# प्रार्थना...

माझे पितृदेव प. पू. श्री रामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज यांच्या श्रीदासरामगाथेतील काही निवडक अभंग, पदे माझे बंधू व गुरुबंधू श्री अनिलप्रभू रामराय केळकर तथा प्रभूराज यांनी एकत्र केले व आत्मारामपाठ असे नाव दिले व त्यावर विवरण केले आहे.

श्रीदासराममहाराजांनी लिहिलेली पदे, अभंग त्यावर 'आत्मा वै पुत्र नामासी' या न्यायाने श्रीप्रभूराज यांनी विवरण लिहिले आहे व ते तितकेच महत्वाचे आहे. त्याच्या पठणाने आपल्याला आत्मदर्शन होईल आणि तसे ते व्हावे अशी प्रार्थना प.पू.श्रीदासराममहाराजांचे चरणी करतो.

शेवटी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर, माझे पितृदेव श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी प्रार्थना करतो की श्रीप्रभूराजांचे हातून अशीच वाङ्‌मयीन सेवा घडत रहावी व त्याचा उपयोग साधकांना व्हावा. यापेक्षा काय लिहू !

भगवान श्रीसद्‌गुरु श्रीगुरुलिंगजंगममहाराजांचे पासून चालत आलेल्या या संप्रदायातील सद्‌गुरु परंपरेला अभिवादन करून या ठिकाणी थांबतो.

॥राजाधिराज श्रीसद्‌गुरुनाथमहाराज की जय॥

सांगली
१७/६/२०१५
अधिक आषाढ प्रारंभ

श्रीदादांचा कृपाभिलाषी
**चंद्रशेखर रामराय केळकर**



# प्रस्तावना ...

माझे मित्रवर्य श्री. अनिलप्रभू केळकर यांनी लिहिलेल्या ''आत्मारामपाठ'' या ग्रंथास प्रस्तावना लिहिताना मला खूप आनंद होत आहे. यापूर्वी त्यांनी 'हरीपाठ संकीर्तन', 'श्रीज्ञानेश्वरीप्रसाद', 'तो हा दासबोध' व 'चैतन्यब्रह्म' असे ग्रंथ प्रस्तुत केलेले आहेत. या ग्रंथाचे विशेष म्हणजे हा ग्रंथ संतश्रेष्ठ श्रीदासराममहाराज यांच्या अभंगावरील विवरण या स्वरुपात आहे. त्यांच्या अभंगात असलेले ज्ञान हे प्रत्यक्ष व अनुभवगम्य स्वरुपाचे आहे. श्रीदासराममहाराजांच्या 'दासरामगाथा' या ग्रंथातील विषय गहन व सखोल स्वरुपाचा असल्याने आकलण्यास कठीण वाटतो. अशा अभंगावर विवरण लिहिणे हे सोपे काम नाही. श्रीदासराममहाराज म्हणजेच श्रीदादांचे सुपुत्र असलेले श्रीअनिलप्रभू हे त्यांचे कृपांकित आहेत. त्यांनी अशा कठीण विषयावर सोपे आणि बुध्दीस पटेल असे विवरण लिहिल्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. अत्यंत अभ्यासपूर्णपणे लिहिला गेलेला हा ग्रंथ दादांच्या अभंगातील वर्म विशद करणारा ठरला असून सर्व प्रकारच्या परमार्थप्रेमींना उपयोगी पडणारा असा झाला आहे.

श्रीदादांनी श्रीज्ञानदेव-तेहेतिशी, ज्ञानेश्वरीतील सहावा अध्याय यासारख्या योगमार्गातील सिध्दांताची फोड करून त्यातील गूढ उकलणाऱ्या टीका लिहिल्या आहेत. तसेच त्यांचे स्वतंत्र लेखनही पुष्कळ आहे. अशा स्वतंत्र लेखनापैकी श्रीदादांना स्फुरलेल्या पद - अभंगांचा संग्रह म्हणजे 'दासरामगाथा' होय. अद्वैत तत्वज्ञानावर आधारलेल्या या ग्रंथामध्ये सद्‌गुरुमहात्म्य, साधन, साक्षात्कार, प्रासंगिक असे अनेक विषय आलेले आहेत. एका सिध्दाची ही सिध्दवाणी आहे. साधक व मुमुक्षूंना मार्गदर्शक ठरणाऱ्या दासरामगाथेचे

सार्थ शब्दात वर्णन करावयाचे झाल्यास संतश्रेष्ठ नामदेवांच्या शब्दात ते असे करता येईल.

''अध्यात्मविद्येचे दाविलेसे रूप।
चैतन्याचा दीप उजळविला॥''

श्रीदासरामगाथेतील प्रत्येक अभंग म्हणजे 'चैतन्याचा दीप' आहे आणि अशा चैतन्यदीपाच्या प्रकाशात अध्यात्मविद्येचे रूप प्रकट झालेले आहे. मौलिक ज्ञान ओतप्रोत भरलेल्या श्रीदासरामगाथेतील अनेक अभंगामधून श्री. अनिलप्रभू यांनी वीस निवडक अभंग विवरणासाठी घेतले आहेत. निवडलेल्या त्या वीस अभंगांमध्ये विविध विषय आलेले आहेत. विषयांच्या अभ्यासाच्या दृष्टीने या वीस अभंगांचे दोन भाग पाडता येतील. अभंग क्रमांक एक ते अकराचा पहिला विभाग व बारा ते एकवीस अभंगांचा दुसरा विभाग. ग्रंथातील विषयांचा आढावा घेण्यासाठी असे दोन विभाग केलेले असून ही विभागणी काटेकोर स्वरुपाची नाही. कारण साधनमार्गासारखे कांही विषय दोन्ही विभागामध्ये आलेले आहेत.

ज्या आत्मचैतन्याच्या सत्तेवर हे शरीर चालते त्याकडे आपले लक्ष नसते. आपले लक्ष केवळ शरीराकडे असते. आपले लक्ष अंतरंगाकडे - चैतन्याकडे वळावे या हेतूने लिहिलेल्या पहिल्या अभंगाचे विवेचन यात आलेले आहे. शरीर, मन, चित्त व बुध्दी हे आपल्यापेक्षा वेगळे आहेत. दुसऱ्या अभंगामध्ये शरीर, मन, चित्त व बुध्दीच्या पलिकडे असलेला 'खरा मी' कोण आहे याचे चिंतन आलेले आहे. अभंग तीन व चार मध्ये या खऱ्या मी च्या शोधासाठी कोणते साधन करावयाचे हे सांगितले आहे. मनबुध्दीला अगोचर असलेल्या खऱ्या 'मी' च्या शोधासाठी देहाचे विस्मरण आणि केवळ चैतन्याचे स्मरण म्हणजे



नामस्मरण हवे. हे सर्व साधण्यासाठी श्वासोच्छ्वासाचे साधन कसे करावे व त्याचे महत्व काय आहे याचे स्पष्टीकरण फारच चांगले झाले आहे. पाचव्या अभंगामध्ये खऱ्या अर्थाने विश्वधर्म ठरावा अशा स्वधर्माची चर्चा आली आहे. सर्वांच्या अंतरंगात असणारा व ज्याच्यावर आपली धारणा आहे असा 'आत्मा' हाच खरा धर्म असून नाम हाच त्याचा खरा आचार आहे हे सविस्तरपणे सांगितले आहे. अशा स्वधर्माच्या आचरणासाठी शब्दब्रह्म ओंकाराचा अनुभव कसा घ्यावा व श्वासोच्छ्वासाचे साधन हे प्रणव प्रकट करणारे कसे आहे हे सहाव्या अभंगाच्या विवेचनात मांडलेले आहे. पुढील सात ते नऊ या अभंगांमधून स्वरुपाकार झालेल्या विदेही संतांच्या अंतरंग स्थितीचे विवेचन अत्यंत सूक्ष्मपणे व अत्यंत मार्मिकपणे केले आहे. अभंग क्रमांक दहा व अकरामध्ये परमार्थातील कर्ममार्ग, ज्ञानमार्ग, योगमार्ग व भक्तीमार्ग व चार संप्रदाय - श्रीसंप्रदाय, स्वरुपसंप्रदाय, चैतन्यसंप्रदाय व आनंदसंप्रदाय या सर्वांचा सद्‌गुरुंनी सांगितलेल्या साधनांच्या अभ्यासाने कसा लाभ होतो व तो साधक कसा परमात्मस्वरुप होऊन जातो, हा विषय सुलभप्रकारे मांडलेला आहे.

ग्रंथाच्या दुसऱ्या भागामध्ये कांही खोल व गहन विषय आलेले आहेत. शेवटच्या एकविसाव्या प्रकरणात परमार्थात नेहमी येणाऱ्या संकल्पना - उदा. उन्मनी, चित्कळा इत्यादी संबंधी दासरामगाथेतील अवतरणे दिलेली आहेत. दुसऱ्या भागातील सुरुवातीच्या बारा ते चौदा या तीन अभंगांमधून सद्‌गुरुंचे महात्म्य व सद्‌गुरुबोध, परमार्थासाठी लागणारे शुध्द आचरण तसेच नामसाधनेचा अभ्यास व त्याचे महत्व यांचा उहापोह विस्तृतपणे केलेला आहे. अभंग पंधरा व सोळामध्ये पवनसिध्दी व निर्विकल्प अवस्था असे परमार्थातील महत्वाचे विषय आलेले आहेत. पवनसिध्दी कशी प्राप्त करून घ्यावी आणि अशी

पवनसिध्दी साधल्यानंतर येणाऱ्या निर्विकल्प अवस्थेत तो महात्मा कसा चैतन्यरूप होऊन जातो याचे वर्णन आलेले आहे. यानंतर अभंग सतरा, अठरा व एकोणीसमध्ये ''डोळा उघडणे'' व ''चत्वारदेह निरसन'' असे परमार्थातील गूढ व अत्यंत महत्वाचे विषय आलेले आहेत. खरा ज्ञानाचा डोळा सद्‌गुरुकृपेने उघडल्याने चत्वार देहाचा निरास होऊन अद्वैताचा अनुभव कसा येतो हा केवळ अनुभवगम्य विषय आहे. अशा महत्वाच्या विषयावरील चिंतन अत्यंत उद्‌बोधक झाले आहे. विसावा अभंग हा या ग्रंथातला सर्वात महत्वाचा भाग आहे. श्रीदासरामगाथेतील सदानंदपाठातील हा अभंग अध्यात्मसाधनेचे सार प्रकट करणारा आहे. हे गुरुकृपेचे फळ आहे. श्वासाच्या साधनेचे रहस्य प्रकट करणारा हा अभंग साधकांना अत्यंत उपयोगी पडणारा आहे. साधनेच्या अभ्यासाने होणाऱ्या प्रगतीचा आलेखच या अभंगातून मांडलेला आहे. चैतन्यरूप नामाच्या अनुभवासाठी अभ्यासाने निःश्वासाचे प्रमाण कमी झाले असता येणाऱ्या अनुभवांचे विवेचन अत्यंत वाचनीय झाले आहे.

हा ग्रंथ वाचताना कांही विशेष जाणवणाऱ्या गोष्टी नमूद कराव्याशा वाटतात. श्री. अनिलप्रभू यांची विषय विवेचन करण्याची एक विशिष्ट पध्दत दिसून येते. अभंगाच्या अंतरंगात शिरून श्रीदादांना अभिप्रेत असलेला विषय किती महत्वाचा आहे, हे ते अनेक प्रकाराने पटवून देतात. विषयाच्या अशा प्रकारच्या मांडणीसाठी ते अनेक प्रकारचे संदर्भ देतात. अभंग क्रमांक चार व सतरा मध्ये कैवल्यउपनिषद व कठोपनिषदाचा उल्लेख आलेला आहे. परमार्थामध्ये गुरुंचा असलेला अनन्यसाधारण महिमा हा अत्यंत जिव्हाळ्याचा असा विषय आहे. त्यामुळे सद्‌गुरुंच्या विषयीच्या विवेचनामध्ये गुरुगीतेतील गुरुंचे



स्वरुप सांगणारे वर्णन आलेले आहे. गुरुंचे महात्म्य सांगताना, श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या गुरुलिंगगीतेमधील अनेक पदांचा उल्लेख आलेला आहे. श्रीदादांच्या विषयातले वर्म उलगडून दाखवताना आद्य कवी मुकुंदराज, श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्यापासून श्रीतुकाराममहाराज, श्रीसमर्थरामदासस्वामी अशा अनेक संतांची वचने तसेच चिमड संप्रदायातील संत, श्रीचिमडचे महाराज, श्रीतात्यासाहेब-महाराज कोटणीस व श्रीमामामहाराज यांची वचने देखील जागोजागी दिसून येतात. विवेचनाच्या ओघात आलेल्या ह्या संतवचनांमुळे अभंगामधील आलेल्या विषयाचे आकलन अधिक सुस्पष्ट होण्यास मदत झालेली आहे. एकूणच या विवरणात संप्रदायिक साधन व तत्वज्ञान यांची उकल साध्या सोप्या शब्दात तसेच अत्यंत उद्‌बोधकरित्या व परिणामकारक पध्दतीने झालेली आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

या ग्रंथाच्या वाचनाने श्रीदासराममहाराजांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच या वाचनाने साधकांना परमार्थाचा लाभ निश्चित होईल. माझ्या हातून श्रीदासरामगाथेतील अभंगांवरील या ग्रंथास प्रास्ताविक सेवा घडावी, ही सद्‌गुरु दासराममहाराजांची कृपा आहे. पुन्हा एकदा भगवान सद्‌गुरु निंबरगीकरमहाराज व सद्‌गुरु श्रीदासराममहाराज यांचे पुण्यस्मरण करून थांबतो.

स्थळ : सांगली
दिनांक : २७/७/२०१५
आषाढी एकादशी

दादांचा चरणरज,
**नारायण देशपांडे**

## ग्रंथासंबंधी ...

श्रीदासरामगाथेतील मी निवडलेल्या २० अभंगांच्या समुहाला, पाठाला 'आत्मारामपाठ' असे नाव देण्यात आले आहे. ती. प.पू. आण्णांचे सांगणेवरून नित्यपठणार्थ हे वीस अभंग माझेकडून निवडले गेले आहेत. यातील एकोणीस अभंग एका चालीत म्हणता येतील असे असून, एकच 'वारे भरले या नयनात' हा अभंग वेगळ्या चालीत, जी आपणा सर्वांना अवगत आहे, म्हणता येतो.

अनंत युगाचा आत्माराम हाच आमचे ती. प. पू. दादांचे दृष्टीने 'राम' होता.हा आत्माराम कसा महत्वाचा आहे, तो कसा आहे, संतांनी तो कसा अनुभवला, या आत्म्याला जाणणे हाच आपला खरा धर्म असून आपल्या प्रकृतीप्रमाणे, आवडीप्रमाणे संप्रदाय निवडून, संतांना गुरुस्थानी मानून साधन मार्गाने कसा आत्मा अनुभवता येतो, अनुभवाप्रमाणे आपले साधन किती झाले आहे, किती शिल्लक आहे, हे सांगणारे हे वीस अभंग आहेत.

या वीस अभंगांचे कीर्तन स्वरुपात विवरण यथाशक्ती, यथामती करणेचा प्रयत्न माझेकडून झाला आहे. विवरणातील जे काही चांगले आहे, तुम्हाला आवडणारे आहे, ते सारे ती. प. पू. दादांचे आहे. लिखाणात एखादा शब्द अधिक उणा झाला असल्यास तो दोष सर्वस्वी माझा आहे. तरी ''न्यून ते पुरते। अधिक ते सरते। करुनी घेयावे तुमतें। विनवितु असे।।'' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात मी आपणास विनंती करीत आहे.

या ग्रंथाचे निमित्ताने माझे ज्येष्ठ व श्रेष्ठ बंधू ती. प. पू. आण्णा यांनी श्रीमहाराजांची केलेली प्रार्थना मजसाठी व आपणा सर्वांसाठी



फलप्रद ठरणारीच आहे. मी त्यांचा आभारी आहे. तसेच माझे मित्र श्रीनारायणराव देशपांडे यांनी मोठ्या आपुलकीने अभ्यासपूर्ण प्रस्तावना या ग्रंथासाठी लिहिली आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

हा ग्रंथ निर्दोष स्वरुपात प्रसिध्द व्हावा म्हणून श्रीदासराम-महाराजांचेवर निष्ठा असणारे माझे मित्र श्री. रमेशराव लाळे यांनी अपार कष्ट घेतले आहेत. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद देतो. या ग्रंथाचे संदर्भात श्री. मधुकर काटकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. मी त्यांचा आभारी आहे. ग्रंथाचे मुद्रण अत्यंत आपुलकीने व सुबकपणे करण्याचे काम श्री प्रसाद ग्राफिक्सचे सौ. व श्री. प्रसाद पटवर्धन यांनी केले आहे, त्यांना शतशः धन्यवाद !

विसावा प्राप्त करून देणाऱ्या वीस अभंगांचे विवरणाचे प्रकाशन वीस तारखेलाच होत आहे हे मोठे विशेष आहे. अशा या आत्मारामपाठाच्या वीस अभंगांचे पठणाने मला व आपणा सर्वांना विसावा प्राप्त व्हावा, आत्मदर्शन व्हावे अशी प्रार्थना माझे सद्गुरु श्रीदासराममहाराज यांना करतो व त्यांचे कृपेने स्फुरलेले, पूर्णत्वाला गेलेले अभंगावरील विवरण माझे पितृदेव ती. प. पू. श्रीदादा व माझी आई ती. प.पू. सौ. सीतावहिनी यांचे पवित्र चरणी स्मरणपूर्वक अर्पण करतो.

**- अनिलप्रभू रामराय केळकर**

स्थळ : सांगली
आषाढी एकादशी
दिनांक : २७/७/२०१५

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | घोटूनी मातीचा दिलासे मुलामा.............. | १ |
| २) | शरीरासी जावे लागते टाकून ................. | १४ |
| ३) | जयाचेनी ज्ञान जयाचेनी भान ................ | २९ |
| ४) | नेत्राविण देखे श्रोत्रावीण ऐके................. | ४० |
| ५) | सर्वांचे अंतरी धर्म तो सारखा................. | ५१ |
| ६) | अकार स्थिरत्वे उकारी मिळता............... | ५८ |
| ७) | संत तो अद्वैती समरस झाले.................... | ६९ |
| ८) | तबला ना पेटी  झांज ना मृदंग................. | ८० |
| ९) | आहे ते खोटे नाही ते मोठे.................... | ८६ |
| १०) | कर्ममार्गे जाणा होय चित्तशुध्दी............... | ९४ |
| ११) | स्वरुप संप्रदायी स्वरुप साक्षात्कार........... | १०३ |
| १२) | गुरु जगी थोर बोलतसे श्रुती................. | ११५ |
| १३) | कृतीवरी क्रिया क्रियेवरी साधन............. | १२६ |
| १४) | नामाचे साधन अखंड स्मरण ............... | १३१ |
| १५) | प्राणाचा मनाचा एक लय होता ............. | १३८ |
| १६) | कल्पना सरता होय निर्विकल्प.............. | १४४ |
| १७) | उघडिया डोळा अंधार दडाला ............. | १५० |
| १८) | वारे भरले या नयनात ...................... | १५७ |
| १९) | अष्टधेचे ज्ञान स्थूल देही जाण.............. | १६५ |
| २०) | सर्वसाधारण अठरा ते वीस................. | १७८ |
| २१) | अभंग वचनामृत .......................... | १८७ |


आत्मारामपाठ

## सोऽहं देवाची आरती

सोऽहं श्रीदेवाला सोऽहंची आरती।
सोऽहं स्वरुप सद्गुरु करु सोऽहं भक्ती॥
सोऽहं माध्यम होता सोऽहंमय वृत्ती।
सोऽहं स्फुरणी स्फुरते सोऽहं ज्ञानस्थिती॥१॥
जय देव जय देव जय सोऽहं देवा।
हंसारूढ तू दिससी तव सोऽहं सेवा॥धृ॥
सोहं विश्वी सोहं माया ब्रह्मस्थिती।
जीव शिव सोऽहंमाजी एकत्वे वसती।
सोऽहं समाधि सोऽहं स्मरणी ये निगुती।
सोऽहं ऐसे साधन नाही त्रिजगती॥२॥
सोऽहं गतीच पहाता सोऽहं ध्यान घडे।
सोऽहं स्वरुप समाधी संदेहोचि उडे।
देहभाव हा हरवुनी सोऽहं भाव जडे।
सोऽहं दासरामी सोऽहं सुख जोडे॥३॥

**श्रीदासराममहाराज**

---

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती दासरामा। नित्य कीर्तन सप्रेमा।
प्रल्हाद अवतार। हनुमंत शिष्योत्तमा॥धृ॥
गुरुलिंगगीता श्रवणी। आपण धन्यची झाला।
वायू साधनाने। जीवन्मुक्त होऊनी ठेला॥१॥
निर्याणाचे वेळी। कीर्तन स्मरण।
अनिलासी जहाली। अनिलाची आठवण॥२॥

**– अनिलप्रभू रामराय केळकर**

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

卐

**।। श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प ६० वे ।।**

# आत्मारामपाठ

(विवरणासह)

卐

**अनिलप्रभू रामराय केळकर**

आवृत्ती पहिली सांगली इ.स. २०१५




■ **प्रकाशक**
अनिलप्रभू रामराय केळकर
घर नं. ८२७, 'श्रीराम निकेतन'
श्रीबापूरावजी केळकर वाडा, गांवभाग
सांगली ४१६ ४१६.
भ्रमणध्वनी : ९८९०२२४१८६

■ **प्रथम आवृत्ती – २०१५**

■ **प्रकाशन दिन**
श्रीदासराममहाराज पुण्यतिथी
२०/८/२०१५


■ सर्व हक्क प्रकाशकाधीन


■ **मुद्रक**
श्री प्रसाद ग्राफिक्स
तळमजला, चाफळकर कॉम्प्लेक्स,
सांगली.

■ प्रसाद मूल्य – १००/–

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | श्रीदासरामगाथा | श्रीदासराममहाराज |
| २. | अमृतवाणी | श्रीमामामहाराज केळकर |
| ३. | श्रीगुरुलिंगगीता | प्रका. श्री. वि. सहस्त्रबुध्दे |
| ४. | श्रीगुरुलिंगगीता | प्रका. चं. रा. केळकर |
| ५. | गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग १ व २ | नारायण देशपांडे |
| ६. | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | संपा. प्रा. डॉ. के. वा. आपटे |
| ७. | श्रीरामनिकेतनमधील आराधना | संपा. प्रा. डॉ. के. वा. आपटे |
| ८. | सन्मार्ग दीप | समर्थ भक्त |
| ९. | श्रीदासराममहाराज यांची प्रवचने | संपा. प्रा. डॉ. के. वा. आपटे |
| १०. | चांगदेव पासष्टी आणि इतर ग्रंथ | संपा. प्रा. डॉ. के. वा. आपटे |
| ११. | तो हा दासबोध | अनिलप्रभू रामराय केळकर |
| १२. | श्रीज्ञानेश्वरीप्रसाद | अनिलप्रभू रामराय केळकर |
| १३. | हरीपाठ संकीर्तन | संपा.अनिलप्रभू रामराय केळकर |
| १४. | अभंग दरबार | संपा. दीपक चंद्रशेखर केळकर |
| १५. | नारायणीय शिष्यप्रबोध | संपा. व्यं. रा. मोहोळकर |
| १६. | श्रीएकनाथी भागवत | श्रीनाथमहाराज |
| १७. | श्रीभावार्थरामायण | श्रीनाथमहाराज |
| १८. | सार्थ विवेकसिंधू | डॉ. म. वि. गोखले |







| | | |
|---|---|---|
| १९. | परमामृत | श्रीमुकुंदराजमहाराज |
| २०. | उपनिषद्रहस्य | गुरुदेव रा. द. रानडे |
| २१. | कैवल्योपनिषद् | स्वामी चिन्मयानंदकृत भाष्य |
| २२. | सार्थ विवेकचुडामणी | नानाभाई स. रेळे |
| २३. | कठोपनिषद | स्वामी चिन्मयानंद |
| २४. | सार्थ श्रीगुरुगीता | प्रका. विनयानंद चॅरिटेबल होम |
| २५. | शिवस्वरोदय | संपा. अलंकार भारती |
| २६. | जीवनगीता भाग १० | न्या. राम केशव रानडे |
| २७. | अध्यात्म संवाद भाग ४ | प्रा. के. वि. बेलसरे |

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग १

*घोटूनी मातीचा दिलासे मुलामा ।*
*तयावरी प्रेमा करितोसी ।। १ ।।*
*पापाचे बनले जाण हे शरीर ।*
*असत्य असार सांगितले ।। २ ।।*
*देहामध्ये आहे मुख्य आत्मा जाण ।*
*तेणेची पावन आहे देह ।। ३ ।।*
*लक्ष ठेवोनिया आत्म्यावरी राही ।*
*प्रेमे नाम गाई अखंडीत ।। ४ ।।*
*गोविंदतनय म्हणे या जगती ।*
*धरी अनासक्ती म्हणिजे बरे ।। ५ ।।*

– (दासरामगाथा अ.क्र.४५८)

व्यवहार हा बहिरंगावर चालतो, अंतरंगावर नाही. पंचज्ञानेंद्रियांचे–मार्फत जे काही आकाराचे – उपाधीचे – द्वैताचे – तुटपुंजे विपरीत ज्ञान होते, त्याच्यावर मदार ठेवून व्यवहार होतो. 'चक्षुर्वैसत्यम' असे मानणारी आपण माणसे, जे आपल्याला, चर्मचक्षुंना द्वैत दिसते, इंद्रियांना जाणवते, मनाला भासते, तेच आपण सत्य मानतो व त्याचे आधारे व्यवहार घडतो. या उलट परमार्थ हा अंतरंगावर चालतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात –

*'तैसे अध्यात्मशास्त्री इये । अंतरंगचि अधिकारीये ।*
*परी लोकू वाक्चातुर्ये । होईल सुखिया ।।१८ /१७५० ।।''*

पंचज्ञानेंद्रियांचेमार्फत होणाऱ्या ज्ञानावर परमार्थ चालत नाही. आपल्या इंद्रियांना फक्त बहिरंगाचेच ज्ञान होते. अंतरंगात त्यांचा प्रवेशच होऊ शकत





नाही. हे जे इंद्रियांना ज्ञान होते, ते ज्ञान कोणाला होते, कोणाचे होते याच्यावरच परमार्थाची मदार असते. अहो, जाणणारा आहे म्हणून जाणीव–ज्ञान होते. म्हणजे महत्वाचा जाणणाराच ना ?

आमचे जे ऊसाबद्दलचे प्रेम आहे ते तो वाकडा आहे का सरळ आहे यावर अवलंबून असते का ? का आमचे प्रेम त्याचे आत मधूर रस आहे म्हणून असते? हा येथे प्रश्न आहे. ऊसाचा आकार पाहून त्यावर प्रेम करणे हा झाला व्यवहार व आकाराला महत्व न देताना त्याचे आत असणाऱ्या मधूर रसावर प्रेम करणे हा परमार्थ. *''ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा ।''* हा संतश्रेष्ठ चोखामेळ्यांचा प्रश्न परमार्थातील अंतरंगाचे महत्व दाखविणाराच आहे.

मुलगी गोरी आहे, मिळवती आहे, आपल्याला अनुरूप आहे हे पाहून प्रेम करणे हा व्यवहार झाला. ती कुणामुळे गोरी दिसते आहे ? कुणामुळे रया आहे चेहऱ्यावरती ? हे पाहून त्याच्यावर प्रेम करणे हा परमार्थ आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''अंग गोरे आणि तरुणे। वरी लेइले आहे लेणे। परी येकलेनी प्राणे। सांडिले जेवी।।१८ /१५०१ ।।'' ''वमिलिया अन्ना। लाळ न घोटी जेवी रसना। अंग न सूये आलिंगना। प्रेताचिया।।१३ /५१४ ।।''* मस्त अंग गोरे आहे, तरुण आहे, दागिन्यांनी मढलेली आहे पण आत फक्त प्राण नाही आहे, चालेल का? तिला कोण मिठी मारेल का ? हा ज्ञानेश्वरमहाराजांचा प्रश्न आहे. माझा नाही. कुणावर प्रेम करतो आपण ? शरीरावर प्रेम करत असशील तर शरीर तर समोर आहे, अगदी दागिन्यांनी मढविलेले आहे, प्रेम करता येते का ? कोण कुणावर प्रेम करते ? चैतन्य हे चैतन्यावर प्रेम करते. सर्वत्र सारखे असणारे चैतन्य अनुभवले की अद्वैत आहे. शरीर पाहिले, आकार पाहिला की द्वैत आहे. शरीर पाहून, उपाधी पाहून होतो तो व्यवहार, तर चैतन्य अनुभवून होतो तो परमार्थ. शरीर अनुभवून होणाऱ्या परमार्थाची गणना व्यवहारातच होते तर चैतन्य पाहून होणाऱ्या

व्यवहाराची परमार्थात गणना होते. द्वैतानुभवात होतो तो व्यवहार, अद्वैतानुभवात होतो तो परमार्थ. म्हणून परमार्थ करणेसाठी अद्वैत अनुभवणे महत्वाचे. पण अद्वैत असणाऱ्या परमार्थात जर व्यवहार शिरला, द्वैत माजले तर तो त्या साधकाला खड्ड्यात घातल्याशिवाय रहात नाही, असे आमचे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगायचे. आमचे श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी सर्वत्र अद्वैत अनुभवले, म्हणून त्यांचा परमार्थ हा खरा परमार्थ होता. *''एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही। अद्वैताचे सुख ते निश्चळ निर्गुण शोधुनी पाही।।''* हे आमचे चिमडचे महाराजांचे वचन यातील गौप्य प्रगट करणारेच आहे.

आम्हाला जर परमार्थ करायचा असेल तर देहाकडे, उपाधीकडे लक्ष ठेवून चालणार नाही तर त्याचे आत जे गुप्तरुपाने चैतन्य आहे, जे सर्वत्र व्यापले आहे, जे संतांनी अनुभविले आहे, तिकडे लक्ष द्यावे लागेल. जगाचे अनुसंधान न ठेवताना जगदंतरी अनुसंधान ठेवावे लागेल. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''या उपाधिमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्विकारिती ।।२/१२६ ।।''*

आपल्याला परमार्थ करायचा आहे असे गृहित धरून आमच्यासारख्या परमार्थेच्छुक जनांना आपले लक्ष अंतरंगाकडे, चैतन्याकडे वळावे या हेतूने श्रीदासराममहाराज अभंगाचे पहिल्या कडव्यात सांगत आहेत, *''घोटूनी मातीचा दिलासे मुलामा। तयावरी प्रेमा करतोसी।''* आपले शरीर हे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांपासून बनलेले आहे. त्याला माती घोटून गिलावा केलेला आहे, म्हणून ते पाहण्यासारखे झालेले आहे. पण हा कच्च्या मातीचा बंगला कधी ढासळेल हे सांगता येत नाही. ज्याचा विश्वास आपण बाळगतो, ते शरीर अविश्वासाचे बनले आहे. जरा वरचा गिलावा खरडून पहा, त्याचा ओंगळपणा जाणवल्याशिवाय रहाणार नाही. समर्थ म्हणतात,





*''वरीवरी दिसे वैभवाचे। अंतरी पोतडे नर्काचे।*
*जैसे झाकणे चर्मकुंडाचे। उघडिताच नये।।* ३/१/१४ ।।''

*''अस्तीपंजर उभविला। सीरा नाडी गुंडाळीला।*
*मेदमांसे सरसाविला। सांदोसांदी भरोनी।।* ३/१/१६ ।।''

ही जी शरीराला रया आहे, शरीरावर जे तेज आहे, ते कुणामुळे आहे ? निजत्व आहे तोवर हे तेज आहे. तेजावरून निजत्वाची ओळख होते. काळाकुट्ट माणूस असू दे, शरीरात चैतन्य असेतोवर त्याचे शरीरावरसुध्दा एक रया असते. तेच आतील चैतन्य निघून गेले, कितीही गोरापान माणूस असू दे, तो काळा ठिक्कर पडतो. चैतन्य आहे तोवर शरीराला उबदारपणा, हलकेपणा असतो. चैतन्य आहे तोवर शरीराची हालचाल. आत चैतन्य असल्याने शरीरावर असणारी रया, शरीराचा आकर्षकपणा, आकर्षणाला कारणीभूत ठरतो. पण आमचे प्रेम मात्र शरीरावर असते. *''निजाचे तेज की तेजाचे निज। येथील ते गूज सांगा मज।।''* व *''जव या वायूचा प्रकाशू। तव या भांडीयाचा विश्वासू।। वायो निघोनिया गेला। तव तो झाला उदासू रया।।''* ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने वायुरूप चैतन्याचे महत्व दाखविणारीच आहेत. अहो, आत चैतन्याचे वारे आहे तोवरच या अविश्वासी शरीराचा विश्वास. असे असताना आमचे प्रेम मात्र शरीरावर, चैतन्यावर नाही. गंमत आहे की नाही माणसाची ?

आमचे प्रेम चैतन्यावर का नसते ? शरीरावर का असते ? कारण आम्हाला आत असणाऱ्या चैतन्याची जाणीव होत नाही. जाणीव होते ती शरीराचीच. चैतन्यातून जडाची निर्मिती होते. जडापासून कधीही जड निर्माण होत नाही. आत्म्यापासून देह तयार होतो व त्यात आत्मा प्रविष्ठ झाला की देहाचा जन्म होतो. अहो, आईवडिलांचे ठिकाणी चैतन्य असेल तरच मुलाचा जन्म होऊ शकतो. चैतन्य नसलेल्या आईबापाला मुले कधी होत नाहीत. म्हणून वायुरूप चैतन्य हेच खरे आपले आपले आई आणि वडील. देहाच्या

आश्रयाने आत्मा राहतो. देह आणि आत्मा एकत्र आल्याने सृष्टीचा कारभार चालला आहे. आत्म्यामुळे देहाचे अस्तित्व आहे. आत्म्यामुळे देहाची जाणीव आहे.पण देहाच्या जाणीवेने आम्हाला आत्म्याची जाणीव कधीच होत नाही. आत्म्याशी आमची वागणूक परक्याप्रमाणे राहते. आत्मा हा सर्वात जवळचा असताना देखील त्यामानाने लांब असणारा देह हाच आम्हाला जवळचा वाटू लागतो. रेल्वेतून प्रवास करताना दिसणारे डोंगर वस्तुत: लांब असताना जवळ असल्यासारखे वाटतात, तर आपल्या अगदी जवळ असणारे आकाश आम्हाला लांब वाटते. असेच काहीसे शरीर व आत्म्याचे बाबतीत होते.

आत्मा हा स्थूल शरीराच्या डोळ्यांना न दिसणारा, स्थूल शरीराच्या कानांना न ऐकू येणारा, स्थूल शरीराच्या जिभेला न चाखता येणारा, स्थूल शरीराच्या त्वचेला न स्पर्शता येणारा, स्थूल शरीराच्या नाकाने न वास घेता येणारा, मन, बुध्दीला अगोचर असल्याने तो या ज्ञानाचा (पदार्थ) विषय होऊ शकत नाही. अर्थात तो शब्दाने वर्णन करता येत नाही. कारण पंचज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त होणारे ज्ञान व मनाला भासणारा भास यांचेच वर्णन शब्दात करता येते. आत्मा हा प्रयोगी (प्रयोग करणारा) असल्याने तो प्रयोगाने जाणता येत नाही. म्हणून तो आहे की नाही, असा संभ्रम निर्माण होतो. चैतन्याची जाणीव न झाल्याने आपल्या खऱ्या स्वरुपाच्या विस्मरणाने, देहतादात्म्याने चैतन्य 'देहच मी' असे मानून देहरुपाने वावरू लागते. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*''तैसे आपुलेनी विसरे। चैतन्यचि देहाकारे।*
*आभासोनि अविष्करे। देहपणे जे ॥* १८/३२४ ॥''

अशा 'देह म्हणजे मी' असे मानणाऱ्या लोकांना श्रीसमर्थ रामदास 'आत्महत्यारा' असे संबोधतात.

*''देह मी वाटे ज्या नरा। तो जाणावा आत्महत्यारा।*





*देहाभिमाने येरझारा। भोगिल्याच भोगी ॥* ५/६/५५ ॥''

– श्रीसमर्थ

तर श्रीज्ञानेश्वरमहाराज अशा लोकांना 'आत्मघातकी' म्हणतात.
*'' एरव्ही कोशकीटकाचिया परी । तो आपण या आपण वैरी ।*
*जो आत्मबुध्दी शरीरी। चारुस्थळी ॥*६/७२ ॥''

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

तर श्रीनाथमहाराज अशा देहाभिमानी लोकांना 'मूर्ख' असे संबोधतात. श्रीनाथमहाराज सांगतात, *'केवळ नश्वर देह देख। तो मी म्हणोनि मानी हरीख। देहाभिमाने भोगी नरक। यापरता मूर्ख कोण आहे ॥ १९/५२३ ॥''*

आपण चैतन्याची जाणीव व्हावी यासाठी देहामार्फत प्रयत्न करतो. देह हे आत्म्याचे घर आहे. मग गृहाला गृहस्थाची जाणीव कशी होणार? अर्थात देहामार्फत चैतन्याचे जाणीवेसाठी होणारे प्रयत्न सारे निष्फळ ठरतात. चैतन्याची जाणीव होत नाही. मग चैतन्य आहे का नाही हा प्रश्न तसाच शिल्लक राहतो.

मनुष्य शरीररक्षणासाठी घर बांधतो. त्या घराबद्दल आत्मियता बाळगतो. पण घर म्हणजे तो माणूस असे कधी होत नाही. तो त्या घरापेक्षा वेगळाच असतो ना ? घराला कधीही मनुष्याचे ज्ञान होत नाही ना ? मग घराला ज्ञान होत नाही म्हणून मनुष्याचे अस्तित्व मानणार की नाही ? बरं घराला मनुष्याचे ज्ञान होत नाही म्हणून मनुष्य नाही असे होत नाही. उद्या घर पडले, आवडेनासे झाले तर मनुष्य घर बदलतो. घर पडले की मनुष्याचे अस्तित्व नाहीसे होत नाही. हे सारे आत्मा (गृहस्थ) व शरीर (घर) यानाही लागू होते. आमचे दृष्टीने जेवढे घराचे महत्व, तेवढेच आत्म्याचे दृष्टीने देहाचे आहे. देहाचेमार्फत आत्म्याचे ज्ञान होत नाही म्हणून त्याचे अस्तित्व न मानणे चुकीचे आहे.

आपल्याला देहाच्या होणाऱ्या जाणीवेने चैतन्याचे ज्ञान होत नसल्याने आपण देहालाच सारसर्वस्व मानतो व देहावर अतोनात प्रेम करतो व चैतन्याशी परक्याप्रमाणे वागतो व हेच एक मोठे पाप घडते. श्रीदासराममहाराज सांगतात, *''देही जे का प्रेम। तेची आहे पापकर्म।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत, *''पापाचे बनले जाण हे शरीर। असत्य असार सांगितले।।''* देहाच्या जाणीवेने चैतन्याची जाणीव होत नाही व चैतन्याबद्दल संशय निर्माण होतो. असा संशय निर्माण होणे हेच मोठे पातक आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात.

*''म्हणऊनि संशयाहूनी थोर। आणिक नाही पाप घोर।''*
*कि जे विनाशाची वागूर। प्राणियासी।। ४/२०३ ।।''*

देहा हा विकारी – बदलणारा असल्याने त्याला असत्य असे म्हटले आहे व देह हा प्रगट असल्याने त्याला असार असे म्हटले आहे. समर्थ म्हणतात, *''प्रगट ते जाणावे असार। आणि गुप्त ते जाणावे सार। गुरुमुखे हा विचार। उमजो लागे।। ६/२/२१ ।।''* देह हा असत्य, असार, पापाचे कारण कसा आहे हे श्रीनाथमहाराज असे सांगतात,

१) *देह तव अत्यंत अशक्त। देहकर्म तेही नाशवंत।*
*कर्मफळ ते क्षयभूत। सुख कोण येथ देहसंगे।।*

२) *देहलोभे आर्तभूत। जो जो विषय सेवीत।*
*तो तत्काळ विष्ठा होत। सुख कोण येथे देहलोभे।।*

३) *देही काळ लागला नित्य। क्षयो करी अहोरात्र।*
*भोगवी जन्ममरणावर्त। सुख कोण येथे देहलोभे।।*

४) *देहा क्षुधेचा मारा नित्य। तृष्णा पीडी जीवनार्थ।*
*देही देहभय निभ्रांत। सुख कोण येथ देहलोभे।।*





५) *ऐके स्वामी साचार। देह तव दुःखाचा डोंगर।*
*देह विकल्पाचा सागर। देह तो महापूर अतितृष्णेचा।।*

६) *देह नित्यमुत्राची नाहणी। देह तव नरकाची खाणी।*
*देह तव पोहाणी घाणी। रोगाची श्रेणी तो देह।।*

७) *देह संदेहाचे सोलीव। देह अहंकाराचे ओतीव।*
*देह विषयाचे भरीव। कृमीचे पेव तो देह।।*

८) *देह द्वंद्वाची निजधरणी। देह दुःखाची निजनिशाणी।*
*देह विकल्पाची पूर्ण भरणी। दरिद्राची अराणी तो देह।।*

९) *देह आशेचा कळवळा। देह अहंकाराचा अंगबळा।*
*देह अहंममतेचा सोहळा। विकाराचा मळा तो देह।।*

१०) *देह अविद्येचे अधिष्ठान। देह संकल्पाचे साजिरे वन।*
*देह मोहकाचे मोहन। मुख्यत्वे अज्ञान तो देह।।*

११) *देह कामाचा पर्वतगडू। देह क्रोधाचा अवघडू।*
*देह दोषाचा दुस्तर आगडू। विनाशाचा मठ तो देह।।*

१२) *देह अपवित्रतेचे मूळ। देह कुश्चळा अतिकुश्चळ।*
*देह अमंगळा अमंगळ। मुख्य विटाळ तो हा देह।।*

१३) *देहसंगामाजी सुख। म्हणती ते केवळ मूर्ख।*
*देहसंग ते केवळ दुःख। गर्भ नरक भोगवी।।*

१४) *देहसंगती अमित दोष। देहसंगती तो श्वानवोक।*
*देह तोची महानरक। परमदुःख देहसंगे।।* (भावार्थरामायण)

१५) *मुळी देहची तव अनित्य। मा तेथिचे भोग काय शाश्वत।*
*परी धन वेचुनी विषयार्थ। भुलले जाणा भ्रांत स्त्रीलोभे।।*
(एकनाथी भागवत)

तर समर्थ देहाचे असत्य, असारपण असे सांगतात,

१) *पाहता शरीराचे मूळ । या ऐसे नाही अमंगळ ।*
*रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्ये जन्म यासी ॥ ३/१/११ ॥''*

२) *अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाची पुतळा ।*
*तेथे निर्मळपणाचा सोहळा । केवी घडे ॥ ३/१/१२ ॥''*

३) *रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा आळोन जाला गाळ ।*
*त्या गाळाचेच केवळ । शरीर हे ॥ ३/१/१३ ॥ ''*

तर श्रीतुकाराममहाराज देहाबद्दल असे सांगतात,

१) *शरीर दुःखाचे कोठार । शरीर रोगाचे भांडार ।*
*शरीर दुर्गंधाचे थार । नाही अपवित्र शरीरा ऐसे ॥*

२) *शरीर विटाळाचे आळे । मायामोहपाशाचे जाळे ।*
*पतन शरीराच्या मुळे । शरीर काळे ग्रासिले ॥*

३) *अविश्वासियासे शरीर सुतकी ।*
*चांडाळ पातकी महादोषी ॥*

या असत्य, असार, पातकी शरीरामध्ये देहापेक्षा वेगळा सत्य असा सारभूत पावन आत्माराम आहे. त्यामुळे हे शरीर पावन झाले आहे हे श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत, ***''देहामध्ये आहे मुख्य** आत्मा जाण । तेणेची पावन आहे देह ॥''*देहामध्ये आत्मा असेल तर त्या देहाला महत्व. नाहीतर कोण विचारतो त्या देहाला ? कोणत्याही गोष्टीतील आत्माराम वजा केला की राहते ते अर्थहीन मृत शरीर. तो नसेल तर साऱ्या त्रैलोक्यात काही रामच राहणार नाही. समर्थ म्हणतात,

*''जेथे आत्माराम नाही । तेथे उरो न शके काही ॥''*
*त्रैलोकीचे प्राणी सर्वही । प्रेतरूपी ॥१६/१०/२५ ॥''*

आत्मा देहामध्ये आहे म्हणून देह पावन मानला जातो. तो शरीरातून





गेला की इतर माणसे त्या मृत शरीराला शिवली की आंघोळ करतात. ते मृत शरीर, आपले शरीरावर कितीही प्रेम असले, तरी घरी कोणी ठेवून घेत नाहीत. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, *'' म्हणती उचला उचला । झणी भूमीभार झाला ॥''*

आत्मा शरीरात प्रविष्ठ झाला, सोहंहंसावरती राम स्वार झाले की हंस उड्डाण खाली वरती करू लागतो. नाडीद्वारा पवन खेळू लागतो. या नाडीद्वारा खेळणाऱ्या पवनामुळे शरीर पावन होते. या पवनाचा उगम – पवनाचे मूळ हा आत्माराम आहे. समर्थ म्हणतात,

*'' आता ऐका पवनाचे मूळ । तो हा अंतरात्माची केवळ ।*
*अत्यंतची चंचळ । सकळामध्ये ॥ १६/७/२ ॥ ''*
*'' नाडीद्वारा धावे जीवन । त्या जीवनामध्ये खेळे पवन ।*
*त्या पवनासरीसा जाण । आत्माही विवरे ॥१३/९/१३ ॥''*

देहामध्ये आत्मा आहे, प्राणाच्या धक्क्यावरती हंस (श्वास) वरती खालती विनासायास करतो आहे, तोवरच ही इंद्रियांची चाके धावतात, शरीर व्यवहार करू शकते, तोवरच शरीरात परमार्थ साधता येतो. आत्मा गेला की व्यवहारही नाही व परमार्थही नाही. व्यवहार व परमार्थ हे दोन्ही आत्म्यामुळे होतात, याची जाणीवच आम्हाला असत नाही. व्यवहार करताना हा व्यवहार कोण करते याची जाणीव जर आम्हाला असेल तर परमार्थ वेगळा करावा लागतच नाही. त्याची जाणीव व्यवहार करताना होत नसल्याने, आपला व्यवहार हा लटका व्यवहारच ठरतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''लटिका व्यवहार सर्व हा संसार । वाया येरझार हरीवीण ॥''*हरीवीण होणारी वाया येरझार, हाच तो लटिका व्यवहार – संसार आहे. बरं, परमार्थ करताना तरी आम्हाला आत्म्याची जाणीव होते का ? हा मोठा प्रश्न आहे. आम्ही जो परमार्थ म्हणून करतो, त्याचा आत्म्याशी कोठे संबध येतो का ? हे ज्याचे त्याने तपासले पाहिजे. संबंध येत नसेल, आत्म्याची जाणीवच होत नसेल, परमार्थ

करताना सतत शरीराचीच जाणीव होत असेल तर त्याला परमार्थ म्हणता येईल का ? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''आत्माची कळला नाही जपतप साधन तीर्थे खोटी गे।*
*ज्ञानदेव म्हणे न सुटती संसाराच्या गोष्टी गे।।''*

तर संतश्रेष्ठ बाबा गर्दे सांगतात,

*''खटपट का बा करतोसी। लटिके नासीक धरतोसी।*
*वरीवरी करीसी गुणगुण। अंतरी नाही निजखूण।।''*

अहो, आत्मा कळला तर तुमच्या व्यवहाराला अर्थ (ध्येय) प्राप्त होतो, तुमच्या परमार्थाला अर्थ (ध्येय) प्राप्त होतो. तो कळला नाही तर कशालाच काही अर्थ नाही असे होते. तो शरीरात आहे तोवर त्याचा व्यवहार व त्याचा परमार्थ कळला तरच देहाचे सार्थक आहे. देह खऱ्या अर्थाने पावन होणार आहे.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''लक्ष ठेवोनिया आत्म्यावरी राही। प्रेमे नाम गाई अखंडीत।।''* आमचे जे आता लक्ष शरीरावरती आहे, दिसणाऱ्या जगाकडे आहे, ते लक्ष आत्म्याकडे द्यायला हवे, जगदंतरी अनुसंधान हवे. समर्थ म्हणतात,

*''प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तु लक्षी अंतरी।*
*आत्मस्थितीची धारणा धरी। या नांव साधक।।*५/९/१६ ।।''

*जगदंतरी अनुसंधान। बरे पाहणे हेची ध्यान।*
*ध्यान आणि ते ज्ञान। येकरूप।।* २०/४/१२ ।।''

आत वळून बघितले पाहिजे. वरवर बघून चालणार नाही, याकरता ज्या श्वासावरून आत्मा असल्याची ओळख पटते, जे श्वास आपल्या अस्तित्वाची ओळख मानली जातात, ज्या श्वासावर आपले आयुष्य मोजले जाते, जे श्वास 'आयुष्याचे साधन' म्हणून ओळखले जातात, त्या श्वासाकडे





लक्ष देणे गरजेचे आहे. या श्वसनाच्या अभ्यासाने, साधनाच्या अभ्यासाने आत्मा हा लक्ष होणार आहे. जे गुप्त आहे ते प्रगट होणार आहे. समर्थ म्हणतात,

१) *येकांती उगेच बैसावे। तेथे हे समजोनी पहावे।*
*अखंड घ्यावे सांडावे। प्रभंजनासी।।* १७/५/६ ।।''

२) *भजन साधन अभ्यास। येणे पाविजे परलोकास।*
*दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे।।*१६/१०/३१ ।।''

३) *गुप्त तेचि प्रगटवावे। असाध्य तेचि साधावे।*
*कानडेची अभ्यासावे। सावकास।।* ६/२/२३ ।।''

या साधनाच्या अभ्यासाने निःश्वासाला काही प्रमाण आले असता नादश्रवण – नामश्रवण घडेल. श्रीदासराममहाराज सांगतात, *''निःश्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सारजप।।''* या सतत होणाऱ्या नादश्रवणाचे ठिकाणी सतत अनुसंधान ठेवले असता, अखंडित नामश्रवण घडले असता, आत्मा हा लक्ष होणार आहे.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''गोविंदतनय म्हणे या जगती। धरी अनासक्ती म्हणिजे बरे।''* जोवर या दृश्य जगाचा आम्हाला अनुभव येतोय, नाना आकाराने जगाची प्रचिती येत आहे, तोवर त्याचा अनुभव येत नाही, आलेला नाही हे पक्के ओळखावे.

*''हे आघवेचि दिसणे । जयाते का न देखणे ।।*
*विश्व भासतसे जेणे। लपालेनी।।* १५/३०९ ।।''

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*''अनुभवेवीण साचा। अनुभव जगताचा''*

– श्रीमामामहाराज केळकर

*''आकार पाहणे, द्वैताचे देखणे।*
*विसरोनी रहाणे आपणासी॥''*
– श्रीदासराममहाराज केळकर

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

हे भिन्न असणारे विश्व, विष्णूमयच अनुभवाला आले पाहिजे.

*''म्हणोनि विश्व भिन्न।*
*परी न भेदे तयाचे ज्ञान।*
*जैसे अवयव तरी आन आन।*
*परी एकेचि देहीचे॥ ९/२५० ॥''*
– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*''विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ॥''*
– श्रीतुकाराममहाराज

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहे.

या दिसणाऱ्या जगाचा तटका तुटल्याशिवाय त्याचा चटका लागत नाही. हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, *''जगाचा तोडी या तटका। तरी तुझा लागे मज चटका॥''*

पण या दृश्य जगाचा तटका तुटणार कसा ? हे दृश्य जग तर कोठे जाणार नाही, पण दृश्यातील आशा जर गेली तर दृश्याचा तटका तुटणार आहे. हे वर्म संत विसोबा खेचर असे सांगतात, *''म्हणे खेचर विसा झालासे पिसा। या दृश्याची आशा सांडी नाम्या॥''*

असा काही दृश्याचा तटका तुटून देवाचा साक्षात्कार व्हावा अशी प्रार्थना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐





॥ श्रीदासराममहाराज प्रसन्न ॥

# आत्मारामपाठ

**अभंग २**

*शरीरासी जावे लागते टाकून।*
*तरी ते आपण नव्हेची गा॥ १ ॥*

*मनावरी आपुले असे नियंत्रण।*
*तरी नव्हे मन आपण गा॥ २ ॥*

*मनापरी चित्त करिते चिंतन।*
*तरी नव्हे आपण चित्त काही॥ ३ ॥*

*बुध्दीचा निश्चय करितो आपण।*
*तरी ते आपण बुध्दी नोहे॥ ४ ॥*

*आपुलिया इच्छे घोटाळतो प्राण।*
*तरी भिन्न जाण आपण गा॥ ५ ॥*

*मी कोण पहाता सर्व अर्थशून्य।*
*तया पैल ज्ञान तेही शून्य॥ ६ ॥*

*ज्ञानाज्ञाना ऐसी शून्य आणि शून्य।*
*तयापैल पूर्ण निजरूप॥ ७ ॥*

*तेथे उरेचि ना हंकार प्रवृत्ती।*
*दासराम निवृत्ती उन्मनता॥ ८ ॥*

(दासरामगाथा अ.क्र.१४५०)

परमार्थात आपण कोण आहोत व देव कोण आहे, या दोन प्रश्नांची उकल झाली तरच परमार्थाला अर्थ प्राप्त होतो. सद्गुरुंच्याकडून या दोन प्रश्नांचीच उकल करून घ्यायची असते. आपण जे इतर प्रश्न सद्गुरुंना

विचारतो ते सद्गुरुंना विचारायचे असत नाहीत. समर्थ म्हणतात,

*''सद्गुरुसी काय पुसावे । हेही कळेना स्वभावे ।*
*अनन्यभावे येक भावे । दोनी गोष्टी पुसाव्या ॥१२/३/३॥''*

*दोनी गोष्टी त्या कोण । देव कोण आपण कोण ।*
*या गोष्टीचे विवरण । केलेचि करावे ॥ १२/३/४ ॥''*

सद्गुरुंकडून प्राप्त झालेले साधन अभ्यासून आपण व देव कसे वेगळे नाही आहोत याचा अनुभव घेतला तर जीवनाला अर्थ प्राप्त होईल.

*परब्रह्म म्हणिजे सकळापरते । तयास पाहता आपणची ते ।*
*हे कळे अनुभवमते । सद्गुरु केलिया ॥९/१/२९ ॥*

हे समर्थ वचन येथे लक्षात घ्यावे असे आहे.

समर्थ श्रीसद्गुरु श्रीरामकृपेने श्रीसमर्थांनी या संदर्भात केलेले चिंतन खालील पदांतून व ओव्यातून व्यक्त केले आहे ती पदे व ओव्या अशा –

(१)

*कोण मी मज कळतची नाही । सारासार विचारे शोधोनी पाही ॥१ ॥*
*नर म्हणो तरी नारीच भासे । नारी म्हणो तरी सकळ विनाशे ॥२ ॥*
*दास म्हणो तरी रामची आहे । राम म्हणो तरी नाम न साहे ॥३ ॥*

(२)

*नवमी करा भक्ती नवमी करा । नवमी करा भक्ती नवमी करा ॥१ ॥*
*अष्टमी परी नवमी बरी । ये सुखासरी न पवे दुसरी ॥२ ॥*
*भेद हा तुटे अभेद उमटे । राम प्रगटे तेचि नवमी ॥३ ॥*
*शीघ्र नवमी येतसे ऊर्मी । रामदासी मी अर्पिली रामी ॥४ ॥*

(३)

*मी कोण पाहिजे कळले । देहतत्व तितुके शोधिले ।*
*मनोवृत्तीचे ठायी आले । मी तू पण ॥१२/३/२३ ॥*





*सकल देहांचा शोध घेता । मीपण दिसेना पाहता ।*
*मीतूपण तत्वता । तत्वी मावळली ॥१२ /३/२४ ॥*

*दृश्य पदार्थची वोसरे । तत्वे तत्व तेव्हा सरे ।*
*मीतूपण कैचे उरे । तत्वता वस्तू ॥१२ /३ /२५ ॥*

*आपण कल्पिले मीपण । मीपण शोधिता नुरे जाण ।*
*मीपण गेलिया निर्गूण । आत्माचि स्वये ॥६ /३/२९ ॥*

*जालिया तत्वाचे निरसन । निर्गूण आत्मा तोचि आपण ।*
*का दाखवावे मीपण । तत्वनिरसनाउपरी ॥६ /३/३० ॥*

*तत्वामध्ये मीपण गेले । तरी निर्गूण सहजचि उरले ।*
*सोहंभावे प्रत्यया आले । आत्मनिवेदन ॥ ६ /३ /३१ ॥*

श्रीदासराममहाराजांनी आपण कोण आहोत या संदर्भात या अभंगात चिंतन केले आहे. ते म्हणतात, *''शरीरासी जावे लागते टाकून । तरी ते आपण नव्हेची गा ॥''* जो जन्माला आला तो एक दिवशी देहाला सोडून जाणार हे निश्चित.

*'' जो का जन्मा आला । कधीतरी त्याला ।*
*सोडोनी देहाला । जाणे असे ॥ ''*

– श्रीतात्यामहाराज कोटणीस

*''जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण ॥*
*जन्म हेचि अकारण । गाथागोवी ॥ ३/१/४ ॥''*

– श्रीसमर्थ

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. आत्म्याने एकदा देह धारण केला की जन्म मृत्यूचे सोहळे हे होत रहाणारच.

*''देहाचिया गावा आलिया । जन्ममृत्यूचिया सोहळिया ।*
*ना म्हणो नये धनंजया । जियापरी ॥१८/१०१ ॥''*

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन येथे लक्षात घेण्याजोगे आहे. एखादे

वस्त्र जसे जीर्ण झाले की माणूस नवीन वस्त्र धारण करतो त्याप्रमाणे आत्मा देह विकलांग झाला की नवीन देह धारण करतो.

*''जैसे जीर्ण वस्त्र सांडिजे। मग नूतन वेढीजे।*
*तैसे देहांतराते स्वीकारीजे। चैतन्यनाथे।। २/१४५ ।।''*

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारेच आहे. जन्ममरणाचे हे रहाटगाडगे हे असे फिरतच राहणार.

*''उपजे ते नाशे। नाशीले पुनरपि दिसे।*
*हे घटिकायंत्र तैसे। परिभ्रमे गा।।२/१५९ ।।''*

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे हे वचन येथे लक्षात घ्यावे. पण हे जन्ममरण शरीराला आहे, जे आत्मतत्व आहे ते अविनाशीच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*हे उपजे आणि नाशे। ते मायावशे दिसे।*
*येऱ्हवी तत्वता वस्तू जे असे। ते अविनाशची।। २/१०५ ।।''*

शरीर हे आकारलेले आहे व 'आकारले ते विकारले' या न्यायाने शरीराला षड्विकार प्राप्त होतात. पण आत्मा हा निर्विकार आहे. अर्थात देह म्हणजे आत्मा मानणे हे चुकीचे आहे. *''देह तव साकार। तेथ दिसती षड्विकार। आत्मस्वरुप निर्विकार। देह कैसेनी आत्मा।।''* हे श्रीसंतमुकुंदराजांचे वचन हे स्पष्ट करणारे आहे.

पंचज्ञानेंद्रियांचेमार्फत जे ज्ञान होते, ते ज्ञान होण्यासाठी ज्ञाता हा ज्ञेयापेक्षा वेगळा असावा लागतो. ज्याअर्थी आपण आपल्या डोळ्यांनी आपला देह पाहू शकतो, त्याअर्थी आपण देहापेक्षा वेगळे आहोत, हे सांगणे नकोच. आपण शरीरापेक्षा वेगळे आहोत. हे संतमहात्म्यांनी शरीरात असतानाच अनुभवलेले असते. ते शरीरात असतानाच शरीराला सुटलेले असतात. शरीरापासून सुटल्याशिवाय (देहातीत झाल्याशिवाय) परब्रह्मरूप होताच येत नाही. देहात असतानाच देहातीत होण्यात खरे आपले हित आहे, हे





संतच जाणतात. हे समर्थ असे सांगतात,

*'' म्हणोनी देहबुध्दी हे झडे। तरीच परमार्थ घडे।*
*देहबुध्दीने विघडे। ऐक्यता ब्रह्मीची।। ७/२/३९ ।।''*
*'' हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत।*
*देहबुध्दीने अनहित। हेचि लागे।। ७/२/३७ ।।''*
*'' देहची होऊन राहिजे। तेणे देहदु:ख साहिजे।*
*देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते।। ८/८/२५ ।।''*

श्रीसमर्थ देहरूपाने असतानाच सांगतात, *'' माझी काया गेली खरे। परी मी आहे जगदाकारे।।''* याला काही अर्थ आहे का नाही ? अहो देहाकार गेला – देहाशी तादात्म्यता गेली की जगदाकार होता येते. 'देह मी' हा जो अहंकार आहे तो गेला की तो जगदाकार होतो हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''तो अहंकाराते दंडूनी । सकळ कामू सांडूनी। विचरे विश्व होऊनी। विश्वाचिमाजी ।।२/३६७ ।।''*

श्रीदासराममहाराजांना हे देहभाव विरणारे साधन श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराजांचेकडून प्राप्त झाले होते. ज्यांच्याकडून हे साधन प्राप्त होते ते महात्मे गुरुलिंगजंगम पदावर आरूढ झालेले असतात श्रीज्ञानेश्वरामहाराजांना हेच साधन त्यांचे गुरु श्रीनिवृत्तीनाथमहाराज यांचेकडून प्राप्त झाले होते. त्यांनी श्रीनिवृत्तीनाथमहाराजांना 'गुरुलिंगजंगम' असे एका पदात संबोधिले आहे. ते पद असे,

*''गुरुलिंगजंगम तेणे दाविला आगम। आधीव्याधी झाली सम।*
*तेणे पावलो विश्राम रे । शिवनाम शितलमुखी ।।*

*सेवीबा कापडियारे। देहभाव जिथे विरे।*
*ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे। श्रीविठ्ठलुरे।।''*

श्रीदासराममहाराजांनी हे प्राप्त झालेले साधन अभ्यासून त्याचा आलेला अनुभव त्यांनी एका पदात नोंदविला आहे. ते पद असे, *''वाऱ्यावरी*

*लागली नजर। देहभानाचा पडला विसर। जेथे तेथे परमेश्वर। नाही उरला गुणहंकार॥''*देहभावाचा विसर होणे हा अनुभव घेणारा हा, देहापेक्षा वेगळा आहे हे निश्चित.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''मनावरी आपले असे नियंत्रण। तरी नव्हे मन आपण गा॥''* मनावरती आपले नियंत्रण आहे म्हणजे मन म्हणजे आपण नव्हे असे श्रीदासराममहाराजांचे म्हणणे आहे. आपणास सर्वसामान्यत: असे आपले मनावर नियंत्रण आहे, असे आढळते का? हा इथे प्रश्न आहे. हे चंचळ मन आपणास नाचवत असते. मग मनावर नियंत्रण आहे असे कसे म्हणता येईल ? अहो, आपण वैखरीने नामस्मरण करतो, तेव्हासुध्दा मन नामस्मरणाचे ठिकाणी असत नाही हा आपला अनुभव आहे. *''माला तो करमें फिरे। जिव्हा फिरे मुखमाही। मन तो दाही दिस फिरे। इह तो सुमरन नही॥''* असे आमचे नामस्मरण असते. मग एरवी मनाची काय अवस्था असेल हे सांगावयासच नको. आपले मन कसे चंचल असते, हे श्रीनाथमहाराज असे सांगतात, *''आकाश करवेल चौघडी। महामेरू बांधवेल पुडी। शून्याची मुरडवेल नरडी। परी या मनाची ओढी अनिवार॥''* तर संत श्रीबाबा गर्दे असे सांगतात, *''हे मन चंचल मोठे। नलगे याचा अंतचि कोठे॥''*

वासना या मनामध्ये असतात. सतत काही ना काही वासना ही असतेच. एक वासना पूरी झाली की दुसरी किंबहुना पहिली वासना पुरी व्हायच्या आधीच दुसरी निर्माण होते. या वासनेच्या नदीमध्ये प्राणी गटांगळ्या खातात. आमचे चिमडचे महाराज सांगतात, *''वासना मनी वसली। कधी निघेनाशी झाली। कोठवरी तिसी भांडू। मती माझी थकली॥''* तर श्रीनाथमहाराज सांगतात, *''मनोरथ नानावृत्ती। या नाव वासनासरिता म्हणती। इयेमाजी बुडाले नेणो किती। बळी ते तरती निजपुरुषार्थे।''* व *''वासना बायको शेजारीण। झगडी कुटील मोठी दारूण। हीचेपायी नागवण। घर बुडविसी॥''*





या वासनेच्या नदीतून जे आपल्याला परपार करतात, आपली वासना नाहिशी करतात, ते खरे सद्गुरु.

*''वासनानदी महापुरी। प्राणी बुडता ग्लान्ती करी।*
*तेथे उडी घालोनी तारी। तो सद्गुरु जाणावा॥* ५/२/१३ ॥''
– *श्रीसमर्थ*

जे आपल्या शिष्याला मन सुखरूप शांत करणारे, इंद्रियदमन घडविणारे, सोहं साधन सांगतात व सद्रुपाची ओळख करून देतात ते खरे सद्गुरु. असे साधन जे शिष्याला साधायला सांगत नाहीत ते सद्गुरु नव्हेत.

*'' शिष्यास न लाविती साधन। न करविती इंद्रियदमन।*
*ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी टाकावे॥* ५/२/२१ ॥''
– श्रीसमर्थ

हे साधन श्रीदासराममहाराजांना भगवान श्रीसद्गुरुतात्यासाहेब–महाराजांकडून आईचे उदरातच प्राप्त झाले होते. साधनाचे अभ्यासाने त्यांना आलेला अनुभव त्यांनी एका पदात नोंदविला आहे. ते पद असे,

*''हा प्राण आटला वाऱ्यामाजी। संगम किती हा गोड।*
*शांत हरीच्या नामी काया। सर्व मन हे जाय विलया॥*
*वायुलहरी वायुसागरी मिनली। जेणे हरीची जोड ॥''*

या साधनाचा उल्लेख 'तत्वरूप नाम' म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज हरिपाठात असा करतात, *''एकतत्व नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन न बाधिजे॥''* हे तत्वरुप नामच मनाला घट्ट पकडू शकते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''एकतत्व नाम दृढ धरी मना। हरिसी करुणा येईल तुझी॥''* म्हणजे हे तत्वरुप नाम–साधन मनावर नियंत्रण ठेवू शकते.

मग ज्यांनी गुरुपदेश घेतलेला नाही, ज्यांना हे मनावर नियंत्रण ठेवणारे साधन माहीत नाही, त्यांना मनावर आपले नियंत्रण आहे हे अनुभवता

येते का ? हो, हे प्रत्येकाला अनुभवाला येते. आपणाला झोप लागणेपूर्वी हे चंचल असणारे मन शांत  झालेले असते. मन शांत झाल्याशिवाय, निर्विचार झाल्याशिवाय झोप येतच नाही. झोप येताना ज्या साधनाने मन निर्विचार होते, तेच ते साधन आहे. छांदोग्यपनिषदात असे सांगितले आहे की मन जेव्हा प्राणाचे ठिकाणी, श्वसनाचे ठिकाणी लीन होते, तेव्हा मनुष्यास झोप येते. अर्थात, श्वासोच्छ्वास मनाची गती नियंत्रित करणारे साधन आहे. या श्वसनाचे गतीमुळेच मन हे चंचल आहे. अर्थात या श्वसनाचे-साधनाचे अभ्यासाने श्वसनावर योग्य तेवढे नियंत्रण मिळवता आले तर या मनावर, इंद्रियांवर नियंत्रण ठेवता येणारे आहे. या श्वासाला, प्राण, पवन असे संबोधिले आहे. श्रीनाथमहाराज म्हणतात,

*''सर्वामाजी प्राण सबळ । प्राणबळे बळी सकळ ।*
*प्राणयोगे मन चपळ । अतिचंचल प्राण स्पंदे ।।१९ /४८७ ।।*

*यापरी गा बलिष्ठ प्राण । प्राणाअधिन सदा मन ।*
*तो प्राण जिंकावा आपण । 'बळवंतपण ' या नाव ।।१९ /४८८ ।।*

*प्राणाअधिन जीव मन । या प्राणाचे करुनी दमन ।*
*तो स्वये किजे गा स्वाधीन । 'अतिबळ ' जाण या नाव ।।१९ /४९० ।।*

*विषय ते मनाअधिन । मन पवनासी वश्य जाण ।*
*अभ्यासे वश केला पवन । सहजे  मन स्थिरावे ।।१३ ।२५७ ।।*

तर श्रीज्ञानेश्वरमहाराज या पवनाचे महत्व असे सांगतात,

*बलिये इंद्रिये येती मना । मन एकवटे पवना ।*
*पवनू सहजे गगना । मिळोची लागे ।। ६ /४६० ।।*

या साधनाचे ठिकाणी-प्राणापानाचे ठिकाणी-मन लीन झाले असता परमार्थ पूर्ण होतो. श्रीदासराममहाराज सांगतात, ***''प्राणापानामाजी मनाचे मिलन । परमार्थ पूर्ण तये ठायी ।।''***





प्राणापानाचे ठिकाणी हे मन मुरल्यावर जे काही उरते त्या चैतन्याचा अनुभव तुम्ही का घेत नाही असा प्रश्न श्रीज्ञानेश्वरमहाराज करतात. ते म्हणतात, ***''मन मुरे मग जे उरे । ते तू कारे सेविसी ना ।।''***

हे मन मुरले आहे-मनोलय साधला आहे, हे कसे ओळखावे ? जेव्हा साधनाचे अभ्यासाने तारकस्वरुपाचा अनुभव येतो तेव्हा मन मुरते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***''गगनी भासले अगणित तारे । तेथे मन मुरे वृत्तीसहित ।।''*** मन मुरल्यावर, मनाचा लय झाल्यावर अनुभव घेणारा, मनावर नियंत्रण ठेवणारा हा मनापेक्षा वेगळा आहे, हे निश्चित.

मग ही निसर्गाने निर्विचार होऊन येणारी झोपेची अवस्था व साधनामध्ये मनाचा लय होऊन येणारी निर्विकल्प अवस्था, या दोन्ही एकच आहेत का ? नाही. झोप ही अज्ञानात्मक असून साधन हे ज्ञानात्मक (वृत्तीरहित ज्ञान) आहे. निद्रा ही ज्ञानमयी झाली की तीच उन्मनी अवस्था, तीच साधनाची अवस्था. श्रीदासराममहाराज सांगतात, ***''ज्ञानमयी निद्रा तेची गा उन्मनी । दासरामा धनी आत्माराम ।।''***

मनामध्ये काही अंश जडाचा व काही अंश चैतन्याचा असतो असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगायचे. हाच विषय 'योगवसिष्ठ' या ग्रंथात मुनी वसिष्ठांनी प्रभू रामचंद्रांना सांगितला आहे. या मनामध्ये असणाऱ्या जडांशाने मन म्हणजे आत्मा नाही हे निश्चित. श्रीनाथमहाराज सांगतात, ***''अकरा इंद्रियामाजी जाण । मन तेही एक करण । करणत्वे त्या जडपण । आत्मा नव्हे जाण या हेतू ।।''*** एरवी चिदानंदी असणारे हे शुध्दबुध्द मन संकल्पावर आले की अशुध्द होते. त्याला जडपणा येतो. ***''मन संकल्प शुध्द पै नोहे । एरवी तरी आहे चिदानंदी ।''*** हे संतवचन येथे लक्षात घ्यावे.  हेच मन विकल्पावर आले तर काय होईल ? या मनाच्या संकल्प विकल्प निर्माण होण्याच्या गुणधर्माने मन म्हणजे आत्मा नव्हे, हे सिध्द होते. श्रीनाथमहाराज म्हणतात,

*''आत्मा नभ नव्हे शुन्यपणे। मन नव्हे संकल्प गुणे।*
*अंत:करण नव्हे नश्वरलक्षणे। चित्त चिंतने नव्हे आत्मा ।।*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''मनापरी चित्त करीते चिंतन। तरी नव्हे आपण चित्त काही ।।''* मनात उठणाऱ्या संकल्प विकल्पांचे चिंतन चित्त करते. मनात उठणाऱ्या संकल्प विकल्पांवर आपले नियंत्रण आहे. अर्थात त्यावर होणाऱ्या चिंतनावरही आपले नियंत्रण आहे. म्हणजे चिंतन करणारे चित्त म्हणजे आपण नव्हे. चित्त हरपल्यावर चैतन्य उरते. म्हणजेच चित्त म्हणजे चैतन्य नव्हे. श्रीनाथमहाराज सांगतात, *''चित्तची हरपले अवघे चैतन्यची जाहले ।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत, *''बुध्दीचा निश्चय करीतो आपण। तरी ते आपण बुध्दी नोहे ।।''* चित्त मनात उठलेल्या निरनिराळ्या विकल्पांवर चिंतन करते व बुध्दी ही चित्तातील चिंतनाचा आधार घेऊन एखाद्या विकल्पावर ठाम राहते. म्हणून बुध्दीला 'निश्चयात्मिका बुध्दी' म्हणतात. बुध्दी निर्णयाप्रत येते. पण निर्णय कोण घेतो ? आपणच ना ? म्हणजे आपण बुध्दीपेक्षा वेगळे आहोत. आपल्या बुध्दीवर आपला विश्वास पाहिजे. बऱ्याचदा आपण म्हणतो, *''माझा माझ्या बुध्दीवर विश्वास नाही.''* कोणाची बुध्दी केव्हा फिरेल काही सांगता येत नाही. ''साठी बुध्दी नाठी'' ही सारी आमची सहजगत्या होणारी विधाने आपण बुध्दीपेक्षा वेगळे आहोत हे दाखविणारीच आहेत. ज्या प्रकाशाने बुध्दीला ज्ञान होते तो प्रकाश वेगळा आहे. गुरुकृपेशिवाय तो उमगत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*'' ऐसे ज्ञानप्रकाशे पाहेल। तै मोहांधकारु जाईल।*
*जै गुरुकृपा होईल। पार्था गा ।।४/१७१ ।।''*

आमच्या बुध्दीत जो प्रकाश पडतो तो प्रकाश व ज्या प्रकाशाने बुध्दीत प्रकाश पडतो तो आत्मप्रकाश, यात जमीन-अस्मानाचा फरक आहे.





बुध्दीतल्या प्रकाशाने हा प्रकाश (आत्मप्रकाश) गोचर होत नाही.

मन, चित्त, बुध्दी, अहंकार या सगळ्याला मिळून अंत:करण म्हणतात. जसे कार्य अनुभवाला येईल तशी संज्ञा त्याला प्राप्त होते.

*' 'चित्तचतुष्टच्य चमत्कार। मन बुध्दी चित्त अहंकार।*
*ही एकची परी भिन्न प्रकार। जैसा व्यापार तैसे नाव ।।*
– श्रीनाथमहाराज

*''तरी बुध्दी आणि मन। चित्त अहंकार हन।*
*हे चतुर्विध चिन्ह। अंत:करणाचे ।।* १८/४९८ ।।
– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने याला प्रमाण आहेत. हे अंत:करण ज्यांचे आज्ञेत आहे, तो खरा ज्ञानी. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*''जयाची आज्ञा आपण। शिरी वाहे अंत:करण।*
*मनुष्याकारे जाण। ज्ञानचि तो ।।* १३/५१२ ।।''

अर्थात मन, चित्त, बुध्दी, अहंकार हे अंत:करण महात्म्यांच्या आज्ञेत असते. त्याअर्थी ते या अंत:करणापेक्षा वेगळे होते हे निश्चित.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''आपुलिया इच्छे घोटाळतो प्राण। तरी भिन्न जाण आपण गा ।।''* मनोलय न साधल्याने आपल्या ठिकाणी इच्छा निर्माण होते. या जन्मात जर ती इच्छा पुरी झाली नाही आणि जर मरणसमयी ती वासना तशीच शिल्लक राहिली तर आपला प्राण इथेच घोटाळतो. ती इच्छा पुरी होण्यासाठी त्याला पुनर्जन्म प्राप्त होतो.

*''जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।''* असे श्रीनाथमहाराज सांगतात. तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''आणि मरणी जया जे आठवे। तो तेची गतीते पावे ।। म्हणोनी सदा स्मरावे। मातेची तुवा ।।८/७५ ।।''*

पण हा झाला मृत्यूनंतरचा भाग. जिवंत असताना हे कसे अनुभवता येणार? संतवाङ्मयात प्राण हा शब्द आत्मा व श्वास या दोन वेगवेगळ्या अर्थांनी वापरला जातो. आस व श्वास (प्राण) यांचा काही संबंध आहे. जोवर श्वास आहे तोवर आस आहे, हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. जोवर अंत:करणात इच्छा आहे, वासना आहे, आस आहे, तोवर श्वास हा खालीच घुटमळतो. माणसाचे जीवन हे अधोगामीच राहते. जेव्हा सर्व वासना नाहीशा होऊन, मोक्ष व्हावा ही एकच इच्छा अंत:करणात उरते, वासना शुध्द होते, तेव्हा जीवन ऊर्ध्वगामी होऊन कारण देहातून महाकारणदेहात प्रवेश होतो. त्याला तुर्या अवस्था प्राप्त होते. *'तुर्या ते शुध्द वासना। तेथ तोचि कडूवटपणा। उन्मनी बुझ निर्वासना। म्हणोनी गोड ते।।'* हे संत मुकुंदराजांचे सांगणे येथे लक्षात घ्यावे असे आहे. आपल्या ठिकाणी ईच्छा निर्माण झाली तर प्राण खाली घोटाळतो. (नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण वाढते.) इच्छा नाहीशी झाली की नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण कमी होते. *''हा प्राण आटला वाऱ्यामाजी''* असाच तो अनुभव असतो. असा प्राण समर्पण झाला की परमार्थ साधला असे समजायला हरकत नाही. अशा तऱ्हेने जे तन मन प्राण भगवंताला सतत अर्पण करतात ते देहाच्या निर्वाणानंतर भगवद्रूप होतात. *'' येर तनुमनुप्राणी। जे निरंतर माझेयाची वाहाणी। ते देहाच्या निर्वाणी। मीची होती।।* ७/१५० *।।''* ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ओवी हे आपणास खात्रीपूर्वक सांगत आहे. ज्यांचा श्वास-प्राण खाली घोटाळत नाही, त्यांचा प्राण-आत्मा खाली घोटाळत नाही.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत, *''मी कोण पाहता सर्व अर्थशून्य। तयापैल ज्ञान तेही शून्य।।''* मनाच्या अस्तित्वावर भासमान होणाऱ्या जागृती आणि स्वप्न या विपरीत ज्ञानाच्या अवस्थेत होणारे, आकारलेल्या जगाचे ज्ञान हे फसवे ज्ञान आहे. ते समर्थांच्या शब्दात, 'पाहणे येकाचे येक' असे आहे. सुषुप्ती अवस्थेत मनोलयाने या आकारलेल्या जगाचेही ज्ञान नसते व निराकाराचेही ज्ञान नसते. निद्रेत





घोररुपाने आत्माराम प्रगट होतो पण तेव्हा आपण बिनघोर झालेलो असतो. आपण जागृत होताच घोर रुपाने प्रगट झालेला आत्माराम बिनघोर होतो व आपणाला घोर लागतो. निद्रा ही अशी अज्ञानात्मक अवस्था आहे. अशा तऱ्हेने या तीनही अवस्थेत 'मी' ची जाणीव होऊ शकत नाही.

*''स्वप्नी रे पाहता मिथ्यानगरी। निद्रा घोर झाला राम ।।*
*जागृत होता काहीच नाही। जेथील तेथे गेला राम।।''*

हे संतवचन या तिन्ही अवस्थांचे या दृष्टीने असणारे फोलपण दाखविणारेच आहे.

'जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीन अवस्थांमध्ये त्रिभागलेले आपले जीवन एकविध होणेकरिता करावी लागणारी खटपण म्हणजे साधन' असे आमचे चिमडचे श्रीनारायणमहाराज सांगत. साधनाचे अभ्यासाने वासना शुध्द होऊन, त्रिगुणांचा निरास होऊन त्रिविध झालेले जीवन एकविध होते व जीवन ऊर्ध्वगामी होऊन महाकारणदेहात तुर्या अवस्था प्राप्त होते. या तुर्या अवस्थेचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात

*''जागृती स्वप्न सुषुप्ती। तिन्ही अवस्थाते प्रकाशिती।*
*यालागी ते चौथी। तुरीय म्हणती सज्ञान।। ''*

तर श्रीसमर्थ तुर्येचे वर्णन असे करतात,

*जाणे ब्रह्म जाणे माया। जाणे अनुभवाच्या ठाया।*
*ते येक जाणावी तुर्या। सर्वसाक्षिणी।।* ७/४/४९ *।।''*

तुर्या ही महाकारण देहातील ज्ञानावस्था आहे. महाकारणदेहात अखंड चैतन्याचे स्मरण, अखंड चैतन्याची जाणीव असते. हेच ते संतमहात्म्यांचे अद्वय भजन, सतत होणारे कीर्तन आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, *''महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।।''* या अखंड स्मरणानेच त्यांना मुक्ती प्राप्त होते. श्रीनाथमहाराज सांगतात,

*''अखंडस्मरणे अद्वयभजने वाजवी करटाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तत्काळी।।''* या तुर्यावस्थेतच संतमहात्मे सतत असतात. या तुर्यावस्थेतच मनाचे उन्मन होऊन ते अविनाशी ब्रह्मस्वरुप होतात.

महाकारणदेह हा आकाशरूप आहे. तुर्यावस्थेत होणारे ज्ञान, येणारे अनुभव हे या आकाशाचे – आत्म्याचे असतात. श्रीसमर्थ म्हणतात,

*''आकाश म्हणिजे अंतरात्मा। प्रत्यये पहावा महिमा।*
*त्या आकाशापासून जन्मा। वायो आला।।१२/६/१२ ।।''*

*''आकाश अनुभवा येते। स्वरुप अनुभवापरते।*
*म्हणोनिया आकाशाते। साम्यता न घडे।। ८/५/६८ ।।''*

व ज्या अर्थी अनुभव येत आहेत, त्याअर्थी द्वैत शिल्लक आहे, हे उघड आहे.

*''दुजेवीण अनुभव। हे बोलणेची वाव।*
*या कारणे नाही ठाव। अनुभवासी।।६/१०/२९ ।।''*

ही समर्थ ओवी यातील वर्म दाखविणारीच आहे.

वेगळेपणाने अनुभव येतात. वेगळेपणाने पहाणे घडते म्हणून त्याला 'आकाश' किंवा 'शून्य' ही संज्ञा प्राप्त होते. समर्थ म्हणतात,

*''वेगळेपणे पहावे। तयास आकाश म्हणावे।*
*अभिन्न होता स्वभावे। आकाश ब्रह्म।।९/९/१७ ।।''*

*''भिन्नपणे अनुभवले। तयास शून्य ऐसे बोलिले।*
*वस्तु लक्षिता अभिन्न जाले। पाहिजे आधी।।८/१०/७२ ।। ''*

या शून्यावस्थेत येणाऱ्या अनुभवांचे वर्णन श्रीसंत कबीरसाहेब असे करतात, *''शून्य मेहेलमें दीप बिराजे। बाजे अनुहात ढोल।''* तर या शून्याचा अनुभव ज्याला आला नाही, त्याला काय कळले असा प्रश्न श्रीज्ञानेश्वरमहाराज असा करतात,





*''शून्य शोधिले नाही जेणे। काय विवरण केले तेणे।*
*अज्ञान मूर्खपणे। गाढव जिणे पशुचे।।''*

काही लोक या आकाशाच्या अनुभवाला ब्रह्माचा अनुभव समजतात पण आकाश व स्वरुप यात भेद आहे. श्रीसमर्थ म्हणतात,

*''इकडे दृश्य तिकडे देव। मध्ये शून्यत्वाचा ठाव।*
*तयास प्राणी मंदबुध्दीस्तव। ब्रह्म म्हणे।। ८/१०/६६ ।।''*

आकाशाचा अनुभव आला, शून्याचा अनुभव आला की आपण ब्रह्मसाक्षात्काराच्या योग्य त्या मार्गावर आहोत असे समजायला हरकत नाही.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''ज्ञानाज्ञाना ऐसी शून्य आणि शून्य। तयापैल पूर्ण निजरूप।''* परमार्थात अज्ञान चालत नाही आणि ज्ञान टिकत नाही. विज्ञानवृत्ती अनुभव हासुध्दा ठायीच मुरून जातो. मला ज्ञान झाले किंवा मला ज्ञान झाले नाही या दोन्ही वृत्तीच आहेत. अज्ञानाचे ज्ञान होऊन, ज्ञानाने मला कळले ही वृत्ती – ज्ञानाची जाणीव नाहीशी झाल्यावर – निवृत्ती झाल्यावर आत्म्याचे चंचळपण नाहीसे होते व तो महात्मा देहीच विदेही होतो. नि:शब्द परब्रह्मरूप होऊन तो नि:शब्द होतो. त्याला निर्हेतूक समाधान प्राप्त होते. या ठिकाणी तुर्यावस्थेत असणारे मायाब्रह्माचे अनुसंधान संपते.

श्रीदासराममहाराज पुढे सांगतात, *तेथे उरेचिना हंकार प्रवृत्ती। दासराम निवृत्ती उन्मनता।।* मी कोण हे शोधताना मी म्हणून कोणी उरलाच नाही.

*''मीपण ते बुडाले। विवेके वेगळेपण गेले।*
*निवृत्तिपदास प्राप्त झाले। उन्मनीपद।।१२/३/२८ ।।''*

या समर्थ ओवीतच श्रीदासराममहाराजांच्या अनुभवाचे वर्णन करता येईल.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग ३

*जयाचेनी ज्ञान, जयाचेनी भान।*
*ऐसा तो चिद्‌घन आत्माराम।। १ ।।*

*नामाचे साधनी प्रगटची होता।*
*मार्गीचि पुढता दिसो लागे।।२ ।।*

*चारी वाचेलागी कैसा स्फुरवीत।*
*आणि विराजत षडचक्री।।३ ।।*

*जीव शीव ऐसे उठती तरंग।*
*सिंधू तो अथांग दासरामी।।४ ।।*

– दासरामगाथा अ.क्र. ११०४

देहाचे भान, दृश्याचे भान, देहाची जाणीव, दृश्याची जाणीव, कुणामुळे होते, त्याची जाणीव आम्हाला असत नाही. त्याची जाणीव श्रीदासराममहाराजांनी या अभंगात आपणास करून दिली आहे. ते म्हणतात, *''जयाचेनी ज्ञान जयाचेनी भान। ऐसा तो चिद्‌घन आत्माराम।।''* देहाची जाणीव, दृश्याची जाणीव एका आत्म्यामुळे होते. शरीरातील आत्मा गेल्यावर कुठाय देहाची जाणीव ? कुठाय दृश्याची जाणीव ? एवढा महत्वाचा आत्मा, पण त्याची आम्हाला जाणीवच नाही. आपण डोळ्यांनी दृश्य पाहतो. कोण दृश्य पाहतो ? डोळे दृश्य पाहतात का? का डोळ्याच्या माध्यमातून आणखी कोणी दृश्य पाहतो ? दृश्याचे ज्ञान कोणाला होते ?आपण कल्पनेने दृश्य पाहतो, ते काय डोळ्यांनी पाहतो का ? स्वप्न पाहतो ते कुठल्या डोळ्यांनी पाहतो ? तेव्हा जे काही ज्ञान होते, जाणीव होते, ती कुणाला होते ? रात्री आपण झोपतो, तेव्हा या साऱ्या ज्ञानेंद्रियांमार्फत होणाऱ्या जाणीवा कुठे





नाहीशा होतात ? कुठे लय पावतात ? सकाळी उठल्यावर हे सारे परत कुठून येते ? हे सारे प्रश्न आहेत. सुभाषितकार म्हणतात, *''डोळ्यांनी बघतो ध्वनी परीसतो कानी पदी चालतो। जिव्हेने रस चाखितो मधुरही, वाचे आम्ही बोलतो। हातानी बहु साल काम करतो, विश्रांतीही घ्यावया। घेतो झोप सुखे फिरोनी उठतो ही ईश्वराची दया।''* अहो डोळ्यांनी तो पाहतो, कानानी तो ऐकतो, जिव्हेने रस तो चाखतो, मनातील कल्पना तो करतो, चित्तातील चिंतन तो करतो, बुध्दीचा निश्चय तो करतो. मग तो नसेल तर इंद्रियांना जाणीव होईल का ? ज्ञानेंद्रियातील चैतन्यतत्व जर दूर झाले, तर ती स्वत:हून त्या त्या विषयवस्तूपासून ते ते इंद्रियज्ञान करून घेण्यास असमर्थ असतात. अशा तऱ्हेने आत्मा हाच सर्व ज्ञानेंद्रिये, मन, बुध्दी यामधील द्रष्टा असतो.

आम्ही जे काही शोध लावतो, त्याचा शोधक कोण आहे ? कल्पक कोण आहे ? आत्माच ना ? खऱ्या शोधकाची आम्हाला जाणीवच नाही. त्याचे महत्वच आम्हाला नाही. म्हणूनच भौतिकशास्त्र हे लंगडे आहे.

आम्ही मन, बुध्दीच्या सहाय्याने आत्मा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. पण तो 'मन बुध्दी अगोचर' आहे. जो कल्पनेच्या पलिकडे आहे, तर्कांच्या पलिकडे आहे, तो कल्पनेने, तर्काने कसा जाणता येईल ? जो कल्पना करतो, जो तर्क करतो त्याची कल्पना करून, तर्क करून तो कल्पक (कल्पना करणारा), तार्किक (तर्क करणारा) कसा भेटणार ? 'आत्मा हा प्रयोगी आहे (प्रयोग करणारा आहे) तो प्रयोगाने सिध्द होणार नाही' हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. आमच्या सर्व कल्पना, सर्व तर्क संपले, मगच तो भेटण्याची शक्यता. या ज्ञानी अंतरात्म्याचे आकलन, महत्व आपल्या बुध्दीला कळणारे नाही. श्रीसमर्थ म्हणतात,

*''ज्ञानी येक अंतरात्मा। सर्वांमध्ये सर्वात्मा।*
*त्याचा कळावया महिमा। बुद्धी कैची।। १५/८/२८ ।।''*

पंचज्ञानेंद्रियांमार्फत मन बुध्दीला होणारे ज्ञान हे खरे ज्ञान असे संत महात्मे मानत नाहीत. त्यांची ज्ञानाची व्याख्याच निराळी आहे. श्रीदासराममहाराज ज्ञानाची व्याख्या अशी करतात, ''ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे ज्ञान म्हणजे ज्ञान, तर ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे अज्ञान म्हणजे अज्ञान'' तर समर्थ आपण आपल्याला जाणणे म्हणजे खरे ज्ञान – आत्मज्ञान आहे, हे असे सांगतात,

*''ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।*
*पाहावे आपणासी आपण । या नाव ज्ञान ।।* ५/६/१ ।।''

तर श्रीतुकाराममहाराज ज्ञान म्हणजे काय हे असे सांगतात,

*''ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे ।*
*जाणोनी नेणणे विज्ञान ते ।।''*

तर श्रीज्ञानेश्वरमहाराज ज्ञान म्हणजे काय हे असे सांगतात,

*''क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाते । जाणणे जे निरुते ।*

*ज्ञान ऐसे तयाते । मानू आम्ही ।।* १३ / ९ ।। '' व

*''आपला आपणपेया । विसरू जो धनंजया ।*
*तेचि रूप यया । अज्ञानासी ।।* १४ / ७१ ।। ''

पण ही आपली आपणाला जाणीव व्हावी कशी ? आत्म्यामुळे देहाची, दृश्याची जाणीव होते पण देहाच्या होणाऱ्या जाणीवेने, दृश्याच्या होणाऱ्या जाणीवेने आत्म्याची जाणीव आम्हाला होत नाही. याकरता आपणाला होणाऱ्या देहाच्या दृश्याच्या सर्व जाणीवा नाहीशा होऊन राहणाऱ्या नेणीवेची जाणीव असणे आवश्यक आहे. ही नेणीवेची जाणीव होणे म्हणजेच आपण आपल्याला जाणणे, आत्मज्ञान आहे.

*''जे जे भासे जाणवियें । ते ते जरी निरसुनी जाये ।*
*तरी जाणीवची आहे । तेचि पाहे तियेते ।।''*





*'' नेणीव जरी जाणितली । तरी ते नेणीव मिथ्या झाली ।*
*तेथील जाणीव उरली । आत्मप्रभा ।। ''*

*'' ते नेणीव फिटे गुरुखुणा । जाणे आपण आपणा ।*
*बोलिजे या अनुसंधाना । महाकारण ऐसे ।।''*

*'' फिटुनिया नेणणे । आप आपणा जाणणे ।*
*तिही देहाचेनि साक्षीपणे । महाकारण देह ।।''*

हे श्रेष्ठ संत मुकुंदराज यांचे परमामृत, यावर अधिक प्रकाश टाकते. या सर्व विपरितज्ञानात्मक जाणीवा नाहीशा होऊन होणारी नेणीव खोटी ठरावी – नेणीवेची जाणीव व्हावी असे मागणे समर्थ असे मांडतात,

*''मन बुध्दी अगोचर । बुध्दीवीण अंधःकार ।*
*जाणीवेचा पडो विसर । नेणीव खोटी ।।* १४ / १ / ७३ ।।''

या सर्व विपरितज्ञानात्मक जाणीवा नाहीशा होणे याला समर्थ नेणीव – अज्ञान म्हणतात. तर या नेणिवेची जाणीव होणे, याला जाणीव – ज्ञान म्हणतात. समर्थ म्हणतात,

*''ज्ञान म्हणिजे जाणणे । अज्ञान म्हणजे नेणणे ।*
*विपरितज्ञान म्हणिजे देखणे । येकाचे येक ।।* २०/१/२३ ।। ''

समर्थांचे अवतार असे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज वारंवार 'मी अज्ञानी आहे' असे म्हणत, ते या अर्थाने. आम्ही समजतो त्या अर्थाने नव्हे. त्यांना देहाची, दृश्याची, विपरितज्ञानात्मक जाणीव होत नव्हती. या नेणीवेची – अज्ञानाची जाणीव त्यांचे ठिकाणी सतत होती. तर हे अज्ञान (विपरितज्ञानाची जाणीव नाहीशी होऊन राहणारी नेणीव) नाहिसे करा (नेणीवेची जाणीव होऊ दे) की ज्ञान आपोआपच होईल असे जगद्गुरु शंकराचार्य सांगत. ''इतर लोकांना ही अज्ञानाची (विपरितज्ञान नाहीसे होऊन होणाऱ्या नेणीवेची) अवस्था ज्ञातेपणी कधी प्राप्त होत नाही. पण मला मात्र माझे ठिकाणी असणाऱ्या अज्ञानाची जाणीव आहे. म्हणून मी ग्रीसमधील सर्वात हुशार

ठरलो.'' हे थोर तत्वज्ञ सॉक्रेटिस यांचे विचार हेच स्पष्ट करत आहेत. ते म्हणतात, "O t h e r  p e o p l e d o  n o t  k n o w  t h a t  t h e y  d o  n o t  k n o w,  I  k n o w  t h a t  I  d o  n o t  k n o w,  t h e r f o r e  I  a m  t h e  w i s e s t  m a n  o f G r e e c e" - S o c r  a t i s

ही अज्ञानाची (विपरित ज्ञानाची जाणीव नाहीसे होऊन होणाऱ्या नेणीवेची) अवस्था सर्वसामान्य माणसाला रोज अनुभवता येते. झोप – निद्रा ही निसर्गाने प्राप्त होणारी अज्ञानात्मक अवस्था आपण रोज अनुभवतो. ती निद्रा ज्ञानमयी होणे हे महत्वाचे आहे. म्हणून संतमहात्म्यांची झोप आपल्यासारखी असत नाही. त्यांना झोपेतसुध्दा चैतन्याचे स्मरण असते. निद्रा ज्ञानमयी असते. त्यांचे अंतरी ज्ञानच जागते असते. अशा तऱ्हेने अज्ञानाचे ज्ञान झाले असता, निद्रा ज्ञानमयी झाली असता काय अवस्था प्राप्त होते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

*''तैसे अज्ञान ज्ञाने नेले। आपण वस्तु देऊनि गेले।*
*ऐसे जाणणेनिवीण उरले। जाणते जे।।१५/५२८।।''*

हे जे अज्ञानाचे ज्ञान होते – आत्मज्ञान होते – ते कोणाला होते ? ते आत्म्यालाच होते. आत्म्यालाच आत्म्याची जाणीव होते म्हणून आत्मा हा स्वसंवेद्य आहे. *''ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।। १/१ ।।''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी आत्मरुपाचे केलेले वर्णन बोलके आहे.

हे विपरितज्ञानाचे अज्ञान होऊन अज्ञानाचे ज्ञान होणेसाठी – तिन्ही अवस्थांची एक अवस्था होणेसाठी – त्रिविध झालेले जीवन एकविध होणेसाठी करावी लागणारी खटपट म्हणजे साधन असे चिमडचे श्रीनारायणमहाराज सांगत.

श्रीदासराममहाराज अभंगाचे पुढील कडव्यात साधनाचे महत्व सांगत आहेत. ते म्हणतात,





*''नामाचे साधनी प्रगटची होता। मार्गची पुढता दिसो लागे।।''*

तो प्रगट होण्यासाठी, आत्ता आपणाला होणारी ही देहाची–दृश्याची जाणीव नाहिशी व्हावयास हवी. पण या जागृतीत, स्वप्नात होणाऱ्या निरनिराळ्या दृश्य अदृश्य पदार्थांच्या जाणीवा कशा नाहीशा होणार ? यात बाऊ वाटण्याजोगे काहीच नाही. झोप लागताना या जाणीवा रोज नाहीशा होतातच की. ज्या साधनाने झोप लागताना या जाणिवा नाहीशा होतात तेच ते साधन आहे परमात्मप्राप्तीचे. 'झोप लागताना मन हे श्वासात लीन होते व मग झोप लागते' असे छांदोग्यपनिषदात सांगितले आहे. अर्थात श्वसन हे परमात्मप्राप्तीचे साधन आहे. आपले आयुष्य हे श्वासावर अवलंबून आहे. आयुष्यातील श्वास वजा केले तर कुठाय आयुष्य ? आपले आयुष्य म्हणजे एक रत्नांची पेटी आहे. तर श्वासोच्छ्वास ही त्या पेटीतील मौल्यवान रत्ने आहेत. समर्थ म्हणतात,

*''आयुष्य हेचि रत्नपेटी। माजी भजनरत्ने गोमटी।*
*ईश्वरी अर्पुनिया लुटी। आनंदाची करावी।।३/१०/२७।।''*

तर श्रीतुलसीदासमहाराज या रत्नांचे महत्व असे सांगतात,

*''तीन भुवन और चौदा लोक। एक श्वासका मोल।*
*तुलसी कहे रामभजनबीन। वृथा श्वास मत खोल।।''*

श्वासोच्छ्वास या आयुष्याच्या साधनाच्या अभ्यासाने परमार्थातील श्रेष्ठ अशी सच्चिदानंद पदवी प्राप्त होणार आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, *''आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।''* आमच्या श्रीमामामहाराजांनी या साधनाच्या अभ्यासाने 'सच्चिदानंद' ही पदवी प्राप्त करून घेतली होती. श्रीदासराममहाराज त्यांचे बाबतीत म्हणतात, *''आरती गोविंदा नित्यकीर्तनानंदा। सच्चिदानंदकंदा गुरुलिंगसाधुबोधा।।''* ही सच्चिदानंद पदवी प्राप्त व्हावी याकरता योगी दिवसाकाठी होणारे २१६०० श्वासोच्छ्वास अभ्यासतात. श्रीचांगदेवमहाराज सांगतात, *''एकवीस सहस्त्र श्वास ते उच्छ्वासी। ते योगिया अभ्यासी स्थीर स्थीर ।।''*

ज्या देहभावाने आपणास करंटेपण प्राप्त होऊन अद्वैताची वाट सापडत नाही, ज्ञानअन्न प्राप्त होत नाही, तो देहभाव विरणारे श्वासोच्छ्वास हे साधन आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे। श्रीविठ्ठलू रे।।''*हा देहभाव विरला, देहबुध्दी नाहीशी झाली तरच परमार्थ होऊ शकतो. देहावर राहून परमार्थ करता येत नाही. देहावर राहून केलेल्या परमार्थाची व्यवहारात जमा होते व देहावर न राहता केलेला व्यवहार हासुध्दा परमार्थ ठरतो.

देहाच्या विसरात खरे सुख आहे हे जाणून श्रीतुकाराममहाराज देवाची प्रार्थना करतात, ''हे देवा मला या देहाचा विसर पडू दे, खऱ्या सुखाची प्राप्ती होऊ दे.'' ते म्हणतात, *''देवा आता ऐसा करी उपकार। देहाचा विसर पाडी माझ्या।। तरीच हा जीव सुख पावे माझा। बरे केशीराजा येईल कळो।।''* देहाची जाणीव जर सतत होत असेल तर देहदुःख हे होणारच. ते सहन केले पाहिजे. देहात असताना देहातीत होण्यातच आपले हित आहे. देहातीत झालो तरच परब्रह्माची प्राप्ती होणार आहे. समर्थ म्हणतात,

*''देहची होऊनी राहिजे। तेणे देहदुःख साहिजे।*

*देहातीत होता पाविजे। परब्रह्म ते ।। ८ / ८ / २५ ।।''*

श्वसनाच्या अभ्यासाने - साधनाच्या अभ्यासाने जागृतीत देहाचा, मनाचा लय साधला असता होणारी चैतन्याची जाणीव म्हणजेच नामस्मरण होय. देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण हे श्रीदासराममहाराजांचे नामस्मरण आहे.

साधनाच्या अभ्यासाने निःश्वास खाली येण्याचे प्रमाण जसजसे कमी होईल, निःश्वास जो आत्ता अप्रमाण खाली येतो आहे, त्याला काही प्रमाण येईल तेव्हा देहाचा, मनाचा लय होऊन चैतन्याचा अनुहत नाद श्रवण होईल - नामश्रवण घडेल. श्रीदासराममहाराज सांगतात, *''निश्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप।।''* चैतन्याचा ध्वनी हे नाम वैखरीने





उच्चारता येत नाही. तो ध्वनी चैतन्यानेच होत असतो अर्थात हे नाम स्थूलदेहाच्या बहिर्मुख कानांना ऐकू येणारे नाही. नामश्रवण घडते आहे पण श्वासोच्छ्वास आहे तसाच चालला आहे याचा अर्थ नामश्रवण आपणास घडत नाही आहे असाच होतो. श्रीतुकाराममहाराज म्हणतात , *''नाम जपे त्यासी उरले साधन। ऐसे हे वचन बोलो नये।।''* साधन-श्वासोच्छ्वास सूक्ष्म झाले म्हणजे नामजप सुरु होतो. नामजप सुरु झाला की साधन उरत नाही. असा नामजप श्रवण होऊ लागला की कामक्रोध नाहीसे होतात.

हे नाम जाणायचे आहे. अनुभवायचे आहे. हे तोंडानी उच्चारायचे नाही आणि कोणी हा चैतन्याचा ध्वनी तोंडानी उच्चारला तरी त्याचा काही फायदा होणार नाही.

या साधनाच्या अभ्यासाने श्रवण होणाऱ्या नामाचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज ''नाम परब्रह्म वेदार्थे'' असे करतात तर श्रीतुकाराममहाराज ''चैतन्य निजधाम'' असे करतात. तर या नामाचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, *''श्रोत्रवाणी चक्षू याचे पैल नाम। जेथे नादब्रह्म अनिर्वाच्य।।''*

सगळ्या संतांनी या श्वासोच्छ्वासी असणाऱ्या नामाचा पुरस्कार केला आहे. समर्थ म्हणतात, *''नाम श्वासोच्छ्वासी असे। परब्रह्म तेथे वसे।।''* तर समर्थश्रीअक्कलकोटस्वामी म्हणतात, *''सकलही संती हे केले साधन। नामाचे स्मरण श्वासामाजी।।''* तर श्रीब्रह्मचैतन्यमहाराज म्हणतात, *''नका करू काही आस। राम जपा श्वासोच्छ्वास।।''* तर श्रीगुलाबरावमहाराज म्हणतात , *''आता मज एक सुचला उपाव। घेईन मी नाम श्वासोच्छ्वासी।।''* तर कबीरसाहेब सांगतात, *''सीताराम कहोजी मनमो। जब तक श्वास चला तनमो।।''* तर संत श्रीतुलसीदास सांगतात, *''श्वासो लेवे नाम बिना। सो जीवन धिक्कार। श्वासश्वासमो राम जप। वो ही धारणाधार।।''* तर श्रीमामामहाराज सांगतात, *''श्वासोच्छ्वासी*

*नाम साधुनी। काळाला हटवी।''* तर श्रीस्वामी स्वरुपानंद सांगतात, *''श्वासोच्छ्वासी देख राम नाम जप। होतो आपेआप अखंडीत।।''*

नाम हे श्वासोच्छ्वासात आहे हे समजले, पण ते श्वासात आहे का उच्छ्वासात आहे ? ते श्वासातही नाही किंवा उच्छ्वासातही नाही. ते श्वास आणि उच्छ्वास यांच्यामधील संधीकाळात आहे. या संधीकाळातील नाम साधणेची संधी आपण घ्यावयास हवी. या संधीकाळातील वेळेवर काळाची सत्ता नाही. श्रीदासराममहाराज सांगतात, *''श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ। तयाचिया पैल नाम आहे।। १ ।। म्हणोनी तयासी काळवेळ नाही। उध्दारची होई साधिलिया।।''* नामाला काळवेळ नाही म्हणजे ते केव्हाही उच्चारावे असा त्याचा अर्थ नसून ते सदासर्वदा उच्चारणे अपेक्षित आहे. श्रीमामामहाराज श्रीरामपाठात सांगतात, *''काळवेळ नामस्मरणासी नाही। सदासर्वदाही उच्चारावे।।''*अहो, सदा असणाऱ्या श्वासात असणारे नाम आम्ही सदाच घेतले पाहिजे. ते कालातीत आहे म्हणून ते नित्य आहे. म्हणून नामाचा नेम हाच नित्य नेम. अहो, अनित्य शरीराला धरून – देहावर राहून – कधी नित्यनेम होईल का ? म्हणून नामाचा नित्यनेम नामी आहे. मी नाहीसा करणारा आहे. म्हणून तो नेम वेगळाच आहे. मी नाहीसा झाला, आपण नामी झालो की आत्माराम प्रगट होणार आहे. श्रीनाथमहाराज म्हणतात, *''एका जनार्दनी नाम। नामी प्रगटे आत्माराम।।''* असा नामाचा नित्यनेम साधणारे दुर्लभच.

या साधनाने–श्वासोच्छ्वासाने नामाची प्राप्ती होते व नामी आत्माराम प्रगट होतो म्हणून या साधनाला 'नामाचे साधन' असे श्रीदासराममहाराजांनी संबोधले आहे.

नामाचे साधनाने गुप्त असणारा आत्माराम प्रगट होतो हा अनुभव श्री चिमडचे महाराज असे सांगतात, *''आजवरी गुप्तची होते बाई। आता दिशा प्रगटे दाही। याच डोळा याच देही। अनुभव घेणे।।* तर





समर्थरामदासस्वामी असे सांगतात, *''गुप्त तेचि प्रगटवावे। असाध्य तेचि साधावे। कानडेची अभ्यासावे। सावकास।। ६/२/२३ ।।''* तो प्रगट झाला की विश्वाचा आभास नाहीसा होतो. जे सत्य आहे तेच दिसू लागते. 'पाहणे आपणासी आपण' हे आत्मज्ञान होते. दृश्य नाहीसे होऊन दृष्टा हाच दृश्य होतो. त्यामुळे द्रष्टेपण नाहिसे होते. उपाधीचे ज्ञान न होताना उपाधीमध्ये गुप्तरुपाने असणाऱ्या चैतन्याचेच ज्ञान त्याला होते. सतत होणाऱ्या चैतन्याच्या ज्ञानाने अखंड चैतन्याचे स्मरण राहते. हे महाकारणदेही असणारे अखंड स्मरण म्हणजेच अद्वैताचे भजन – हरिकथा आहे. श्रीदासराममहाराज म्हणतात, *''महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा।''* हा सारा अनुभव आपल्या चर्मचक्षुंना येतो का ? नाही. हा सारा अनुभव अतिंद्रिय असा असतो. *''इंद्रिया नेणता भोगिजे।''* असाच तो अनुभव येतो. श्रीदासराममहाराज सांगतात, *''नेत्रावीण देखे श्रोत्रावीण ऐके। रसनेवीण चाखे ते निजवस्तू।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''चारीवाचेलागी कैसा स्फुरवीत। आणि विराजत षड्चक्री।।''* चक्राचक्रातून अनुभवाला येणारा चक्रपाणी चारी वाचांना स्फुरविणारा असाच आहे. जाणीव असणे हा आत्म्याचा गुण आहे. श्रीसमर्थ म्हणतात,

*''आत्मयाचे नाना गुण। ब्रह्म निर्विकार निर्गुण।*
*जाणणे एकदेशी पूर्ण। गुण आत्मयाचे।। २०/६/२९ ।।''*

ही जाणीव आहे म्हणून त्याला जाणता–साक्षी–असे संबोधतात. श्रीसमर्थ म्हणतात,

*''जाणता येक अंतरात्मा। त्याचा काय सांगावा महिमा।*
*विद्या कळा गुणसीमा। कोणे करावी।। १८/२/२३ ।।''*

ही जाणीव आहे तोवर बोलणे आहे. जाणीव नाहीशी झाली की बोलणे संपले. खरे मौन झाले. अर्थात आत्म्याचे ठिकाणी असणारी जाणीव

हीच चारी वाचेचे स्फुरण आहे. श्रीसमर्थ म्हणतात, *''जेथे जाणपण खुंटले। तेथे बोलणेही तुटले। हेतुरहित जाले। समाधान।। ९/४/४२ ।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''जीव शिव ऐसे उठती तरंग। सिंधू तो अथांग दासरामी।।''* जीव आणि शिव हे दोन्ही हरिरूपाचे – आत्मरुपाचे ठिकाणी उठलेले तरंग आहेत. श्रीनाथमहाराज सांगतात, *''जीव शिव दोन्ही हरिरूपी तरंग। सिंधू तो अभंग नेणे हरी।।''* आत्मरूपालाच हरी, नारायण असे संबोधले जाते. *''एक हरी आत्मा जीव शिव समा। वाया तू दुर्गमा न घाली मन।।''* – श्रीज्ञानेश्वरमहाराज. *''नराचा समुदाय गहन। त्यासी 'नार' म्हणती जाण। त्याचे 'अयन' म्हणजे स्थान। म्हणौनि म्हणती 'नारायण' आत्मयासी।।''* – श्रीनाथमहाराज. ही संतवचने याला प्रमाण आहेत.अर्थात जीव आणि शिव आत्मरुपापेक्षा वेगळे नाहीत, हे उघड आहे. श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या, श्रीगुरुलिंगगीतेत भ. स. निंबरगीकरमहाराज सांगतात, *''येनु इल्लदानू याक निन्न नीनू। सत्यचिदानंदनू आत्मारामा।। १ ।। बंदिल्ला जीवात्मा नोडगे वळग। नाद बिंदू तोरिसी तम्मा।।२ ।।* अरे, हे काही नाहीच आहे, मग तू व तुझे कशाला पाहिजे ? सत्य एक चिदानंद आत्माराम तेवढा आहे. अरे बाळा, जीवात्मा काही उत्पन्न झालेला नाही. तो वस्तुत: आत्मरूपच असून त्याचे ठिकाणी उत्पत्ती व नाश नाही. हे सागराचे ठिकाणी – हरीचे ठिकाणी कल्पनेने उठलेले तरंग (जीव, शिव) नाहीसे झाले की हरीची प्राप्ती होणार आहे. हे तरंग कसे नाहीसे होतात हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, *''हा प्राण आटला वाऱ्यामाजी। संगम किती हा गोड। शांत हरीच्या नामी काया। सर्व मन हे जाय विलया। वायुलहरी वायुसागरी मिनली। जेणे हरीची जोड ।।''* असा काही हरीचा साक्षात्कार मला व आपणा सर्वांना व्हावा अशी प्रार्थना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐





।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

### अभंग ४

*नेत्राविण देखे श्रोत्राविण ऐके।*
*रसनेवीण चाखे ते निजवस्तू।।१ ।।*

*पायावीण चाले मुखावीण बोले।*
*अंगावीण खेळे ते निजवस्तू।।२ ।।*

*तृप्ती पाण्यावीण जेवी नसता अन्न।*
*व्यवहारी धन नसता काही।।३ ।।*

*करावीण सर्व करी तो व्यापार।*
*करितो संसार नारी नसता।।४ ।।*
*अरुप निर्गुण निर्विकार पूर्ण।*
*ऐसी निरंजन वस्तू आहे ।। ५ ।।*

*काही नसता तेथे खेळतो हा खेळ।*
*दावितो नवल दासरामा।। ६ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.१३५१

अथर्ववेदात समावेश असणाऱ्या कैवल्यउपनिषदातील एकविसाव्या मंत्रात व्यक्त झालेला आशय श्रीदासराममहाराजांचे या अभंगात व्यक्त झालेला आहे. कैवल्यउपनिषद आत्म्याचे वर्णन असे करते,

*''अपाणिपादोहमचिन्त्यशक्तिः पश्याम्यचक्षुः स श्रुणोम्यकर्णः।*
*अहं विजानामि विविक्तरूपो न चास्ति वेत्ता मम चित्सदाहम्।।२१ ।।*

अर्थ : मी हातापायाशिवाय असूनही अतर्क्य शक्तीचा आहे. डोळ्याशिवाय असूनही मी पाहतो, कानाशिवाय ऐकतो, रुपरहित मी (प्रत्येक गोष्ट) जाणतो.

परंतु मला जाणणारा कोणीही नाही. मी सदा शुध्द ज्ञानस्वरुप आहे.

स्वामी चिन्मयानंद या कैवल्यउपनिषदाचे व त्यातील या मंत्राचे महत्व असे सांगतात, ''हिंदू संस्कृतीच्या खजिन्यातील 'कैवल्योपनिषद' हा जर दुर्मिळ रत्नखचित दागिना असेल तर, हा मंत्र दागिन्यांचे सौंदर्य वाढविणारा त्यातील मध्यभागी असलेला मौल्यवान सुंदर हिरा आहे असे आपण नि:संकोचपणे म्हणू शकू.''

साधनाचे अभंग या शीर्षकाखाली श्रीदासरामगाथेत समाविष्ट असणाऱ्या अभंगांपैकी (अ.क्र. १३३८ ते १३५२) हा अभंग आहे. श्रीरामानंदमहाराजांनी श्रीदासराममहाराजांना साधनाचे अभंग करावयास सांगितले व त्यांचे आज्ञेवरून श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे कृपेने श्रीदासराममहाराजांचे ठिकाणी अंत:स्फूर्त झालेले हे 'साधनाचे अभंग' आहेत. या साधनाच्या अभंगाबद्दल श्रीदासराममहाराज असे सांगतात,

*''रामानंदमहाराज बोधिती माते। करी अभंग ते साधनाचे ।।१ ।।*
*हनुमंत सद्गुरुराये नवल केले। अबोल वदविले, निजकृपे ।।२ ।।*
*तुकाराम वाणी स्वप्नात येवोनी। आनंद देवोनी गेले मज ।।३ ।।*
*नागाप्पाण्णा करिती कवतूक। दिली प्रेमे भीक संतोषाची ।।४ ।।*
*सिध्दांचा प्रसाद गोडी ते अगाध। दासरामा बोध साधनाचा ।।५ ।।*

विशेष म्हणजे हे साधनाचे अभंग त्यांचे बालपणीच त्यांचे ठिकाणी अंत:स्फूर्त झालेले आहेत. लौकिकदृष्ट्या उपनिषदांचा अभ्यास नसताना, संस्कृतचे विशेष ज्ञान नसताना असा उपनिषदातील आशय अभंगातून व्यक्त होणे ही निश्चित अलौकीक गोष्ट आहे. श्रीतुकाराममहाराजांनी वेदाचा अर्थ अभंगातून व्यक्त केला ही जितकी अवघड गोष्ट आहे, तितकीच ही गोष्ट अवघड आहे असे मला वाटते.

श्रीदासराममहाराज यांच्या या साधनाच्या अभंगातील हा १४ वा अभंग आहे. त्यात ते सांगतात, ***''नेत्रावीण देखे श्रोत्रावीण ऐके।***





***रसनेवीण चाखे ते निजवस्तू ।।''*** आत्मा जेव्हा आत्म्याला पाहतो किंवा चैतन्याला जो चैतन्याचा अनुभव येतो, तो या देहाच्या डोळ्यांना येत नाही. अर्थात हे चैतन्याचे पाहणे नेत्रेवीणच असते हे उघड आहे. चैतन्याचा अनुभव इंद्रियांना बाजूला ठेवूनच घ्यावा लागतो. अर्थात चैतन्याचा अनुभव जड देहाच्या कोणत्याच इंद्रियाला येत नाही. चैतन्य हे मनबुध्दीलाही अगोचरच आहे. अर्थात ते शब्दातही मांडता येत नाही. *'' हे शब्देवीण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे। बोला आदि झोंबिजे। प्रमेयासी ।। १/५८ ।।''* – श्रीज्ञानेश्वरमहाराज व *'' दृश्यास दिसे ते दृश्य। मनास भासे तो भास। दृश्यभासातीत अविनाश। परब्रह्म ते ।। १४/९/१९ ।। ''*– श्रीसमर्थ. ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

आपण जे या डोळ्यांनी देवदर्शन व्हावे या हेतूने प्रयत्न करतो, ते सारे व्यर्थ आहे किंवा आम्ही या डोळ्यांनी देव पाहिल्याचे सांगतो, त्यालाही फारसा अर्थ नाही.

*''तैसे स्थुलाकारी नाशिवंते। भरंवसा बांधोनि चित्ते।*
*पाहती मज अविनाशाते। तरी कैचा दिसे ।।९/१५२ ।।''*

*''दृष्टीचा देखणा। दृष्टी अगोचर।*
*दृष्टीसी गोचर कैसा होये ।।''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने व

*''अस्थिचा देही मांसाचा डोळा। पाहेन म्हणे ब्रह्माचा गोळा।*
*तो ज्ञाता नव्हे आंधळा। केवळ मूर्ख ।।६/८/४६ ।।''*

हे श्रीसमर्थांचे वचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

मग आपण जे जड दृश्य पाहतो ते नेत्रेवीण असते का ? हो ते ही 'नेत्रेवीण' च असते. हे विश्व म्हणजे 'चिद्विलास' आहे. चैतन्याची जाणीव चैतन्याला होणे हेच येथील पाहणे. या विश्वात काही साधर्म्य आहे. साम्य

आहे. म्हणूनच देणे, घेणे, पाहणे, ऐकणे या क्रिया होऊ शकतात. उपभोक्ता व उपभुक्त यात आत्मतत्व असेल, चैतन्य असेल तरच पाहण्याचे, ऐकण्याचे सुख. कोणा एकात जर आत्मतत्व नसेल तर हे सुख जाणवत नाही. सजीवात चैतन्य आहे. जाणीव आहे हे मान्य पण निर्जिवात चैतन्य आहे का ? हो. निर्जिवातही चैतन्य आहे. श्रीदासराममहाराज हे कीर्तनात ही गोष्ट पटवून देताना सांगत, ''स्पंदाशिवाय पदार्थ नाही, श्वसनाशिवाय स्पंद नाही. जीवाशिवाय श्वसन नाही म्हणजे आहे ते सारे सजीव आहे. चैतन्यमय आहे.'' म्हणजे या चैतन्याची जाणीव झाली – साधर्म्याची जाणीव झाली तर पाहणे, भेटीचा आनंद. हे जे सामान्यपणे विश्वात पसरलेले जे चैतन्य आहे तेच श्रीदासराममहाराजांचे दृष्टीने असामान्य आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, ***''सर्व विश्वामाजी असे जे सामान्य। तेचि असामान्य दासरामी ॥''*** म्हणून विश्व जरी भिन्न असले तरी ज्ञान – जाणीव मात्र चैतन्याचीच आणि तीही चैतन्यालाच. हे साम्य जर अनुभवले तर वैषम्य आहे कुठे? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, ***''म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान। जैसे अवयव तरी आनआन। परी एकेचि देहीचे ॥ ९/२५० ॥''*** अनंतरूपाने अनंतवेषाने हे चैतन्य नटलेले आहे खरे, पण ज्ञानेश्वरमहाराजांनी अनंतरुपे न पाहताना त्याला (चैतन्याला) पाहिले, आणि आम्ही त्याला न पाहताना अनंतवेषातील अनंतरुपेच पाहतो. अनंतरुपाने अनंत वेष करुन एक चैतन्यच नटले आहे. पण चैतन्याची जाणीव आपणास नसल्याने अज्ञानाने आम्हाला मात्र अनंतरुपे व अनंतवेषांची जाणीव होते. वस्तुत: चैतन्यच चैतन्याला पाहते, जे नेत्रेवीण असते पण अज्ञानाने विपरितज्ञान मात्र देहाचे, दृश्याचे होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***'' म्हणोनि सर्वत्र मीचि मिया। घेपतसे धनंजया। परी दृश्यत्व हे वाया। अज्ञानवशे ॥ १८/११२४ ॥''*** आपल्या खऱ्या रुपाची जाणीव नसल्याने, आपण आपल्याला विसरल्याने, आपल्या आत असणाऱ्या चैतन्याची जाणीव आपल्याला नसल्याने, खरे पाहिले तर चैतन्याचे ज्ञान चैतन्याला होऊनही आपणाला चैतन्याची जाणीव





होत नाही. आकाराचे विपरित ज्ञान होते व त्यालाच आम्ही खरे ज्ञान समजतो. म्हणून सारा घोळ होतो. श्रीदासराममहाराज सांगतात, ***''आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी रहाणे आपणसी ॥१ ॥ आपणा पहाता आकार उरेना। बोलाया राहेना पाहता कोणी ॥२ ॥ दासरामा गूज लाधले सहज। कृपा महाराजे पूर्ण केली ॥३ ॥*** म्हणजे अद्वैताचे ज्ञान होणेसाठी – साधर्म्य अनुभवणेसाठी – आपणातील चैतन्याची जाणीव होणे गरजेचे आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

> ***''म्हणोनि आपणपा विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे।***
> ***ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा ॥ ६/४०९ ॥''***

अहो, 'नादश्रवणी तदाकारता' साधली तर नयनात वारे भरणार, नाहीतर पदार्थच भरणार. भ. स. निंबरगीकरमहाराज सांगायचे, ''साधकाने दृष्टी उघडली की त्याला आधी वस्तू दिसली पाहिजे, चैतन्य जाणवले पाहिजे. मग तो पदार्थ दिसला पाहिजे. असे होत नसेल तर या साधकाची दृष्टी दग्ध आहे. ज्याला डोळा उघडला की आधी वस्तू (आत्म) दिसते व मग पदार्थ दिसतो तो साधक, सिध्द नव्हे. मग आपली अवस्था काय आहे, हे ज्याचे त्याने तपासून पहावे.

आपण दोन माणसे एकमेकांना भेटतो. त्या ठिकाणी नेमके काय होते हे बघण्यासारखे आहे. आपण दुसऱ्या माणसाचे डोळ्यात न पाहता त्याची देहाकृती पाहिली. दुसऱ्या माणसाने आपले डोळ्याकडे न पाहताना आपली देहाकृती पाहिली. आपण दोघांनी एकमेकांची देहाकृती पाहिली. पण भेट होते का ? भेट होत नाही. देहच जर देहाला पहात असेल तर भेट व्हावयास हवी. मग भेट नेमकी कुणाची होते व केव्हा होते ? आपण जर दोघांनी एकमेकांकडे पाहिले व माझी जाणीव त्याचे ठिकाणी निर्माण झाली व त्याची जाणीव माझे ठिकाणी निर्माण झाली तरच भेट होते. भेटीमागचे हे वर्म श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, ***''तुका म्हणे भेटी। जव नोहे दृष्टादृष्टी ॥''*** म्हणजे माझ्या

डोळ्यांनी त्याचे डोळे पाहिले व त्याच्या डोळ्यांनी माझे डोळे पाहिले म्हणजे भेट होते का ? कित्येक माणसांचे डोळे झोपेत उघडे असतात. आपण जर त्या झोपलेल्या माणसाच्या डोळ्यात पाहिले तर भेट होते का ? त्याचा आकार पूर्णपणे आपण पाहतो, पण भेट होत नाही. या देहाच्या डोळ्याने फक्त आकाराचेच ज्ञान होते. निराकाराचे ज्ञान होत नाही. आपण जेव्हा एकमेकांना भेटतो तेव्हा आपल्यातील चैतन्य त्याच्या चैतन्याला पाहते, जे नेत्रेवीण असते व नंतर देहाच्या डोळ्यांना आकाराचे ज्ञान होते व भेटीचे समाधान होते. चैतन्याची जाणीव चैतन्याला झाली नाही तर नुसत्या डोळ्याला होणाऱ्या आकाराचे ज्ञानाने, भेटीचे समाधान होत नाही. आपल्या आतील चैतन्याची जाणीव आपल्याला नसल्याने, विश्वातील चैतन्याची जाणीव आपल्या आतील चैतन्याला होऊनही, ही चैतन्याची जाणीव आहे हे आपणाला उमगत नाही व फक्त आकाराचेच विपरीतज्ञान आपणास होते. म्हणजे आपण भेटतो, आपण एकमेकाला पाहतो म्हणजे चैतन्याची जाणीव चैतन्याला होते, आत्म्याची जाणीव आत्म्याला होते असेच होते ना ? हे पाहणे 'नेत्रेवीण' असते, हा सारा आशय श्रीदासराममहाराज त्यांचे एका अभंगात सांगतात. तो अभंग असा, *''डोळा डोळ्यासी न पाहे। आत्मा आत्मरूप पाहे ।। डोळा न पाहे आत्मया। आत्मा पाहतो डोळिया।। तेथे पाही कवणा कोण। का हे माजविले दोन। वोखटे हे द्वैत। आप आपणू विलसत।। पूर्ण आत्मानंद घन। दासराम उरला कोण।।''* ऐकणे, चव घेणे या क्रियासुद्धा चैतन्याच्या जाणीवेतच होणाऱ्या आहेत.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''पायावीण चाले मुखावीण बोले। अंगावीण खेळे ते निजवस्तू।।''*या जगात चैतन्य नाही अशी जागा नाही. मग कुठे जाण्यासाठी पायाची ती काय गरज ? अर्थात ते चालते ते पायावीणच. नि:शब्द चैतन्य हे साधकाला अनुभवाने नि:शब्द करणारेच आहे. चैतन्य जे बोलते ते 'शब्देवीण संवादीजे' असेच असते. ते मुक्याने बोलते. अर्थात ते बोलते ते मुखाविणच. हाच आशय थोर संत उध्दव





चिद्‌घन असा व्यक्त करतात,

*''ही खूण गुरु जाणे गुरु जाणे। येरा टकमक पाहणे।।धृ।।*
*पायावीण जे चाले। चालत परी ते पाय न हाले।।१ ।।*
*देव मुक्याने सांगे। सांगे परी ते मौन न भंगे।।२ ।।*
*उध्दव चिद्‌घन पाहे। सगळा डोळस होऊनी पाहे।।३ ।।*

देहाच्या उपाधीत चैतन्य सापडले आहे हे खरे, पण त्याचा देहाशी काहीही संबंध नाही. चैतन्याच्या कक्षेत शरीर आहे इतकेच. ते स्वत: असंगच आहे. ते निरुपाधीक अत्यंत शुध्द असे आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''आता असंगा साक्षीभूता। देही चैतन्याची जे सत्ता।*
*तिये नाव पंडुसूता। चेतना येथे।।*१३/१३४ ।।''

*'' हा अनादी नित्यसिध्दू। निरुपाधी विशुध्दु।*
*म्हणऊनी शस्त्रादिकी छेदू। न घडे यया।।*२/१४५ ।।''

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''तृप्ती पाण्यावीण जेवी नसता अन्न। व्यवहारी धन नस्ता काही।।''* शरीरात चैतन्य आहे तोवर शरीराला पाण्याची, अन्नाची गरज व ही गरज भागविण्यासाठी धनाची गरज आहे. अन्नपाणी मिळाले नाही तर शरीर मरते, चैतन्य नाही. चैतन्याला जन्म ही नाही अर्थात मरणही नाही. ज्यांचे देहाशी तादात्म्य आहे, ते खाण्याकरता जगतात. ज्यांचे चैतन्याशी तादात्म्य आहे, ते जगण्याकरता खातात. चैतन्यरुप महात्म्यांची अवस्था कशी असते, हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

*''जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जयाचा जठरु।*
*तया क्षुधातृषेचा अडदरु। कहीची नाही।।*२/३३९ ।।''
*तहाने तहानचि पियावी। भुकेलिया भुकची खावी।*
*अहोरात्र वावी। मवावा वारा।।*१२/६३ ।।

देहाला खायला, प्यायला लागते, तरच देहाचे व्यवहार होतात. म्हणून देहाचे व्यवहार होण्याकरता धनाची गरज आहे. चैतन्याच्या होणाऱ्या व्यवहारासाठी कोणत्याही धनाची गरज असत नाही.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''करावीण सर्व करी तो व्यापार। करीतो संसार नारी नसता ।।''* त्या चैतन्याला हातही नाही, पायही नाही. भ. स. श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज सांगतात, *''नसे हात ना पाय त्या निर्गुणाते। निराकारही मानवेना तयाते। निराकार साकार ऐसा वरावा। मना राम तो अंतरी साठवावा ।।''* त्याला हात नाही पण प्रकृतीच्या (वायुरूप) माध्यमातून करतो सारे तोच.

*''हे करणे का न करणे। हे आघवे तोचि जाणे।*
*हे विश्व चळतसे जेणे। परमात्मेनी ।। १२/११८ ।।''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ओवी हे स्पष्ट करणारीच आहे. कर्माचा उगम वासनेत आहे. त्यामुळे वासनेच्या योगाने प्राप्त होणारा जन्म, त्यापाठोपाठ येणारे मरण हा संसरणरुपी संसार जीवाला प्राप्त होतो.

१) *जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।*
– श्रीनाथमहाराज

२) *वासना बायको शेजारीण। झगडी कुटील मोठी दारुण।*
*हिचे पायी नागवण। घर बुडवीसी ।।*
– श्रीनाथमहाराज

३) *पुनरपि जननं पुनरपि मरणं। पुनरपि जननीजठरे शयनम्।*
*इह संसारे बहुदुस्तारे। कृपयाऽ पारे पाहि मुरारे ।। २१ ।।*
– जगद्गुरु शंकराचार्य

४) *जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगे। होईजे येणे जगे।*
*आत्मा गुणसंगे। संसारिया ।। १४/३३ ।।*
– श्रीज्ञानेश्वरमहाराज





५) *तेथ सोहंहंसाची बोळवण। न करिताची जाहली जाण।*
*येणे पळाले जन्ममरण। पडले शून्य संसारा ।।*
– श्रीनाथमहाराज

ही सारी संतवचने साकल्याने पाहिली असता जीवाला प्राप्त होणारा संसार कोणत्या स्वरुपाचा आहे, तो नारीवीण कसा आहे, हे कळल्यावाचून राहणार नाही.

निरंजन वस्तू – आत्मवस्तू कशी आहे हे श्रीदासराममहाराज अभंगात पुढे सांगतात, *'' अरुप निर्गुण निर्विकार पूर्ण। ऐसी निरंजन वस्तू आहे ।।''* निरंजन वस्तू – आत्मवस्तू ही नामरुपातीत, गुणातीत अर्थात जाणीवरहित, पापपुण्यरहित, जन्ममरणरहित, भ्रमरहित, उपाधीरहित, वेगळेपणाने पाहता न येणारी, अविनाशी, अरुप, निर्गुण, निर्विकार, निराकार, पूर्ण परब्रह्मस्वरुप आहे. तिनेच हा सारा मायेचा खेळ मांडला आहे.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''काही नसता तेथे खेळतो हा खेळ। दावितो नवल दासरामा ।।''*

सत्य ब्रह्माच्या अस्तित्वावर कल्पनेने भासमान होणारे हे जगत हा परमेश्वराचाच खेळ आहे. विश्व भासमान होणे किंवा विश्वाचा आभास नाहिसा होणे हे दोन्ही त्याच्या सत्तेनेच होते. हा सारा त्याचाच खेळ आहे. हा त्याने खेळ मांडून दिला आहे. तो आपण कौतुकाने खेळला पाहिजे. म्हणजे अंतर्बाह्य सुख होणारे आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, *''तुका म्हणे आता खेळतो कौतुके। झाले तुझे सुख अंतर्बाही ।।''* या खेळामध्ये जो गुंतत नाही, जो खेळ खेळून निराळा राहतो, तोच खरा खेळिया. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, *''खेळ खेळूनी निराळा राही। सांडी या विषयाची घाई रे। तेणेच खेळे बसवंत होसी। ऐसे सत्य जाण माझे भाई ।।''* या खेळियांमध्ये श्रीमारुतीराय हे तरबेज खेळाडू होते. खेळ कसा खेळावा, हे त्यांनी दाखवून दिले. श्रीनामदेवमहाराज सांगतात, *''खेळियामाजी हणम्या*

*बळकट। न सापडे काम व्यसनी। काम नाही तेथे क्रोध कैचा। मग कैसा भांडणार रे।।''* खेळात जय पराजय हे अटळ आहे. कोणाचा तरी जय होणार. कोणाचातरी पराजय होणार. आपला जय व्हावा याकरता प्रामाणिक प्रयत्न करावयास हरकत नाही. पण यशाने हुरळून जाता कामा नये किंवा पराभवाने खट्टू होता कामा नये.

खेळ कसा खेळावा हे सांगताना श्रीब्रह्मचैतन्यमहाराज लहान मुलींचे उदाहरण द्यायचे. ते सांगायचे , ''लहान मुली खेळणपीठाने खेळत असतात. खेळ अगदी रंगात आलेला असतो. तेवढ्यात आई हाक मारते. त्यावेळी ती मुलगी जसा कोणताही विचार न करताना खेळ गोळा करते तसे, परमेश्वराची हाक आली की आपल्याला हा खेळ कोणताही विचार न करताना गोळा करता आला पाहिजे.''

परमेश्वराने कोणता खेळ मांडला आहे? परमेश्वराने वाऱ्याचा खेळ मांडला आहे. हे सारे कर्तृत्व वाऱ्याचे आहे. आत्म्याचे ठिकाणी असणाऱ्या जाणीवेमुळे होणारा श्वासोच्छ्वास हा त्याचा खेळ आहे. समर्थ म्हणतात,

*''नाडिद्वारा धावे जीवन। जीवनामध्ये खेळे पवन।*
*त्या पवनासरिसा जाण। आत्माही विवरे।।* १३/९/१३ ।।''

जीवनामध्ये जो पवन खेळतो आहे त्या खेळाचे ठिकाणी जो सतत जागा राहतो व जो कामक्रोधाने खेळाचा बेरंग होणार नाही हे पाहतो – कामक्रोधाने आपल्या श्वसनाची गती बदलणार नाही हे पाहतो, तो देवच होऊन जातो. श्रीमामामहाराज सांगतात, *''खेळामाजी जो जागला। दास म्हणे देव झाला।।''* असे देवरूप झालेले महात्मे – ब्रह्मरूप झालेले महात्मे, ब्रह्माशीच खेळतात. *''ब्रह्म होऊनी ब्रह्मीच खेळे''* अशीच ती अवस्था असते. अशा ब्रह्मरूप झालेल्या महात्म्यांना हे विश्व म्हणजे चमत्कार वाटतो. श्रीदासराममहाराज सांगायचे ''हे विश्व म्हणजे आकाशाचा चमत्कार आहे. ५० वर्षांपूर्वी हे आत्ता दिसणारे विश्व मला दिसत नव्हते, आणखी ५० वर्षांनी





निश्चित मला हे दिसणार नाही आहे. मग हे आत्ताच कुठून आले ? हे विश्व पाहताना हे आपण काय नाही तेच पाहतो आहोत असेच मला वाटते. *'' नव्हतेच कैसे झाले रे खेळिया। नाही तेच दिसू लागले रे।।''* या श्रीनामदेवमहाराजांच्या शब्दात श्रीदासराममहाराजांच्या अनुभूतीचे वर्णन करता येईल.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

**अभंग ५**

*सर्वांचे अंतरी धर्म तो सारखा ।*
*दुजा भाव देखा नाही तेथे ।।१ ।।*

*जो का दारिद्र्यात तोची श्रीमंतात ।*
*म्हणोनी अद्वैत बोलताती ।।२ ।।*

*आत्मा तोची धर्म नाम तो आचार ।*
*संत सदाचार बोलताती ।।३ ।।*

*गोविंदतनय सांगे सकळा अंतरी ।*
*भरला श्रीहरि सारिखाची ।।४ ।।*

– दासरामगाथा अ.क्र. ९१५

माणसाला जिवंत रहायचे म्हणजे, देहरक्षणासाठी अन्न, वस्त्र, निवारा यांची गरज आहेच. कोणीही असो, दुपारी १२ ची वेळ कठीण आहे. सकाळी उठलो की आज काय जेवायला करायचे ? हा प्रश्न आहेच. आणि तो प्रश्न सोडविण्यासाठी कर्म करणे हे अनिवार्य आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''म्हणऊनि संगु जव प्रकृतीचा । तव त्यागु न घडे कर्माचा ।*
*ऐसियाही करू म्हणती तयाचा । आग्रहोचि उरे ।। ३/६३ ।।''*

कर्म हे बेलगाम होऊ नये म्हणून, त्रासदायक होऊ नये म्हणून, कोणाच्या हितास बाधा आणणारे होऊ नये म्हणून वडिलधाऱ्या माणसांनी, जाणत्या माणसांनी सर्वांना सोयीचे व्हावे अशा पध्दतीने कर्म कसे करावे, यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे, नियम, बंधने निर्माण केली, त्याला धर्म ही संज्ञा प्राप्त झाली. ज्यांना हे नियम पटले, त्यांनी त्यांनी हे नियम पाळण्याचे बंधन स्वत:वर घालून घेतले. अशा नियम पाळणाऱ्यांचा एक समुदाय निर्माण झाला.





ते त्या धर्माचे अनुयायी झाले. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''एथ वडील जे जे करिती । तया नाम धर्मू ठेविती । तेचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ।।३/१५८ ।।''*

देश काळ परिस्थितीनुसार, माणसाच्या प्रकृतीनुसार अनेक धर्मांची निर्मिती झाली. पुढे माझा धर्म श्रेष्ठ का तुझा धर्म श्रेष्ठ असे वाद निर्माण केले गेले. माणसामाणसात भेद निर्माण झाले. स्वेच्छेने, सक्तीने धर्मांतरे होऊ लागली.माणसाला सुखकर व्हावे म्हणून निर्माण झालेले धर्म दु:खाला कारणीभूत ठरू लागले. धर्माच्या आधाराने माणसे एकमेकांशी जोडली जाणे दूरच, माणसे एकमेकांना दुरावू लागली. अमंगळ भेदाभेद वाढत गेला. मग विष्णुमय जग कसे अनुभवाला येणार ? ''या जातीच्या ,धर्माच्या, पंथाच्या भिंती कोसळून पडल्याशिवाय आकाशाचा – आत्म्याचा – साक्षात्कार होणार नाही.'' हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घेणेसारखे आहे.

अंत:करणातील सर्व भेद नाहीसा होऊन त्याचे एकपण जाणवणे म्हणजे भगवंताला शरण जाणे आणि असा जो सर्व प्रकृतिधर्म सोडून भगवंताला शरण जातो, त्याला भगवान मोक्ष प्राप्त करून देतात. डोकीतील भेद गेलेला नाही आणि दिवसातून ५० वेळा भगवंताच्या पायावर डोके ठेवतोय, त्याचा काही उपयोग नाही. ही शरणागती नव्हे.

*''पै आपुलेनि भेदेविण । माझे जाणिजे जे एकपण ।*
*तयाचि नाव शरण । मज येणे गा ।।१८/१३९८ ।।''*

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन व

*''सर्व धर्मान् परित्यज्य । मामेकं शरणं व्रज ।*
*अहम् त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच: ।। १८/६६ ।।''*

हे गीतावचन यावर प्रकाश टाकतात.

जो धर्म माणसामाणसात भेद वाढवितो, तो धर्म आहे का ? हा इथे

प्रश्न आहे. म्हणून श्रीदासराममहाराजांनी सगळ्यांना जोडणारा, सगळ्यांना एका सूत्रात गुंफून ठेवणारा धर्म सांगितला. ते म्हणतात, *''सर्वांचे अंतरी धर्म तो सारखा। दुजा भाव देखा नाही तेथे।।''*श्रीदासराममहाराजांनी जो धर्म सांगितला आहे तो सर्वांपेक्षा वेगळा आहे. एकतर हा धर्म 'सर्वांचे अंतरी' आहे. त्यामुळे त्याचे कर्म बाहेर दिसणारे, दुसऱ्याला उपद्रव करणारे नाही. त्यामुळे तुमचा धर्म तुमच्या घरात करा हे कोणी सांगायचे कारण नाही. दुसरे म्हणजे हा धर्म सारखा आहे. म्हणजे कोणाचाही धर्म वेगळा नाही. त्यामुळे धर्मांतर करणे, घडविणे हा प्रकार येथे नाही. हा धर्म तुम्हाला सोडता येत नाही आणि जरी तुम्ही धर्म सोडलात तरी तो धर्म तुम्हाला सोडत नाही. म्हणून तो ''सांगातीचा धर्म'' म्हणून ओळखला जातो. सगळ्यांचा धर्म सारखा असल्याने हा अमक्या धर्माचा, हा तमक्या धर्माचा हा दुजाभाव तेथे रहात नाही. बाह्यत: तुम्ही कोणत्याही धर्माचे असा, हा 'धर्म' जाणला, जे सर्वत्र अंतरात एकसारखे पसरले आहे, ते जाणले, धर्माचे हे अंतरंग जाणले की सर्व मतभेद नाहीसे होणार आहेत. बाह्यत: कोणताही धर्म त्या माणसाचा असू दे, त्याला हा धर्म जाणून घेण्याचा अधिकार आहे. या धर्मात कोणत्या देवाची उपासना केली जाते ? या धर्मात 'वारा' हा देव आहे आणि 'वारा' हाच भक्त आहे. देव आणि भक्त यातसुध्दा येथे द्वैत नाही. फक्त हे वारे पंचमहाभूतातील नसून 'चैतन्याचे वारे' आहे, हे आपण लक्षात घ्यावे. आपल्या आत जे वारे आहे, जे चैतन्य आहे तेच विश्वात कसे भरून राहिले आहे हे अनुभवणे हे त्या धर्माचे ध्येय आहे. हे चैतन्याचे वारे अनुभवले असता सर्व धर्मातील भेद नाहीसे होणारे आहेत. या चैतन्यातून विश्वाची निर्मिती झाली असून साऱ्या विश्वात चैतन्य भरून राहिले आहे. हे सामान्यपणे सर्वत्र सारखेपणाने गुप्तरुपाने पसरलेले चैतन्य हेच श्रीदासराममहाराजांचे दृष्टीने 'असामान्य' असे आहे. श्रीदासराममहाराज म्हणतात, *''सर्व विश्वामाजी असे जे सामान्य। तेचि असामान्य दासरामी।।''*त्यांना सर्वत्र चैतन्यच दिसत होते. त्यांना घाणीत चैतन्य दिसत होते. तर आम्हाला चैतन्यात घाण दिसते. इतका फरक आहे





त्यांच्यात व आमच्यात.

ज्या महात्म्यांचे या चैतन्याशी तादात्म्य आहे, त्यांचे ठिकाणी आपणाला द्वैत अनुभवाला येणार नाही. ज्यांचे द्वैताशी तादात्म्य आहे, ज्याचे उपाधीशी तादात्म्य आहे ते आम्ही , त्यांना सर्वत्र द्वैतच अनुभवाला येते. 'मी' कसा सगळ्यांपेक्षा वेगळा आहे हेच आम्ही पहात असतो. याउलट ज्यांचे तादात्म्य अद्वैताशी आहे – ज्यांचे तादात्म्य या चैतन्याशी आहे – ते संत. त्यांना सर्वत्र अद्वैत अनुभवाला येते. संतांना द्वैतात अद्वैत अनुभवाला येते व आम्ही अद्वैतात द्वैत अनुभवतो–परमार्थात द्वैत अनुभवतो. आमच्या श्रीमामामहाराजांनी, श्रीदासराममहाराजांनी अद्वैत परमार्थ आचरिला. अद्वैत बोलणारे खूप आहेत, पण असे अद्वैत आचरणारे विरळाच. उगीच का त्यांच्याकडे सर्व संप्रदायातील सर्व धर्मांची माणसे आपलेपणाने, हे आपलेच घर आहे असे समजून येत. त्यांना सर्व माणसे आपलीच वाटत. त्यांना कोणी परके दिसलेच नाही. म्हणून श्रीमामामहाराज, श्रीदासराममहाराज समजून घ्यायचे असतील, तर अंत:करणातील सारे द्वैत, भेद लयाला जायला पाहिजेत.

*'' विचित्र भूते विचित्र नाम। विचित्राकारे जग विषम।।*
*तेथे देखे सर्वी सर्व सम। परब्रह्म समत्वे।। ''*

– श्रीनाथमहाराज

*'' म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान।।*
*जैसे अवयव तरी आनआन। तरी एकेची देहीचे।।*९/२५० *।।''*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने श्रीमामामहाराज, श्रीदासराममहाराज यांच्या पारमार्थिक अधिकाराचे वर्णन करणारीच आहेत. त्यांना सारे जग विष्णुमयच दिसत होते. हे सर्व विश्व वासुदेवरूपच आहे, हा त्यांचा अनुभव होता. म्हणून त्यांचेपाशी गरीब, श्रीमंत, ज्ञानी, अज्ञानी हा भेद नव्हता. गरीबाला जी वागणूक तीच

श्रीमंताला. त्यांनी जे आचरिले, तेच सर्वांना सांगितले. म्हणून ते वंदनीय ठरले.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''जो का दरिद्र्यात तोची श्रीमंतीत। म्हणोनी अद्वैत बोलताती।''*** गरीबी अथवा श्रीमंती प्रारब्धाधीन आहे. प्रारब्ध हे शरीराला चिकटलेले आहे, चैतन्याला नाही. आपण 'दरिद्रीनारायण' असा शब्द वापरतो. वस्तुत: 'नारायण' हा श्रीमंतच आहे. देहाच्या अनुषंगाने आपण अज्ञानाने चैतन्यावर हा आरोप करत असतो. आपण महात्मा, हुतात्मा, मृतात्मा असे निरनिराळे शब्दप्रयोग असेच अज्ञानाने वापरत असतो. जन्म मरण हे देहाला असते, चैतन्याला नाही. आत्मा कधीही मरत नाही, तर तो मृतात्मा होईल कसा ? दरिद्री माणसाचा देह जो चालवत असतो, तोच श्रीमंत माणसाचा देह चालवितो. तो अंतर्यामी आहे म्हणून प्रारब्धाने एखादा गरीब व तो अंतर्यामी आहे म्हणून प्रारब्धाने एखादा श्रीमंत असे असू शकेल. पण आत जो 'तो' आहे तिथे गरीब आणि श्रीमंत हा भेद नाही. गरीबाचा देह चालविणारा, श्रीमंताचा देह चालविणारा आत्मा एकच.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*''का रायाचे देह चाळू। रंकापरौते गाळू।*
*हे न म्हणेची कृपाळू। प्राणू पै गा ।।१२/१४६ ।।''*

देहाकडे पाहिले की लहान-थोर, उंच-नीच, हा भेद जाणवणारच. पण त्याचीच जाणीव झाली, चैतन्याचीच जाणीव झाली तर त्याठिकाणी हा भेद राहू शकत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*''म्हणोनि साने थोर न म्हणावे। उंच नीच भाव सांडावे।*
*एक मीचि ऐसे मानावे। वस्तुजाताते ।।१०/३०५ ।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''आत्मा तोची धर्म नाम तो आचार। संत सदाचार बोलताती।।''***

सर्वांचे अंतरात सारखा असणारा, ज्याचे ठिकाणी दुजा भाव नाही





असा, ज्याने हे धारण केलेले आहे असा, ज्याच्यावर आपली धारणा आहे असा आत्माराम, त्याला ओळखणे, त्याच्याबद्दल आत्मीयता असणे-प्रेम असणे हाच आपला धर्म आहे. श्रीदासराममहाराज म्हणतात, ***''ज्याचे गावी रहावे। तयालागी ओळखावे।।१ ।। ज्याचे गावी ज्याची सत्ता। तेथे करावी ममता।।२ ।। ज्याचे खावे अन्न। त्याची करावी आठवण।।३ ।। राम म्हणे हाची धर्म। येणे लाभे मोक्षधाम।।४ ।।''***ज्याने हे सारे आपणाला उपलब्ध करून दिलेले आहे, ज्याच्या सत्तेने हे शरीर, ही पंचमहाभूते कार्य करतात, जो देतो म्हणून आपण उदरभरण करू शकतो, त्या आत्मारामाची आठवण करणे हाच खरा धर्म. हा धर्म कसा आचरावा हे दाखविण्यासाठीच संतांचे अवतार असतात. ***''धर्माचे पालन। करणे पाखंड खंडण। हेचि आम्हा करणे काम। बीज वाढवावे नाम।।''*** हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारेच आहे. आत्मा सोडून जे काही आहे, त्या साऱ्यांचे खंडण करून फक्त धर्माची-आत्म्याची जाणीव राहणे हेच ते नामबीज - कल्पांतीचे बीज आहे. ''देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण म्हणजे नामस्मरण''. हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. असे एक नाम जो अनुभवतो तोच खरा धार्मिक ***''तोचि जाणावा धार्मिक। ज्याचे मुखी नाम एक।।''***हे श्रीदासराममहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारेच आहे. असे आत्मारामाचे स्मरण घडणे, सत्स्वरुप दाखविणारा आचार घडणे हाच खरा सदाचार हे श्रीमामामहाराज असे सांगतात, ***''रामनाममुखी थोर सदाचार। पापाचा विचार ज्यात नसे।।''*** असा सदाचार सांभाळणारा मानव या जगतात धन्यता प्राप्त करून घेतो हे समर्थ असे सांगतात, ***''प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा।। सदाचार हा थोर सांडू नये तो। जगी तोची तो मानवी धन्य होतो।''***ती प्रभा मनात घेऊन रामाचे चिंतन करणे हा सदाचार येथे श्रीदासराममहाराजांना अपेक्षित आहे.

श्रीदासराममहाराज शेवटच्या कडव्यात सांगतात, ***''गोविंदतनय सांगे सकळा अंतरी। भरला श्रीहरी सारिखाची।''***सकळांच्या अंतरात

जो सारखा भरला आहे, ज्याला धर्माची मूर्ती असे म्हणतात, त्या आत्मदेवाला श्रीदासराममहाराज 'हरी' असे संबोधतात. 'हरी' नाही अशी जागा शोधूनही सापडणार नाही. *''हरी येथे रे हरी तेथे रे। हरीवाचुनी स्थळ नाही रिते रे॥''* ही श्रीनाथमहाराजांची अनुभूती आहे. अहो आत हरी नसेल तर हे शरीर चालेल का ? बोलेल का ? हरीच्या सत्तेने हे शरीर चालतेय, बोलतेय. श्रीतुकाराममहाराज सांगतात, *''चाले हे शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविते हरीवीण। देखवी ऐकवी एक नारायण। तयाचे भजन चुको नका ॥''* तो अंतर्यामी आहे, म्हणून सृष्टीत चैतन्य जाणवते. तो वजा केला की सृष्टीत काही रामच राहणार नाही. *''जेथे आत्माराम नाही। तेथे उरो न शके काही। त्रैलोकीचे प्राणी सर्वही। प्रेतरूपी॥ १६/१०/२५ ॥''* हे समर्थवचन हे स्पष्ट करणारे आहे. हा सर्वत्र भरून राहिलेला श्रीहरी आम्हाला का दिसत नाही? कारण आमच्या भाग्यात ते नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*''म्हणोनी अर्जुना मी नसे। ऐसा कवणू ठाव असे।*
*परी प्राणियांचे दैव कैसे। जे न देखती माते॥ ९/३०० ॥''*

आम्हाला सर्वत्र हरी केव्हा दिसेल ? याचे उत्तर श्रीज्ञानेश्वरमहाराज असे देतात,

*''म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आणि आपण विश्व होईजे॥*
*ऐसे साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा॥ ६/४०९ ॥''*

आपल्या आत असणाऱ्या विश्वाची – परमेश्वराची (विश्व हे नाव विष्णूचे आहे) जाणीव झाली की विश्वात भरून राहिलेल्या वासुदेवाची – श्रीहरीची जाणीव होते. विश्वात आणि आपणात काय साधर्म्य आहे याची जाणीव होते या साधर्म्याची उपासना हीच खरी उपासना. हे विश्वातील साधर्म्य मला व आपल्या सर्वांना जाणवावे, धर्माचे खरे रूप – अंतरंग समजून अंत:करणातील भेद नाहीसा व्हावा अशी प्रार्थना श्रीदासराममहाराजांच्या चरणी करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐





॥ श्रीदासराममहाराज प्रसन्न ॥

# आत्मारामपाठ

## अभंग ६

*अकार स्थिरत्वे उकारी मिळता।*
*उकार पाहता गतीरूप ॥१॥*
*उकार मिळता मकारामाझारी।*
*पावेल निर्धारी जीव लय ॥२॥*
*जीवासी मारोनी जीवविले कैसे।*
*अमोल हे ऐसे साधनगुह्य ॥३॥*
*त्रिपद जाणता मिळणी साधिता।*
*सुखा सुख हाता येत असे ॥४॥*
*त्रिपदाचे ऐक्य त्रिपुटीचा लय।*
*गुरुकृपा होय तरीच कळे ॥५॥*
*आकाशामाझारी ॐकार मिळता।*
*नि:शब्दत्व हाता येत असे ॥६॥*
*अद्वैताचे सुख पाहे निजडोळा।*
*जाणोनी जिव्हाळा दास म्हणे ॥७॥*

– दासरामगाथा अ.क्र. २१५

ओंकाराचा अनुभव कसा घेता येतो याचे वर्णन श्रीदासराममहाराजांनी या अभंगात केले आहे. ओंकार तोंडानी उच्चारणे व ओंकाराचा अनुभव घेणे यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आम्ही ओंकार तोंडानी उच्चारतो व होणारे शारीरिक लाभ ओंकाराचा अनुभव म्हणून सांगतो. ते अनुभव येथे अपेक्षित नाहीत.

अहो, जो ओंकार सद्गुरुंचे स्वरुप म्हणून मानला जातो, जो ओंकार

श्रीगणेशाचे रूप म्हणून मानला जातो, जे तिन्ही देवांचे जन्मस्थान आहे, जो हरीपासून निर्माण झाला आहे, तो ओंकार आम्ही तोंडाने म्हणतो, तोच का ? हा इथे प्रश्न आहे.

अ, उ, म या तीन मात्रांपासून 'ओम' हा मंत्र बनला आहे. याचा अर्थ अ, उ, म यांचा एकत्रित उच्चार म्हणजे ओंकार का ? मग श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या ओंकाराचे वर्णन

*''अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल।*
*मकार महामंडल। मस्तकाकारे।।१/१९ ।।''*

असे का केले असेल ? हे वर्णन या वर्णाक्षरांचे आहे का ? हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वर्णन केलेले अकार, उकार, मकार गुरुकृपेने एकत्र आल्याने त्यांना आदिबीज शब्दब्रह्म ओंकाराचा अनुभव आला. ते म्हणतात,

*'' हे तिन्ही एकवटले। तेथ शब्दब्रह्म कवळले।*
*ते मिया गुरुकृपे नमिले। आदिबीज।।१/२० ।।''*

अ, उ, म ही जर आपण वर्णाक्षरे मानली तर त्यांचा एकत्रित उच्चार करणेसाठी गुरुकृपेची काय आवश्यकता आहे ? तो उच्चार म्हणजे आदिबीज शब्दब्रह्म आहे का ?

या ओंकाराने ज्याचा निर्देश होतो, अशा स्वसंवेद्य सकल अर्थ प्रकाशात आणणाऱ्या आत्मरुपास श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'श्रीगणेश' असे संबोधिले आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*'' ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या।*
*जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।१/१ ।।''*
*'' देवा तूचि गणेशू। सकलार्थप्रकाशू।*
*म्हणे निवृत्तीदासू। अवधारिजो।।१/२ ।।''*

ओंकाराचा उच्चार म्हणजे श्रीगणेशाचे रूप का ? तोंडाने ओंकार म्हणणेवर माझा कोणताही आक्षेप नसून त्याचे जे लाभ होत असतील ते आपण





जरूर घ्यावेत. पण संतांनी वर्णन केलेला जो ओंकार आहे तो आपण समजतो त्यापेक्षा वेगळा आहे, इतकेच मला सांगायचे आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या या ओंकाराचे वर्णन करणाऱ्या ओव्यांचेवर भाष्य करताना श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत की अकार मात्रा ही त्या शब्दब्रह्माचा प्राण आहे. कोणत्याही अक्षरातील अकार वेगळा केला की त्या अक्षराचा पाय मोडल्यासारखे होते. त्या अक्षरात अकार मिसळला की त्या अक्षराला पूर्णता येते. उदा. क् + अ = क. अर्थात 'अ' शब्दब्रह्माचा प्राण आहे. उकार ही त्या प्राणाची गती आहे. मात्र हा उकार सावरकरी लिपीतील नव्हे. ऋषीप्रणीत जो उकार काढण्याची पध्दत आहे त्यात जे 'अ' चे पोट फोडले जाते, ते ती त्या प्राणाची गती दाखविण्यासाठीच. हे अकार व उकार म्हणजेच प्राण व प्राणगती एकत्र येऊन, प्राणगती मकारस्थानी - मस्तकाचे ठिकाणी आली असता, श्रवण होणारा अनुहात ध्वनी हा ओंकार आहे. शंकराचे देवळात आपण गाभाऱ्यात जाऊन जेव्हा 'शंभो' म्हणतो, तेव्हा घुमटीत जसा 'घुम' असा ध्वनी होतो तसेच काहीसे हे आहे.

अभंगाचे पहिल्या कडव्यात श्रीदासराममहाराज हेच सांगत आहेत. ते म्हणतात, *''अकार स्थिरत्वे उकारी मिळता। उकार पाहता गतिरूप।।''*हा जो अकार, जो शब्दब्रह्माचा प्राण आहे, ते आमचे दृष्टीने एक अक्षरच आहे. शब्दलिपीतील प्रथम स्वर आहे. या अर्थाने अभंगाचा अर्थ लागेल का? 'अ' हा स्वर-अक्षर स्थिर होतो व तो उकारी मिळतो, याचा काही अर्थ होतो का ? अकार हा शब्दब्रह्माचा प्राण आहे याचा अर्थ शब्दब्रह्माचा प्राण हा ओंकारातील अकाराने दर्शविला जातो. आत्म्याचे ठिकाणी निर्माण झालेल्या जाणीवेने असणारे श्वसन हा शब्दब्रह्माचा प्राण आहे. श्वसन असल्याने कंपनाचे नियमन करून शब्दाची निर्मिती होते. अर्थात शब्दाचा प्राण श्वसन हाच आहे. श्वसन नसेल तर शब्द आहे का ? या श्वसनाचा निर्देश ओंकारातील 'अ' काराने होतो. श्वासोच्छ्वास - अकार - हा शब्दब्रह्माचा प्राण असून तो प्रणववाचक - प्रणव प्रगट करणारा होणे गरजेचे

आहे. *''प्रणववाचक श्वासोच्छ्वास। हाची तारक उपदेश ।।''* हे संतांचे सांगणे येथे लक्षात घेण्याजोगे आहे. या श्वासापासून प्रणवाचा उच्चार कसा करावा हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''तैसे चित्त राहिल्यावरी पांडवा। प्राणाचा प्रणवुचि करावा। मग अनुवृत्तीपंथे आणावा। मुर्ध्निवरी।।''*

हा प्रणवाचा उच्चार आधारापासून सहस्त्रदलापर्यंत प्रगट करते म्हणून या श्वसनशक्तीला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'प्राण' असे संबोधतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''कंदौनि हृदयवरी। प्रणवाची उजरी। करिता तेचि शरीरी। प्राणु म्हणिपे।।१८/३३६ ।।''*

सहस्त्रदळापासून दक्षिणशिखामार्गाने भ्रूमध्यापर्यंत येणारी प्राणगती उकार – हे त्याचे विशाल उदर आहे. या प्राणगतीच्या स्पंदनावरच प्राणाचे कार्य चालते. तर सहस्त्रदळ – मकार हे त्याचे मस्तक आहे. हे अकार, उकार म्हणजेच प्राण व प्राणगती एकत्र येऊन जेव्हा मकार स्थानी म्हणजे सहस्त्रदळात मस्तकाचे ठिकाणी येतात, तेव्हा जो अनुहातनाद श्रवण होतो, तोच खरा ओंकार आहे.

आत्ता आपला श्वास उलट्या 'U' सारखा – वेलांटीसारखा वाहतो आहे. त्यामुळे त्याचा प्राणगतीशी कोणताही संबंध येत नाही. भ्रूमध्यात प्राणगतीशी प्राणाचे मिलन होण्यासाठी, जीवन ऊर्ध्वगामी होणे गरजेचे आहे. पण ते होणार कसे ? जीवन ऊर्ध्वगामी कसे करायचे हे समजणेसाठी श्रीदासराममहाराज कीर्तनात एक उदाहरण देत. ते सांगत, ''पाण्याचे तोटीतून पाणी खाली पडत आहे. त्याचा आपणास कारंजा करावयाचा आहे. कारंजा करणेसाठी आपणास काय करावे लागेल? तेच येथे करायचे आहे. कारंजा करणेसाठी तोटीला खाली एक वॉटरटाईट बूच घालावे लागेल. म्हणजे पाणी खाली येणेचे बंद होईल व वरून पाणी तसेच येत राहील.पाणी एके ठिकाणी स्थिर होईल. तेथे एक नळीला छिद्र पाडले की कारंजा उडू लागेल. तेच येथे जीवन ऊर्ध्वगामी होणेसाठी करावे लागेल.





साधनाचे अभ्यासाने श्वसन अंतर्मुख होईल. नि:श्वास खाली यायचे प्रमाण कमी होईल, सूक्ष्म होईल. स्थिर झालेले श्वसन – जीवन कारंज्यासारखे ऊर्ध्वमुख होईल, त्याचे प्राणगतीशी मीलन होईल व ही प्राणगती जवळच्या मार्गाने सहस्त्रदळात जाईल. तेथे जो अनुहातध्वनी श्रवण होईल तोच ओंकारध्वनी. या ॐकार श्रवणाने काय अवस्था प्राप्त होते हे श्रीदासराममहाराज अभंगाचे दुसऱ्या कडव्यात सांगत आहेत. ते म्हणतात, *''उकार मिळता मकारामाझारी। पावेल निर्धारी जीवलय।''* वस्तुत: जीव हा काल्पनिक आहे. जीव आणि शिव हे दोन्ही हरिरुपाचे ठिकाणी – आत्मरुपाचे ठिकाणी उठलेले तरंग आहेत. जीव म्हणजे वायुसागरात कल्पनेने उठलेली वायुलहरी आहे. ही कल्पनेने उठलेली वायुलहरी कल्पनेच्या निरासाबरोबर, ध्वनीश्रवणाने होणाऱ्या आत्मज्ञानाने नाहीशी होते व चिदानंद आत्माराम हा कसा एकमेव सत्य आहे याची प्रचिती येते. मी एक कोणी कर्ता आहे, हा भ्रम नाहीसा होतो, जीवपणा नाहीसा होतो व राम कर्ता आहे याची अनुभूती येते.

श्रीदासराममहाराज अभंगाचे पुढील कडव्यात सांगतात, *''जीवासी मारोनी जीवविले कैसे। अमोल हे ऐसे साधन गुह्य ।।३ ।।* मेल्यावर खरे साधन सुरु होते, असे श्रीदासराममहाराज सांगायचे. आपणास प्रश्न पडेल की मेल्यावर साधन कसे होणार ? श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''देह बळी देऊनी साधिले म्या साधन।।''* अहो, देहभाव विरणे हे साधनातील वर्म आहे. साधनाने देहभाव विरला पाहिजे. आमचा देहभाव साधनाने वाढत असेल तर आपले काहीतरी चुकते आहे, हे लक्षात घ्यावे. देह म्हणजे मी असे वाटणाऱ्या साधकाला साधन कधी साधेल का ? ही 'मी' ची जाणीव ठेवून, देहाची जाणीव ठेवून, अहंकार बाळगून साधन साधता येत नाही. श्रीसमर्थ म्हणतात, *''आणीक येक समाधान। मीपणेवीण साधन।। करु जाणे तोचि धन्य। समाधानी।।* ७/७/५३ *।।''* अहंकारविरहित साधन होणे – मीपणेविण साधन होणे – म्हणजेच ''जीव मारुनी जिवविले'' अशी अवस्था

होणे. अहो, मीपण म्हणजेच जीवपण. समर्थ म्हणतात,

*''आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण ।*
*जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ।। ७/२/२० ।।''*

ही 'मी' ची जाणीव नसणे म्हणजेच निरहंकारता. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''तया पाडे देही । जया मी आहे हे सेचि नाही । निरहंकारता पाही । तया नाव ।। १३/५३४ ।।''* मी आणि माझे हे अंत:करणातून जाणे हाच खरा संन्यास आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *'' आणि मी माझे ऐसी आठवण । विसरले जयाचे अंत:करण । पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ।।५/२० ।।''* आपला श्वासोच्छ्वास हा प्रणववाचक झाला – प्रणव प्रगट करणारा झाला की हा संन्यास सहजच साधणारा आहे. *''श्वासोच्छ्वासी प्रणवाभ्यास। तोचि आमुचा संन्यास।।''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. श्वासोच्छ्वास प्रणववाचक होणे हेच साधनातील अमोल असे साधनगुह्य आहे. जे हे अबोलण्याचे बोलणे बोलतात, ज्याचा जीवपणा नाहीसा झालेला असतो ते महात्मे कोणत्या अवस्थेत असतात? हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, *''बोलो अबोलणे मरोनिया जीवे । असोनी नसणे जनी आम्हा ।।''* तर श्रीदासराममहाराज या अवस्थेचे वर्णन असे करतात, *''नव्हताची ऐसा होऊनिया ठेलो। तुझा भक्त झालो एकाएकी।।''* साधकाचा देहभाव नाहीसा झाला असता त्याला विदेही सुख प्राप्त होते. संतजनाबाई सांगतात, *''देहभाव सर्व जाय । तेव्हा विदेही सुख होय ।।''*

हे विदेही सुख कसे प्राप्त होते हे श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत. ते म्हणतात, *''त्रिपद जाणता मिळणी साधिता । सुखासुख हाता येत असे।।''* राममंत्र, श्रीराम जयराम जयजयराम मंत्र, सोहं मंत्र, रामकृष्णहरी मंत्र, ओंकार मंत्र, गायत्री मंत्र हे सारे प्रचलित मंत्र त्रिपदच आहे. पण हे सारे मंत्र त्रिपद आहेत हे तरी आम्हाला कुठे माहीत आहे ? श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात ऐकले आहे म्हणून मला हे माहित आहे. हे





मंत्राचे त्रिपद जाणून त्यांची मिळणी साधता आली पाहिजे. साधनेने इडा आणि पिंगला सुषुम्नाकार होणे म्हणजे ही मिळणी साधणे होय. ही मिळणी साधली असता तो मंत्र आपल्या हाताला येतो, मंत्र श्रवण होतो व खऱ्या सुखाची प्राप्ती होते. सर्वसुखाचे सुख प्राप्त होते. *''इडा आणि पिंगला सुषुम्नेत सरता । रामनाम हाता येत असे ।।'', '' गोविंद म्हणे सर्व सुखाचे हे सुख । रामनाम एक आन नसे ।।''* हा श्रीमामामहाराजांचा रामपाठ सारे काही स्पष्ट करणारा आहे.

ही मिळणी आपणाला साधली की नाही हे कसे ओळखायचे ? आपल्याला खरे सुख गवसले की आपणाला ही मिळणी साधली आहे हे समजायला हरकत नाही. आपण ज्याला व्यवहारात 'सुख' म्हणून समजतो, ते खरे सुख नाही. तो सुखाचा आभास आहे. संतमहात्मे त्याला सुख मानीत नाहीत. अहो, ज्या सुखाची परिणती पुढे दु:खातच होणार आहे, त्याला 'सुख' म्हणता येईल का ? जेथे दु:खाला प्रवेशच नाही ते खरे सुख. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''देखे अखंडीत प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणे नाही समस्ता । संसारदु:खा ।। २/३३८ ।।''* म्हणून या सुखाला अखंड सुख, सर्वसुख असे संतमहात्मे म्हणतात. पैशातून आम्हाला सुख होते. संपत्तीतून आम्हाला सुख होते. अहो, हे सुख पैसा आहे तोवरच, संपत्ती आहे तोवरच, आणि पैसा व संपत्ती यातून सुखच होईल याचा काय भरवसा ? पैसा आणि संपत्ती दु:खालाही कारणीभूत होऊ शकतात. म्हणून जी सुखे साधनाधीन असतात ती दु:खच असतात. *''यत्सुखं साधनाधिनं तद्दु:खमेवच । अकृत्रिममनाद्यंतं तत् सुखम् सात्विकं विदु: ।''* हे श्रीदासराममहाराजांचे कीर्तनात येणारे वचन व *''विषयभोगी जे सुख । ते साद्यंतची जाण दु:ख । परी काय करीती मूर्ख। न सेविता न सरे।। ५/१२० ।।''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. मग खरे सुख माणसाला कधी होते ? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''किंबहुना सोये । जीव आत्मयाची लाहे । तेथे जे होये । तया नाम सुख ।। १३/१३१ ।।''*

जीवाला जेव्हा आत्मप्राप्ती होते तेव्हा जे होते त्याला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'सुख' म्हणतात. जीवाला आत्मप्राप्ती न होता जे प्राप्त असते, ते सर्वथा दुःखच असते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''आणी ऐसी हे अवस्था। न जोडता पार्था। जीजे तेचि सर्वथा। दुःख जाणे॥ १३/१३२ ॥''* म्हणून बाह्यतः जरी आम्ही सुखात लोळत असलो तरी आत्मप्राप्ती झाली नसल्याने आम्ही सदैव दुःखीच असतो. माणूस कधीही सुखी होत नाही याचे कारण हे आहे. म्हणूनच समर्थांनी म्हटले आहे, *''जगी सर्वसुखी असा कोण आहे। विचारी मना तूचि शोधूनी पाहे॥''* याउलट ज्यांचेकडे बाह्यतः कोणतेच सुख नव्हते असे श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीतुकाराममहाराज आत्मप्राप्ती झाली असल्याने सदैव सुखी होते. त्यांना दुःख कसले असते हेही माहित नव्हते. त्यांचेपाशी संसार दुःखाला प्रवेशच नव्हता. आपल्या जीवाने शिवाला पाहणे – शिवरूप होणे म्हणजे आत्मसुख. *''आपुलिया जीवे शिवासी पहावे। आत्मसुख घ्यावे वेळोवेळा॥''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. एकदा का आत्मसुखाची गोडी लागली, खरे सुख प्राप्त झाले की विषयातून मिळणारे हे, खरे सुख नाही हे लक्षात येते.

*'तरी आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो का सकळ विषया।*
*जेयाचे ठाई इंद्रिया। मानू नाही॥४/१८७ ॥''*

*''जो आत्मलाभासारिखे । गोमटे काहीच न देखे।*
*म्हणोनी भोगविशेषे। हरिखे ना जो॥१२/१९० ॥''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने येथे लक्षात घ्यावी अशीच आहेत.

आपल्या जीवाने शिवाला पाहणे म्हणजे आत्मसुख. म्हणजे हे सुख द्वैतातून मिळणारेच आहे असे आपणास वाटेल. पण तसे नाही आहे. आत्मरूपच, जीव आणि शिव होऊन, आपले सुख आपण भोगत असते. श्रीनाथमहाराज सांगतात, *''जीवभावने मी ची जीवू। शिवभावने मी ची शिवू। मी एकला ना नव्हे बहू। माझा अनुभव मी ची जाणे॥''* आत्म्याला





आत्म्यापासून होणारे सुख म्हणजे आत्मसुख. द्वैतातून जे सुख मिळते, जो सुखाचा आभास होतो, त्याठिकाणी त्रिपुटी उत्पन्न होते. सुख, सुख घेणारा, ज्यापासून सुख होते ते, हीच ती त्रिपुटी. अद्वैतापासून जे सुख मिळते, त्याठिकाणी ही त्रिपुटी उरत नाही. जोवर द्वैत आहे, तोवर सुख नाही. अद्वैतातच खरे सुख आहे. श्रीनाथमहाराज सांगतात, *''प्रपंचामाजी असते सुख। तरी का त्याजिते सनकादिक। द्वैत तितुके केवळ दुःख। परमसुख अद्वैती॥''*

त्रिपदाचे ऐक्य, त्रिपुटीचा लय, अद्वैतातील सुख हे आम्हास कसे अनुभवता येणार हे श्रीदासराममहाराज अभंगाचे पुढील कडव्यात असे सांगतात, *''त्रिपदाचे ऐक्य त्रिपुटीचा लय। गुरुकृपा होय तरीच कळे॥''* कोणत्याही गोष्टीत ऐक्य होणे हे तसे अवघडच. हा अनुभव आम्हाला घडोघडी येतो. द्वैत माजविणे यात आमचा हातखंडा. द्वैतातून अद्वैत साधणे हे काम संताचे, सद्‌गुरुंचे. कोठेही ऐक्य घडले की ओळखावे, त्यामागे गुरुकृपा आहे. तसेच येथेसुध्दा त्रिपदाचे ऐक्य होऊन त्रिपुटीच्या लयाने होणारे अद्वैत सुख गुरुकृपा असेल तरच अनुभवाला येते. या सुखाचा अनुभव भगवंतांनी अर्जुनाला दिला हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''तरी सुख ते गा किरीटी। दाविजेल तुज दिठी। जे आत्मयाचिये भेटी। जीवासी होय॥ १८/७७३ ॥''* तर हे सुख मला सद्‌गुरुंनी दाखविले असे कृतज्ञतापूर्वक श्रीनामदेवमहाराज एका अभंगात असे नोंदवितात, *''सद्‌गुरुनायके पूर्ण कृपा केली। निजवस्तु दाविली माझी मज। माझे सुख मज दावियले डोळा। दिधली प्रेमकळा नाममुद्रा॥''*

हे सुख कोठे प्राप्त होते हे श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात असे सांगतात, *''आकाशामाझारी ॐकार मिळता। निःशब्दत्व हाता येत असे॥''* महाकारणदेहातील आकाशात ॐकाराचा ध्वनी – अनुहात नाद – श्रवण होतो. संघाताशिवाय होणारा ध्वनी श्रवण होतो. आकाशच जेव्हा गरजायला लागते तेव्हा त्याला अनुहात – संघाताशिवाय होणारा ध्वनी

म्हणतात. जीव हा नादलुब्ध असल्याने 'लुब्धली नादी की लागली समाधी ' या श्रीतुकाराममहाराजांच्या वचनाचा अनुभव सर्व नादश्रवण करणाऱ्या स्त्री-पुरुषांना, पंडीत, ज्ञानी, योगी महानुभावांना येतो. 'नादश्रवणी तदाकारता' घडते. शब्दातला अर्थ त्याला कळतो. अर्थ कळला की शब्द मागे पडतात. शब्दातला फोलपणा त्याला समजतो. शब्दच नि:शब्द होतात. रात्रंदिवस तो अर्थाकडे, ध्येयाकडे पाहतो, लक्ष देतो. अर्थरूप होतो, ध्येयरूप होतो. समर्थ होतो. हे स्वरुपानुभवाचे सुख शब्दात सांगता येत नाही. नि:शब्द परमात्म्याचा अनुभव, अनुभव घेणाऱ्याला नि:शब्द करणाराच असतो. म्हणूनच अनंत बोलणाऱ्या वेदांनी अनुभवाअंती मौन धारण केले. हे प्रचितीने अनुभवता येते. समर्थ या अनुभवाचे वर्णन असे करतात,

*'शब्दचि नि:शब्द होती। श्रुती नेति नेति म्हणती।*
*हे तो आले आत्मप्रचिती। प्रत्यक्ष आता ।।९/२/३५ ।।''*

तर श्रीनिवृत्तीनाथमहाराज या अनुभवाचे वर्णन असे करतात, *''राऊळामाजी जाता राहे देह अवस्था। मन हे उन्मन झाले नसे बध्दतेची वार्ता। हेतू हा मावळला शब्दा आली निशब्दता। तटस्थ होऊनी ठेले निजरूप पाहता।। हे सुख काय सांगू वाचे बोलता न ये। आरतीचेनि योगे गेले मीपण माझे ।।''*

अद्वैताचे सुख हे कसे अनुभवता येते हे याचे वर्णन श्रीदासराममहाराज असे करतात, *''अद्वैताचे सुख पाहे निजडोळा। जाणोनी जिव्हाळा दास म्हणे ।।''* अस्थिच्या देहात जो मांसाचा डोळा आहे, तो द्वैत दाखविणाराच आहे. आकार दाखविणाराच आहे. हे अद्वैताचे सुख या डोळ्यांना अनुभवता येत नाही. भगवंतांनी अर्जुनाला दिव्यचक्षू देऊन ज्ञानदृष्टी दिली व विश्वरूप दर्शन – अद्वैत दर्शन घडविले. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''मग दिव्यचक्षु प्रगटला। तया ज्ञानदृष्टी पाटा फुटला। ययापरी दाविता जाहला। ऐश्वर्य आपुले ।। ११/१७९ ।।''* ज्ञानदृष्टी प्राप्त झाल्याशिवाय आत्मसुख – अद्वैत





सुख घेता येत नाही. *''आत्मसुख घ्यारे उघडा ज्ञानदृष्टी। वाउगी चाऊटी नका करू ।।''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. जो आपल्याला अद्वैतदर्शन घडवितो – जो आपल्याला आत्मदर्शन घडवितो तो आपला डोळा, निजडोळा. हे डोळे, ही बघण्याची दृष्टी, आपल्याला सद्गुरु प्राप्त करून देतात. म्हणून त्यांचे उपकार मानावे तेवढे थोडेच. *''गुरुच्या उपकारा उपकारा। नाहीच पारावारा। देऊनी आपुला डोळा। डोळा दाखविले घननीळा। देऊनी आपली दृष्टी। अवघी चिन्मय केली सृष्टी ।।* हे संतवचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे.

अद्वैताच्या गप्पा मारणारे खूप आहेत. पण अद्वैत तत्वज्ञान आचरणारे आमचे भ.स.निंबरगीकरमहाराजांसारखे, आमचे मामामहाराजांसारखे, आमचे श्रीदासराममहाराजांसारखे विरळाच. त्यांचेपाशी द्वैत औषधालाही मिळणार नाही. ज्यांचेपाशी द्वैत अनुभवाला येत नाही, ते खरे महाराज. आमचे चिमडचे महाराज भ. स. निंबरगीकरमहाराजांचे बाबतीत म्हणतात , *''एक आहे बाबा तेथे द्वैत काही नाही। अद्वैताचे सुख ते निश्चळ। निर्गुण शोधूनी पाही ।।''* अद्वैताचे निश्चळ सुख प्राप्त होणेसाठी निर्गुणाचा शोध घेतला पाहिजे. निर्गुण हा निश्चळ आत्मसुखाचा स्त्रोत आहे. जिव्हाळा आहे. तो जिव्हाळा आपण जाणला पाहिजे. आणि हा जो जिव्हाळा आहे ते आमचे भ. स. निंबरगीकरमहाराज आहेत. भ.स.निंबरगीकरमहाराज – भ.स. गुरुलिंगजंगममहाराज यांचे कृपेने अद्वैत आत्म्याची जाणीव झाली व जाणीवेने आत्मसुख झाल (जाणीवेने होते सुख – श्रीसमर्थ) खरे. पण या गुरुलिंगजंगमांचे दर्शन – निर्गुणस्वरुप होणे मात्र या अद्वैतबोधाच्या पलिकडे गेल्याशिवाय – एकपणाची जाणीव नाहीशी झाल्याशिवाय होत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, *''ते तू गुरुलिंगजी माझे। जे येकलेपणीचे विरजे। जयालागी वोलांडिजे। अद्वैतबोधू ।। १८/१५७० ।।''* असे काही श्रीमहाराजांचे दर्शन आपल्याला व्हावे अशी प्रार्थना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

**अभंग ७**

*संत तो अद्वैती समरस झाले ।*
*रंगोनिया गेले भक्तीरसी ।। १ ।।*
*नामसंकीर्तन उरले त्या ठाया ।*
*देहभाव लया गेला त्यांचा ।। २ ।।*
*त्रिपुटी ग्रासिली वृत्ती स्थिर झाली ।*
*ज्योतीसी मिळाली आत्मज्योती ।। ३ ।।*
*दासराम ऐशा संतासी शरण ।*
*वंदितो चरण प्रेमभावे ।। ४ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.५५३

संतमहात्मा ओळखणे हे अवघड आणि समजा ओळखला तर त्यापाशी कडेपर्यंत टिकणे हे त्याहीपेक्षा अवघड. बाह्यलक्षणावरून संतमहात्मा ओळखता येत नाही आणि आम्हाला आतलं काही कळत नाही. मग हे जमणार कसे ? संतांची अनंत लक्षणे वर्णन करून सांगितली आहेत. तरी संतांचे घर सापडत नाही. ''*अनंत लक्षणे वर्णिता अपार। संतांचे ते घर सापडेना ।।*'' या संतवचनाचा प्रत्यय प्रत्येकाला येतो. खरा संतमहात्मा जो असतो तो जगासमोर येतच नाही. ''*या जगी संत बहुत झाले । परी ते दृष्टीस नच आले ।।*'' हे संतश्रेष्ठ साईबाबांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. आपण कोणी xyz आहोत याची जाणीव त्यांना स्वत:ला असत नाही आणि ही जाणीव इतरांनाही ते होऊ देत नाहीत.

*''मार्गाधारे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे ।*
*अलौकिक नोहावे । लोकांप्रती ।।३/१७१ ।।''*





*''पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ।*
*हा अमुक ऐसी नोहावी । सेचि लोका ।।१३/१८८ ।।''*

*''माझे असतेपण लोपो । नांवरूप हारपो ।*
*मज झणे वासिपो । भूतजात ।। १३/१९७ ।।''*

हे सारे ईश्वरीज्ञान आचरणारे महात्मे जगासमोर कसे येणार ? या जगाचे मागे कोण आहे  इकडे ज्यांचे लक्ष आहे, ती जगासमोर कशी येणार ? जे सिध्दींच्या मागे नाहित, प्रसिध्दीच्या मागे नाहित, जे ऋध्दी, सिध्दी, निधी यांना उपाधी मानतात, असे एकांतप्रिय, ज्ञानाची मूर्ती असे महात्मे कसे लोकांसमोर येणार ? ते सिध्दीच्या मागे असत नाहीत, सिध्दी त्यांच्यामागे असतात. ते प्रसिध्दीच्या मागे असत नाहीत, प्रसिध्दी त्यांच्या मागे असते.

आपल्यामागे कोण आहे, ज्याच्यामुळे आपण पुढे जात आहोत, ते मागे वळून पाहिले तरच संत समजणार. ते मागे आहेत, आपल्या पाठीशी आहेत, याची जाणीव झाली की कुणाला भ्यायची काय गरज ? म्हणून मागे वळून पहा. संत सापडतील. आपण मागे कधी वळून  पहात नाही. मागे वळून पाहणारी माणसे फार थोडी. म्हणून ''*बहु अवघड आहे संतभेटी*'' असे संतांनी सांगितले आहे. संत भेटावयास हवे असतील तर मागे वळून पाहिले पाहिजे. संत सांगतात, ''*काय पाहतोसी पुढे । उलट उलट मुळाकडे ।।*''

संतमहात्मा कसा असतो, याचे वर्णन श्रीदासराममहाराजांनी या अभंगात केले आहे. ते म्हणतात, '' *संत तो अद्वैती समरस झाले। रंगोनिया गेले भक्तीरसी ।।*''संतमहात्मे जे अद्वैत आहे, जे सर्वत्र अंतर्यामी सारखेपणाने, गुप्तरुपाने भरून राहिले आहे, त्याच्याशी तादात्म्य पावलेले असतात. जे विश्वात सामान्यपणे पसरले आहे तेच त्यांचे दृष्टीने असामान्य असते. श्रीदासराममहाराज सांगतात, ''*सर्व विश्वामाजी असे जे सामान्य । तेचि असामान्य दासरामी ।।*'' जे सामान्य आहे ते सामान्य न वाटता असामान्य वाटणे हेच त्यांचे असामान्यत्व.

संतमहात्मे आत्मज्ञानाने आत्मरुपच झालेले असतात. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज संतांचे बाबतीत म्हणतात, *''आत्मज्ञाने चोखडी। संत जे माझी रुपडी।।''* तर श्रीतुकाराममहाराज म्हणतात , *''देव ते संत देव ते संत। निमित्त त्या प्रतिमा।।''* जे असतानाच देवरूप, आत्मरूप झालेले असतात, तेच मरणानंतर देवरूप होतात. ज्या महात्म्यांनी देहाचा, मनाचा, प्राणाचा लय सतत साधलेला असतो, ते आत्मरूप महात्मे देहाच्या निर्वाणानंतर देवच होऊन जातात. श्रीज्ञानेश्वरमहाराज अशा संतांचे वर्णन असे करतात,

*'' ते मरणाऐलीचकडे। मज मिळोनी गेले फुडे।*
*मग मरणी आणिकीकडे। जातील केवी ।।* ९/३६५ ।।''

*'' येर तनुमनुप्राणी। जे निरंतर माझेयाची वाहाणी।*
*ते देहाच्या निर्वाणी। मी ची होती।।* ७/१५० ।।''

जे असतानाच स्वरुपाकार झालेले असतात अशा संतांच्या बाबतीत खात्रीने सांगता येते की ते देहाच्या निर्वाणानंतर स्वरुपाकार झालेले आहेत. *''आत्मारामी राम मिळोनिया गेले। स्मृतिरुपे उरले केशवमनी।।''* हे आमच्या श्रीकेशवकाकांनी (डॉ. के. वा. आपटे) आमच्या श्रीदासराम–महाराजांचे केलेले वर्णन अगदी सार्थ आहे.

स्वरुपाकार झालेले महात्मे कधीही जात नाहीत. श्रीसमर्थ अशा महात्म्यांचे वर्णन असे करतात, *''असो ऐसे सकळही गेले। परंतु येकचि राहिले। जे स्वरुपाकार जाले। आत्मज्ञानी ।।* ३/९/५९ ।।'' अशा महात्म्यांना मरण असत नाही. ज्यांचे मरण मरून गेलेले असते, तेच महात्मे अमर होतात. श्रीतुकाराममहाराज सांगतात, *''मरण माझे मरुनी गेले। मग मी झालो अमर।।''* ते देहात असतानाही नामात असतात व ते देह ठेवल्यावरही नामातच असतात. ''जेथे नाम आहे तेथे मी आहे'' असे जे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज सांगतात ते या अर्थानेच. हे नाम हे चैतन्यरूप आहे,





परब्रह्मरूप आहे., हे आपण लक्षात घ्यावे.

देहात असताना देहातीत झालेले महात्मे, देहाला सुटलेले महात्मे देहात असताना कसे असतात याचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, *''ते वर्तत दिसती देही। परी ते देही ना माझां ठायी। आणि मी तयांच्या हृदयी। समग्र असे।।* ९/४०९ ।।'' तर श्रीसमर्थ अशा महात्म्यांचे वर्णन असे करतात, *''तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा। दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाचि नाही।।* ७/१०/३१ ।।'' ते महात्मे आपल्यातच राहतात, आपल्यासारखेच दिसतात पण ते आमच्यापेक्षा वेगळे असतात. त्यांचे पाहणे, त्यांचे बोलणे, त्यांचे ऐकणे, त्यांचे खाणे, त्यांचे बसणे, त्यांचे वागणे हे आपल्यापेक्षा वेगळे असते. ते पाहतात पण आम्ही पाहतो ते नाही, ते सर्वत्र चैतन्य पाहतात. ते बोलतात, पण आम्ही बोलतो ते नाही. ते बोलतात ते अंतर्खूण बाणवणारे असते. ते आहत ऐकत नाहीत तर ते अनुहात ऐकतात. ते खातात पण अनुभव विठ्ठलाचा. *''देव खाते, देव पिते''* हा संत जनाबाईंचा अनुभव आहे. एका चैतन्याचाच अनुभव ते सतत घेत असतात. अर्थात त्यांना या दृश्य विश्वाचा अनुभव येत नसतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज संतांच्या या अवस्थेचे वर्णन असे करतात,

*''नाईकणे ते कानचि वाळी। न पाहणे ते दिठीची गाळी।*
*अवाच्य ते टाळी। जिभची गा।।*१४/२०९ ।।''
*''परी विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान।*
*जैसे अवयव तरी आन आन। परी एकेचि देहीचे।।*९/२५०।।''

चैतन्याचा हा जो अनुभव या संतांना येतो, तो या जड देहाच्या इंद्रियांना येतो का ? नाही. तो या इंद्रियांना येत नाही. अहो, ही इंद्रिये द्वैताचा अनुभव देणारीच आहेत. या डोळ्यांना फक्त आकारच दिसतो. निराकार परमात्मा कसा दिसणार ? *''आकार पाहणे द्वैताचे देखणे। विसरोनी राहणे आपणासी।।''* हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे

असेच आहे. या कानांना फक्त आहत ऐकायला येतो. तो अनाहत कसा ऐकेल. हे जे ज्ञान आहे त्याचा अनुभव *''शब्देवीण संवादीजे। इंद्रिया नेणता भोगिजे।।''* अशा पध्दतीने घ्यावा लागतो.

सर्वत्र आत्मरूपाचा अनुभव येत असल्याने – '' पाहणे आपणासी आपण'' होत असल्याने संतांना कोणीही परका वाटत नाही, त्यांना कोणाचाही राग येत नाही. शांती हा त्यांचा स्थायीभाव होतो. अक्षय शांतीने अक्षयसुख, समाधान त्यांना प्राप्त होते. सर्वत्र निर्वैरता ते अनुभवतात. त्यांच्या या अवस्थेचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात,

*''जववरी द्वैताचे भान। तव वरी विरोधाचे कारण।*
*अवघा एकचि आपण। तेथ वैरी कोण कोणाचा ?।।''*

*जे भेदाचे निराकरण। तेची निर्वैरतेचे लक्षण।*
*उध्दवा सत्य जाण। निर्वैरपण या नाव।।''*

*''परमार्थाची मुख्यत्वे स्थिती। पाहिजे गा परमशांती।*
*ते शांतीची उत्कट गती। दावी लोकाप्रती आचरोनी।।''*

सर्वत्र 'समत्व' अनुभवाला येत असल्याने अंत:करणातील ममत्व नाहीसे होते. 'मी आणि माझे' हे नाहिसे होते. ते संन्यस्त वृत्तीने राहतात. त्यांच्या या अवस्थेचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, *''आणि मी माझे ऐसी आठवण। विसरले जयाचे अंत:करण। पार्था तो संन्यासी जाण। निरंतर।। ५/२० ।।''*

संत हे अद्वैताशी–चैतन्याशी समरस झाले, चैतन्यरूप झाले. विभक्त होते ते भक्त झाले. मग भक्तीची काय गरज, असे आपणास वाटेल. पण संतांनी भक्त झाल्यावरही, भगवद्रूप झाल्यावरही भक्ती करायची सोडली नाही. श्रीतुकाराममहाराज देवरूप झाले. पण त्यांचे भजन थांबले नाही. संत हे साधनाने सिध्द झाले. पण त्यांनी साधन सोडले नाही.





*''तो सीध परी करी साधन। सर्वकाळ रामचिंतन।।*
*ध्यानधारणा अनुष्ठान। चुको नेदी।।''*

– श्रीरामदासस्वामी

*''आधी होता संत संग। तुका झाला पांडुरंग।*
*त्याचे भजन राहीना। मूळ स्वभाव जाईना।''*

– श्रीतुकाराममहाराज

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. परमात्मरूप झाल्यावरही त्यांनी आपला मूळ स्वभाव, आपली सहजस्थिती हे भजन –साधनअभ्यास – सोडला नाही. म्हणून ते देवाचे लाडके भक्त ठरले. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात , *''मग यावरीही पार्था। माझा भजनी आस्था। तरी तयाते मी माथा। मुकूट करी।। १२/२१४ ।।''* खरे पाहिलेना, देव होऊनच देवाचे भजन करता येते. संत होऊनच संतांचे भजन करता येते.,

*''म्हणोनि माझीया भजना। उचितु तोची अर्जुना।*
*गगन जैसे आलिंगना। गगनाचिया।।१५/५६५ ।।''*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*''संत होऊनीया संतांसी भजावे। तरीच तरावे तुका म्हणे।''*

– श्रीतुकाराममहाराज

ही संतवचने हेच स्पष्ट करतात ना ? जोवर आमचे ठिकाणी काम, क्रोध आदी विकार आहेत, तोवर सहजस्थिती – मूळस्वभाव – श्वसनाची मूळ स्थिती – हे भजन कसे साधणार ? काम, क्रोध यांना भजनमार्गीचे मांग असे श्रीज्ञानेश्वरमहाराज संबोधतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ।*
*भजनमार्गीचे मांग। मारक जे।।३/२४१ ।।''*

हे कामक्रोधादी षड्‌विकार नाहीसे झाल्यावर, देवरूप झाल्यावर

होणारे भजन, होणारी सेवा, होणारी भक्ती ही आपण समजतो त्या भजनापेक्षा, आपण समजतो त्या सेवेपेक्षा, आपण समजतो त्या भक्तीपेक्षा वेगळी आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''ऐसे मीच होऊनी पांडवा। करिती माझी सेवा। परी नवलावो तो सांगावा। असे आईक॥ ९/१९६ ॥''* या भक्तीमध्ये देव वेगळा, भक्त वेगळा, उपासना वेगळी असे असत नाही. या भक्तीमध्ये देवही तोच व भक्तही तोच. वाराच देव व वाराच भक्त आणि उपासनाही पण वायुस्वरुपच. याला अद्वैतभक्ती म्हणतात. श्रीनाथमहाराज या भक्तीचे वर्णन असे करतात,

*''एवं आपली आपण भक्ती। करीतसे अनन्यप्रीती।*
*हेचि निरुपण वेदांती। 'अद्वैतभक्ती' या नाव॥ ''*

आम्ही जो देव वेगळा मानून उपासना करतो, तिला श्रीनाथमहाराज काय म्हणतात ते पहा,

*''देव भक्त दोनी भिन्न। ऐसे जे का उपासन।*
*ते ज्ञानाचे मुख्य अज्ञानपण। सूक्ष्म भ्रम पूर्ण अतर्क्यत्वे॥*

नेमकी कशी भक्ती होणे संतांना अपेक्षित आहे, हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

*''देव देऊळ परीवारु। की जे कोरूनी डोंगरू।*
*ऐसा भक्तीचा व्यवहारु। का न व्हावा॥''*

हे देवाभक्तांचे ऐक्य होऊन होणारी भक्ती संत कशी अनुभवतात हे श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''नामसंकीर्तन उरले त्या ठाया। देहभाव लया गेला त्यांचा॥''* अशी अद्वैतभक्ती साधणाऱ्या महात्म्याजवळ देहभाव असत नाही. देहभाव असेल तर परमात्म्याशी अद्वैत साधता येत नाही. बरोबर कुटुंबाला घेऊन येऊन कधी संन्यास घेता येतो का ? *'' काखे घेवोनिया दारा म्हणे मज संन्यासी करा ''*हे शक्य आहे का? जोवर देहाचा निरास होत नाही, देहभाव जात नाही, तोवर देव आणि भक्त हा





भेद राहणारच हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

*''म्हणौनि तू आणि आम्ही। हे दिसताहे देहधर्मी।*
*मग ययाच्या विरामी। मीचि होसी॥ १८/१३६७ ॥''*

तर श्रीसमर्थ हे असे सांगतात, *''म्हणोनी देहबुध्दी हे झडे। तरीच परमार्थ घडे। देहबुध्दीने विघडे। ऐक्यता ब्रह्मीची॥* ७/२/३९ ॥'' संत हे देहात असताना देहातीत झालेले असतात. त्यांनी आपले हित साधलेले असते. म्हणून आपले सर्वांचे हित कशात आहे, हे एक संतमहात्मा , ज्याचे अंत:करण माऊलीचे आहे तोच जाणू शकतो. *''लेकुराचे हित। जाणे माऊलीचे चित्त।''*हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन व

*'' हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत ।*
*देहबुध्दीने अनहित। हेचि लागे॥ ७/२/३७ ॥''*

हे समर्थवचन, ही संतवचने हेच स्पष्ट करतात. असा संतमहात्मा ज्याचा सोहंभावाने देहभाव नष्ट झालेला आहे, ज्याला देशकाळाचे भान राहिलेले नाही, जो भगवंताला जाणून भगवद्रूप झालेला आहे, जो निर्विकल्पाचे ठिकाणी कल्पनातीत झालेला आहे तो, जे बोलेल ते नामसंकीर्तन. *''कैसे माझा गुणी धाले। देशकाळाते विसरले। कीर्तनसुखे झाले। आपणपाचि॥९/२०९॥''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन व *''जया अंतरी भगवंत। अचळ राहिला निवांत। तो स्वभावे जे बोलत। ते ब्रह्म निरुपण ॥१४/३/२५ ॥''* हे समर्थवचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. म्हणून नामसंकीर्तन हे ज्यांचा देहभाव गेलेला आहे, अशा संतांनीच करावीत. ''देहावर राहून जर कीर्तन केले तर ते कीर्तन ठरत नाही'' असे श्रीदासराममहाराज सांगायचे. ज्यांनी श्रीदासराममहाराजांची कीर्तने ऐकली आहेत, त्यांना हे पटल्यावाचून राहणार नाही.

स्थूल, सूक्ष्म, कारणदेह लयाला जाऊन, महाकारणदेहात अखंड नामसंकीर्तन जो साधतो, नित्य कीर्तन जो साधतो, तोच नित्यकीर्तन करू

शकतो. श्रीदासराममहाराज सांगतात, *''महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वय भजन हरिकथा ।।''*या अखंडस्मरणाने तो महात्मा मुक्त होऊन जातो हे श्रीनाथमहाराज असे सांगतात, *''अखंड स्मरणे अद्वय भजने वाजवी कर टाळी । एका जनार्दनी मुक्ती होये तात्काळी ।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''त्रिपुटी ग्रासली वृत्ती स्थिर झाली । ज्योतीसी मिळाली आत्मज्योती ।।''*महाकारण देहात आत्म्याची जाणीव असते– ज्ञान असते. जोवर ज्ञानाची जाणीव आहे, अनुभव येत आहेत, तोवर त्रिपुटी नाहिशी होत नाही. समर्थरामदासस्वामी सांगतात, *''अनुभवे त्रिपुटी उपजे । अद्वैती द्वैतची लाजे ।। म्हणोनी बोलणे साजे । अनिर्वाच्य ।।* ६/१०/३० *।।''*साधुबोधाने तो महात्मा 'नुरोनिया ठेला' या अवस्थेत येतो. अनुभव घेणारा, ज्याचा अनुभव घ्यायचा, त्याच्यापेक्षा वेगळा रहात नाही. मग अनुभव काय सांगणार ? त्याचा अनुभव ठायीच मुरून जातो. श्रीज्ञानेश्वरमहाराज हरिपाठात सांगतात, *''साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला । ठायीच मुराला अनुभव ।।''*हा अनन्य व्हायचा अनुभव अनिर्वाच्य असतो. तो शब्दाने सांगता येत नाही. असा जो चारी देहांचा निरास करून विदेही होतो, तोच साधु धन्यता प्राप्त करून घेतो. ज्याने महाकारणदेहात आत्म्याला जाणले तो देही व ज्याने महाकारणदेहाचा निरास करून परमात्म्याला जाणले, परमात्मरुप झाला तो विदेही.

*''मूळमाया चौथा देह । जाला पाहिजे विदेह ।*
*देहातीत होऊन राहे । धन्य तो साधू ।।*१७/३/२० *।।''*

– श्रीसमर्थ रामदासस्वामी

*''आम्ही देही तू आत्मा । आम्ही विदेही तू परमात्मा ।।''*

– श्रीतुकाराममहाराज

ही संतवचने यावर प्रकाश टाकतात. ही विदेही अवस्था म्हणजेच निवृत्ती अवस्था, उन्मनी अवस्था, विज्ञान अवस्था.





*''साक्षत्व वृत्तीचे कारण । उन्मनी ते निवृत्ती जाण ।*
*जेथे विरे जाणपण । विज्ञान ते ।।*७/४/५० *।।''*

*''मीपण ते बुडाले । विवेके वेगळेपण गेले ।*
*निवृत्तीपदास प्राप्त जाले । उन्मनीपद ।।*१२/३/२८ *।।''*

*अनिर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती।*
*निरोपाधी विश्रांती । योगियांची ।।*७/३/४४ ।*।''*

ही समर्थ दासबोध वचने संतांच्या या अवस्थेचे वर्णन करणारीच आहेत. वृत्तीरहित ज्ञानाने संसरणाची शांती होऊन तो महात्मा पूर्ण समाधानी होतो. मनाचे उन्मन, ज्ञानाचे विज्ञान झाल्याने आत्म्याचे चंचळपण नाहीसे होते व आत्मा निरोपाधिक होऊन ब्रह्मरूप होतो. *'ज्योतीसी मिळाली आत्मज्योती'* अशीच ती अवस्था असते.

*''वृत्तीरहित जे ज्ञान । तेचि पूर्ण समाधान ।*
*जेथे तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचे ।।*७/५/१४ *।।''*

– श्री समर्थ.

*''स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती ।*
*संसाराची शांती झाली माझ्या ।।''*

– श्रीनाथमहाराज

*''जेथे ज्ञानचि होते विज्ञान । जेथे मनचि होते उन्मन ।*
*तेथे कैचे चंचळपण । आत्मयासी ।।*१०/१०/५२ *।।''*

– श्रीसमर्थ

ही संतवचने याचा अधिक खुलासा करतात.

अशा पूर्णत्वाला गेलेल्या महात्म्यांना संतांना श्रीदासराममहाराज शरण जातात. हेच श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात असे सांगतात, *''दासराम ऐशा संतासी शरण। वंदितो चरण प्रेमभावे ।।''* श्रीदासराममहाराज यांचे अंत:करणात संतांचेबद्दल प्रेम होते. ते त्यांचे

अभंगातून निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या प्रकारांनी व्यक्त झाले आहे. कोणत्याही संप्रदायाचा, कोणत्याही धर्माचा साधू घरी आला की त्याचा आदराने बहुमान करून ते *''साधु गृहाप्रती आले ।भले सार्थक झाले ।।''* हे संत आनंदचिद्घनाचे पद उभे राहून श्रध्देने म्हणत. सर्व संतांचे त्यांचेवर प्रेम होते व त्यांचेही सर्व संतांचेवर प्रेम होते. सर्व संतांचे प्रेम, आशिर्वाद त्यांना प्राप्त झाले हेच त्यांचे भाग्य होते. असे संतप्रेम, सत्संग मला व आपणा सर्वांना सतत लाभो ही प्रार्थना माझे सद्गुरु श्रीदासराममहाराजांना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

**अभंग ८**

*तबला ना पेटी झांज ना मृदंग।*
*रंग तो श्रीरंग आपण झाला ।।१ ।।*

*स्वये हरी करी हरीचे कीर्तन।*
*राम नारायण वासुदेव ।।२ ।।*

*श्रोता नाही कोणी निरंजन स्थानी।*
*अवघा नयनी रंग भरे ।।३ ।।*

*कोण्यालागी कोणी वाखाणावे येथ।*
*दासराम संथ हरीपायी ।।४ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.२४६

नित्य कीर्तन साधणे हे आपण समजतो त्या कीर्तनापेक्षा कसे वेगळे आहे हे या अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितले आहे. ते म्हणतात, ***''तबला ना पेटी झांज ना मृदुंग। रंग तो श्रीरंग आपण झाला।''***

बाह्यत: जे आपण कीर्तन अनुभवतो, ते तबला, पेटी शिवाय होईल का ? बुवा तबला पेटीची सोय केल्याशिवाय कीर्तनाला येणारच नाहीत. अहो, वाद्यांची साथ असल्याशिवाय कीर्तनात रंग भरत नाही. तबला पेटी पाहिजे, वादक निष्णात पाहिजेत, बरोबर चरण धरायला चांगले साथीदार हवेत, प्रोत्साहन देणारे भरपूर श्रोते हवेत, तरच कीर्तनाला रंग येतो.

जेथे नित्य कीर्तन करतात, त्या ठिकाणीच ***'तबला ना पेटी झांज ना मृदुंग। रंग तो श्रीरंग आपण झाला।''*** असा अनुभव नित्य कीर्तन श्रवण करणाऱ्या श्रोत्यांना येऊ शकतो. ज्यांचे नित्य कीर्तनाचे अनुष्ठान आहे, त्यांना





या सर्व प्रसंगांना तोंड द्यावेच लागते. श्रीतुकाराममहाराजांचे नित्य कीर्तनाचे अनुष्ठान होते. ते म्हणतात ,***''नित्य करितो कीर्तन। हेचि माझे अनुष्ठान ।।''*** रोजचे कीर्तन सुरु झाले की श्रोत्यांची उपस्थिती कधी कमी, कधी जास्त हे होणारच. विशेष प्रसंगी, सणवारी, कोणी गावातील भजनी मंडळी यायची, भजनाचा तडाका व्हायचा, श्रोत्यांची गर्दी व्हायची, मजा यायची. पण एखादा दिवस असाही उजाडायचा, श्रोते कोणी असायचेच नाहीत. श्रीतुकाराममहाराज व पुढे पांडुरंग अशी अवस्था व्हायची. श्रीतुकाराममहाराज त्यांचा हा अनुभव एका अभंगात असा नोंदवितात, ***''कोणे दिशी माळ बुक्क्याची गर्दी। कोणे दिशी भजन प्रेमानंदी। कोणे दिशी आप आपणा छंदी। तुक्याने गावे। हरी ठेवील तैसे रहावे। स्वस्थ असावे।। ''*** अहो, बोलायला सारे सोपे आहे, असे नित्य कीर्तन आचरणे फार अवघड आहे. नित्यकीर्तन करायचे असेल तर तबला पेटीवर अवलंबून राहून चालत नाही. तबला पेटीवर जर नित्यकीर्तन अवलंबून राहिले तर नित्यकीर्तन साधता येईल का ? रोजची तबला पेटी वाजविणारी माणसे कशी उपलब्ध होणार ? बरं आपले सारे लक्ष स्वराकडे राहिले तर हरिचिंतन कसे होणार ? ***''एक मन ते गुंतले स्वरी। कोणे चिंतावा श्रीहरी।।''*** या समर्थवचनाप्रमाणेच अवस्था होईल. म्हणून श्रीनामदेवमहाराजांनी त्यांचे नित्यकीर्तनात या तबला पेटीला, साथीदारांना फारसे महत्व दिले नाही. ते म्हणतात, ***''टाळ मृदुंग दक्षिणेकडे। माझे गाणे पश्चिमेकडे ।।''***

कोणताही कसाही प्रसंग येवो, कीर्तन चुकणार नाही असा निर्धार हवा, तरच हे नित्यकीर्तन साधेल. श्रीतुकाराममहाराज म्हणतात ,***''साता दिवसाचा झाला उपवासी। तरी कीर्तनासी सोडू नये।।१ ।। फुटो हे मस्तक तुटो हे शरीर। नामाचा गजर सोडू नये ।।२ ।। शरीराचे होत दोन तेही भाग। कीर्तनाचा रंग सोडू नये ।।३ ।। तुका म्हणे ऐसा नामी झाला निर्धार। तेथे निरंतर देव वसे ।।४ ।।''***

हा कीर्तनाचा नित्यनेम कुणाला साधतो ? जो नित्यकीर्तन साधतो, त्यालाच हे नित्यकीर्तन साधते. जे नित्य आहे त्याच्या जाणीवेत होणारे कीर्तन हे नित्यकीर्तन . या जगात नित्य काय आहे हो?

*''निराकार जाणावा नित्य। आकार जाणावा अनित्य।*
*यास बोलिजे नित्यानित्य। विचारणा ॥१३/६/१५ ॥''*

*''देह अनित्य आत्मा नित्य। हाचि विवेक नित्यानित्य।*
*अवघे सुक्ष्माचे कृत्य। जाणती ज्ञानी ॥१३/१/२३ ॥''*

ही समर्थवचने आणि *''तो नित्यरूपु पार्था। वोळखावा सर्वथा। जो या इंद्रियार्था । नागवेचि॥ २/१२४ ॥''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन, ही संतवचने नित्य काय व अनित्य काय हे स्पष्ट करणारी आहेत. नित्य निराकार आत्म्याच्या जाणीवेत होणारे कीर्तन हे नित्य कीर्तन. आत्म्यामुळे देहाची जाणीव होते पण देहाच्या जाणीवेने आत्म्याची जाणीव होत नाही. म्हणजे देहाची जाणीव नाहीशी व्हायला पाहिजे, त्याशिवाय आत्म्याची जाणीव होणारी नाही. मग झोपेत देहाची जाणीव नाहीशी होते की, मग झोपेत जे काही होते ते नित्यकीर्तन काय ? नाही. झोपेत देहाचीही जाणीव असत नाही व आत्म्याचीही जाणीव असत नाही. ती अज्ञानात्मक अवस्था आहे. ही निद्रा ज्ञानमयी होणे म्हणजे देहाचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण होय. हेच संतांचे नित्यकीर्तन. या अवस्थेत ते सतत चोवीस तास असतात. हे अखंड स्मरण असणे हे महाकारणदेहातील तुर्यावस्थेचे लक्षण आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, *''महाकारणदेही अखंडस्मरण । अद्वय भजन हरिकथा।''* हे महाकारणदेहातील अखंडस्मरण-नित्यकीर्तन-साधले तर बाहेर दिसणारे दीड दोन तासांचे कीर्तन नित्य साधता येते. हे श्रीदासराममहाराज सोप्या भाषेत असे सांगत, ''गणपतीपुढचा कारंजा दीड दोन तास उडण्यासाठी कृष्णाबाईचा प्रवाह २४ तास वहावा लागतो''. त्याप्रमाणे बाहेर दिसणारे दोन तासांचे कीर्तन करणेसाठी अंतर्यामी सतत कीर्तन





साधावे लागते. या महाकारणदेहातील अखंड कीर्तनाचा उल्लेख श्रीमामामहाराज असे करत. ते सांगत, ''शरीरातील सप्तर्षीमंडळ स्थानात अखंड कीर्तन व अखंड प्रसाद आहे''. या नित्यकीर्तनाचा उल्लेख श्रीतात्यासाहेबमहाराज त्यांचे पदात असा करतात, *''अखंडीत वाचे श्रीरामस्मरण। हेचि पै कीर्तन दासालागी॥''* तर या नित्य निरंतर कीर्तनाचे महत्व श्रीसमर्थ असे सांगतात,

*''ऐसिये सभेचा गजर। तेथे माझा नमस्कार।*
*जेथे नित्य निरंतर। कीर्तन भगवंताचे॥१/८/२७ ॥''*

*आपुलिया सुखस्वार्था। केलीच करावी हरिकथा।*
*हरिकथेवीण सर्वथा। राहोचि नये॥ ४/२/४ ॥''*

तर भगवद्‌गीता या नित्य निरंतर कीर्तनाबद्‌दल असे सांगते,

*''सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः।*
*नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते॥९/१४ ॥''*

नाहीतर बाह्यत: हे सतत कीर्तन करणे शक्य आहे का ? कुणी केले आहे का ? हे सतत अंतर्यामी चालणारे कीर्तन काय स्वरुपाचे असते हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

*''तरी कीर्तनाचेनि नटनाचे। नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे।*
*जे नामची नाही पापाचे। ऐसे केले॥९/१९७ ॥''*

तर श्रीदासराममहाराज या कीर्तनाचे स्वरुप असे सांगतात, *''शब्दनिःशब्दाची सांगड कीर्तन। पावे समाधान गुरुकृपे॥''* हे अंतर्यामी चालणारे कीर्तन आपणास कधी अनुभवता येते, त्या कीर्तनसुखाने आपण कधी सुखी होतो हे ज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,

*''कैसे माझा गुणी धाले। देशकाळाते विसरले।*
*कीर्तनसुखे झाले। आपणपाचि॥९/२०९ ॥''*

अहो, ज्या कीर्तनाने देव अंतर्यामी प्रगट होऊन नाचतो, त्या कीर्तनाचे महत्व काय असेल ? श्रीनानामहाराज बर्वे, श्रीमामामहाराजांच्या कीर्तनाचे वर्णन असे करतात, *''अनुदिन अभिनव कीर्तन चाले। हृदयभूवनी मधु-माधव डोले॥''* अहो, श्रीरंगामुळेच कीर्तनात जर रंग भरत असेल, तर त्या कीर्तनाला वाद्यांची गरजच काय ?

श्रीदासराममहाराज अभंगाचे पुढील कडव्यात सांगतात, *''स्वये हरी करी हरीचे कीर्तन। राम नारायण वासुदेव॥''* देहातीत अवस्थेत परब्रह्मरूप झालेल्या भक्ताने केलेले हे कीर्तन आहे. हरीरूप झालेल्या महात्म्याने केलेले हे हरीचे कीर्तन आहे. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, *''आधी होता संतसंग। तुका झाला पांडुरंग। त्याचे भजन राहीना। मुळस्वभाव जाईना॥''* या हरीरूप झालेल्या महात्म्यांच्या कीर्तनाला हरी हाच श्रोता असतो. या कीर्तनात लावला जाणारा बुक्का, प्राप्त होणारा प्रसाद, सारे काही वेगळेच. *''नित्य नवा कीर्तनी कैचा वोढवला रंग। श्रोता आणि वक्ता स्वये जाहला श्रीरंग॥''* हे श्रीनाथमहाराजांचे वचन व *''हरीचे कीर्तनी हरी श्रोता वक्ता। देव देऊनी स्वतः हरी झाला॥ नाद शब्द अर्थ बुक्का माळ आरती। प्रसाद तो चित्ती हरीरूप॥''* हे श्रीदासराममहाराजांचे वचन व *''शब्दामाजी अर्थ, अर्थामाजी नाद। नादात प्रसाद अभेदू गा॥''* हे श्रीदासराममहाराज यांचे कीर्तनात येणारे संतवचन, ही संतवचने एकत्रितरित्या पाहिली असता हे कीर्तन कसे वेगळे आहे हे जाणवल्यावाचून राहणार नाही.

श्रीदासराममहाराज अभंगाचे पुढील कडव्यात सांगतात, *''श्रोता नाही कोणी निरंजन स्थानी। अवघा नयनी रंग भरे॥''* महाकारणदेहातील अखंड स्मरणाने-अखंड कीर्तनाने तो शब्दाचा ग्रास होऊन नि:शब्दावस्थेत येतो. त्रिपुटीचा लय होतो. परब्रह्मस्वरुप ज्योतीस आत्मज्योती मिळून जाते. परब्रह्मस्वरुप तो होतो. अनुभव ठायीच मुरून जातो.





हा अनुभव इंद्रियांना न जाणता येणारा, मनाला न कळणारा, कल्पनातीत, तर्काच्या पलिकडला असल्याने तो शब्दात सांगता येत नाही. म्हणून निरंजनस्थानी कोणी श्रोताही नाही, अर्थात कोणी वक्ताही नाही. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात , *''वक्ता तो वक्ताची नोहे। श्रोतेनविण॥''* जो कोणी एक आहे त्याच्याशी संपूर्ण तादात्म्य होते. एकाशी एकी होते. अवघा रंग एक होऊन तो परमात्म्याच्या रंगात रंगून जातो. मग रंगाचा बेरंग कसा होणार ? *''अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंग॥''* अशीच ती अवस्था असते.

श्रीदासराममहाराज अभंगाचे पुढील कडव्यात सांगतात, *''कोण्यालागी कोणी वाखाणावे येथ। दासराम संथ हरीपायी॥''* परब्रह्मस्वरुप झाल्यावर, हरीच्या ठिकाणी स्थिर झाल्यावर वर्णन कुणी कुणाचे करायचे ? आणि कसे करायचे हा मोठा प्रश्नच आहे. त्याचे वर्णन करता येत नाही हेच त्याचे वर्णन. या अंतरस्थितीचिया खुणा, अंतर्निष्ठच जाणू शकतात.

हा बोलण्याचा, लिहिण्याचा विषय नसून तो अनुभवण्याचाच विषय आहे. असा काही अनुभव आपणा सर्वांना व मला श्रीदासराममहाराजांनी द्यावा ही प्रार्थना त्यांचे चरणी करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग ९

*आहे ते खोटे नाही ते मोठे ।*
*ऐसे उफराटे संताघरी ।।१ ।।*

*नाही तेची झाले, आहे ते लपाले ।*
*अखंड व्यापीले नाहिपणे ।।२ ।।*

*नाही नाही दोनी गेलिया छेदोनी ।*
*घनू निरंजनी परमात्मा ।।३ ।।*

*दासरामी अवघा नामीच आनंद ।*
*श्रीहरी गोविंद वासुदेव ।।४ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.४६

सर्व संतांनी या दृश्य जगाला खोटेच म्हटले आहे. कारण त्यांना खरे काय आहे, हे समजले होते. एकदा खरे काय आहे, हे समजले की खोटे काय आहे हेही समजते. अहो, खरे नव्हे ते खोटे, हे तरी खरे आहे का नाही ? आम्हाला खरे काय आहे हे माहीत नसल्याने आम्ही दृश्य जगच खरे धरून चाललो आहोत. जगद्‌गुरु शंकराचार्य या जगाचे खोटेपण असे सांगतात, *''ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।।''* तर समर्थरामदासस्वामी त्याचे असारपण असे सांगतात, *''प्रगट ते जाणावे असार। आणि गुप्त ते जाणावे सार। गुरुमुखे हा विचार उमजो लागे ।। ६/२/२१ ।।''* तर श्रीतुकाराममहाराज या जगाचे मिथ्यापण असे सांगतात, *''सत्य तू सत्य तू सत्य तू विठ्ठला। का गा दाविला जगदाभास ।।''*

श्रीदासराममहाराज या जगाचे खोटेपण या अभंगात सांगत आहेत. ते म्हणतात, *''आहे ते खोटे नाही ते मोठे। ऐसे उफराटे*





*संताघरी ।।''* जे आहे ते दिसत नाही आणि जे दिसते आहे ते टिकत नाही. आपण जे दिसतंय त्याला सत्य मानतो व त्याच्याच मागे लागतो. त्यामुळे सारा घोळ आहे. *''असे ते न दिसे। नसे ते आभासे। झाकोळला असे आत्मनाथ ।''* हे संतवचन हे स्पष्ट करणारेच आहे.

ज्यात कधी बदल होत नाही, त्याला सत्य म्हणतात. आम्ही जे दृश्य पाहतो ते सतत बदलणारे आहे. त्या दृश्याला अवस्थांतर, स्थित्यंतर आहे. जे एका रुपात कधीच दिसत नाही, जे फसवे आहे, भ्रामक आहे, त्याला खरे कसे मानणार ? हा इथे प्रश्न आहे.

आपण जे पंचज्ञानेंद्रियांचेमार्फत अनुभवतो, तो अनुभव अवस्थेप्रमाणे बदलणारा आहे. ज्या त्या अवस्थेत, तो तो अनुभव खरा वाटतो. आम्ही जागृतीत जे अनुभवतो, ते जग आम्ही झोपेत अनुभवतो का ? नाही ना ? तेव्हा जागृतीतील जग हे खोटे वाटते. स्वप्नामध्ये स्वप्न खरे वाटते, जागृतीतील जग खोटे वाटते. स्वप्नामधून जागे झालो, स्वप्न खोटे वाटते, हे जागृतीतील जग खरे वाटते. मग यातले खरे कोणते व खोटे कोणते ? एका दिवसात आम्ही तीन वेगवेगळ्या गोष्टी खऱ्या मानतो, हे खरे आहे का ? जे खरे आहे ते कायम खरेच वाटले पाहिजे, हे तरी खरे आहे का नाही ? म्हणून यातले काहीच खरे नाही एवढे खरे. या विश्वाच्या निर्मितीच्या मुळाशी कल्पना आहे, मग ते सत्य कसे असणार ? समर्थ म्हणतात,

*'' पंचभूते आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृती जाण ।*
*अष्टधाप्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसे ।।६/२/१४ ।।''*

*निश्चळामध्ये चंचळ । तेचि कल्पना केवळ ।*
*अष्टधाप्रकृतीचे मूळ । कल्पनारूप ।।११/१/५ ।।''*

श्रीगुरुलिंगगीता या विश्वनिर्मितीबद्दल असे सांगते ''विश्वाच्या उत्पत्तीला कर्ता नाही. हरिच्या ठिकाणी ते कल्पनेने निर्माण झाले आहे. चंचळत्वधर्मामुळे ते भासमान होते म्हणून ते आहे म्हणायचे आणि शेवटी

कल्पनाच आहे म्हणून नाही म्हणायचे.''

श्रीहरीच्या ठिकाणी कल्पनेने विश्व निर्माण झाले म्हटले की आश्चर्य वाटते. पण सामान्य माणूस जो परमेश्वराचा अंशच आहे, तो कल्पनेने स्वप्न पाहतो, तेव्हा स्वप्नातील सारे आपणच होतो ना ? तसेच येथे परमेश्वराने कल्पनेने स्वप्न पाहिले व स्वप्नातील सारे आपणच झाला म्हटले तर आश्चर्य वाटायचे काय कारण ? श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''जो जागता स्वप्नावस्थे जाये। तो जेवी स्वप्नीचे आघवे होये। तेवी अनंत ब्रह्मकटाह आहे। आपणचि जाहला ।। ११/१२० ।।''*

या साकारलेल्या विश्वाचे जे आम्हास ज्ञान होते, ते आपले आत कल्पना आहे, म्हणूनच होते. निर्विकल्प अवस्थेत या साकार विश्वाची जाणीव होत नाही. कल्पनेने जाणवणारे, भासमान होणारे हे जग काल्पनिक मानले जाते.

*'' जे जे काही साकार दिसे । ते ते कल्पांती नासे ।*
*स्वरुप ते असतचि असे । सर्वकाळ ।।९/२/१ ।।''*
– श्री समर्थ

*'' तैसे भूतजात माझ्या ठायी । कल्पिजे तरी आभासे काही ।।''*
*निर्विकल्पी तरी नाही । तेथ मीचि मी आघवे ।।९/९० ।।''*
– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने यावर प्रकाश टाकतात.

कल्पनेतून विश्वाची निर्मिती झाल्याने, विश्वाच्या आरंभी कल्पना व शेवटी विश्वाच्या विनाशानंतर परत कल्पनाच उरणार म्हणजे विश्वाच्या अंती कल्पना. विश्वाच्या आदी अंती कल्पना असल्याने मध्येही कल्पनाच असणार ना ? म्हणून विश्व हे काल्पनिक आहे.

आपल्याला जे आहे असे वाटते आहे, ज्याचे ज्ञान आम्हास





पंचेंद्रियांचे मार्फत होते त्याला श्रीदासराममहाराज 'नाही' म्हणत नाहीत. ते त्याचे अस्तित्व मान्य करतात. ते म्हणतात ते सारे आहे, पण खोटे आहे. हा रुपया खोटा आहे. याचा अर्थ त्या खोट्या रुपयाचे अस्तित्व मान्य आहे, पण तो चलनात चालणारा नाही, म्हणून तो खोटा आहे. तसेच हे सारे आहे तोवर आहे. हे कधीतरी 'नाही' होणारे आहे. विकारी आहे म्हणूनच ते खोटे आहे. सत्यावर विकृतीचा भास निर्माण झाला आहे, सत्य स्वरूप लोपले आहे, म्हणून सारी माणसे भ्रमात पडतात. सत्य हाताला येत नाही.

हे जे सारे 'आहे' ते कधीतरी 'नाही' होणारे आहे. मग हे 'आहे' हे खरे, का 'नाही' हे खरे, हेच कळत नाही. हे 'आहे' हेही खरे नाही आणि हे 'नाही' हे ही खरे नाही. हे 'आहे' हे ही खोटे व 'नाही' हे ही खोटेच. हे 'आहे' आणि 'नाही' ज्याला आहे, असे जे आहे ते सारे खोटे. हे 'आहे' आणि 'नाही' ज्याला नाही असे जे आहे ते मोठे, ते खरे.

जे जग आता 'आहे' आणि नंतर 'नाही' होणार आहे, मग अशा जगावर विश्वास ठेवायचा कसा ? जे अविश्वासाचे बनले आहे, त्यावर आमचा विश्वास आहे. मग विश्वासघातच होणार. हे आहे आणि नाही ज्याला आहे अशा नामरुपात्मक, भ्रामक, अविश्वासी जगाचा संतांनी तटका तोडला म्हणून त्यांना, जो इंद्रियांना जाणता येत नाही, जो मनबुध्दीला अगोचर आहे, म्हणून जो आम्हास नाही वाटतो, अशा देवाचा चटका लागला. श्रीदासराममहाराज सांगतात, *''जगाचा तोडी या तटका । तरी तुझा लागे मज चटका ।।''*

देव कसा आहे हे सांगताना श्रीदासराममहाराज सांगत, ''आहे आहे म्हणताना जे नाही होते, असे जे नाही, असे जे आहे तोच देव आहे.'' या अपरिवर्तनीय देवाच्या अस्तित्वावर ही परिवर्तने होत असतात. तो आहे म्हणून हे जग आहे आणि नाही.''

खरे सत्य कशाला म्हणतात हे श्रीदासराममहाराज असे सांगतात,

*''विकृती आहे ज्यात । तया आहे आदीअंत ।।१ ।।*

*सत्य नोहे भास। कैचे जन्ममरण त्यास ॥२ ॥*
*सत्य हे अढळ। तेणे निर्मिले सकळ ॥३ ॥*
*गुरुराज म्हणे। रूपी जडा मने प्राणे ॥४ ॥''*

सत्याचा शोध संतांनी घेतलेला असल्याने त्यांचे वागणे, बोलणे, विचार हे सारे आपल्यापेक्षा वेगळे असते. श्रीसमर्थ संतांचे वेगळेपण असे सांगतात,

*'' जो जनामध्ये वागे। परी जनावेगळी गोष्टी सांगे।*
*ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधू ॥६/१/१८ ॥''*

*'' तो जनी दिसतो परी वेगळा। वर्तता भासे निराळा।*
*दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाचि नाही ॥ ७/१०/३१ ॥''*

तर ज्ञानेश्वरमहाराज संतांचे वेगळेपण असे सांगतात,

*''ते वर्तत दिसती देही। परी ते देही ना माझा ठायी।*
*आणि मी तयांचा हृदयी। समग्र असे ॥९/४०९ ॥''*

आपण सर्व पाहतो, पण पाहणाऱ्याला पाहू शकत नाही. संत महात्मे हे दृश्य पहात नाहीत. ते पाहणाऱ्यालाच पाहतात. आपणास सर्व कळते, पण ज्याला कळते तो कळता, आपणास कळत नाही. संतमहात्मा जो कळणारा कळता आहे, त्यालाच जाणतात. आपण बोलतो पण बोलणारा आपणास कळत नाही. संतमहात्मे दुसऱ्याशी बोलत नाहीत. ते जो बोलणारा आहे, त्याच्याशी बोलतात. आमचे सारे लक्ष उपाधीकडे असते, चैतन्याकडे असत नाही. संतांना उपाधीची जाणीवच होत नाही. त्यांचे सारे लक्ष चैतन्याकडे असते. आपण साऱ्या जगाचे अनुभव घेतो, पण अनुभव घेणारा जाणत नाही. संतमहात्मे जगाचा अनुभव घेत नाहीत, ते अनुभव घेणाऱ्या अनुभवीचाच अनुभव घेतात. आपण बहिर्मुख असतो तर संत सतत अंतर्मुख असतात. आपण खाण्यासाठी जगतो. संतमहात्मे जगण्यासाठी खातात. संतांच्या घरी प्राप्त होणाऱ्या खुणा साऱ्या उलट्याच असतात. श्रीधरस्वामी या संतांच्या घरी





प्राप्त होणाऱ्या खुणांचे वर्णन असे करतात, *'' नाथाच्या घरची उलटीच खूण। पाण्याला मोठी लागली तहान। श्रीधरस्वामी म्हणे मार्ग हा उलटा। जाणेल तोचि गुरुचा बेटा ॥''* संतांनी चोखाळलेला मार्ग हाही उलटा व त्यांनी अनुभवलेले नाम हे ही उलटेच. समर्थ म्हणतात,

*''उफराट्या नामासाठी। वाल्मिक तरला उठाउठी।*
*भविष्य वदला शतकोटी। चरित्र रघुनाथाचे ॥४/३/१६ ॥''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''नाही तेचि झाले, आहे ते लपाले। अखंड व्यापिले नाहीपणे।''* जे नाही आहे असे वाटते आहे अशा चैतन्यापासून जड निर्माण झाले आहे. समर्थरामदासस्वामी म्हणतात,

*'' जडाचे मूळ ते चंचळ। चंचळाचे मूळ ते निश्चळ।*
*निश्चळासी नाही मूळ। बरे पहा ॥ १५/४/२५ ॥ ''*

जे जड निर्माण झाले आहे ते वस्तुत: नाही आहे, पण ते आम्हास आहे असे वाटते आहे. चैतन्यामुळे जडाची जाणीव होते पण जडाच्या जाणीवेने चैतन्याची जाणीव होत नाही. जे आपल्या जाणीवेत येते ते सारे जड आहे. (शुध्द जाणीव – जाणीवेची जाणीव सोडून) जे खरे पाहिले तर आहे, पण ते जाणीवेत येत नसल्याने ते आपणास नाही वाटते, ते जे झालेले आहे, त्या जडाच्या मागे लपलेले आहे. म्हणून देह – दृश्य नाहीपणात आहे आणि आत्मा आहेपणात नाही आहे. हा सारा आशय श्रीनामदेवमहाराज आपले अभंगात असा व्यक्त करता,

*''नव्हतेची कैसे झाले रे खेळिया। नाही तेच दिसू लागले रे।*
*अरूप होते ते रूपासी आले। जीव शीव नाम पावले रे ॥''*

चैतन्यातून हे सारे जड पुढे आले व चैतन्य जडाचे मागे राहिले. त्यामुळे चैतन्य हे मागेच राहिले. ते कधी लोकांसमोर आलेच नाही. चैतन्य मागे लपले आहे म्हणून हा जगाचा आभास होतो आहे.

*''स्वस्तिश्री वटेशू। जो लपोनी जगदाभासू।*
*दावी मग ग्रासू। प्रकटला करी ।।''*

श्रीचांगदेवपासष्टीतील श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ओवी

*''हे आघवेचि दिसणे। जयाते का न देखणे।*
*विश्व भासतसे जेणे। लपालेनी ।। १५/३०९ ।।''* व

*'' तू जयाप्रती लपसी। तया जग हे दावीसी।*
*प्रकटू तै करीसी। आघवेची तू ।।१४/४ ।।''*

या श्रीज्ञानेश्वरीतील ओव्या हे स्पष्ट करणाऱ्याच आहेत.

म्हणजे विश्वाचा आभास होणे किंवा विश्वाचा आभास मावळणे हे दोन्ही चैतन्यामुळेच घडते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''स्वप्नाचे दिसणे न दिसणे। जैसे आपलेनि असलेपणे।*
*विश्वाचे आहे नाही जेणे। प्रकाशे तैसे ।।१८/१११६ ।।''*

चैतन्याच्या अस्तित्वावर विश्वाचा आभास होतो म्हणजे विश्वाच्या आभासाने चैतन्याचे अस्तित्वच अखंडपणे जाणवते ना ?

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''नाही नाही दोनी गेलीया छेदोनी। घनु निरंजनी परमात्मा।।''* दोन नकार म्हणजे एक होकार होय. जे नाही आहे ते नाही झाले की जे आहे ते आपणास जाणवणार आहे. दृश्य पदार्थ जे नाही आहेत (कल्पनेमुळे आहेत) ते नाहीत (कल्पना गेल्यावर निर्विकल्पावस्थेत) असे झाल्यावर जी आहे, ती आत्मवस्तू आहे. असाच आशय श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या 'Gods Message' या इंग्रजी काव्यात व्यक्त झाला आहे.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''दासरामी अवघा नामीच आनंद। श्रीहरी गोविंद वासुदेव।।''*





निर्विकल्प अवस्थेत जगाचा अनुभव न येता सर्वत्र व्याप्त असा परमात्मा जो श्रीहरी, गोविंद, वासुदेव या नावांनी ओळखला जातो, तो प्रत्ययाला आल्याने – सतत देवाचेच स्मरण होत राहिल्याने ना 'मी' होऊन नामी आनंद प्राप्त होतो.

असा काही आनंद मला व आपल्या सर्वांना प्राप्त व्हावा अशी प्रार्थना श्रीसद्‌गुरुदासराममहाराज यांचे चरणी करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

### अभंग १०

*कर्ममार्गे जाणा होय चित्तशुध्दी ।*
*उपासने बुध्दी दृढ होय ।।१ ।।*

*ज्ञाने तो आनंद निरभिमानी होय ।*
*धरिता गुरुपाय मार्ग कळे ।।२ ।।*

*गुरुभक्ती साधन योग्य आचरण ।*
*घडता दर्शन देवाजीचे ।।३ ।।*

*दर्शन स्पर्शन इक्षण भाषण ।*
*होता मनोन्मन समाधी ते ।।४ ।।*

*आपणात सर्व सर्वात आपण ।*
*होताची अभिन्न राम उरे ।।५ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.४७०

परमार्थात (अ) ज्ञानमार्ग (ब) योगमार्ग (क) भक्तीमार्ग (ड) कर्ममार्ग हे चार मार्ग सांगितले जातात. हे चार मार्ग वेगळे आहेत का? हा एक मोठा प्रश्न आहे. परमात्मप्राप्तीचा एकच मार्ग आहे. 'नान्य पंथा विद्यते अयनाय' असे सांगितले जाते, मग हे चार मार्ग वेगळे असतील का ? ज्ञानात योग, भक्ती, कर्म हे आहेच. योगात ज्ञान, भक्ती, कर्म हे आहेच. भक्तीत ज्ञान, योग, कर्म हे आहेच. ज्यात ज्ञानाला प्राधान्य दिले जाते तो ज्ञानमार्ग, भक्तीला प्राधान्य दिले जाते तो भक्तीमार्ग, कर्माला प्राधान्य दिले जाते तो कर्ममार्ग, योगाला प्राधान्य दिले जाते तो योग मार्ग. ज्याला भक्त 'नामामृत' म्हणतात, त्याला योगी 'जीवनकला' म्हणतात. शब्द, भिन्न अर्थ एकच ***''नामामृत***

*गोडी वैष्णवा लाधली। योगिया साधली जीवनकळा ।।''* हा श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा 'हरीपाठ' हे स्पष्ट करणारा आहे. ज्या परमात्म्याची प्राप्ती करून घ्यायची, त्याकरता काही तरी करावे लागते ते कर्म, त्या परमात्म्याचे प्रेम असणे ही भक्ती, त्या परमात्म्याला जाणणे हे ज्ञान, परमात्मरूप होऊन जाणे हा योग. परमात्मरूप होताना हे सारे व्हावेच लागते.

शब्दाने अर्थ कळतो. अर्थाला महत्व आहे. शब्दाला नाही. आम्ही शब्दाला महत्व देतो व शब्दातच अडकतो, गुरफटतो. *''शब्दाकरिता कळे अर्थ। अर्थ पाहता शब्द व्यर्थ। शब्द सांगे ते यथार्थ। परी आपण मिथ्या ।। ६/१०/१९ ।।''* हा समर्थांचा दासबोध हे रोखठोक सांगणाराच आहे. अर्थ (ध्येय) सर्वांचा एकच आहे. शब्द फक्त वेगळे आहेत. आपण अर्थाकडे पहावे म्हणजे हा शब्दाचा घोळ राहणार नाही. रात्रंदिवस जो अर्थाकडे – ध्येयाकडे – लक्ष देतो, तोच अर्थरूप होतो – ध्येयरूप होतो – समर्थ होतो. श्रीसमर्थ म्हणतात, *''रात्रंदिवस पाहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ। परलोकीचा निजस्वार्थ। तेथेची घडे ।। २०/३/२९ ।।''*

मोक्षप्राप्ती होणेसाठी कर्ममार्गाचे काय महत्व आहे हे श्रीदासराममहाराजांनी या अभंगात सांगितले आहे. ते म्हणतात, *''कर्ममार्गे जाणा होय चित्तशुध्दी। उपासने बुध्दी दृढ होय ।।''* ''खरे जे ज्ञान आहे ते आत आहे व ते सर्व कर्मापासून अलिप्त आहे.'' हे श्रीदासराममहाराजांचे सांगणे कर्माची मर्यादा स्पष्ट करणारेच आहे. कर्माने जास्तीतजास्त चित्तशुध्दी होऊ शकते. चित्तशुध्दी होईपर्यंत जे काही करावे लागते तो सारा कर्ममार्ग आहे. जगद्‌गुरु शंकराचार्य कर्माची उपयुक्तता अशी सांगतात,

*''चित्तस्य शुध्दये कर्म न तु वस्तूपलब्धये।*
*वस्तुसिध्दीर्विचारेण न किंचित्कर्मकोटिभिः ।।११।।''* (विवेकचूडामणि)

कर्माने चित्तशुध्दी होते, वस्तुरूप होता येत नाही. कोट्यावधी कर्मे केली तरी वस्तुरुप होता येत नाही.





कोणत्या मार्गाने चित्तशुध्दी होते ? श्रीज्ञानेश्वरमहाराज कर्म म्हणजे काय हे असे सांगतात, *''ऐसा करितेनवीण गोचरु। अव्यक्ती हा आकारु। निपजे जो व्यापारु। तया नाम कर्म।।''* अव्यक्ताचे ठिकाणी दिसणारा आकार निर्माण करण्यासाठी दिसणाऱ्या कर्त्याशिवाय जी कृती दिसते तिला कर्म असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. श्वासोच्छ्वास हीच ती कृती आहे, जी मनाचे व देहाचे कारण आहे. देह व मन हे श्वासोच्छ्वासाचे कार्य आहे. श्वासोच्छ्वास ही क्रिया अनैच्छिक आहे. तिला दिसणारा कर्ता नाही. ती चैतन्याची क्रिया आहे. निद्रावस्थेतसुध्दा देहाची व मनाची कोणतीही क्रिया होत नसताना श्वासोच्छ्वास ही क्रिया होत राहते. अर्थात तिचा कर्ता कोणी वेगळा आहे. *''जे श्वासोच्छ्वासवरी। होत निजेलियाहीवरी। काही न करणेची परी। होती जयाची ।। १८/२२५ ।।''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारेच आहे. मनोलय साधला असता कल्पना अविद्येच्या उपाधीतील जीवाचे ठिकाणी राहणारी श्वसनाची मूळ क्रिया (१२ अंगुळ निःश्वास) – नित्यक्रिया म्हणजे कर्म आहे. साधनाने ही श्वसनाची क्रिया सूक्ष्मतर सूक्ष्मतम होणे म्हणजे ते अकर्म आहे तर मनात वासना निर्माण होऊन – इच्छा निर्माण होऊन श्वसनाची गती वाढणे – विकारणे हे विकर्म आहे. श्रीनाथमहाराज सांगतात,

*''अविद्यायुक्त जीव परम। त्यासी नित्यक्रिया तेचि कर्म।*
*नित्य न करणे ते अकर्म। विकर्म ते निषिध्द ।।*
*कर्म सर्वसाधारण। तेचि विकाराते पावले जाण*
*उठिले विधिनिषेध दारूण। विकर्म जाणा ते म्हणिपे ।।''*

कर्माचे मूळ वासनेत आहे. ही वासना – कामना निर्माण झाली की श्वसनाची गती बदलते – नित्यक्रिया विकारते व इंद्रियांना वासनापूर्तीसाठी मन प्रेरीत करते. मग इंद्रियाकरवी जे काही होते त्याला आपण कर्म म्हणतो. श्रीनाथमहाराज सांगतात, *''काया वाचा अथवा मन। करिजे तितुके कर्म*

*जाण। सुक्ष्म स्फुर्तीचे जे भान। ते मूळ जाण कर्माचे ॥''* म्हणजे देहाकडून होणाऱ्या कर्माला मनच जबाबदार असते. व्यवहारात आपण देहाकडून कर्म झाले म्हणजे ते कर्म झाले असे आपण मानतो. पण अध्यात्मशास्त्र तसे मानत नाही. मनात एखादी गोष्ट आली, नित्यक्रिया विकारली, मग ती गोष्ट इंद्रियांकरवी होवो न होवो, ते कर्म झालेच असे अध्यात्मशास्त्र मानते. म्हणून मनात इच्छा निर्माण होणे, क्रोध निर्माण होणे, कोणताही विकार निर्माण होणे हेच कर्म आहे. संत मुक्ताबाई कर्माची व्याख्या अशी करतात, *''कामक्रोध सर्व कर्म दंडीले बळे। सूत्र धरुनी मध्यभागी वरी चालिले। निर्गुणाचा संग मला आजी जाहला। पूर्व दिशे भानू जसा आत उगवला ॥''* मनात कोणतीही इच्छा नसताना – हेतू नसताना – शरीराकडून एखादे कर्म घडले तर त्या कर्माला पारमार्थिकदृष्ट्या फारसा अर्थ नाही. ''कर्माची किंमत वृत्तीवरती आहे, कृतीवरती नाही.'' हे श्रीदासराममहाराजांचे सांगणे येथे लक्षात घेणेसारखे आहे. हेच मुनी वसिष्ठांनी प्रभू रामचंद्रांना 'योगवसिष्ठ' या ग्रंथात सांगितले आहे. ते म्हणतात, *''मन कृतं कृतं कर्म। न शरीर कृतं कृतं ॥''* व्यवहारात या अर्थाने जर कर्माकडे पाहिले तर आपल्या मनात किती वाईट वासना येत असतात, किती वाईट कर्म होत असते हे न बघितलेलेच बरे.

मूळ श्वासाची गती – नित्यक्रिया – कर्माप्रमाणे बदलते. क्रिया आहे म्हणून कर्म आहे आणि कर्म आहे म्हणून क्रिया आहे. जसे कर्म, तशी श्वसनाची गती. धावताना नि:श्वास ४२ अंगुळे, मैथुनकाळी ६५ अंगुळे, निद्रेत १०० अंगुळे, जेवताना, बोलताना १८ अंगुळे, रागावलो तर ५६ अंगुळे नि:श्वास खाली येतो. ही श्वसनगती बदलणे – विकारणे म्हणजेच विकर्म आहे. आमची सारी कर्मे विकर्म या सदराखाली येतात. या नित्यक्रिया विकारणाऱ्या कोणत्याही कर्माने चित्तशुध्दी कधीही होणार नाही. अहो, वनात जाऊन चिंतन वनितेचे होणार असेल तर त्या एकांतवासाला काय अर्थ आहे ? तीर्थाला पर्यटन म्हणून जात असू तर त्या तीर्थाटनाला काय अर्थ आहे ? कामनारहित होणे, कामक्रोधरहित होणे, कर्मापासून अलिप्त होणे हे या असल्या





कोणत्याही कर्मावर अवलंबून नाही.

चित्तशुध्दी होणेसाठी विकर्माचे कर्म व्हावे लागेल. आत्ता जो नि:श्वास अप्रमाण खाली येतो आहे, त्याला काही तरी प्रमाण आले पाहिजे. तो नि:श्वास १२ अंगुळांपर्यंत खाली आला पाहिजे. या नित्यक्रियेलाच श्रीनाथमहाराज 'कर्म' म्हणतात. *''आधी ते करावे कर्म। कर्ममार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षची पावणे ॥''* हे समर्थ वचन येथे लक्षात घ्यावे असे आहे.

साधनाचे अभ्यासाने, जाणीवेत श्वसनाचे ठिकाणी मनोलय साधला असता, देहभाव लयाला गेला असता, श्वासोच्छ्वास हे निर्हेतूक होतात व श्वासोच्छ्वास हे सहजकर्म होते. या निर्हेतुक श्वासोच्छ्वासाची जाणीव ज्या ज्ञानाने होते त्या ज्ञानात आत्मानुभूती आहे. त्यातच उपासना आहे. या ज्ञानावस्थेत जे कर्म होते – निर्हेतूक श्वासोच्छ्वास करताना जे कर्म होते, ते 'ते कर्म' आहे. ते कर्म कसे असते, हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात, *''परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी। हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूविण ॥ २/२६६ ।''*

चैतन्याच्या जाणीवेत निर्हेतुक सत्क्रिया आचरणे हाच खरा कर्ममार्ग आहे. मनात कोणताही संकल्प विकल्प नसताना होणारे कर्म हे 'ते कर्म' आहे. एखादे कर्म मी करीन किंवा आरंभलेले कर्म पूर्णत्वाला नेईन असा संकल्प त्यांचे मनाला शिवतही नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''आणि हे कर्म मी करीन। अथवा आदरिले सिध्दी नेईन। येणे संकल्पेही जयाचे मन। विटाळेना ॥ ४/१०४ ॥''* ''काय करायचे व काय करायचे नाही हे सारे श्रीमहाराजांचे हातात आहे.'' हे श्रीदासराममहाराजांचे सांगणे येथे लक्षात घेणेसारखे आहे. *''हे करणे का न करणे। हे आघवे तोचि जाणे। हे विश्व चळतसे जेणे। परमात्मेनी ॥ १२/११८ ॥''* ही ज्ञानेश्वरमहाराजांची ओवी सारे काही स्पष्ट करणारी आहे. आपण जर कर्ता असू तर आपल्या इच्छेप्रमाणे

व्हावयास हवे, पण तसे होत नाही. ''इच्छेविरुध्द होणे हा निसर्ग आहे, इच्छेप्रमाणे होणे ही श्रीमहाराजांची कृपा आहे.'' हे श्रीदासराममहाराजांचे सांगणे, आपण कायम लक्षात ठेवावे असेच आहे.

*''कर्ता आपण ऐसे म्हणावे । तरी आपले इच्छेसारिखे व्हावे ।*
*इच्छेसारिखे न होता मानावे । अवघेच वाव ।।१३/६/२६ ।।''*

हा श्रीदासबोध आपणाला अंतर्मुख करणाराच आहे. म्हणून 'रामकर्ता' हे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे सांगणे आपल्याला पटले पाहिजे, अनुभवाला आले पाहिजे.

*''मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे तू कष्टी होसी ।*
*राम कर्ता म्हणता पावसी । यश किर्ती प्रताप ।।६/७/३६ ।।''*

*''कर्त्यासी वोळखावे । यास विवेक म्हणावे ।*
*विवेक सांडिता व्हावे । परम दुःखी ।।१३/७/२९ ।।''*

ही समर्थवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. कर्माचा कर्ता आपण नाही. हे जाणल्याने कर्माचा कर्तृत्वाचा अहंकार त्यांचे ठिकाणी असत नाही. त्यामुळे त्यांना कर्तृत्वाचा अहंकार व कर्मफळाची अभिलाषा यामुळे प्राप्त होणारा कर्मबंध बाधक होत नाही. ते कर्म करून अकर्ते असतात. कर्म न करणे म्हणजे नैष्कर्म्य नव्हे, तर कर्तेपणाची भावना नसताना होणारे कर्म हेच नैष्कर्म्य आहे.

*''अगा करितेनवीण कर्म । तेचि ते निष्कर्म ।*
*हे जाणती सवर्म । गुरुगम्य जे ।। ५/६३ ।।''*

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे सांगणे, हे स्पष्ट करणारेच आहे.

साधनाचे अभ्यासाने निश्वास खाली यायचे प्रमाण अत्यल्प राहते. विकर्माचे कर्म (१२ अंगुळे निःश्वास) होऊन कर्माचे अकर्म (अत्यल्प अंगुळे निःश्वास) होते. विकर्मापासून अकर्म होणेसाठी कराव्या लागणाऱ्या कर्ममार्गाने चित्तशुध्दी होते. *''सोहं तेही अस्तवले''* या अवस्थेत दृश्याचा आभास





नाहीसा होऊन पाहणाराच दृश्य होतो. *''पाहणे आपणासी आपण''* हे ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे त्याला शत्रुता कोठेही जाणवत नाही. निर्भयत्व प्राप्त होते. त्यामुळे चित्ताचा विक्षेप होणे संभवत नाही. चित्तशुध्दी होते.

श्वासोच्छ्वास – आयुष्याचे साधन हे आत्मसाक्षात्काराचे साधन आहे. आत्मसाक्षात्कार हे साध्य साधल्यावर साधनाची गरज राहत नाही. जोवर तो बोध मनाला होत नाही तोवरच साधनाचा उपयोग. आत्मसाक्षात्कार दृष्टीपथात आल्यावर साधन साधणेची गरज त्या साधकाला राहत नाही. साधन खाली राहते व तो साधक परपार होतो.

*''जववरी अर्जुना । तो बोध भेटेना मना ।*
*तवची यया साधना । भजावे लागे ।। ३/१४९ ।।''*
*तैसा आत्मसाक्षात्कारु । होईल देखोनि गोचरु ।*
*ऐसा साधनहतियेरु । हळूची ठेवी ।।१८/१०८३ ।।''*

चित्तशुध्दी झाल्यावर, मनाला तो बोध प्राप्त झाल्यावर त्याला सर्वत्र परमेश्वरच अनुभवाला येतो व *''जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ।। १०/११८ ।।''* या ज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाप्रमाणे विश्वात्मक देवाची उपासना – भक्ती त्याचे हातून होते व उपासनेने बुध्दी दृढ होते, तो स्थितप्रज्ञ होतो. पण ही जी बुध्दी आहे ती, आपण समजतो ती बुध्दी नव्हे. आपण समजतो त्या बुध्दीला परमात्मा अगोचर आहे. तिचा परमात्मप्राप्तीसाठी तसा काहीही उपयोग नाही. ही बुध्दी म्हणजे देहाचा निरास झाल्यावर जी बुध्दी राहते, जिला अद्वैताचे ज्ञान होते, जिला ज्ञानेश्वरमहाराज 'नवलबुध्दी' म्हणतात, तर जगद्गुरु शंकराचार्य जिला 'प्रज्ञा' असे संबोधतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज या बुध्दीचे वर्णन असे करतात,

*जव देह हे असेल । तव वोळगी ऐसी किजेल ।*
*मग देहांती नवल । बुध्दी आहे. ।।१३/४३० ।।''*

तर जगद्‌गुरु शंकराचार्य हिचे वेगळेपण असे सांगतात,

*''ब्रह्मात्मनोः शोधितयोरेकभावावगाहिनी।*
*निर्विकल्पान्न चिन्मात्रा वृत्तिः प्रज्ञेति कथ्यते।*
*सुस्थितासौ भवेद्यस्य स्थितप्रज्ञः स उच्यते॥ ४२९ ॥''*
(विवेकचुडामणी)

ईश्वर आणि जीव यांचे ऐक्य समजणारी विकल्परहित आणि ब्रह्माकार जी वृत्ती तिला प्रज्ञा म्हणतात. ही प्रज्ञा ज्यांची उत्तम स्थिर झाली आहे, त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. अशा स्थितप्रज्ञाचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***''तो कामु सर्वथा जाये। जयाचे आत्मतोषी मन राहे। तोचि स्थितप्रज्ञु होये। पुरुष जाणे॥ २/२९३ ॥''*** अशा स्थितप्रज्ञ माणसाला निरंतर आनंद मिळत असतो. जगद्‌गुरु शंकराचार्य सांगतात,

*''यस्य स्थिता भवेत्प्रज्ञा यस्यानन्दो निरंतरः।*
*प्रपञ्चो विस्मृतप्रायः स जीवन्मुक्त इष्यते॥४३० ॥*
(विवेकचुडामणी)

श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे असे सांगतात, ***''ज्ञाने तो आनंद निरभिमानी होय। धरीता गुरुपाय मार्ग कळे॥''*** कर्माला अकर्माची मोहोर बसल्याने – कर्माचे अकर्म झाल्याने जीवनातील अहंकार नाहीसा होतो, संसाराचा दरारा नाहीसा होतो व सर्वत्र जे या चराचराचे मूळ आहे अशा ज्ञानाचा – आनंदरूप चैतन्याचा अनुभव त्याला येतो व ***''अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आता। चरणी जगन्नाथा। चित्त ठेले।''*** श्रीनाथमहाराजांचे वचनाप्रमाणे त्याची अवस्था होते.

पण हा निरंतर आनंद सद्‌गुरुकृपेशिवाय प्राप्त होत नाही. सद्‌गुरुकृपेशिवाय हा मार्ग आकलन होत नाही.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''गुरुभक्ती साधन योग्य आचरण। घडता दर्शन देवाजीचे॥''*** सद्‌गुरुंनी सांगितलेले साधन साधणे हे योग घडविणारे आचरण आपल्या हातून घडणे, या श्रेष्ठ गुरुभक्तीनेच देवाचे दर्शन होणारे आहे.





श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''दर्शन स्पर्शन इक्षण भाषण। होता मनोन्मन समाधी ते॥''***

बुध्दी निश्चळ झाली असता प्राप्त होणारी उन्मनी अवस्थेतील समाधी अवस्था, सतत देवाचा अनुभव देणारीच असते. डोळ्यांना देवाचेच दर्शन, स्पर्श देवाचाच, बोलणे देवाशीच, सारे व्यवहार देवाबरोबर अशी ती अवस्था असते.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''आपणात सर्व सर्वात आपण। होताची अभिन्न राम उरे॥''*** आपल्या आत जो एक राम आहे, तोच सर्वत्र अनुभवाला आल्यावर भेद राहीलच कसा ? ***''अंदर राम बाहीर राम। जहाँ देखो वहाँ राजाहीराम॥''*** या श्रीनाथमहाराजांचे वचनाप्रमाणे या साधकाची अवस्था होते.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

**अभंग ११**

*स्वरुप संप्रदायी स्वरुप साक्षात्कार।*
*साधन विचार गुह्य भाग ।। १ ।।*

*चैतन्याचे पंथी चैतन्य उजळे।*
*भक्तीचे सोहळे अनिर्वाच्य ।। २ ।।*

*आनंदपंथीया आनंदाचा लाभू।*
*होतसे स्वयंभू आनंद तो ।। ३ ।।*

*श्रीसंप्रदायी जाण मुक्ती जोडे*
*बंधन उघडे नाही होय ।। ४ ।।*
*साधन घडता सर्व काही लाभ।*
*दास हा स्वयंभ राम होय ।। ५ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.९५०

या जगात अनेक प्रकारची, भिन्न प्रकृतीची, भिन्न विचारांची, अंतर्यामी भिन्न भाव असणारी माणसे आहेत. जशी प्रकृती, जसा भाव, जसा विचार, तसा देव त्याला भावतो. जसा देव भावतो तशी उपासना पध्दती – संप्रदाय तो स्वीकारतो. अशा अनेक उपासना पध्दती – संप्रदाय भारतात उपलब्ध आहेत. त्यातील शेकडा ९५ संप्रदाय भगवान शंकरापासून, दोन टक्के भगवान विष्णूपासून, दोन टक्के शक्तीपासून व अेखादा संप्रदाय ब्रह्मदेवापासून उदय पावलेला आहे. सर्वच संप्रदायांचा हेतू एकच 'आत्मज्ञान होणे' हा असल्याने सर्व संप्रदाय श्रेष्ठच आहेत. या साऱ्या संप्रदायाचे साधारणत: चार प्रकारात वर्गीकरण केले जाते. ते चार प्रकार असे, (अ) स्वरुप (ब) चैतन्य (क) आनंद (ड) श्री. कोणताही संप्रदाय असो, तो या चार

प्रकारात बसला पाहिजे. आमचा आपला वेगळाच संप्रदाय आहे की जो या चारी प्रकारात मोडत नाही, असे येथे चालत नाही.

आद्य शंकराचार्यांनी भारतभर प्रवास करून, चार दिशांना चार मठ स्थापन केले व त्या चार मठात चार संप्रदाय स्थापन केले. त्या संप्रदायांची नावे अशी (अ) प्रकाश (ब) आनंद (क) स्वरुप (ड) चैतन्य.

या चार संप्रदायांची गुणवैशिष्ट्ये या अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितली आहेत. स्वरुप संप्रदायाचे वैशिष्ट्य श्रीदासराममहाराज असे सांगतात, *''स्वरुप संप्रदायी स्वरुप साक्षात्कार। साधन विचार गुह्य भाग ॥''* ज्या संप्रदायात स्वरुप साक्षात्कार होणे महत्वाचे मानले जाते तो स्वरुप संप्रदाय. श्रीरामदासस्वामींचा समर्थ संप्रदाय हा स्वरुप संप्रदाय आहे. समर्थ म्हणतात,

*''म्हणोनी आम्ही रामदास। श्रीरामचरणी आमचा विश्वास।*
*कोसळोनी पडो हे आकाश। आणिकाची वास न पाहू ॥''*
*स्वरुप संप्रदाय अयोध्या मठ। जानकीदेवी श्रीरघुनाथ दैवत।*
*मारुती उपासना मार्ग नेमस्त। वाढविला परमार्थ रामदासी ॥*

आमचा निंबरगी संप्रदाय हा सुध्दा स्वरुप संप्रदाय आहे. भगवान शंकरापासून हा संप्रदाय उदय पावला आहे. *''शिवापासोनिया आली परंपरा। केलेसे विस्तारा हनुमंते ॥''* असे श्रीदासराममहाराज सांगतात तर भगवान सोमेश्वरांच्या पिंडीमधून भगवान रेवणसिध्द प्रगट झाले व त्यांचेपासून पुढे श्रीमरूळसिध्द, श्रीकाडसिध्द, श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज असा हा संप्रदाय विस्तार पावला. चिमड संप्रदायातील अधिकारी पुरुष श्रीगोपालनाथ सांगतात,

*''सोमेश्वर पिंडीपासूनी जगी प्रथम रेवणसिध्द जन्मुनी।*
*मुक्तपणे राहुनी जनी तत्वबोधे अज्ञ तारुनी।*
*मरुळसिध्द रुप धरुनी मोंगलाई वास प्रभू ॥१ ॥*





*तृतीय काडसिध्द सन्मुनी।*
*अतिमोदभरे सिध्दगिरी वसति साधुनी।*
*सिध्दस्थान घोरवनी सस्वरुपी ऐक्य पावुनि ।*
*नारायणराव शिष्य स्थापी निंबर्गीग्रामी बोधुनि ॥२ ॥''*

स्वरुपसाक्षात्कार होणे हे या स्वरुपसंप्रदायिकांचे ध्येय असते. स्वरुपसाक्षात्कार होणे म्हणजे काय हो ? जे स्वरुप साक्षात आहे, तदाकार आपण होणे म्हणजे स्वरुप साक्षात्कार होणे. आत्ता जे गुप्त आहे, ते कालांतराने प्रगट होते, आत्ता जे प्रगट आहे ते कालांतराने गुप्त होते. असे जे गुप्त ही नाही व प्रगटही नाही त्याला साक्षात म्हणतात. ते आहे म्हणून हे गुप्त आणि प्रगट होते. असे जे साक्षात आहे, तिकडे जर लक्ष गेले तर प्रचितीला वेड लागते. *''गुप्त ना प्रगट आहे हा साक्षात। लक्षिता प्रचित वेडावली ॥''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे.

जे जे काही साकार प्रगट दृश्य आहे, जे जे दृष्टीस दिसणारे आहे, ते ते कधी तरी गुप्त होणारे, कल्पांती नाश पावणारेच आहे - अंत:करणातील कल्पना नाहीशी झाली की नाश पावणारेच आहे. स्वरुप मात्र सदासर्वकाळ जसेच्या तसे असते. नित्य नवे असते.

*''दृष्टीस दिसे ते निरसे। येतद्विषयी श्रुती असे।*
*म्हणोन जे दृष्टीस दिसे। ते स्वरुप नव्हे ॥९/२/८ ॥''*

*''जे जे काही साकार दिसे। ते कल्पांती नासे।*
*स्वरुप ते असतची असे। सर्वकाळ ॥९/२/१ ॥''*

ह्या श्रीसमर्थांच्या ओव्या हे स्पष्ट करणाऱ्याच आहेत. साकार दिसणाऱ्या चराचराचे जे मूळ आहे, जेथून हे चराचर निर्माण झाले, त्या निश्चळ परब्रह्माला शुध्द निर्मळ स्वरुप म्हणतात. हे निश्चळ परब्रह्म-शुध्द निर्मळ स्वरुप हे आपले स्वरुप आहे हे जाणणे म्हणजे शुध्द स्वरुपज्ञान होय.

*"जे या चराचराचे मूळ । शुध्द स्वरुप निर्मळ ।*
*या नाव ज्ञान केवळ । वेदांतमते ।।५/६/१८ ।।"*

*"ऐक शुध्द ज्ञानाचे लक्षण । शुध्द स्वरुपची आपण ।*
*या नाव शुध्द स्वरुपज्ञान । जाणिजे श्रोती ।।५/६/१० ।।"*

*"दृश्य पदार्थ वोळखिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे*
*शुध्द स्वरुप जाणिजे । या नाव स्वरुपज्ञान ।। ५/६/७ ।।"*

ही समर्थ वचने सारे काही स्पष्ट करणारी आहेत.

आपले लक्ष – अनुसंधान – दृश्य जगाकडे असते. त्यामुळे आपणास सर्वत्र द्वैत अनुभवास येते. संतमहात्म्यांचे लक्ष – साधुंचे लक्ष हे दिसणाऱ्या जगाकडे असत नाही. त्यांचे लक्ष त्यामागे गुप्तरुपाने दडलेल्या सर्वगत चैतन्याकडे असते. त्यांचे अनुसंधान जगदंतरी असते. त्यामुळे त्यांना कोठेही द्वैत आढळत नाही. म्हणून ते जगात असून जगावेगळे असतात.

*"सदा स्वरुपानुसंधान । हे मुख्य साधूंचे लक्षण ।*
*जनी असोन आपण । जनावेगळा ।।८/९/९ ।।"*

*"सदा स्वरुपानुसंधान । करी द्वैताचे निरसन ।*
*अद्वय निश्चयाचे ज्ञान । तेचि शुध्द कल्पना ।।७/५/३४ ।।"*

ही समर्थ वचने स्वरुपानुसंधानाचे महत्व दाखविणारीच आहेत. पण हे सदा स्वरुपानुसंधान आपणास कसे साधणार? सदा स्वरुपानुसंधान साधणेसाठी साधकाला त्रिगुणाच्या पलिकडे असणारा चौथा गुण – शुध्द सत्वगुण प्राप्त होणे गरजेचे आहे. तो शुध्द सत्व गुणच, अहर्निशी परमार्थ – सदा स्वरुपानुसंधान घडवू शकतो. ***"तुका म्हणे ऐका सत्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशी ।।"*** हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन आपणास हे आश्वासन देत आहे. हे त्रिगुण जे आहेत ते आपल्या श्वसनामध्ये आहेत. समर्थ म्हणतात,





*"त्रिगुण आणि पंचभूते । हे वायोमध्ये मिश्रिते ।*
*अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये ।।९/८/१७ ।।"*

या त्रिगुणाचा निरास होणेसाठी या श्वसनाचा अभ्यास होणे, साधनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. साधनाचे अभ्यासाने त्रिविध झालेले जीवन एकविध होणे – जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था होणे – त्रिगुणांचा निरास होणे हे साधल्याशिवाय संतांनी साधलेला अहर्निशी परमार्थ – सदा स्वरुपानुसंधान प्राप्त होणार नाही.

सदा स्वरुपानुसंधान साधणे हे तुर्यावस्थेचे लक्षण आहे. तुर्यावस्थेत साधकाला निरनिराळे आत्म्याचे – सगुण ब्रह्माचे – आकाशाचे – अनुभव प्राप्त होतात. वेगळेपणाने अनुभव प्राप्त होणे हे अजून द्वैत असल्याचेच लक्षण आहे. स्वरुपाकार होणे – वेगळेपणा संपणे हा खरा स्वरुपानुभव.

१) *"जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।*
*ते येक जाणाची तुर्या । सर्वसाक्षिणी ।। ७/४/४९ ।।"*

२) *दुजेवीण अनुभव । हे बोलणेची वाव ।*
*याकारणे नाही ठाव । अनुभवासी ।। ६/१०/२९ ।।"*

३) *आकाश अनुभवा येते । स्वरुप अनुभवापरते ।*
*म्हणोनिया आकाशाते । साम्यता न घडे ।।८/५/६८ ।।"*

४) *आकाश वेगळेपणे पहावे । स्वरुपी स्वरुपची व्हावे ।*
*वस्तुचे पाहाणे स्वभावे । ऐसे असे ।।८/५/६६ ।।*

ही श्रीसमर्थवचने सारे काही स्पष्ट करणारी आहेत. जेव्हा तुर्येमध्ये असणाऱ्या सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते तेव्हा तुर्येमध्ये असणारी ज्ञानाची जाणीव नाहीशी होते. ज्ञानाचे विज्ञान होते. तो साधक स्वरुपाकार होतो. यालाच स्वरुप साक्षात्कार होणे असे म्हणतात.

*''म्हणोनी सर्वसाक्षी मन । तेचि जालिया उन्मन ।*
*मग तुर्यारूप ज्ञान । ते मावळोन गेले ।।७/५/११ ।।''*

हे समर्थवचन हे स्पष्ट करणारेच आहे.

सदा स्वरुपानुसंधानाने स्वरुपाकार झालेले महात्मे, देहाने वेगळे दिसत असतील, पण सर्वत्र एकच असणाऱ्या देहातीत वस्तूशी तादात्म्य पावून, एकाशी एकी होऊन ते एकरुपच झालेले असतात. समर्थ म्हणतात,

*''साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरुपी मिळाले ।*
*अवघे मिळोनी येकची जाले । देहातीत वस्तू ।।७/२/३१ ।।''*

सदा स्वरुपानुसंधानाने स्वरुपाकार झालेल्या महात्म्यांचे ठिकाणी देहाची जाणीव असत नाही. त्यांना द्वैताचा अनुभव येत नाही. सर्वत्र अद्वैतच ते अनुभवतात. त्यामुळे त्यांचे ठिकाणी संदेह असत नाही. अशा महात्म्यांचे वर्णन श्रीसमर्थ असे करतात,

*'' सिध्दस्वरुपी नाही देहो । तेथे कैचा हो संदेहो ।*
*याकारणे सिध्द पहा हो । नि:संदेही ।। ५/१०/४१ ।।''*

तर श्रीज्ञानेश्वरमहाराज अशा महात्म्यांचे वर्णन असे करतात,

*''ते वर्तत दिसती देही । परी ते देही ना माझा ठायी ।*
*आणि मी तयांच्या हृदयी । समग्र असे ।।९/४०९ ।।''*

'स्वरुपी राहणे' हा ज्यांचा स्वधर्म आहे अशा स्वरुपाकार झालेल्या साधूंना सिध्द म्हणतात. श्रीसमर्थ म्हणतात,

*'' सकळ धर्मामध्ये धर्म । स्वरुपी राहणे हा स्वधर्म ।*
*हेची जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचे ।।८/९/५४ ।।''*

*'' स्वरुप होऊन राहिजे । तया नाव सिध्द बोलीजे ।*
*सिध्द स्वरुपीच साजे । सिध्दपण ।।८/९/४ ।।''*





जन्माला आलेले सगळेच मरतात, पण जे स्वरुपाकार झालेले आहेत असे आत्मज्ञानी साधुसंत मरणाला मारून अमर होतात. समर्थ म्हणतात,

*''असो ऐसे सकळही गेले । परंतु येकचि राहिले ।*
*जे स्वरुपाकार जाले । आत्मज्ञानी ।।३/९/५९ ।।''*

श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे सांगतात,

*'चैतन्याचे पंथी चैतन्य उजळे ।*
*भक्तीचे सोहळे अनिर्वाच्य ।।''*

चैतन्याचा आविष्कार होणे हे या संप्रदायाचे लक्षण आहे. चैतन्य पंथीयात चैतन्य जाणवते. बसलेले उठता येत नाही आणि आम्ही चैतन्यपंथी असे होत नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा वारकरी संप्रदाय हा चैतन्य संप्रदाय आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे 'चैतन्याचा जिव्हाळा (स्त्रोत)' होते म्हणून त्यांचे ठिकाणी चैतन्याबद्दल जिव्हाळा (प्रेम) होता. श्रीनाथमहाराज त्यांचे वर्णन असे करतात,

*''कैवल्याचा पुतळा प्रगटला भूतळा ।*
*चैतन्याचा जिव्हाळा ज्ञानोबा माझा ।।''*

मूर्तीमंत चैतन्य म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज होते. त्यांच्याच भाषेत त्यांचे वर्णन करायचे झाले तर ते असे करता येईल,

*''अगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देव जाणिजे ।*
*आणि सुखसर्वस्व माझे । चैतन्य तो ।।६/४८२ ।।''*

भगवंतांचा आत्मा म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज होते. भगवंतांनी स्वत: ही गोष्ट श्रीनामदेवमहाराजांना सांगितली आहे. ते म्हणतात ,

*''देव म्हणे नाम्या पाहे । ज्ञानदेव मीच आहे ।*
*तो आणि मी नाही दूजा । ज्ञानदेव आत्मा माझा ।।''*

स्वत: चैतन्यरूप असल्यानेच अचेतन भिंत चालविणे, मेलेल्या

सच्चिदानंदबुवांना जिवंत करणे असे चमत्कार त्यांचे हातून घडले.

क्षेत्राचा (छत्तीस तत्वांचा) स्पर्श नसलेले असंग केवळ जाणणारे साक्षीभूत जे चैतन्य ज्याच्या सत्तेने हा देह चालतो, त्या सत्तेला, चेतना असे म्हणतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*'आता असंगा साक्षिभूता। देही चैतन्याची जे सत्ता।*
*तिये नाव पंडुसुता। चेतना येथे॥ १३/१३४॥''*

एवढे महत्वाचे चैतन्य, ज्याच्या सत्तेने देह चालतो, तिकडे आमचे लक्षच नाही. आमचे सारे लक्ष देहाकडे आहे. याउलट संतांचे लक्ष अशाश्वत उपाधीकडे – देहाकडे असत नाही. त्यांचे लक्ष उपाधीमध्ये – देहामध्ये गुप्तरुपाने असणाऱ्या सर्वगत शाश्वत चैतन्याकडे असते. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*'' या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत।*
*ते तत्वज्ञ संत। स्विकारीती॥२/१२६ ॥''*

उपाधीमध्ये गुप्तरुपाने असणाऱ्या चैतन्याकडे लक्ष देणे, जगदंतरी अनुसंधान ठेवणे, त्या चैतन्यावर प्रेम करणे हीच खरी भक्ती आहे. *''विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती॥''*हे संत शिवरामांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे. नमन झाल्याशिवाय, मनाचे मनत्व नाहीसे झाल्याशिवाय ही भक्ती प्राप्त होत नाही. हे भक्तीतील वर्म श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, *''भक्ती ते नमन। वैराग्य तो त्याग। ब्रह्मी ब्रह्मभोग ब्रह्मतनू॥''*ही भक्ती प्राप्त होणे किती अवघड आहे, हे श्रीतुकाराममहाराज असे सांगतात, *''भक्ती ते कठीण। सुळावरील पोळी। विरळा तो बळी धैर्यवंत॥''*ही भक्ती नवविध असून यातील दुसरी भक्ती, जी भगवंताला अत्यंत प्रिय आहे, जिला 'थोर भक्ती' असे श्रीतुकाराममहाराज संबोधतात, ती सर्व संतांनी, वैष्णवांनी अनुसरली. हे कीर्तन जे अंतर्यामी साधता येते, ते कसे वेगळे आहे हे आपण मागे पाहिलेले





आहे. हे कीर्तन म्हणजे एक सुखाचा सोहळाच असतो. या कीर्तनसुखाने ते आपल्याच ठिकाणी सुखी झालेले असतात. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''कैसे माझा गुणी धाले। देशकाळाते विसरले॥ कीर्तनसुखे झाले। आपणपाची॥९/२०५ ॥''* हे सुख शब्दात सांगता येणारे नाही. म्हणून ते अनिर्वाच्य आहे. श्रीनिवृत्तीनाथमहाराज या सुखाचे वर्णन असे करतात, *''ते सुख काय सांगू। वाचे बोलता न ये॥''*

श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे सांगतात, *''आनंदपंथीचा आनंदाचा लाभू। होतसे स्वयंभू आनंद तो॥''* आपले मूळ स्वरुप हे आनंदरूप आहे. ते प्राप्त करून घेणे हे या आनंदपंथीयांचे उद्दिष्ट असते. कोणत्याही स्थितीत, कोणत्याही अवस्थेत आत्मानंदाची प्राप्ती होणे व आत्मानंदात दंग असणे हे या संप्रदायाचे लक्षण आहे.

विषयातून प्राप्त होणारा आनंद हा विषय आहे तोवरच प्राप्त होणारा असतो. विषय नाहीसा झाला की माणूस अधिकच दुःखी होतो. म्हणून श्रीब्रह्मचैतन्यमहाराज म्हणतात , *''विषयाचा आनंद दारुसारखा आहे, ती धुंदी उतरली की मनुष्य जास्त दुःखी होतो.''* म्हणून विषयातून आनंद मिळविण्याचा प्रयत्न हा कष्टालाच, दुःखालाच कारणीभूत होतो.

विषयातून मिळणारा आनंद हा अशाश्वत असतो म्हणून तो खरा आनंद नाही. विषय तर कोणताही नाही आणि आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत हा खरा आनंद – ब्रह्मानंद. 'निर्विषयानंद म्हणजे ब्रह्मानंद' हे श्रीदासराममहाराजांचे सांगणे येथे लक्षात घ्यावे असेच आहे. ब्रह्मानंद हा *''आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदची अंग आनंदाचे॥''* या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाप्रमाणे असतो. हा निर्विषयानंद मिळविणेसाठी आपण निर्विषय होणे अत्यंत गरजेचे आहे. निर्विषय होणेसाठी मायेचा निरास होणे आवश्यक आहे व तो गुरुकृपेशिवाय होत नाही. म्हणून हा आनंद आपले सद्गुरुच आपणाला प्राप्त करून देतात. *''आनंद केला बा गुरुराया। हरली*

*अवघी माया ।।''* हे संतवचन याला प्रमाण आहे. गुरु हे स्वत: आनंदरूप असतात. म्हणून ते शिष्याला आनंद प्राप्त करून देऊ शकतात. *''ब्रह्मानंद माझा गुरु। कैसा फेडू हा उपकारु।।''* हे संतवचन व *''ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं। द्वंद्वातीतं गगनसदृश्यं तत्व-मस्यादिलक्ष्यम्। एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं। भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि।।८९ ।।* हा गुरुगीतेतील श्लोक, ही वचने गुरुंचे स्वरुप स्पष्ट करणारीच आहेत. श्रीगुरुंनी सांगितलेल्या साधनाचे अभ्यासाने, देहभावरहित स्थिती प्राप्त होऊन श्रेष्ठ असा आनंद-आत्मानंद त्या साधकाला प्राप्त होतो. आपल्या खऱ्या स्वरुपाचा बोध त्याला होतो. देहाचे रूप हे आपले खरे रूप नसून अजन्मा, स्वानंदघन आनंदरूप आपणच आहोत, याचा प्रत्यय त्याला येतो. आत्मा हा आनंदरूप आहे, हे स्पष्ट करणारी संतवचने खालीलप्रमाणे -

१) *''ज्ञान म्हणो तऱ्ही नाही जाणीव।*
*अज्ञान म्हणो तऱ्ही नाही नेणीव*
*आभाव म्हणो तरी नवल ठेव। आनंदाची।।''*
- श्रीमुकुंदराजस्वामी

२) *सोहं आत्मा स्वानंदघन। अजन्मा तो तूचि जाण।*
*हेचि साधूचे वचन। सदृढ धरावे।। ८/८/३३ ।।''*
- श्रीसमर्थ

३) *येनू इल्लदानू याक निन्न नीनू।*
*सत्यचिदानंदनु आत्मारामा।।*
- श्रीगुरुलिंगगीता

आपले आतले आनंदरूप समजल्याने

*जो नादे ऐकिजता नादू। स्वादे चाखिजता स्वादू।*
*जो भोगिजतसे आनंदू। आनंदेचि।।१५/५४७ ।।''*





या ज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाप्रमाणे तो बाहेरचा आनंद घेतो, अंतर्बाह्य आनंदच त्याला प्रत्ययाला येतो. *''अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आता। चरणी जगन्नाथा चित्त ठेले।।''*या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचनाप्रमाणे त्याची अवस्था होते.

श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे असे सांगतात, *''श्रीसंप्रदायी जाण मुक्ती जोडे। बंधन उघडे नाही होय।।''* 'श्रीसंप्रदाय' या नावावरून आपणास असे वाटेल की या संप्रदायात जाणे बरे आहे. आपणास हवी तेवढी संपत्ती, लक्ष्मी प्राप्त करता येईल. पण तसे नाही आहे. मोक्ष, मुक्ती प्राप्त करून घेणे हे या संप्रदायाचे उद्दिष्ट आहे.

वस्तुत: मुक्त असणारा जीव मी आणि माझे यात अडकून बध्द होतो. *''मुक्त होता परी बळे झाला बध्द। घेवोनिया छंद माझे माझे।।''* हे संतवचन हे स्पष्ट करते. जीव हा सप्तपाशी जखडला आहे. या सप्तपाशाचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात,

*''काळपाश कर्मपाश। धर्मपाश ब्रह्मपाश।*
*मायापाश मोहपाश। जन्मपाश सातवा।।''*
*काळपाश तो आयुष्यघातू। कर्मपाश तो अनैश्वर्यवंतू।*
*धर्मपाश तो आश्रमगतू। वेदविहितार्थ ब्रह्मपाश।*
*देहममता तो मोहपाश। मुख्यमाया तो आशापाश।*
*कनककांता हा जन्मपाश। सप्तपाशी जीव बध्द।।''*

वासना नाहिशी होणे - शांत होणे - म्हणजे मुक्ती असून वासना निर्माण होणे हेच बध्दाचे लक्षण आहे, हे श्रीनाथमहाराज असे सांगतात,

*''सकळ वासनेची शांती। या नाव मुख्य मुक्ती।*
*विषय वासना उत्पत्ती। बध्दतां निश्चिती या नाव।।''*

अंत:करणात वासना, इच्छा असेल तर कितीही संपत्ती असो तो भिकारीच. वासनारहित जर तो असेल, मग वास्तवात संपत्ती असो अथवा नसो, तो

श्रीमंतच आहे. वासनारहित होणे हीच या संप्रदायिकांची खरी श्रीमंती. वासनारहित होण, बंधनरहित होणे म्हणजेच उन्मनी अवस्था आहे. ही परमार्थातील अखेरची स्थिती आहे. त्यानंतर त्याला मिळवायचे असे काही उरत नाही.

श्रीदासराममहाराज मूळ अभंगात शेवटी असे सांगतात,

*''साधन घडता सर्व काही लाभ।*
*दास हा स्वयंभ राम होय॥५॥''*

श्रीमहाराजांनी सांगितलेल्या साधनाचे अभ्यासाने वरील सर्व लाभ होतातच. साधक हा स्वत: रामरूप होऊन जातो. परमार्थात यापेक्षा काय मिळवायचे असते ?

卐 卐 卐





॥ श्रीदासराममहाराज प्रसन्न ॥

# आत्मारामपाठ

### अभंग १२

*गुरु जगी थोर बोलतसे श्रुती।*
*गुरु कोण चित्ती उमगेना॥१॥*

*ऐसा गुरुपाठ विचारेची घ्यावा।*
*विचारे शोधावा गुरुबोध॥२॥*

*गुरु जगी एक बोले गुरुगीता।*
*परी तया अर्था जाणती ना॥३॥*

*सद्रुपी ओळख करी तो सद्‌गुरु।*
*येर ते गुरुगुरु करिताती॥४॥*

*गुप्तरुप जेणे प्रगटची दिसे।*
*ऐसा गुरु वसे दासरामी॥५॥*

– दासरामगाथा अ.क्र. ११२८

आहार, निद्रा, भय, मैथुन हे सारे सर्व देहात सारखेच असते. पण मनुष्य देहात असणारे विशेषज्ञान हे त्या देहाचे वैशिष्ट्य आहे. *''आहार, निद्रा, भय, मैथून। सर्व योनिसी समसमान। मनुष्यदेहीचे ज्ञान। अधिक जाण सर्वांशी॥''* हे श्रीनाथमहाराजांचे वचन नरदेहातील ज्ञानाचे महत्व दाखविणारेच आहे. हे ज्ञान माणसाला ज्या गोष्टीपासून प्राप्त होते, त्या गोष्टींना तो गुरु असे संबोधतो. अर्थात माणसाला जे ज्ञान उपलब्ध झाले आहे ते सारे गुरुंच्यामुळे आहे. म्हणून माणसाच्या जीवनात गुरुंचे महत्व अपरंपार आहे.

जे जे आपणास परमेश्वराने उपलब्ध करून दिले आहे त्यांचे गुणधर्म काय आहेत, हे पाहून त्याचा वापर कसा करावा, हे आपणास आपले आई,

वडील, आचार्य शिकवतात. ते आपले गुरुच. ज्या यातीचा जो उद्योगधंदा असेल तो पोट भरण्यासाठी वडील माणसे शिकवतात तेही आपले गुरुच. या साऱ्यांचे महत्व आपल्या जीवनात अनन्यसाधारण आहेच.

पण आपले ज्ञान, 'आहार, निद्रा, भय, मैथुन' याकरताच उपयोगात येणारे असेल तर ते ज्ञान, इतर प्राणीमात्रात आहेच की. मग आपले वेगळेपण ते काय ? पोट भरायची विद्या, ज्ञान हे इतर प्राणीमात्रांप्रमाणेच माणसात आहे. त्यात वेगळे असे काहीच नाही. पण या मनुष्यदेहात सर्वव्यापक परमात्मवस्तू – चराचराचे मूळ – शुध्दस्वरुप – प्राप्त करून देणारी अध्यात्मविद्या – अध्यात्मज्ञान – प्राप्त करून घ्यायचा अधिकार आहे. या नरदेहातच नराचा नारायण होऊ शकतो. हे नरदेहातील विशेष ज्ञान – अध्यात्मज्ञान हे त्या देहाचे विशेष आहे.

*''पशुदेही नाही गती । ऐसे सर्वत्र बोलती ।*
*म्हणोनी नरदेहीच प्राप्ती । परलोकाची ।।१/१०/२१ ।।''*

*''येवं पोट भरायची विद्या । तयेसी म्हणो नये सद्विद्या ।*
*सर्वव्यापक वस्तू सद्या । पाविजे ते ज्ञान ।।६/१/२३ ।।''*

ही समर्थ वचने व

*''देखोनि मनुष्यदेहासी । सुख झाले भगवंतासी ।*
*अधिकार ब्रह्मज्ञानासी । येणे देहेसी मत्प्राप्ती ।।''*

हे श्रीनाथमहाराजांचे वचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

ही अध्यात्मविद्या प्राप्त होणेसाठी जे आपणास मार्गदर्शन करतात त्यांना गुरु किंवा सद्गुरु असे संबोधण्यात येते. सर्वात श्रेष्ठ अशी अध्यात्मविद्या, जिचे वर्णन 'अध्यात्मविद्या विद्यानां' असे केले जाते, ती प्राप्त करून देणारे, सद्गुरु हे सर्वश्रेष्ठ मानले जातात.

श्रीगुरुगीता सांगते,





*''न गुरोरधिकं तत्त्वं न गुरोरधिकं तपः ।*
*तत्त्वं ज्ञानात्परं नास्ति । तस्मैश्री गुरवे नमः ।। ७४ ।।''*

गुरुतत्व हे सर्वश्रेष्ठ असून गुरुहून श्रेष्ठ असे दुसरे काही नाही . पुरातन काळातील श्रुती आणि स्मृती यांनी गुरुंचेच वर्णन केले आहे, श्रीगुरुंचे महात्म्य इतके आहे. कितीही वर्णन केले तरी ते अपुरेच आहे. श्रीसमर्थ म्हणतात,

*''म्हणोनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।*
*अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।। १/४/३१ ।।''*

तर श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''का साडेपंधरया रजतवणी । तैशी स्तुतीची बोलणी ।।*
*उगियाची माथा ठेविजे चरणी । हेचि भले ।। १०/१५ ।।''*

म्हणूनच आजही श्रुती आणि स्मृती गुरुवर्णन करीत आहेत. पण ते अजुनही अपुरेच आहे. श्रीचिमडचे महाराज म्हणतात, *''श्रुतीस्मृती तुजला गाती। परी ती आजवरी ना होय पुरती।।''* पुढील काळात श्रीदासराममहाराजांना श्रुत झालेल्या 'श्रीगुरुलिंगगीतेचे' भाकीतच श्रीचिमडचे महाराजांनी पंचपदीत केले आहे असे वाटल्यावाचून रहात नाही. श्रीदासराममहाराजांना अलिकडील काळात श्रुत झालेल्या श्रीगुरुलिंगगीतेत हे गुरुमहात्म्य ठिकठिकाणी व्यक्त झाले आहे. श्रीगुरुलिंगगीता श्रीगुरुंचे वर्णन असे करते,

*''नमो वरव कोडुवाता । नमो नम्म सद्गुरुनाथा ।।१ ।।*
*शरणरु दासप्रेमी । नमो नमो नम्म स्वामी ।।२ ।।*
*निरंजन निर्विकारु। नमो गुरु देवदेवरु ।।३ ।।*
*शरणागतरु संरक्षकने । नमो नमो नामप्रियने ।।४ ।।*

माझ्यावर अनुग्रह करून आशीर्वाद देणाऱ्या, शरणागत दासावर प्रेम करून त्याचे रक्षण करणाऱ्या, नामप्रिय निरंजन, निर्विकारस्वरुप सद्गुरुंना मी नमन करतो.

हेच गुरुमहात्म्य श्रीदासराममहाराजांनी या अभंगात सांगितले आहे. ते म्हणतात, *''गुरु जगी थोर बोलतसे श्रुती। गुरु कोण चित्ती उमगेना ।।''* श्रीगुरुंचे हे श्रेष्ठत्व आम्हास अनुभवाला येत नाही. कारण गुरु कोण आहेत हे नेमके आम्हाला समजलेले नाही. आम्ही गुरुंना साकार मनुष्याकृती पाहतो तोवर, गुरुंचे खरे स्वरुप आपणास समजलेले नाही. गुरुंचा खरा उपदेश झालेला नाही. श्रीनाथमहाराज सांगतात, *''जे गुरुसी मनुष्य मानिती। ते मिथ्या गुरुभक्ती। त्यासी कल्पांती नव्हे विश्रांती ।। उपदेश भ्रांती मुख्यत्वे ।।''* अहो, गुरु म्हणजे मुर्तीमंत ज्ञान. आम्ही मनुष्याकृती त्यांना पाहणे, हे आपले विपरित ज्ञान आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*'' गुरु तेथ ज्ञान। ज्ञानी आत्मदर्शन। दर्शनी समाधान।*
*आथी जैसे ।।१८/१६३७ ।।''*
*'' तो चालते ज्ञानाचे बिंब। तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ।*
*येर माणूसपण ते भांब। लौकिक भागू ।।१०/७७ ।।''*

ज्ञानी कोण हो ? आम्ही समजतो तसे का ? ज्यांनी भरपूर पुस्तके वाचली आहेत, उत्तम प्रवचने करतात, ते ज्ञानी का ? नाही. या ज्ञानाने अहंकार वाढतो. *''ग्रंथ वाचिले ज्ञान मिळविले अभिमानाने फुगले रे। सद्‌गुरुवाचुनी गूज कळेना ब्रह्मसुखाला मुकले रे ।।''* या संतवचनाप्रमाणे जे ज्ञानी अभिमानाने ब्रह्मसुखाला मुकलेले असतात – आत्मसुखाला मुकलेले असतात. त्यांची बडबड अनुभवावाचून असते. ज्या ज्ञानाने अहंकार वाढतो व देवाचा साक्षात्कार होत नाही त्या ज्ञानाला ज्ञान म्हणता येईल का ? अज्ञानाने देवाची प्राप्ती होत नाही. (अज्ञाने तरी देवाधिदेव। पाविजे कैसा – श्रीसमर्थ) अर्थात ज्या ज्ञानाने देवाची प्राप्ती होत नाही ते ज्ञान नसून अज्ञानच आहे.

ज्या अज्ञानाने देवाची प्राप्ती होत नाही ते अज्ञान, ज्याचे नाहीसे झाले आहे तो ज्ञानी. अज्ञान म्हणजे नेमके काय आहे हे समर्थ असे सांगतात,





*''आपण म्हणजे मीपण। मीपण म्हणजे जीवपण। जीवपण म्हणिजे अज्ञान। संग जडला ।। ७/२/२० ।।''* अहो, अहंकार, मीपण, जीवपण हेच अज्ञान आहे. ते गेले की तो ज्ञानी. श्रीमामामहाराज केळकर सांगतात, *''तोचि ज्ञानी भला। अहंभाव ज्याला गेला ।।''* 'मी' आहे म्हणून 'माझे' आहे, 'माझे' आहे म्हणून वासना आहे. मी गेला की वासना पण रहात नाही. ज्ञानी पुरुष हे वासनारहित असतात. श्रीसमर्थ सांगतात,

*''बीज अग्निने भाजले। त्याचे वाढणे खुंटले।*
*ज्ञात्यास तैसे जाले। वासनाबीज ।। १५/१०/२८ ।।''*

ज्याच्या अंत:करणात काम (इच्छा) नाही, तेथे क्रोध येईल का? लोभ होईल का ? ते ज्ञानी षड्‌विकाररहित असतात. श्रीमामामहाराज सांगतात, *''तोचि ज्ञानी भला। षड्‌विकार नाही ज्याला ।।''* वासनारहित अवस्थेत हे महात्मे असल्याने त्यांना जन्म व त्यापाठोपाठ प्राप्त होणारे मरण प्राप्त होत नाही. *''जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाली अंगे हरिरूप ।।''* या श्रीनाथमहाराजांचे वचनाप्रमाणे त्यांची वासना हरिरूप झाल्याने जन्ममरणरहित अवस्थेत – संकल्पविकल्परहित अवस्थेत – जाणीवनेणीवरहित अवस्थेत – त्यांना मोक्ष प्राप्त झालेला असतो. (ज्ञानात एव तु कैवल्यम् – शंकराचार्य) जन्म व त्यापाठोपाठ येणारे मरण हा संसार त्यांचेठायी उरत नाही. त्रिगुणरहित ते होतात. (संसार समस्तत्रिगुण – श्रीनाथमहाराज) त्यामुळे त्यांचेठिकाणी संसारदु:खाला प्रवेशच असत नाही. ब्रह्मरस प्राप्त होऊन ते सतत आनंदात असतात. संत श्रीमुकुंदराज अशा महात्म्यांचे वर्णन असे करतात, *''जे संसारासी वेगळे। ज्ञान वैराग्येसी आगळे। ब्रह्मरसे आनंदले। ते सद्‌गुरु जाणावे ।।''*

गुरु हा शब्दच बोलका आहे. श्रीगुरुगीतेत गुरु या शब्दाची फोड तीन प्रकारे केली आहे व त्यातून तीन वेगवेगळे अर्थ त्यांनी आपणासमोर मांडले आहेत. ते श्लोक व त्यांचे अर्थ खालीलप्रमाणे –

१) *गुकारस्त्वन्धकारश्च । रुकारस्तेज उच्यते ।*
*अज्ञानग्रासकं ब्रह्म । गुरुरेव न संशयः ॥२३ ॥*

अर्थ : 'गु' शब्दाचा अर्थ अज्ञानांध:कार होय आणि 'रु' शब्दाचा अर्थ ज्ञानप्रकाश, तेज होय. अज्ञानाचा नाश करणारे सगुण ब्रह्म गुरुच होत ह्यात मुळीच संशय नाही.

२) *गुकारः प्रथमो वर्णो । मायादिगुणभासकः ।*
*रुकारो द्वितीयो ब्रह्म । मायाभ्रान्तिविनाशनम् ॥२४ ॥*

अर्थ : (गुरु शब्दातील) गुकार हा पहिला वर्ण, मायादी गुण प्रगट करणारा आहे. दुसरा जो रुकार, तो ब्रह्माचे द्योतक असून मायानिर्मित भ्रमनिरसन करणारा होय.

३) *गुकारं च गुणातीतं । रुकारं रुपवर्जितम् ।*
*गुणातीतस्वरुपं च । यो दद्यात्स गुरुः स्मृतः ॥४६ ॥*

अर्थ : गुरु या शब्दातील 'गु' ह्या अक्षराने गुणातीत आणि 'रु' अक्षराने रुपातीत स्वरुप निर्देशित होते. जो गुणरुपातीत निर्गुण निराकार स्वरुपाचा साक्षात्कार घडवितो, त्यालाच 'गुरु' ही संज्ञा प्राप्त होते.

श्रीगुरुंचे नेमके स्वरुप कसे आहे, हे श्रीगुरुगीता असे सांगते,

१) *'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु । गुरुर्देवो महेश्वरः ।*
*गुरुः साक्षात् परब्रह्म । तस्मै श्री गुरवे नमः ॥३२ ॥''*

अर्थ : गुरु स्वत:च ब्रह्मा, विष्णु, सदाशिव होय. गुरुच परब्रह्म होय. अशा श्रीगुरुंना वंदन असो.

२) *ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं।*
*द्वंद्वातीतं गगनसदृश्यं तत्वमस्यादिलक्ष्यम् ॥*
*एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं ।*
*भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरुं तं नमामि ॥८९ ॥*





अर्थ : ब्रह्मानंदरुपी, परमसुखदाता, केवळ ज्ञानस्वरुप सुखदु:खादी द्वंद्वरहित, आकाशासारखा निर्लेप, तत्वमसी आदी महावाक्याचे साध्य, एक, नित्य, विमल, निश्चल, सर्व प्राण्यांच्या बुध्दीचा साक्षी, भावातीत त्रिगुणरहित अशा सद्‌गुरुंना मी नमन करतो.

आपले जे निर्गुण परब्रह्मरूप आहे तेच सद्‌गुरुंचे खरे रूप आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण। दिधले संपूर्ण माझे हाती ॥''* तर श्रीगुरुलिंगगीता हेच असे सांगते,

*''ना नीने गुरुराया गुरुराया । ना नीने गुरुराया ॥धृ॥*
*देह मन धन विल्ले प्राणेंबू व्यवहारन ।*
*शरीरद मुख्य प्राण नीने गुरुराया ॥१ ॥*

*प्राणप्रिय परमेश्वरनू यल्लवू सार ।*
*कडिदाटीसो पर तर सद्‌गुरुराया ॥२ ॥*

*कुळ गण गोत नीने तायीतंदी नीने ।*
*सिध्दानंद नानु नीने नम्म प्रभुराया ॥३ ॥*

अर्थ : हे गुरुराया मी तूच आहे. ॥धृ॥ देह, मन आणि धनाच्या व्यापारासाठी लागणारा प्राणच केवळ तू नाहीस तर हे गुरुराया, शरीरातील मुख्य प्राणदेखील तूच आहेस. ॥१ ॥ हे प्राणप्रिय परमेश्वरा, सद्‌गुरुराया, तूच या सर्वांचे (सृष्टीचे) साररूप आहेस. तूच या सर्वातून मला पैलपार कर. ॥२ ॥ माझे कूळ, गणगोत, मायबाप सारे तूच आहेस. हे प्रभुराया सिध्दानंदा मी तूच आहे. ॥३ ॥

''तू तुझ्या जीवनाचा शिल्पकार आहेस'' हे सद्‌गुरु वामनराव पै यांचे वचन कायम उरी बाळगावे असेच आहे .पण आपण कोण आहोत हेच आपणास माहित नसल्याने, ते माहित करून देणाऱ्या सद्‌गुरुंची आवश्यकता आहे. निजत्वाचा अनुभव न देता, तोंडी मंत्र देऊन अनुग्रह करणारे गल्लोगल्ली आहेत. पण जे शिष्याला निजत्वाची ओळख करून देतात, त्याकरता करावे

लागणारे साधन सांगतात, ते खरे सद्गुरु.

*''मंत्रतंत्र जे सांगती । ते तोंडीचे तोंडी उपदेशिती ।*
*नाही अंतरी निजप्रतिती । उपदेश भ्रांती मुख्यत्वे ।।''*

*''मंत्रतंत्र उपदेशिते । घरोघरी गुरु आहेत आईते ।*
*जो शिष्यासी मेळवी सद्वस्तूते । सद्गुरु त्याते श्रीकृष्ण मानी ।।''*

ही श्रीनाथमहाराजांची वचने व

*''गायत्रीमंत्राचा उचारू । सांगे तो साचार कुळगुरु ।।*
*परी ज्ञानेविण पैलपारु । पाविजेत नाही ।।५/२/८ ।।''*

*'' शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रियदमन ।*
*ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळावे तरी टाकावे ।। ५/२/२१ ।।''*

ही समर्थ वचने, ही संतवचने यावर प्रकाश टाकतात.

जे वासनारहित आहेत, संसारातून आपूट बाजूला झालेले आहेत, मोक्ष प्राप्त झालेले आहेत, देही असून पूर्ण विदेही आहेत असे पूर्ण ज्ञानी पुरुषच आपणाला वासनेतून मुक्त करू शकतात. या संसारातून बाजूला करू शकतात. सत्य ज्ञानाची प्राप्ती करून देऊ शकतात. ब्रह्मज्ञान प्राप्त करून देऊ शकतात. सद्गुरु कुणाला म्हणायचे याचे वर्णन श्रीसमर्थ असे करतात,

*''वासना नदी महापुरी । प्राणी बुडता ग्लांती करी ।*
*तेथे उडी घालूनी तारी । तो सद्गुरु जाणावा ।।५/२/१३ ।।''*

*''जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञान अंधार निरसी ।*
*जीवात्मया शिवात्मयासी । ऐक्यता करी ।।५/२/९ ।।''*

तर श्रीनाथमहाराज सद्गुरुवर्णन असे करतात,

*''जो स्वरुपी करी समाधान । तोचि सद्गुरु सत्य जाण ।*
*यावेगळे सद्गुरुपण । होआवया कारण असेना ।।''*





तर संत मुकुंदराजमहाराज सद्गुरुवर्णन असे करतात,

*''म्हणौनि दुर्लभू तो सद्गुरु । जो परब्रह्मेसी करी साक्षात्कारू ।*
*जयाचेनि हेळामात्रे संसारु । निरसौनि जाये ।। ''*

आपले सद्गुरु हे परब्रह्मस्वरुप आहेत, हे चित्ताला उमगत नाही. परब्रह्मस्वरुप हे चिंतनाने उमगणारे नाही. श्रीगुरुगीता सांगते,

*येन चेतयते हीदं, चित्तं चेतयते न यम् ।*
*जाग्रत्स्वप्नसुषुत्प्यादि, तस्मै श्रीगुरवे नमः ।। ३८ ।।''*

अर्थ : ज्याच्यामुळे हे जग ह्या चेतन स्वरुपाने अनुभवास येते, ज्याच्यामुळे ह्या विश्वाला, व्यक्तींना चेतना, सजीवता प्राप्त होते, चित्त ज्याला प्रकाशित करु शकत नाही, जागृती, स्वप्न, सुषुप्ती आदी अवस्था ज्याच्या द्वारा प्रकाशित होतात, अशा त्या गुरुंना नमन असो.

तर श्रीमुकुंदराजस्वामी परब्रह्मस्वरुपाबद्दल असे सांगतात,

*''जे ध्यानेविण ध्याइजे । जे चिंतणेवीण चिंतीजे ।*
*जे जाणणेवीण जाणिजे । ते परब्रह्म गा ।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''ऐसा गुरुपाठ विचारेची ध्यावा । विचारे शोधावा गुरुबोध ।।''* प्रपंचाचे मौन साधणारा श्रेष्ठ असा नामपाठ – गुरुपाठ – साधणेसाठी बरवे साधन साधण्याचा बरवा विचार जो आपणास निर्विचार करणारा आहे, आपण केला पाहिजे. आमचे चिमडचे महाराज सांगतात, *''यास्तव बरवा विचार करी । सांडुनी आळस निद्रा वैरी । साधन करुनी सुख घे करी । दास विनवी श्रीगुरुचा ।।''* हा विचारच आपणाला अनन्य करणारा आहे. श्रीसमर्थ सांगतात,

*''विचारेची अनन्य जाला । पाहणाराविण प्रत्यय आला ।*
*तेही वृत्ती निवृत्तीला । बरे पाहा ।। ११/९/२४ ।।''*

बोधी, बोधिले, बोधिता या त्रिपुटीचा लय करणारा हा बोध होईपर्यंत

हे साधन होणे आवश्यक आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''जंववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना।*
*तवचि यया साधना। भजावे लागे।।३/१४९ ।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात,

*''गुरुजगी एक बोले गुरुगीता।*
*परी तया अर्था जाणती ना।।१ ।।''*

उपाधीभेदामुळे, भिन्न प्रकृतीमुळे, भिन्न प्रारब्धाने, जरी प्रत्येकाचे गुरु वेगवेगळे वाटत असले तरी ते सर्व देहातीत असणाऱ्या वस्तुशी तादात्म्य पावून एकच स्वरुपाकार झालेले असतात. गुरु ही व्यक्ती नसून शक्ती आहे. शक्ती ही सर्वत्र सारखी पसरलेली असते. तेच खरे गुरुंचे स्वरुप आहे. श्रीगुरुगीता सांगते,

१) *''अखण्डमण्डलाकारं, व्याप्तं येन चराचरम्।*
*तत्पदं दर्शितं येन, तस्मै श्रीगुरवे नमः ।।६७ ।।*

अर्थ : ज्याने हे चराचर , खण्डित न होणारे वलयाकार मंडळ व्यापले आहे, असे ब्रह्मपद दाखविणाऱ्या श्रीगुरुला नमन असो.

२) *स्थावरं जंगमं चैव , तथा चैव चराचरम्।*
*व्याप्तं येन जगत्सर्वं , तस्मै श्रीगुरवे नमः ।। ७१ ।।*

अर्थ : स्थावर जंगम तसेच चराचर असे संपूर्ण जगत ज्यांनी व्यापले आहे, त्या श्रीगुरुंना नमस्कार असो.

या सर्वव्याप्त श्रीगुरुंचा अनुभव श्रीमुकुंदराजस्वामी असा व्यक्त करतात, *''सोहंभावे मुकुंदरायी। भरला निजगुरु सर्वाठायी।''* तर श्रीदासराममहाराज हा अनुभव असा सांगतात, *''अवघाची महाराजा। दासरामी कोण दुजा।।''* या सर्वव्याप्त गुरुंचा अनुभव घेणे महत्वाचे आहे.





श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''सद्रुपी ओळख करी तो सद्‌गुरु। येर ते गुरुगुरु करिताती।।''* सत्स्वरुपाची जो ओळख करून देतो तो सद्‌गुरु. बाकीचे नुसते नावाचेच गुरु. अगोचर असणारे स्वरुप गुरुंच्यामुळे गोचर होते. *''स्वरुप ते अगोचर गुरु करिती गोचर।।''* ही श्रीमामामहाराजांची अमृतवाणी हे स्पष्ट करणारीच आहे.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''गुप्तरुप जेणे प्रगटचि दिसे। ऐसा गुरु वसे दासरामी।।''* *''आपले गुप्त रुप जो दाखवितो तो गुरु''* असे श्रीदासराममहाराज सांगत. उपाधीमध्ये गुप्तरुपाने सर्वगत असणारे चैतन्य प्रगट होणे ही असाध्य गोष्ट श्रीगुरुंनी सांगितलेल्या अभ्यासाने साध्य होते. *''गुप्त तेचि प्रगटवावे। असाध्य तेचि साधावे।। कानडेचि अभ्यासावे। सावकास।। ६/२/२३ ।।''* ही समर्थ ओवी समर्थांच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारीच आहे. आपुला हा अनुभव श्रीकेशवस्वामी असा सांगतात, *''सत्यस्वरुप लोपले होते। ते म्या पाहिले गुरुचेनी हाते।।''* तर चिमडचे महाराज हा अनुभव असा सांगतात, *''आजवरी गुप्तचि होते बाई। आता प्रगटे दिशा दाही। याच डोळा याच देही। अनुभव घेणे।।''* हा गुप्तरुप प्रगट करणारा गुरु श्रीदासराममहाराजांचे हृदयात वास करणारा आहे. श्रीदासराममहाराजांचा हा अनुभव श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात असा व्यक्त करता येईल.

*'' मज हृदयी या श्रीगुरु। जेणे तारिलो हा संसारपुरु।*
*म्हणौनि विशेषे आदरु। विवेकावरी।।१/२२ ।।''*

असे काही गुरु, शिष्य, परब्रह्म यांचे ऐक्य, हृदयातील परब्रह्माचे अनुभवाने अनुभवाला यावे, अशी प्रार्थना माझे सद्‌गुरु श्रीदासराममहाराज यांचे चरणी करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

**अभंग १३**

*कृतीवरी क्रिया क्रियेवरी साधन।*
*त्यावरी अवलंबून मन असे ।।१ ।।*
*मनावरी चित्त चित्तावरी प्राण।*
*प्राणोपरी चैतन्य कळो आले ।।२ ।।*
*गुरुकृपा संतसंग प्राप्त होता।*
*गुह्य येई हाता आपेआप ।।३ ।।*
*दासराम बोले सद्‌गुरु समर्था।*
*साधन सर्वथा नित्य घडो ।।४ ।।*

–दासरामगाथा अ.क्र. १८१४

शुध्द आचरण असेल तरच शुध्द परमार्थ साधता येतो. परमार्थ करतो आहे पण आचरण शुध्द नाही, याचा अर्थ त्याचा परमार्थ खोटा आहे. ***''इंद्रियासी नेम नाही। मुखी राम म्हणोनी काही।।''*** या श्रीतुकाराममहाराजांचे वचनाप्रमाणे जेव्हा एखाद्याचा अनुभव येतो, तेव्हा त्याला खरे नामस्मरण साधलेले नाही, असे समजावे. ***''राम राम सब कुछ कहे। ठक ठाकुर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम है कुछ और।।''*** – संत कबीर.

ठक, ठाकुर आणि चोरांनी घेतलेले नाम हे ध्रुव, प्रल्हादांनी घेतलेल्या नामापेक्षा वेगळे होते, असाच त्याचा अर्थ होतो ना ? हे ध्रुव, प्रल्हादांना साधलेले नाम आचरणे हा खरा आचार, ज्याला संत सदाचार म्हणतात, आपणाला कधी साधणार ? आपले बाह्य वर्तन सुधारले तरच हे परिवर्तन होणे शक्य आहे.

आपल्या बाह्य आचरणाचा परमार्थाशी काय संबंध आहे, हे श्रीदासराममहाराजांनी या अभंगात सांगितले आहे. ते सांगतात, *''कृतीवरी क्रिया क्रियेवरी साधन। त्यावरी अवलंबून मन असे।।''* ज्या प्रमाणात काम (शरीराने केलेले काम, मनातील इच्छा) जास्त त्या प्रमाणात नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण अधिक, जेवढे नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण अधिक तेवढी देहाची जाणीव जास्त (अपवाद फक्त झोपेचा, झोपेत देहाची जाणीव नसते, पण नि:श्वास सर्वात जास्त खाली येत असतो), जेवढी देहाची जाणीव जास्त, तेवढे साधन साधण्याची शक्यता कमी. जेवढे साधन कमी साधले जाईल तेवढा मनोलय कमी साधला जाईल, जेवढा मनोलय कमी साधला जाईल तेवढे मनाचे मन जे चित्त त्याचा लय कमी, प्राणाचा लय कमी, अर्थात चैतन्याची जाणीव नाही. अर्थात देहाचे विस्मरण व चैतन्याचे स्मरण हे खरे नामस्मरण साधणार नाही.

जोवर आपण देह धारण केला आहे, जोवर देहाची, दृश्याची जाणीव आमचे ठिकाणी आहे, तोवर आपले ठिकाणी असणाऱ्या उणिवांची जाणीव होणार. त्या उणिवा दूर करणेसाठी, होणेसाठी कर्म करणे, कृती करणे हे अटळ आहे.

*''म्हणऊनि संगु जव प्रकृतीचा। तव त्यागू न घडे कर्माचा।*
*ऐसीयाही करू म्हणती तयांचा। आग्रहोचि उरे।।३/६३ ।।''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ओवी हे स्पष्टपणे सांगणारी आहे.

या कर्माचा आणि श्वसनक्रियेचा अन्योन्य संबध आहे. श्वसनक्रिया आहे म्हणून कर्म शक्य आहे व कर्म आहे म्हणून श्वसनाची गरज. आपल्या कर्माप्रमाणे श्वसनाची गती बदलत असते. व्यवहार करायचा म्हटले की कर्म करणे, कृतीत बदल होणे, हे सारे होणे अटळ आहे. पण परमार्थ करायचा असेल तर श्वसनगतीतील बदल चालणार नाही. श्रीदासराममहाराज सांगतात, ''श्वसनगतीत बदल झाल्यावर व्यवहार अडत नाही. परमार्थ मात्र अडतो.





श्वसनात ज्यायोगे समता राहील असा प्रत्येक व्यवहार हवा.'' याकरिता शरीराची, मनाची अनावश्यक हालचाल टाळली पाहिजे. आवश्यक हालचाल उदरभरणाकरिता करावीच लागेल. उर्वरित काळ मात्र एकांतात देवाच्या चिंतनात घालवावा. मन सैरभैर होणार नाही, याची काळजी घ्यावी, आपले आचरण कसे असावे व कसे नसावे या संदर्भात श्रीरामदासस्वामी आपणास असा बोध करतात,

१) *आपणास आहे मरण। म्हणोन राखावे बरेपण।*
*कठीण आहे लक्षण। विवेकाचे।।१२/२/२६ ।।*

२) *राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येते तदनंतरे।*
*ऐसी ही विवेकाची उत्तरे। ऐकणार नाही।।१९/३/१८ ।।*

३) *जगामध्ये जगमित्र। जिव्हेपासी आहे सूत्र।*
*कोठे तरी सत्पात्र। शोधून काढावे।।१९/२/१९ ।।*

४) *जितुके काही आपणासी ठावे। तितुके हळूहळू सिकवावे।*
*शाहाणे करूनि सोडावे। बहुत जन।।१९/१०/१४ ।।*

५) *जो अन्न देतो उदरासी। शरीर विकावे लागे त्यासी।*
*मां जेणे घातले जन्मासी। त्यासी कैसे विसरावे।।३/१०/५५ ।।*

६) *धड मळिण नेसो नये। गोड अन्न खाऊ नये।*
*दुराग्रह करू नये। प्रसंगे वर्तावे।।१४/१/९ ।।*

७) *कोणास काहीच न मागावे। भगवद्भजन वाढवावे।*
*विवेकबळे जन लावावे। भजनाकडे।।१९/६/११ ।।*

८) *अखंड येकांत सेवावा। अभ्यास करीतचि जावा।*
*काळ सार्थकचि करावा। जनासहित।।११/१०/१७ ।।*

९) *विरक्ते असावे विरक्त। विरक्ते असावे हरिभक्त।*
*विरक्ते असावे नित्यमुक्त। अलिप्तपणे।।२/९/३५ ।।*

संतांचे उपदेशाप्रमाणे आचरण जर घडले तर साधनाचा अभ्यास चांगला होतो. हेतुपूर्वक असणारी असत्क्रिया कमी होऊन निर्हेतुक सत्क्रिया आचरण्याचा काळ वाढतो. मनोलय साधला जातो. श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''मनावरी चित्त चित्तावरी प्राण। प्राणोपरी चैतन्य कळो आले।।''*

मनोलय साधला असता चित्ताचा लय, प्राणाचा लय साधला जातो व सर्वत्र चैतन्याची अनुभूती येते.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''गुरुकृपा संतसंग प्राप्त होता। गुह्य येई हाता आपेआप।।''* आपल्यावर गुरुकृपा झाली की आपल्या वागण्याबोलण्यात, आचरणात फरक पडतो व हा कठीण वाटणारा परमार्थ सोपा वाटू लागतो. परमार्थातील गौप्य सहजच प्राप्त होते. श्रीदासराममहाराज सांगतात,

*''एक होता गुरुकृपा। मार्ग होय अती सोपा ।।१ ।।*
*गुरुविणा न कळे वर्म। कैचे पकडावे धाम ।।२ ।।*
*कैसे व्हावे ब्रह्मरूप। न कळे करोनीया तप ।।३ ।।*
*गुरुराज सांगे लोका। डोई घ्याव्या गुरुपादुका ।।४ ।।''*

देहाची जाणीव नाहीशी होऊन चैतन्याची जाणीव प्रगट होणे ही खरी गुरुकृपा. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''तैसी गुरुकृपा होये। तरी करीता काय आपु नोहे।*
*म्हणोनि ते अपार माते आहे। ज्ञानदेवो म्हणे।।६/३५।।''*

*''म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे।*
*श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेवो म्हणे।।१८/१७३५।।''*

*''ऐसे ज्ञानप्रकाशे पाहेल। तै मोहांधकारु जाईल।*
*जै गुरुकृपा होईल। पार्था गा।।४/१७१।।*





श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''दासराम बोले सद्‌गुरु समर्था। साधन सर्वथा नित्य घडो।।''*

श्रीदासराममहाराजांनी हे मागणे आमचेसाठी भगवान श्रीसद्‌गुरु-तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचेकडे मागितले आहे. कारण त्यांची अवस्था तशी नव्हती. शेष साधन पूर्ण करण्यासाठी त्यांचा अवतार झाला होता व ते साधन पूर्ण झाले आहे व तू आता जगाचा उध्दार करावास असा स्पष्ट संकेत श्रीगुरुलिंगगीतेत भ. स. निंबरगीकरमहाराजांनी दिला आहे. भ. स. श्रीदासराममहाराज यांचे कृपेने आम्हास साधन प्राप्त झाले आहे. ते त्यांनीच आमचेकडून करवून घ्यावे अशी प्रार्थना मी त्यांना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

**अभंग १४**

*नामाचे साधन अखंड स्मरण।*
*नुरवी जे मौन आणि बोल ।। १ ।।*
*बोल अबोलणे गिळोनिया दोनी।*
*येईजे साधनी नरदेही ।। २ ।।*
*प्रवृत्ती सांडोनी होई अंतर्मुख।*
*पुढे उर्ध्वमूख होई प्राण्या ।। ३ ।।*
*वेद ही अक्षरे ब्रह्माचे उच्छीष्ट।*
*आनंद निघोट शुध्दरूप ।। ४ ।।*
*महावाक्य उमज गुरुकृपा वर्म।*
*दासरामा धाम कैवल्याचे ।। ५ ।।*

– दासरामगाथा अ.क्र. १२००

नामाच्या साधनाच्या अभ्यासाचे महत्व श्रीदासराममहाराजांनी या अभंगात सांगितले आहे.

श्रीदासराममहाराज सांगतात, *''नामाचे साधन अखंड स्मरण। नुरवी जे मौन आणि बोल।।''* आम्ही जे नाम समजतो, त्या नामाने अखंडस्मरणाची जोड होते का? आम्ही जे नाम घेतो त्याठिकाणी स्मरणच असत नाही तर अखंड स्मरण कुठले ? श्रीनाथमहाराज आमच्या नामस्मरणाचे वर्णन असे करतात, *''नाम वदताहे वैखरी। चित्त धावे विषयावरी। ऐसे कैसे रे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण।।''* तर कबीरसाहेब आपले नामस्मरण कसे असते, हे असे सांगतात, *''माला तो करमें फिरे। जिव्हा फिरे मुखमाही। मन तो दाही दिस फिरे। इह तो सुमरन नही।।''* ज्या





नामाला स्मरणाची जोड नाही त्या नामाला काहीही अर्थ नाही. समर्थ सांगतात, *''नवल स्मरणाची ठेव। नामी नाही अनुभव।।''* स्मरणयुक्त नाम झाले तर नामस्मरणाने समाधान प्राप्त होते. समर्थ सांगतात,

*''स्मरण देवाचे करावे। अखंड नाम जपत जावे।*
*नामस्मरणे पावावे । समाधान।। ४/३/२ ।।''*

श्रीक्षेत्र गोंदावले येथे राहून एका गृहस्थांनी ३।। कोटी नामस्मरण केले पण समाधान झाले नाही. म्हणजे संतांनी साधलेले नामस्मरण, आपण करतो त्या नामस्मरणापेक्षा काही वेगळे आहे का नाही ? कबीरसाहेब सांगतात, *''रामनाम सब कहत है ठग ठाकुर और चोर। जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे। वो नाम कुछ और।।''* संतांनी साधलेले नाम कसे वेगळे आहे हे कबीरसाहेब असे सांगतात, *''होठ कंठ हाले नही। जिव्हा ना करे काम। राम हमारा जप करे। हम बैठे आराम।।''*

अव्यक्त ब्रह्माची व्यक्त बाजू म्हणजे नाम आहे. नामरुपातीत असणारे ब्रह्म-अनंत-नावारुपाला आले. *''आला नावारुपा। तुका म्हणे झाला सोपा।।''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारे आहे. ब्रह्मच चंचळत्वाने चैतन्य होऊन नाद, बिंदू , कला, ज्योती या रुपाने व्यक्त झाले. ब्रह्माला नाम आणि रुप प्राप्त झाले. यातील जो नाद आहे, ते ब्रह्माचे नाम आहे. 'बिंदू, कला, ज्योती' जे प्रकाशरुप आहेत, ते ब्रह्माचे रुप आहे. नाद बिंदू, कला, ज्योती हे सारे नामाचेच प्रकर्ष आहेत. ही सारी चैतन्याची मूलतत्वे आहेत. व्यवहारात नामाला रूप वा रुपाला नाम असते. नाम आणि रुप हे वेगळे असतात. परमार्थात मात्र नाम आणि रुप वेगळे नाहीत. कारण ब्रह्मच नादरुपाने किंवा प्रकाशरुपाने व्यक्त होत असते. *''नाम तेचि रूप। रुप तेचि नाम। नामरुपा भिन्न नाही नाही।।''* हे श्रीनामदेवमहाराजांचे वचन याला प्रमाण आहे. नादरुपाने व्यक्त झाले तरी ते ब्रह्मच किंवा प्रकाशरुपाने व्यक्त झाले तरी ते ब्रम्हच. म्हणून नाम हे परब्रह्मच मानले जाते.

*'' नामजपयज्ञु तो परम। बाधू न शके स्नानादी कर्म।*
*नामे पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थे।।*१०/२३३ ।।'' व
*'' घेऊनि येथिचे वर्म। जै विचारिसी हे नाम।*
*तै केवळ हेचि ब्रह्म। जाणसी तू।।* १७/४०० ।।''

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने याला प्रमाण आहेत. परमार्थात अनुभव येताना आधी नाद ऐकायला येतात व नंतर प्रकाशाचा अनुभव येतो. व्यवहारात याच्या उलट अनुभवाला येते. वीज होताना प्रकाशाचा वेग जास्त असल्याने आधी प्रकाश दिसतो व नंतर नाद ऐकायला येतो. परमार्थात अनुभवाला येणारा चैतन्याचा नाद किंवा प्रकाश हा बाहेरील नादप्रकाशापेक्षा संपूर्णत: वेगळा आहे. बाह्यत: आपण नाद कानांनी ऐकतो व प्रकाश डोळ्यांनी पाहतो. पण चैतन्याचा अनाहत नाद किंवा नवलप्रकाश याचा अनुभव या बहिर्मुख इंद्रियांना कधीही प्राप्त होत नाही.

अंतरात चैतन्याचा नाद जोवर घुमतोय तोवरच हे बाहेरचे नाद आपण ऐकू शकतो आणि जेव्हा आम्ही बाहेरचेच नाद ऐकतो तेव्हा आतला नाद कधीच ऐकायला येत नाही. अंतरात आत्मप्रकाश आहे तोवर या बाहेरील प्रकाशाचे ज्ञान होते आणि जोवर या बाह्यप्रकाशाचे ज्ञान होते आहे, तोवर हा आत्मप्रकाश कधीही दिसत नाही. हा अंतर्यामी घुमणारा अनुहात नाद (नाम) जर आमच्या अनुभवाला आला किंवा बिंदू, कला, ज्योती या रुपाने अंतर्यामी नवल प्रकाश अनुभवास आला तर सर्वत्र तोच अनुहात नाद, नवल आत्मप्रकाश अनुभवाला येतो. या भिन्न विश्वामध्ये असणाऱ्या असामान्य साधर्म्याचाच - चैतन्याचाच अनुभव त्याला येतो. आकार न दिसताना त्यामागे दडलेल्या निराकाराचे ज्ञान - अद्वैताचेच ज्ञान - त्याला होते.

*'' नाईकणे ते कानची वाळी। न पाहणे ते दिठीचि गाळी।*
*अवाच्य ते टाळी। जिभची गा।।* १४/२०९ ।।'' व
*''म्हणोनि विश्व भिन्न। परी न भेदे तयाचे ज्ञान।*
*जैसे अवयव तरी आन आन। परी एकेची देहीचे।।*९/२५० ।।''





या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वचनांचा अनुभव त्याला येतो. सर्वत्र तोच अनुभवाला येत असल्याने साहजिकच त्याचे अखंडस्मरण राहते.

हे अनुभवाला येणारे नामरूप म्हणजे आपले निजत्व आहे. तोच आपला भगवान आहे. श्रीमामामहाराज सांगतात, *'' निजत्व ते नामरूप। जे का चालिले आपाप।।'' ''नामरूप भगवान। माझा नामरूप भगवान।।''* या निजत्वाची प्रचिती जो आणून देतो, त्याकरता करावे लागणारे साधन जो सांगतो, तो खरा सद्गुरु. जे नुसते उपदेश म्हणून तोंडी मंत्र सांगतात, तो खरा उपदेश नव्हे. *''मंत्रतंत्र जे सांगती। ते तोंडीचे तोंडी उपदेशिती। नाही अंतरी निजप्रतिती। उपदेश भ्रांती मुख्यत्वे।।'' ''मंत्रतंत्र उपदेशिते। घरोघरी गुरु आहेत आइते। जो शिष्यासी मेळवी सद्वस्तुते। सद्गुरु त्याते श्रीकृष्ण मानी।।''* ही श्रीनाथमहाराजांची वचने व *''शिष्यास न लाविती साधन। न करविती इंद्रियदमन। ऐसे गुरु अडक्याचे तीन। मिळाले तरी टाकावे।।* ५/२/२१ ।।'' हे समर्थवचन, ही संतवचने सारे काही स्पष्ट करणारी आहेत. साधनाच्या अभ्यासाने नामाचा अनुभव कसा घ्यायचा हे सद्गुरुंकडून समजून घ्यावे लागते. श्रीनामदेवमहाराज सांगतात, *''नामा म्हणे तरी सद्गुरुपासुनी। नाम घ्या जाणुनी नाना काही।।''*नामाच्या अनुभवाने अखंड स्मरण प्राप्त करून देणाऱ्या साधनाला 'नामाचे साधन' म्हणतात.

साधनाच्या अभ्यासाने त्रिगुणांचा निरास होऊन ज्यातून हे त्रिगुण निर्माण झाले अशा चौथ्या शुध्द सत्वगुणाच्या सहाय्याने अहर्निशी परमार्थ होतो. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांची एक अवस्था होते व महाकारणदेहात प्रवेश होऊन अखंड स्मरण प्राप्त होते. हे महाकारणदेहातील असणारे अखंड स्मरण हेच संतांचे अद्वय भजन-हरिकथा-आहे. श्रीदासराममहाराज हे असे पटवून देतात, *''महाकारणदेही अखंड स्मरण। अद्वयभजन हरिकथा।।''* तर श्रीनाथमहाराज या अखंडस्मरणाचे महत्व

असे सांगतात, *''अखंडस्मरणे अद्वयभजने वाजवी कर टाळी। एका जनार्दनी मुक्ती होये तत्काळी ।।''* तर केशवस्वामी अखंडस्मरणाने द्वैतभय नाहीसे होते हे असे सांगतात, *''अखंड देऊनीया स्मरणासी। द्वैत भयाते नासी ।।''*

या अवस्थेमध्ये देहाची, दृश्याची कोणतीही जाणीव त्याला राहत नाही. अर्थात तेथे बोलणे उरत नाही. मग नेणीवेने प्राप्त होणारे मौन तेथे असते का ? तर नाही. तेथे मौन ही असत नाही. कारण तेथे नेणीवेची जाणीव असते.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''बोल अबोलणे गिळोनिया दोनी। येईजे साधनी नरदेही ।।''* नामाच्या ठिकाणी रुपाची प्रचिती आली की सर्ववृत्तीचे मौन साधले जाते. उन्मनी अवस्था, निवृत्ती अवस्था त्याला प्राप्त होते. *''नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले ।।''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन व *''गगनी भासले अगणीत तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित ।।''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन, ही संतवचने याला प्रमाण आहेत. या उन्मनी अवस्थेत त्याला खरे मौन साधते. *''साच लटिके दोन्ही। न बोले जाहला मौनी। जे भोगिता उन्मनी। आरायेना ।। १२/२०९ ।।''* या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचनात साधकाच्या या अवस्थेचे वर्णन करता येईल.

ही उन्मनी अवस्था प्राप्त होणेसाठी काय करावे लागते हे श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''प्रवृत्ती सांडोनी होई अंतर्मुख। पुढे ऊर्ध्वमुख होई प्राण्या ।।''* बहिर्मुख असणारे आपले जीवन उर्ध्वमुख होणेसाठी प्रथम ते अंतर्मुख व्हावे लागेल. अंतर्मुख झालेले जीवन स्थीर होईल व नंतर ते उर्ध्वमुख होईल असे श्रीदासराममहाराज सांगत. आमचे जीवन दृश्याच्या जाणीवेने अधोमुख आहे. जोवर जीवन अधोमुख आहे तोवर आपण व परमेश्वर यातील भेद वाढतो. मनोलयाने देहाची, दृश्याची जाणीव नाहीशी झाली की जीवन खाली काही प्रमाणात येते. जीवन अंतर्मुख होते. परमेश्वर व आपणातील भेद कमी होतो. समर्थ सांगतात,





*''अधोमुखे भेद वाढतो। उर्ध्वमुखे भेद तुटतो।*
*निःसंगपणे निर्गुणी तो। महायोगी ।।* २०/३/२२ ।।''

म्हणजे जीवन अंतर्मुख होण्यासाठी आमची जी आता प्रपंचाकडे, संसाराकडे प्रवृत्ती आहे, ओढ आहे, ती कमी व्हावयास हवी. प्रवृत्ती म्हणजे नेमके काय आहे हे श्रीदासराममहाराज असे सांगतात,

*'' प्रवृत्ती जाणीव शून्य ते नेणीव। तयापैल भाव निवृत्तीचा ।।''*
*'' आकार प्रवृत्ती निराकार शून्य। तयावरी धन्य निवृत्ती ते ।।''*
*'' प्रवृत्ती बडबड शून्य वाचा मौन। करणी ते साधन निवृत्तीचे ।।''*
*'' प्रवृत्तीसी अंध डोळा उघडीला। आनंद जोडीला निवृत्तीचा ।।''*

ही सारी प्रवृत्ती (आमचे ठिकाणी असणारी दृश्याची जाणीव, आकाराचे ज्ञान, जाणीवेने असणारी बोलण्याची प्रवृत्ती) नाहीशी झाली असता जीवन अंतर्मुख होते व त्याला नेणिवेची जाणीव – शून्याचे ज्ञान होते. ही नेणीवेची जाणीव नाहीशी होणे, जाणीवरहित जाणता होये म्हणजे निवृत्ती अवस्था प्राप्त होणे होय. हा प्रवृत्तीपासून निवृत्तीपर्यंतचा प्रवास तसा कठीणच आहे. भगवान शंकर अजून तो मार्ग आक्रमित आहेत. श्री ज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*'' तेथ प्रवृत्तीतरुच्या बुडी। दिसती निवृत्तीफळाचिया कोडी।*
*जिये मार्गीचा कापडी। महेशू आझुनी ।।* ६/१५३ ।।''

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''वेद ही अक्षरे ब्रह्माचे उच्छीष्ट। आनंद निघोट शुध्दरुप ।।''*

ऋषीमुनी हे वेदांचे द्रष्टे आहेत, कर्ते नव्हेत. ध्यानाचे वेळी ऋषीमुनींच्या कानावर जे आले ती ही वेदाक्षरे आहेत. म्हणून त्यांना वेदमंत्रच म्हणतात. वेदाक्षरे ही हरीनामच आहेत. *''वेदाक्षराणी हरिनामानी ।।''* हे वचन हे स्पष्ट करणारेच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज या वेदमंत्राबद्दल सांगतात,

*''हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरू॥*
*तो स्वये सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला॥१/७२॥''*

ब्रह्माच्या नि:श्वासातून वेद प्रगट झाले आहेत. अर्थात ते ब्रह्माचे उच्छिष्ट आहेत. ब्रह्माचा शेष प्रसाद आहे. हा प्रसाद केव्हा प्राप्त होतो ? नि:श्वासाला जेव्हा काही प्रमाण येते, नि:श्वास जेव्हा एक अंगूळ खाली वाहतो तेव्हा नादश्रवण घडते. *'' नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप॥''* व *''एकचि अंगूळ वहाता नि:श्वास। होय नादघोष सुस्वरेसी॥''* ही श्रीदासराममहाराजांची वचने हे स्पष्ट करणारीच आहेत. नादश्रवणाने मन ध्वनीमध्ये रंगून जाते. *'नादश्रवणी तदाकारता'* घडते व मन एकाग्र होऊन समाधान प्राप्त होते. मनाला आनंद प्राप्त होतो. या अनुहात श्रवणाने आनंद प्राप्त होतो. हे गुरुलिंगगीता असे सांगते, *''विजय दुंदुभि अनुहात। अक्षर ब्रह्मनु केळुत ॥ १॥ इदे महाराजावरु कृपा। यन्न नोडिद निर्विकल्पा ॥२॥ नित्यानंदा आनंदकंदा। परमानंदा निजबोधा॥ ३॥ प्रल्हादने बोधसुधे। नोडिद महिमे अगाधे॥ ४॥''*

**अर्थ :** अक्षरब्रह्माच्या (ॐकाराच्या) अनुहाताचे श्रवण म्हणजे विजयदुंदुभि होय.।।१।। अशा अनुहाताचे श्रवण निर्विकल्पाचा अनुभव असून ही श्रीमहाराजांची कृपा होय.।।२।। या आनंदकंद परमानंद अशा अनाहत श्रवणाचा अनुभव निजबोध स्वरुपाचा असून तो नित्यानंद देणारा आहे.।।३।। अशा प्रकारे प्रल्हादाच्या बोधामृताचा हा अगाध महिमा आज पाहिला – अनुभवला.।।४।।

श्रीदासरामहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''महावाक्य उमज गुरुकृपा वर्म। दासरामा धाम कैवल्याचे॥ ४॥*

महावाक्याचा उमज होणे हे गुरुकृपेचे वर्म आहे. जे कैवल्याचे धाम प्राप्त करून देणारे आहे.

卐 卐 卐





।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग १५

*प्राणाचा मनाचा एक लय होता।*
*तत्वे तत्व सारिता पवनसिध्दी॥ १॥*
*पवनसिध्दी झालीया प्रगटे आत्माराम।*
*येतसे निष्कर्म हातालागी ॥ २॥*
*निष्कर्माचे कर्म अबोधाचा बोल।*
*उकलेल खोळ प्रपंचाची ॥ ३॥*
*उपाधी निरसता होतो त्यात खेळता।*
*चैतन्य हे चित्ता मिळूनी राही ॥ ४॥*
*दासराम बोले अध्यात्माचे गुह्य।*
*गुरुकृपा साह्य सकळासी ॥ ५॥*

– दासरामगाथा अ.क्र. २१३

एका परमेश्वराच्या अधिष्ठानावर ३६ तत्वे एकत्र आली. या ३६ तत्वांच्या समूहाला श्रीज्ञानेश्वरमहाराज 'क्षेत्र' असे संबोधतात. दृष्यमान व भासमान होणारे जग हे सारे या ३६ तत्वांचे बनलेले आहे. हा जो ३६ तत्वांचा पसारा आहे त्याचे मागे एक हरितत्व लपले आहे. म्हणून या जगाचा भास होतो आहे. ते हरितत्व प्रगटले की हे दृश्य विश्व लयाला जाते. म्हणजे या दृश्याचे अस्तित्वच मुळी या हरितत्वावर अवलंबून आहे.

*''तैसी छत्तीसही इये तत्त्वे। मिळती जेणे एकत्वे।*
*तेणे समूहपरत्वे। क्षेत्र म्हणिपे॥१३/१५५॥''* व
*''स्वस्तिश्री वटेशू। जो लपोनि जगदाभासू।*
*दावी मग ग्रासू। प्रगटला करी॥''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने हे स्पष्ट करणारीच आहेत. या ३६ तत्वांना (क्षेत्र) व मागे लपलेल्या हरितत्वाला (क्षेत्रज्ञ) जो जाणतो, तो खरा ज्ञानी. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाते । जाणणे जे निरुते ।*
*ज्ञान ऐसे तयाते । मानू आम्ही ।। १३/९ ।।''*

आम्ही क्षेत्र जाणण्याचा प्रयत्न करतो. पण क्षेत्राचे क्षेत्रत्व ज्या क्षेत्रज्ञामुळे आहे तिकडे आमचे लक्षच नाही. क्षेत्रातून क्षेत्रज्ञ जर वजा केला तर क्षेत्राला क्षेत्र कोण म्हणेल का? क्षेत्रज्ञ वजा झाला की तत्वांचे विघटन लगेच सुरु होते. मग क्षेत्र राहील का ? आम्ही जे क्षेत्र जाणण्याचा प्रयत्न करीत आहोत, ते तरी संपूर्ण खऱ्या अर्थाने आम्हाला कळले आहे का ? आम्हाला क्षेत्राचे जे ज्ञान होते, ते सारखे बदलणारे आहे. मग जे बदलते त्याला ज्ञान म्हणता येईल का ? बदलणाऱ्या क्षेत्राचे बदलणारे ज्ञान प्राप्त होऊन आम्ही अज्ञच राहणार. क्षेत्र जाणून आम्ही क्षेत्रज्ञ होणार नाही. पण क्षेत्रज्ञ जाणला तर क्षेत्राचे निश्चित ज्ञान होईल. क्षेत्रज्ञामुळे क्षेत्राची जाणीव होते. पण क्षेत्राच्या जाणिवेने क्षेत्रज्ञ जाणला जात नाही.

क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ एकत्र आल्याने या जगाची निर्मिती झाली. मग क्षेत्रज्ञाचे ठिकाणी जाणीव निर्माण झाल्याने संसरण हा संसार त्याचे मागे लागला. ज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगे । होईजे येणे जगे ।*
*आत्मा गुणसंगे । संसारिया ।।१४/३३ ।।''*

वस्तुत: चैतन्याला चैतन्याचे ज्ञान होत असते. पण मनाच्या योगाने जागृती व स्वप्न या दोन्ही अवस्थेत चैतन्याचे ज्ञान न होताना, विपरित ज्ञान प्राप्त होते. जागृतीत कल्पनेने अष्टधाप्रकृतीचे – दृश्याचे ज्ञान, तर स्वप्नात कल्पनेने त्याच दृश्याचे ज्ञान होत असते. या दोन्ही अवस्थेत मनाचे ठिकाणी असणारी जाणीव जेव्हा नाहीशी होते, जेव्हा मनाला अज्ञानाचा अनुभव येतो,





तेव्हा निद्रा अवस्था प्राप्त होते. जाणीवेत जर मनाचा लय साधला तर ३६ तत्वांचे दृश्य नाहीसे होऊन – तत्वांचा तत्वात निरास होऊन – वायुरूप चैतन्याची जाणीव होते. ज्या वायुरूप चैतन्यामुळे हे सारे सिध्द झाले आहे, त्या ठिकाणी आपण सिध्द होतो. पवनसिध्दी प्राप्त होते.

पवनसिध्दी ही कशी प्राप्त करून घ्यायची हे दासराममहाराज अभंगाचे पहिल्या कडव्यात सांगत आहेत, ***''प्राणाचा मनाचा एक लय होता । तत्वे तत्व सारिता । पवनसिध्दी ।।''***

झोप लागताना मन हे प्राणाचे ठिकाणी – श्वसनाचे ठिकाणी – लय पावते. मगच झोप लागते. अर्थात श्वसन हे मन लय पावण्याचे साधन आहे. या साधनाचा अभ्यास करून जाणीवेत मनाचा लय साधणे म्हणजे साधन साधणे होय. हा मनाचा लय साधताना श्वसनातील पृथ्वी, आप, तेज, वायू या तत्वांचा म्हणजेच स्थूल, सूक्ष्म, कारणदेहाचा निरास साधला जातो. पृथ्वीचा लय आपतत्वात, आपतत्वाचा लय तेजतत्वात, तेजतत्वाचा लय वायूतत्वात, वायूतत्वाचा लय अंतरात्म्यात होतो. हे स्थूल व सूक्ष्म देहातील असणारे विपरितज्ञान – असणारी दृश्यांची जाणीव – नाहीशी झाल्यावर कारणदेहात असणारी नेणीव – अज्ञान – नाहीसे होऊन त्याचे ज्ञान होणे म्हणजेच आत्मज्ञान आहे. झोपेत जागे राहणे हे आत्मज्ञान आहे. या कारणदेहातील अज्ञानाचे ज्ञान होणे – नेणीवेची जाणीव होणे – आपण आपणाला जाणणे – म्हणजे महाकारणदेह होय. दृश्याची जाणीव न होताना चैतन्याची जाणीव होणे म्हणजे तत्वात तत्वाचा निरास होणे होय. यालाच पवनसिध्दी होणे असे म्हणतात. श्रीसमर्थ सांगतात, ***''दृश्य पदार्थची वोसरे । तत्वे तत्व तेव्हा सरे । मीतूपण कैचे उरे । तत्वता वस्तू ।।१२/३/२५ ।।''***

ही पवनसिध्दी झाल्यावर पुढे काय होते हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, ***''पवनसिध्दी झालीया प्रगटे आत्माराम । येतसे निष्कर्म हातालागी ।।''*** पवनसिध्दी झाल्यावर कल्पनेने होणारी दृश्याची जाणीव न

होताना सर्वत्र आत्मारामाचा - वस्तूचा साक्षात्कार होतो. *'' पहाणे आपणासी आपण ''* हे समर्थ ज्ञान घडते. दृश्य जाऊन द्रष्टा हा द्रष्ट्याला पाहतो. अर्थात द्रष्टेपण नाहीसे होते. (दृश्य असेल तर द्रष्टा) . सर्वत्र तोच अनुभवाला आल्याने मी आणि तू, माझे आणि तुझे, हे संपते. त्याचा साक्षात्काराने अहंकार नाहीसा होतो. कर्तेपणा संपतो व निष्कर्म हाताला येते.

*'' दृश्य जाऊनिया द्रष्टे । द्रष्ट्यासीचि जै भेटे ।*
*तै एकलेपणेन घटे । द्रष्टेपणही ।।१८/११५७ ।। ''*

*'' तैसे माझिये साक्षात्कारी । सरे अहंकाराची वारी ।*
*अहंकारलोपी अवधारी । द्वैत जाय ।।११/६९४ ।। ''*

*'' अगा करितेनवीण कर्म । तेचि ते निष्कर्म ।*
*हे जाणती सवर्म । गुरुगम्य जे।। ५/६३ ।।''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने साधकाच्या या अवस्थेचे वर्णन करणारीच आहेत.

श्रीदासराममहाराज पुढे सांगतात, *''निष्कर्माचे कर्म। अबोलाचा बोल । उकलेल खोळ । प्रपंचाची ।।''*

नेमका कर्ता कोण आहे याची जाणीव झाल्यावर होणारे कर्म हे निष्कर्माचे कर्म असते. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे अनुभवाला आल्यावर होणारे कर्म - निष्कर्म - आपणाला यश, कीर्ती, प्रताप प्राप्त करून देणारे आहे. *''मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी। यश कीर्ती प्रताप।। ६/७/३६ ।।''* हे समर्थवचन हे स्पष्ट करणारेच आहे.

मनोलय साधल्यावर चैतन्याच्या जाणीवेत होणारे निर्हेतूक कर्म - निष्कर्म म्हणजेच श्रीमामामहाराजांचे रामनाम आहे, अबोलण्याचे बोलणे आहे. *''सहजकृती रामनाम। नाही अंतरी दुजे काम।'' व ''रामनामाचे बोलणे। दास म्हणे अबोलणे ।।''* ही श्रीमामामहाराजांची अमृतवाणी सारा





खुलासा करणारी आहे. हे महाकारणदेहात अहर्निशी साधणारे रामनाम प्रपंचाचे मौन साधणारेच आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान। नामपाठ मौन प्रपंचाचे।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''उपाधी निरसिता। होतो त्यात खेळता। चैतन्य हे चित्ता मिळूनी राही।।''* आता महाकारणदेहात चैतन्य साक्षात्काराला आल्यानंतर कसली आलीय उपाधी असे आपणाला वाटेल. वेगळेपणाने चैतन्याचे अनुभव येणे हीच ती उपाधी, महाकारणदेहातील आकाश अनुभवाला येते. वेगळेपणाने आकाश अनुभवाला येते, म्हणून ते आकाश पंचमहाभूतातले गणले जाते. हा वेगळेपणा संपला, त्रिपुटी उरली नाही, मग ह्या महाकारणदेहाचा विदेह होतो. आकाश उपाधीवेगळे होते. या उपाधीरहित आकाशाला चिदाकाश म्हणतात. हे उपाधीरहित आकाश म्हणजेच ब्रह्म होय. समर्थ रामदासस्वामी सांगतात,

१) *''उपाधीमध्ये सापडले । सूक्ष्म पाहाता भासले ।*
*इतुक्यासाठी आकाश जाले । भूतरूप ।।९/६/३६ ।।''*

२) *''वेगळेपणे पहावे । तयास आकाश म्हणावे ।*
*अभिन्न होता स्वभावे । आकाश ब्रह्म ।।९/९/१७ ।।''*

३) *उपाधीवेगळे आकाश । तया नाव चिदाकाश ।*
*तैसा निर्मळात्मा परेश । तो उपाधीवेगळा ।।८/७/५२ ।।''*

४) *उपाधीवीण जे आकाश । ते ब्रह्म निराभास ।*
*ते निराभासी मूळमायेस । जन्म जाला ।।१०/३/ १ ।।''*

हे आकाशाचे - अंतरात्म्याचे तुर्यावस्थेत वेगळेपणाने येणारे अनुभव, ही उपाधी कधी नाहीशी होते ? जेव्हा तुर्यावस्थेत असणाऱ्या सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते, तेव्हा हे तुर्येतील पदार्थज्ञान, त्रिपुटी असणारे ज्ञान, नाहीसे होते. ज्ञानाचे विज्ञान होते व आत्म्याचा चंचळपणा नाहीसा

होऊन तो निरुपाधिक आत्मा – ब्रह्मच – होऊन जातो.

समर्थ रामदासस्वामी सांगतात,

१) *''आकाश म्हणिजे अंतरात्मा । प्रत्यये पहावा महिमा ।*
*त्या आकाशापासून जन्मा । वायो आला ।।१२/६/१२ ।।''*

२) *''सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसे म्हणती तया ।*
*परी ते जाणिजे वाया । पदार्थज्ञान ।।५/६/६ ।।''*

३) *''म्हणोनी सर्वसाक्षी मन । तेची जालिया उन्मन ।*
*मग तुर्यारूप ज्ञान । ते मावळोन गेले ।।७/५/ ११ ।।''*

४) *''जेथे ज्ञानचि होते विज्ञान । जेथे मनचि होते उन्मन ।*
*तेथे कैचे चंचळपण । आत्मयासी ।।१०/१०/५२ ।।''*

जेव्हा आत्म्याची उपाधी जाऊन तो निरुपाधिक आत्मा होतो – ब्रह्मच होतो – तेव्हा चित्तात चैतन्य भरून राहते व चित्ताला अखंड प्रसन्नता हा प्रसाद प्राप्त होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

१) *''मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियाची भरेल जेव्हा ।*
*माझा प्रसादु जाण तेव्हा । संपूर्ण जाहला ।।१८/१२६९ ।।''*

२) *''देखे अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता ।*
*तेथे रिगणे नाही समस्ता । संसरदुःखा ।।२/३३८ ।।''*

श्रीदासराममहाराज अभंगात पुढे सांगतात, *''दासराम बोले अध्यात्माचे गुह्य । गुरुकृपा साह्य सकळासी ।।''* श्रीदासराममहाराजांनी ह्या अभंगात अध्यात्मातील गौप्य (गुह्य) प्रकट केले आहे. पण त्याचे श्रेय त्यांनी स्वत:कडे घेतले नाही. गुरुकृपेने हे गुह्य माझ्याकडून प्रकट झाले आहे असे ते सांगतात. केवढी ही निरहंकारता ! *''तया पाडे देही । जया मी आहे हे सेचि नाही । निरहंकारता पाही । तया नाव ।। १३/५३४ ।।''* या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे ओवीत श्रीदासराममहाराजांचे वर्णन करता येईल.

卐 卐 卐





।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग १६

*कल्पना सरता होय निर्विकल्प ।*
*कल्पक अपाप भेटो येई ।।१ ।।*
*कल्पक पाहता कल्पना ओसरे ।*
*घुमो लागे वारे चैतन्याचे ।।२ ।।*
*भरता हे वारे होय तदाकार ।*
*मग देहाकार नाठवेची ।।३ ।।*
*देहाकार जाता नुरे अहंकार ।*
*तोचि साक्षात्कार संतजनी ।।४ ।।*
*ऐसा जरी झाला एक साक्षात्कार ।*
*आनंदे निर्भर दासराम ।।५ ।।*

– दासरामगाथा अ.क्र १११४

निर्विकल्प अवस्थेचे वर्णन या अभंगात श्रीदासराममहाराजांनी केले आहे. ते म्हणतात, *''कल्पना सरता होय निर्विकल्प । कल्पक अपाप भेटो येई ।।''* मनातील सर्व कल्पना नाहीशी झाल्यावर निर्विकल्प अवस्था प्राप्त होते व कल्पक जो आहे त्याची सहज भेट होते.

एक सुषुप्ती अवस्था सोडली तर आपल्या मनात कोणतीही कल्पना नाही, अशा अवस्थेची आपण कल्पनाही करू शकणार नाही. कारण डोकीत कल्पना नाही असे जाणीवेत कधी होतच नाही. या कल्पना करण्याच्या सवयीमुळे आपण सत्याचीही कल्पना करतो. कल्पना नव्हे ते सत्य हे तरी सत्य आहे की नाही ? आम्ही सत्याची कल्पना करतो, अशाने सत्य – परब्रह्म – कधी हाताला येईल का ? देव हा सत्य असताना काल्पनिक देवाची कल्पनेने

पूजा केली असता हाताला कल्पनाच येणार. सत्य हाताला येणार नाही. समर्थ म्हणतात,

*''कल्पनेच्या देवा कल्पनेची पूजा । तेथे कोणी दुजा आढळेना ।।१ ।।*
*आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे ।।२ ।।*
*आहे तैसा आहे कल्पना न साहे । दास म्हणे पाहे अनुभवे ।।३ ।।''*

जोवर आम्ही या कल्पनांना कुरवाळत बसलो आहोत तोवर देवदर्शन होणार नाही, हे निश्चित. श्रीनिवृत्तीनाथमहाराज म्हणतात, *''कल्पना काजळी कल्पिले कवळी । कैसेनि जवळी देव होय ।।''* देवाची कल्पना करून कल्पना नाहीशा होणार कशा ? निर्विकल्प कसे होणार ? देवाची कल्पना करून कल्पना वाढतीलच, पण कमी होणार नाहीत. समर्थ म्हणतात,

*''देवास देहधारी कल्पिती । तेथे नाना विकल्प उठती ।*
*भोगणे त्यागणे विपत्ती । देहयोगे ।।१४/८/३२ ।।''*

अंत:करणातील सर्व कल्पना नाहीशा होणे हीच निर्विकल्पाची कल्पना, तर नि:संग होणे म्हणजेच नि:संगाची भेट. समर्थ म्हणतात,

*''निर्विकल्पासी कल्पिता । कल्पनेचि नुरे वार्ता ।*
*नि:संगास भेटो जाता । नि:संगचि होईजे ।। ७/३/५१ ।।''*

जो स्वत: कल्पनातीत होऊन, निर्विकल्प ब्रह्माचे ठिकाणी लीन होतो, तोच संत. बाकीचे सारे ब्रह्माची कल्पना करणारे, मायेच्या कक्षेतील भ्रमरूप असंत समजावेत. समर्थ म्हणतात,

*''निर्विकल्पी कल्पनातीत । तोचि वोळखावा संत ।*
*येर अवघेचि असंत। भ्रमरूप ।।१३/२/२६ ।।''*

कल्पनेचा निरास होणे म्हणजेच आत्मवस्तूची ओळख होणे, परमेश्वराचा योग घडणे होय. श्रीतुकाराममहाराज म्हणतात, *'' वस्तुते ओळखा सांडा रे कल्पना । नका आडराना जाऊ झणी ।''* संकल्पाचा





त्याग होणे, संकल्पाचा नाश होणे हा खरा संन्यास. म्हणून संन्यास घेणे व परमेश्वराचा योग घडणे या दोन्ही गोष्टी सारख्याच.

*''ऐसा घेई का संन्यास । करी संकल्पाचा नाश।।''*

– श्रीतुकाराममहाराज

*''म्हणोनि कल्पना जै सांडे । तैचि गा संन्यासु घडे ।*
*याकारणे दोन्ही सांगडे । संन्यासयोगु ।। ५/२५ ।।''*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

या कल्पना-उपाधीनेच जीवपण प्राप्त झाले आहे. कल्पना नाहीशी झाली असता जीवपणाचा वियोग होऊन नवल स्वरुपाचा योग होणार आहे.

आम्ही कल्पना करतो म्हणून दृश्याची जाणीव होते. या कल्पना करणाऱ्या मनाच्या अस्तित्वावर जागृती व स्वप्न या दोन्ही अवस्था प्राप्त होत असतात. आतील कल्पना नाहीशी झाली की दृश्याची जाणीव होत नाही. आपण झोपतो तेव्हा मनाचे कार्य संपूर्णपणे थांबलेले असते. कल्पना करणे पूर्णपणे थांबलेले असते. तेव्हा आपण कोणतेही दृश्य पाहत असत नाही, पण कल्पक भेटत नाही. कारण ती अज्ञानात्मक अवस्था असते. तीच अवस्था ज्ञानात्मक झाली, निद्रा ज्ञानमयी झाली की चैतन्याची जाणीव होऊन कल्पक भेटणार आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''तैसे भूतजात माझ्या ठायी । कल्पिजे तरी आभासे काही ।*
*निर्विकल्पी तरी नाही । तेथ मीचि मी आघवे ।।९/९० ।।''*

तर समर्थ सांगतात,

*''जे जे काही साकार दिसे । ते ते कल्पांती नासे ।*
*स्वरुप ते असतचि असे । सर्वकाळ ।।९/२/१ ।।''*

सदा स्वरुपानुसंधानाने अंत:करणातील सर्व कल्पना नाहिशा होऊन, राहणाऱ्या शुध्द कल्पनेने साधूंना द्वैताचे निरसन होऊन अद्वैताचे – चैतन्याचे– ज्ञान होते. समर्थ म्हणतात,

*''सदा स्वरुपानुसंधान। करी द्वैताचे निरसन।*
*अद्वय निश्चयाचे ज्ञान। तेचि शुध्द कल्पना ।।७/५/३४ ।।''*

*''सदा स्वरुपानुसंधान हे मुख्य साधुचे लक्षण।*
*जनी असोन आपण। जनावेगळा ।।८/९/९ ।।''*

सदा स्वरुपानुसंधानाने, कल्पना नाहीशी होऊन सतत उपाधीमध्ये सारख्या गुप्तरुपाने असणाऱ्या चैतन्याची जाणीव होणे – समत्वाचे सुख प्राप्त होणे, हीच साधूंना प्राप्त होणारी हरी समाधी अवस्था आहे.

***''सांडी कल्पना उपाधी। हीच साधूला समाधी।''*** हे संत–वचन, ***''समाधी हरीची समसुखेवीण। न साहेल जाण द्वैतबुद्धी।।''*** हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन व ***''समत्वाचे सुखी हरीची समाधी। इतर उपाधी नुरे जेथे।।''***हे श्रीमामामहाराजांचे वचन, ***'' टाकीता उपाधी। लागे सहज समाधी।।''*** हे श्रीदासराममहारांचे वचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

उपाधीची जाणीव न होताना, सतत चैतन्याचेच ज्ञान होत असल्याने, बुध्दी (आत्म) चैतन्याचे ठिकाणी दृढ होते. म्हणून या समाधीचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात, ***''समाधीसुखी केवळ। जै बुध्दी होईल निश्चळ। तै पावसी तू सकळ। योगस्थिती।। २/२८४ ।।''*** तर श्रीसमर्थ या समाधीबद्दल असे सांगतात, ***''रामदासी दृढबुध्दी। होता सहजसमाधी।।''***

हटयोगात जी समाधी लावली जाते त्या समाधीने उपाधी वाढते, पण देहाचे विस्मरण – दृश्याचे विस्मरण व केवळ चैतन्याचे स्मरण या





नामस्मरणाने, या निर्विकल्प समाधीने – हरीसमाधीने सायुज्यता प्राप्त होते. तो ब्रह्मरूप होतो. अर्थात त्याला कोणतीही उपाधी रहात नाही. तो उपाधीवेगळा सोवळा होतो. त्याला वेगळे सोवळे नेसायची गरज राहत नाही. ***''लावुनी आसन बैससी समाधी। तो तो उपाधी सहज लागे। नाममुखी गाता जोडे सायुज्यता। उपाधी तत्वता दुरी पळे''*** – श्रीनाथमहाराज व ***''उपाधीवेगळा। तुका राहीला सोवळा।।''*** श्रीतुकाराममहाराज, ही संतवचने एकत्रितरित्या हेच स्पष्ट करीत आहेत.

श्रीदासराममहाराज निर्विकल्प अवस्थेत पुढे काय अनुभव येतात, हे असे सांगतात, ***''कल्पक पाहता कल्पना ओसरे। घुमो लागे वारे चैतन्याचे।।''***

कल्पना नाहीशा झाल्या की कल्पक भेटतो. सत्य हाताला येते व सत्य गवसल्यावर मग कल्पना करण्याची गरज ती काय ? सतत चैतन्याच्या वाऱ्याचीच जाणीव चैतन्याला राहते. चैतन्याचा नाद ऐकायचा नाद लागतो. ***'नादश्रवणी तदाकारता'*** घडते व नयनात इतर काही न भरता चैतन्याचे वारेच नयनात भरते.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात , ***''भरता हे वारे होय तदाकार। मग देहाकार नाठवेची।।''*** सतत चैतन्याच्या नादाची जाणीव झाल्याने, नयनात फक्त चैतन्यच भरत असल्याने तद्रुपता घडते. मग देहाची, जाणीव, दृश्याची जाणीव, कुठली राहणार ? चैतन्याला फक्त चैतन्याचीच जाणीव. कल्पनेच्या बाहेरचा विषय आहे, एवढे खरे.

श्रीदासराममहाराज पुढे सांगतात, ***''देहाकार जाता नुरे अहंकार। तोचि साक्षात्कार संतजनी ।।''***जेथे देहाची आठवणच नाही, तेथे अहंकार उरेल का? ***''तया पाडे देही। जया मी आहे हे सेचि नाही। निरहंकारता पाही। तया नाव।। १३/५३४ ।।''*** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात

श्रीदासराममहाराजांचे वर्णन करता येईल. श्रीदासराममहाराज साक्षात जे चैतन्य आहे, तद्रुप झाले. देहाकार गेला व चैतन्याकार झाले व यालाच संत साक्षात्कार म्हणतात. श्रीकेशवस्वामींच्या शब्दात श्रीदासराममहाराजांचे वर्णन असे करता येईल, *''स्वयंब्रह्म जो आपणचि झाला। देव मस्तकी वंदिती त्याला। ज्याच्या दृष्टीस सृष्टी नाही। देह असोनी पूर्ण विदेही।। जेथे जाणीव नेणीव नाही। तेथे काहीच उरले नाही। ब्रह्म होऊनी ब्रह्मीच खेळे। केशव त्याच्या चरणी लोळे।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''ऐसा जरी झाला एक साक्षात्कार। आनंदे निर्भर दासराम।।''* जो एक आहे त्याच्याशी ऐक्य होणे, एकाकार होणे हा साक्षात्कार झाला की फक्त आनंद उरतो. तो आनंद श्रीदासराममहाराजांनी आयुष्यभर अनुभवला व कीर्तनाचे माध्यमातून हा आनंद सर्वांना वाटला. श्रीदासराममहाराज सांगतात ,*''दासराम सहजानंद। सेवी आनंदी आनंद।।''*

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग १७

*उघडिया डोळा अंधार दडाला । दृष्टीपुढे आला झाकिलिया ।।१ ।।*
*शून्याचे माझारी संकल्प निमाला । तेथे तो लोपला सूर्य चंद्र ।। २ ।।*
*जाणीव नेणीव हारपली जेथे । प्रकाश ना तेथे अंधारू गा ।।३ ।।*
*ब्रह्माचे घनत्व अंतर्बाह्य दृष्टी । अभेद्या त्रिपुटी उरली नाही ।।४ ।।*
*शून्याचिये पैल निजत्व स्मरण । नुरे विस्मरण एकाएकी ।। ५ ।।*
*मावळवी जो का विश्वाचा आभास । नवल प्रकाश निजत्वाचा ।।६ ।।*
*देखणा होवोनी देखता अलिप्ती । दासराम प्रीती करी तेथे ।।७ ।।*

– श्रीदासरामगाथा अ.क्र. १०१५

परमार्थात 'डोळा उघडणे' या वाक्प्रचाराला वेगळा अर्थ आहे. तो अर्थ या अभंगात श्रीदासराममहाराजांनी प्रगट केला आहे. ते म्हणतात, *''उघडिया डोळा अंधार दडाला। दृष्टीपुढे आला झाकिलिया।।''* परमार्थदृष्ट्या विश्वाचा आभास नाहिसा करणारा निजत्वाचा नवलप्रकाश दिसणे म्हणजे डोळा उघडणे. तो प्रकाश जोवर आम्हाला दिसत नाही तोवर आमचे ते डोळे (निजत्वाचा प्रकाश दाखविणारे) झाकलेलेच आहेत. या देहाच्या डोळ्यांना हा नवलप्रकाश दिसत नसल्याने, हे देहाचे डोळे उघडले काय किंवा मिटले काय, परमार्थदृष्ट्या अजून डोळे उघडलेलेच नाहीत.

आमचे देहाचे जे डोळे आहेत ते उघडले असता अंधार नाहिसा होईलच असे नाही. आपण आपले सक्षम डोळे उघडले असताना बाहेर जर प्रकाश असेल तर प्रकाशात जड पदार्थांचे ज्ञान होऊन प्रकाशाची जाणीव होईल. कुठलाही प्राणी प्रकाश पाहू शकत नाही. प्रकाशात वस्तू पाहू शकतो. डोळे सक्षम नसतील तर डोळे उघडूनही प्रकाशाचे ज्ञान होणार नाही. आपण





डोळे उघडले असता बाहेर अंधारच असेल तर डोळा उघडूनसुध्दा डोळ्यापुढील अंधार नाहिसा होणार नाही आणि समजा बाहेर प्रकाश आहे आणि आत अंधार असेल (आत पाहणारा जागेला नसेल) तर डोळा उघडूनही प्रकाशाचे ज्ञान होणार नाही. या उघड्या डोळ्यांना जे पदार्थज्ञान होते ते आपल्या आत कल्पना आहे म्हणूनच होते. निद्रावस्थेत कित्येक लोकांचे डोळे उघडे असतात. पण आत कोणतीही कल्पना नसल्याने (मनोलय झालेला असल्याने) त्याला कोणतेही पदार्थज्ञान होत नसते. प्रकाशाची जाणीव होत नसते.

कित्येकदा डोळे उघडे असतात, पण आपण काहीच पहात असत नाही. म्हणजे डोळे उघडे असले की प्रकाशाची जाणीव व्हायलाच पाहिजे असे काही नाही. खिडकी उघडी असली की खिडकीतून जे जे दिसते ते आपण पाहतोच असे नाही. आवश्यकता असेल तर आवश्यक तेवढेच आपण खिडकीतून पाहतो. तसेच डोळ्याचे बाबतीतही आहे. आपल्याला जे पहायला हवे असते, तेवढेच आपण डोळ्यातून पाहतो. डोळ्याला जे जे दिसते, ते सर्व आपण पाहत नाही. 'आपण पाहतो म्हणून दिसते, दिसते म्हणून आपण पाहत नाही' हे श्रीदासराममहाराजांचे वचन येथे लक्षात घ्यावे असेच आहे.

आपण डोळे मिटले तर डोळ्यापुढे अंधार येईलच असे नाही. आपण आपले आत कोणतीही कल्पना नसताना जर डोळे मिटले तर प्रकाशात होणारे दृश्याचे ज्ञान थांबते अर्थात अंधार जाणवतो. पण आपले आत कल्पना असताना जर आपण डोळे मिटले तर कल्पनेने दृश्य पाहणे चालूच राहते अर्थात अंधार डोळ्यासमोर येत नाही. डोळा उघडल्यावर अंधार नाहीसा होऊन प्रकाशाचे ज्ञान होते किंवा डोळा मिटल्यावर अंधाराचे ज्ञान होते हे श्रीदासराममहाराजांचे म्हणणे सर्वार्थाने या देहाच्या डोळ्यांना लागू होत नाही.

या डोळ्यांना जे ज्ञान होते ते 'देखणे येकाचे येक' अशा स्वरुपाचे

असते, ज्याला विपरितज्ञान असे म्हटले जाते. वस्तुत: चैतन्याला चैतन्याचेच आकलन होत असते. पण अज्ञानाने दृश्याचे विपरित ज्ञान होत असते.

*''तैसा सर्वत्र मीची मिया। घेपतसे धनंजया।*
*परी दृश्यत्व हे वाया। अज्ञानवशे॥१८/११२४॥''* व
*''तैसे ज्ञानाचिये दिठी। मजसी अभिन्नची ते किरिटी।*
*येर भिन्नपणे ते उठी। अज्ञानास्तव॥१५/३३४॥''*

ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची वचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

या देहाच्या डोळ्यांना जे या चराचराचे मूळ आहे अशा अद्वैत चैतन्याचे ज्ञान होत नाही. अद्वैताचे ज्ञान– चैतन्याचे ज्ञान होणारा डोळा वेगळा आहे. त्याला ज्ञानदृष्टी, नयन, डोळीयाचा डोळा असे निरनिराळ्या नावांनी संतांनी संबोधिले आहे. जोवर या देहाच्या डोळ्यांना हे दृश्य दिसतेय, आकार दिसतोय, द्वैताचे ज्ञान होते आहे, तोवर अद्वैत दाखविणारा डोळा अजून उघडलेला नाही. परमार्थदृष्टीने अजून अज्ञानाचा अंध:कारच पसरलेला आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात,

*''ते आघवेची दिसणे। जयाते का न देखणे।*
*विश्व भासतसे जेणे। लपालेनी॥ १५/३०९॥''*

जो सर्वत्र चैतन्य पाहतो – एकाचाच अनुभव घेतो, तो जन्ममरणाच्या चक्रातून सुटतो व जो येथे अनेकत्व पाहतो, तो मात्र जन्ममरणाच्या चक्रात सापडतो. कठोपनिषद सांगते,

*''मनसैवेदमाप्तव्यं नेह नानाऽस्ति किञ्चन।*
*मृत्यो: स मृत्यु गच्छति य इह नानेव पश्यति॥११॥*
–अ–२ व १

जन्ममरणाच्या चक्रातून सुटणेसाठी हा अद्वैत दाखविणारा डोळा उघडणे किती महत्वाचे आहे हे यावरुन लक्षात येईल.





हा अद्वैत दाखविणारा डोळा उघडण्यासाठी आमचे मनात असणाऱ्या निरनिराळ्या कल्पना नाहीशा व्हायला हव्यात. आपल्या डोळ्यातील आकार नाहीसा व्हावयास हवा. जाणीव नाहीशी व्हावयास हवी. खऱ्या अर्थाने मौन साधावयास हवे. श्रीदासराममहाराज ''डोळा उघडणे म्हणजे काय ? '' हे असे सांगतात, *''प्रवृत्तीसी अंध डोळा उघडीला।आनंद जोडीला निवृत्तीचा॥''* तर प्रवृत्ती म्हणजे नेमके काय ? हे दासराममहाराज असे सांगतात,

*''प्रवृत्ती जाणीव शून्य ते नेणीव । तया पैल भाव निवृत्तीचा॥''*
*'' आकार प्रवृत्ती निराकार शून्य। तयावरी धन्य निवृत्ती ते॥''*
*''प्रवृत्ती बडबड शून्य वाचा मन। करणी ते साधन निवृत्तीचे॥''*

ही दृश्याकडे असणारी प्रवृत्ती नाहीशी झाली तरच जीवन अंतर्मुख होऊन पुढे स्थिर होऊन ऊर्ध्वमुख होईल. श्रीदासराममहाराज सांगतात, *''प्रवृत्ती सांडोनी होई अंतर्मुख । पुढे ऊर्ध्वमुख होई प्राण्या॥''* जीवन ऊर्ध्वमुख झाले तर भेद नाहीसा होईल, सर्वत्र एकाचा अनुभव येईल. श्रीसमर्थ सांगतात,

*''सकळ करणे ईश्वराला। म्हणोनि भेद निर्माण केला।*
*ऊर्ध्वमुख होता भेदाला। ठाव कैचा॥२०/८/१६॥''* व
*''अधोमुखे भेद वाढतो। ऊर्ध्वमुखे भेद तुटतो।*
*नि:संगपणे निर्गुणी तो। महायोगी॥२०/३/२२॥''*

हा प्रवृत्तीपासून निवृत्तीपर्यंतचा प्रवास तसा अवघडच. प्रवृत्तीपासून बाजूला होणे – डोळा उघडणे हे किती अवघड आहे हे श्रीनिजानंदमहाराज असे सांगतात,

*''डोळा उघडेना उघडेना। पश्चाताप घडेना ॥धृ॥*
*अहंममता करणे। नाना योनी जन्मोनी मरणे॥१॥*
*चिद्चिदग्रंथी सुटेना। क्षणभरी विषयी चित्त विटेना॥२॥*
*निजानंदी रंगेना । निश्चळ निर्मळ भव भंगेना॥३॥*

एक गुरुकृपा झाली की अंतरातील कल्पना नाहीशी होऊन ब्रह्मज्ञानाच्या प्रकाशाने अज्ञानाचा अंध:कार नाहीसा होतो व द्वैतानुसंधान सुटून अद्वैतानुसंधान साधते. समर्थ सांगतात,

*''जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञान अंधार निरसी।*
*जीवात्मया शिवात्मयासी। ऐक्यता करी।। ५/२/९ ।।''*
*''तैसे ज्ञानाचेनि प्रकाशे। मिथ्या कल्पना हे नासे।।*
*मग हे तुटे आपैसे। द्वैतानुसंधान।। ७/५/३० ।।''*

श्रीगुरुकृपेने श्रीगुरुंच्याकडून प्राप्त झालेला साधनाचा अभ्यास सुरु झाला की, जाणीवेत बाह्य मनाचा लय साधून जागृती व स्वप्न या दोन अवस्थेत प्राप्त होणारी दृश्याची विपरीत जाणीव नाहीशी होऊन होणाऱ्या नेणीवेची – शून्याची जाणीव महाकारणदेहात होते. या शून्याचे ज्ञानाने पुढे काय होते हे श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे सांगतात, *''शून्याचे माझारी संकल्प निमाला। तेथे तो लोपला सूर्यचंद्र।।''* साधनाचे अभ्यासाने मनोवृत्तीचा निरोध साधून केवल कुंभक साधला जातो. सूर्य चंद्र या जीवनाच्या गती लोप पावतात. अर्थात नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण अत्यल्प झालेले असते. पुढे जीवन ऊर्ध्वमुख होऊन त्याला सगुण ब्रह्माचे – आत्म्याचे – आकाशाचे – नाद, बिंदू, कला, ज्योती या रूपाने साक्षात्कार होतात. सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन, तुर्यावस्थेत प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचे विज्ञान होते. (ज्ञानाची जाणीव नाहीशी होते.) आत्म्याचा चंचळपणा नाहीसा होतो. कमी होतो.

ही विज्ञानावस्था कशी असते याचे वर्णन श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे असे करतात, *''जाणीव नेणीव हारपली जेथे। प्रकाश ना तेथे अंधारू गा।।''* विज्ञान अवस्था ही ज्ञान, अज्ञान याचे पलिकडील अवस्था आहे. विपरीत ज्ञान नाहीसे होऊन रहाणाऱ्या नेणीवेची – अज्ञानाची जाणीव येथे असल्याने, येथे नेणीवही असत नाही. नेणीवेचे ज्ञान येथे असते पण त्या ज्ञानाची जाणीव तेथे असत नाही. अर्थात, येथे ज्ञानाचा प्रकाश किंवा





अज्ञानाचा अंध:कार असे काही असत नाही. साधकाच्या या अवस्थेचे वर्णन श्रीमुकुंदराजस्वामी असे करतात, *''ज्ञान म्हणो तऱ्ही नाही जाणीव। अज्ञान म्हणो तरी नाही नेणीव। अभाव म्हणो तऱ्ही नवल ठेव। आनंदाची।।''* तर श्रीकेशवस्वामी हे साधक वर्णन असे करतात, *''जेथे जाणीव नेणीव नाही। तेथे काहीच उरले नाही।।''*

या विज्ञान अवस्थेबद्दल अधिक माहिती श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे अशी सांगतात, *''ब्रह्माचे घनत्व अंतर्बाह्य दृष्टी। अभेद्या त्रिपुटी उरली नाही।।''* विज्ञानावस्थेत अंतर्बाह्य ब्रह्माची अनुभूती येते. *''ब्रह्म होवोनी ब्रह्मीच खेळे''* ही संत केशव स्वामी यांची अनुभूती किंवा *''देव खाते, देव पिते''* ही संत जनाबाईंची अनुभूती विज्ञानावस्थेचे महत्व दाखविणारीच आहे. दृश्य, द्रष्टा, दर्शन सारे ब्रह्मरूपच झाल्याने त्रिपुटीचा निरास होतो. श्रीमुंकुदराजस्वामी सांगतात, *''द्रष्टा दृश्ये दर्शन । हे त्रिपुटी जेथ क्षीण। ते परब्रह्म जाण। अनिर्देश्य।।''*

श्रीदासराममहाराज पुढे सांगतात ,*''शून्याचिये पैल। निजत्वस्मरण। नुरे विस्मरण एकाएकी।।''*सर्वसाक्षी मनाचे उन्मन होऊन महाकारणदेहात असणारी नेणीवेची जाणीव – शून्यज्ञान – तुर्यारूपज्ञान मावळते व निवृत्ती अवस्थेत जाणीवरहित ज्ञानाने – वृत्तीरहित ज्ञानाने – खरी विश्रांती, पूर्ण समाधान प्राप्त होते. समर्थ या स्मरणाविषयी – ज्ञानाविषयी असे सांगतात, *''वृत्तीरहित जे ज्ञान। तेचि पूर्ण समाधान। जेथे तुटे अनुसंधान। मायाब्रह्मीचे।।''* तर श्रीनाथमहाराज या स्मरणाविषयी असे सांगतात, *''स्मरता निवृत्ती पावलो विश्रांती। संसाराची शांती झाली माझ्या।।''*हे निवृत्ती अवस्थेतील – विज्ञान अवस्थेतील स्मरण कसे अखंड असते याविषयी श्रीदासराममहाराज त्यांचे 'आत्मविज्ञान' या लेखात सांगतात, ''आत्म्याचे विज्ञान जाणीवेचा ग्रास करते. याठिकाणी आत्म्याची जाणीव उत्पन्न करावी लागत नाही, तर ती सहज अखंड प्रगट होते. जाणीवेचे

अखंडत्व म्हणजे अभेदरूप सहज स्मरणस्थिती. म्हणून या स्थितीला जाणीव म्हणता येत नाही.'' निवृत्ती अवस्था, उन्मनी अवस्था, विज्ञान अवस्था या तिन्ही अवस्थांचा अन्योन्य संबंध श्रीसमर्थ असा सांगतात,

*''साक्षत्व वृत्तीचे कारण । उन्मनी ते निवृत्ती जाण ।*
*जेथे विरे जाणपण । विज्ञान ते ।। ७/४/५० ।।''*
*''अनिर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती ।*
*निरोपाधी विश्रांति। योगियांची ।। ७/३/४४ ।।''*

श्रीदासराममहाराज मूळ अभंगात पुढे सांगतात, ***''मावळवी जो का विश्वाचा आभास। नवल प्रकाश निजत्वाचा।।''*** विश्वाचा आभास नाहीसा होऊन हा निजत्वाचा नवलप्रकाश अंतर्बाह्य अनुभवास येणे – अखंड निजत्वस्मरण होणे – अद्वैताचा अनुभव येणे म्हणजे डोळा उघडणे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, ***''मावळवित विश्वाभासू। नवल उदैला चंडांशू। अद्वयाब्जिनीविकासू। वंदू आता।। १६/१ ।।''*** हा डोळा उघडला की अखंड स्वरुपाचे प्रकाशाचे ज्ञान होते. आमचे संप्रदायातील अधिकारी सत्पुरुष श्रीगुरुदेवरानडेसाहेब या अवस्थेचे वर्णन असे करत, ***''न गमे दिवसराती । अखंड लागलीसे ज्योती ।।''***

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''देखणा होवोनी देखता अलिप्ती । दासराम प्रीती करी तेथे ।।''***या दृश्यापासून, देहापासून, अलिप्त झाल्यावर जेव्हा चैतन्याला चैतन्याचीच अनुभूती येते, आपल्याआत जे चैतन्य आहे, तेच सर्वत्र पसरलेले आहे याचा जेव्हा अनुभव येतो, तेव्हा हे विश्व वारीयाची (चैतन्याच्या वाऱ्याची) न्यारी मौज आहे हे लक्षात येते. साहजिकच त्या चैतन्याबद्दल प्रेम निर्माण होते. या वाऱ्याची – चैतन्याची मौज श्रीदासराममहाराजांनी सतत अनुभवली व त्या वाऱ्यावरच – चैतन्यावरच त्यांनी प्रेम केले. ते म्हणतात, ***''वारियाची मौज किती न्यारी रे । वाऱ्यावरी माझी बहु प्रीती रे ।।''***

卐 卐 卐





।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग १८

*वारे भरले या नयनात ।। ध्रु ।।*
*नादश्रवणी तदाकारता । एकचि अखिल जगात ।।१ ।।*
*मागे शून्य पुढती शून्य । आहे कोण तयात ।।२ ।।*
*लक्ष्यालक्ष्य गुणी तो जाला । नटला नामरुपात ।।३ ।।*
*दासरामी हा सगुण निर्गुण । संतांचे स्मरणात ।।४ ।।*

– दासरामगाथा अ.क्र.१०३०

अद्वैत दाखविणारा डोळा – वायुरुप चैतन्य दाखविणारा डोळा – हा देखील वायुरूप असतो. तो डोळा कसा प्राप्त होतो ? हा डोळा प्राप्त झाल्यावर साधकाची काय अवस्था होते याचे वर्णन श्रीदासराममहाराजांनी या अभंगात केले आहे. ते म्हणतात , ***''वारे भरले या नयनात ।। ध्रु ।।''***

उपाधी दाखविणारा डोळा – द्वैत दाखविणारा डोळा म्हणजे आपल्या देहाचा डोळा व मन:श्चक्षू . देहाच्या डोळ्यांना दिसणारे दृश्य व मनाला होणारे भास याच्या पलिकडे दृश्यभासातीत अविनाशी अद्वैत परब्रह्म आहे. अर्थात या देहाच्या डोळ्यांना किंवा मन:श्चक्षूला हे चैतन्याचे वारे कधीही दिसत नाही.

उपाधीमध्ये गुप्तरुपाने सर्वगत असणारे चैतन्य जो आपणाला दाखवितो तो 'नयन'. आपल्या देहात भरलेले अथवा विश्वात भरलेले चैतन्याचे वारे ज्या डोळ्याला जाणवते त्याला 'नयन' म्हणतात. जो विश्वाचे अंतरंग दाखवतो, जो जगदंतरी अनुसंधान ठेवतो तो नयन. ***''जो आपल्याला आत नेतो, त्याला नयन म्हणतात''*** असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगायचे.

जोवर आपणाला उपाधीचीच जाणीव होते आहे, आकारच दिसतो आहे, जोवर देहाचा व मनाचा लय साधलेला नाही तोवर आपल्या नयनात चैतन्याचे वारे भरणार नाही, वायुरूप नयन प्राप्त होणार नाही. श्रीदासराममहाराज सांगतात,

*''आकार पहाणे द्वैताचे देखणे। विसरोनी रहाणे आपणासी ॥ १ ॥*
*आपणा पहाता आकार उरेना। बोलाया राहेना पहाता कोणी ॥ २ ॥*
*दासरामा गूज लाधले सहज। कृपा महाराजे पूर्ण केली ॥ ३ ॥''*

आपण आपल्याला विसरल्याने, चैतन्याचा विसर झाल्याने, हे आकाराचे ज्ञान, द्वैताचे विपरीत ज्ञान होते आहे. आपण एकदा आपल्याला पाहिले 'पाहणे आपणासी आपण ' हे घडले, आपल्या आतील चैतन्याची जाणीव झाली की आकाराचे ज्ञान न होताना चैतन्याचीच जाणीव होते. याला श्रीदासराममहाराज म्हणतात, *''वारे भरले या नयनात''*

चैतन्याचे वारेच सतत अनुभवाला येत असल्याने संतमहात्म्यांच्या दृष्टीला सृष्टी येतच नाही. दृश्य पदार्थ त्या निर्मळांना स्पर्शही करू शकत नाही. त्यांच्या दृष्टीत फक्त चैतन्यच भरते. जसे आपण पन्नास गोष्टी पाहतो पण त्यातील महत्वाची गोष्टच आपल्या डोळ्यात भरते, तसे तत्वज्ञ संतांच्या दृष्टीत – नयनात – ही गौण जड सृष्टी भरत नाही. सर्वात महत्वाचे जे चैतन्य तेच फक्त दृष्टीत भरते – नयनात भरते.

हा अद्वैत दाखविणारा डोळा – आत्मप्रकाश दाखविणारा डोळा आपणास केव्हा प्राप्त होतो हे आपणास श्रीदासराममहाराज असे सांगतात, *''नादश्रवणी तदाकारता एकची अखिल जगात ॥''* साधनाच्या अभ्यासाने नि:श्वासाला काही प्रमाण आले की नादश्रवण – नामश्रवण घडते. नादानुसंधान – नामानुसंधान साधते. या नामाच्या होणाऱ्या उच्चाराकडे लक्ष ठेवून जर जाणीवनेणीवरहित तादात्म्य झाले तर मोक्ष प्राप्त होतो – आनंद प्राप्त होतो.





*''रामनाम ध्वनी उमटे। तेथे लक्ष लावी नेटे।*
*ब्रह्मानंद सहज भेटे। प्रचूर प्रचूर। जपतू रामनाम।*
– श्रीबांदकरमहाराज

*जाणीव नेणीव भगवंती नाही।*
*हरी उच्चारणी पाही मोक्ष सदा ॥*
– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

या नामाचाच पुढे बिंदू घडतो. नामाच्या ठिकाणी रुपाची प्रचिती येते. नादश्रवणातून पुढे प्रकाशदर्शन होते. श्रीदासराममहाराज सांगतात, *''हृदयात झाली वायूची घासणी। कंठात उदेला ॐकार वन्ही। नामाचा बिंदू घडला गे माये। अंतरबाहेरी प्रकाशे स्वये ॥''* ज्या हृदयात ही वायूची घासणी होते ते हृदय आपण समजतो त्या हृदयापेक्षा वेगळे आहे. कंठसुध्दा आपण समजतो त्या कंठापेक्षा वेगळा असावा असे मला वाटते. ज्या ठिकाणी ॐकाराचा वन्ही प्रगट होतो तो कंठ, असे कंठाचे वर्णन फार तर करता येईल. ऊर्ध्वगामी जीवनात नाम प्रगट होत असल्याने हा कंठ वेगळा असावा असे मला वाटते. श्रीदासराममहाराज सांगतात, *''कंठामाजी देखे अनाहत नाद। वरी तो आनंद तेजोरूप ॥''* आपल्या शरीराचे कंठात अनुहात नाद होत नाही. अर्थात हा कंठ वेगळा आहे हे सांगणे नकोच. हे जे हृदय आहे, ज्या हृदयात वायूची घासणी होते ते हृदय वायुस्वरूपच आहे. श्रीदासराममहाराज सांगतात,

*''महाशून्य मूस पंचभूत आटणी। वायुस्वरुपिणी हृदयामाजी ॥*
*पृथ्वी आप तेज गेले ते ग्रासोनी। देखिजे नयनी वायुरूप ॥''*

साधनाच्या अभ्यासाने वायुस्वरूप हृदयात, श्वसनामध्ये असणाऱ्या पंचमहाभूतांची, महाशून्याच्या मुसीत आटणी होते – चत्वार देहाचा निरास होतो. या पंचमहाभूतातील पृथ्वी,आप, तेज या तीन तत्वांचा निरास झाला

असता, म्हणजे पृथ्वी, आप यापासून बनलेल्या स्थूल देहाचा व तेजापासून बनलेल्या सूक्ष्म देहाचा निरास झाला असता नयनात वायुरूप चैतन्याचा साक्षात्कार होतो. नयनात वारे भरते.

हा साक्षात्कार झालेल्या संतमहात्म्यांच्या कानाना 'आहत' ऐकायला येत नाही, ते विश्वात भरलेला अनुहातच ऐकतात. *''मुंगीके पावमें घुंगरू बाजे''* अशी संत कबीरसाहेबांची अनुभूती होती. त्यांची वाचा फक्त नामच घेते. *''जयाचे वाचापुढा भोजे। अखंड नाम नाचतसे माझे।।''* ही श्रीज्ञानेश्वरमहाराजांची अनुभूती आहे. तो दृश्य न पाहताना सर्वत्र आत्मप्रकाशच पाहतो. तो भूतसृष्टी आत्मवत पाहतो. *''अथवा आत्मप्रकाशे चोखे। जो आपणपेचि विश्व देखे ।।''* अशीच त्यांची अवस्था असते. सगळ्या इंद्रियांना एका चैतन्याची प्रचिती येते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दात या महात्म्याचे वर्णन असे करता येईल,

*''नाईकणे ते कानची वाळी। न पाहाणे ते दिठीची गाळी।*
*अवाच्य ते टाळी। जीभची गा।।१४/२०९ ।।''*

हे बहुरंगी, बहुढंगी विश्व आहे पण ज्ञान मात्र चैतन्याचेच.

*''म्हणोनि विश्व भिन्न । परी न भेदे तयाचे ज्ञान ।।*
*जैसे अवयव तरी आन आन। परी एकेची देहीचे।।९/२५० ।।''*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

साधनाच्या अभ्यासाने नादश्रवणापासून प्रकाशदर्शन घडले, नामाच्या ठिकाणी रुपाची प्रचिती आली की सर्वसाक्षी मनाचे उन्मन होते व तुर्यावस्थेत वेगळेपणाने होणारे ज्ञान मावळून जाते. ज्ञानाचे विज्ञान होते – ज्ञानाची जाणीव नाहीशी होते. तो ब्रह्मरूप होतो.

*''नामी रूप ते बिंबले। सर्व वृत्ती मौनावले।।''*

– श्रीतुकाराममहाराज





*'' गगनी भासले अगणित तारे। तेथे मन मुरे वृत्तीसहित।। ''*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*'' म्हणोनी सर्वसाक्षी मन। तेचि जालिया उन्मन।*
*मग तुर्यारूप ज्ञान। ते मावळोन गेले।।* ७/५/११ *।।''*

– श्रीरामदासस्वामी

ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

हा नादश्रवणापासून प्रकाशदर्शनापर्यंतचा – श्रवणापासून नयनापर्यंतचा प्रवास ४ बोटांचा आहे खरे, पण तो ४ देहांचा निरास करणारा आहे. या श्रवणापासून नयनापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन संतमहात्म्यांनी केले आहे ते असे,

*''श्रवणी पेरिले नयनी उगवले नाना रूपे जसे।*
*जिकडे पाहे तिकडे अवघे ब्रह्मची भरले असे।।'',*
*''श्रवणात पेरणी केली पेरणी केली। ती नयन उजेडा आली।*
*मन पवन चित्त एक करुन। चित्त एक करुन।*
*मशी वेडची गेले भरुन।।''*

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''मागे शून्य पुढती शून्य। आहे कोण तयात।।''* कोणते शून्य मागे आहे आणि कोणते शून्य पुढे आहे, काही कल्पना आहे का ? श्रीदासराममहाराजांनी या दोन शून्यांचा खुलासा 'आत्मविज्ञान' या त्यांचे लेखात केला आहे. त्यांचे सांगणेप्रमाणे यातील एक शून्य जे आपले पुढे आहे, जे दृश्यादृश्यापलिकडे असून दृश्यादृश्यास कारणीभूत आहे व दुसरे शून्य जे आहे ते आपले मागे उपाधिभूत आत्मतत्वाचे ठिकाणी असणारे साक्षीभूत दृष्टीशून्य आहे. या दोन शून्यांमुळे द्वैताचे पाहणे निर्माण झाले आहे. *''शून्य आणि शून्य दृष्टीचे देखणे। निळीयाची खाण प्रकाशली।।''* हे संतवचन याला प्रमाण आहे. या दोन्ही शून्यांचा ग्रास केल्यावर उरलेले जे अखंड पाहणे आहे कि ज्यात अपूर्णत्व

काहीच नाही व जे अभेद आहे, तेच आत्म्याचे दर्शन आहे – आत्मदर्शन आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, *''शून्य शून्य उडवी परती वस्तू ठेवी। त्रिपुटी आटवी तये ठायी।।''* पाहणारे जे शून्य आहे व ज्याला पाहायचे ते शून्य आहे. त्या दोन्ही शून्यात चैतन्याशिवाय (वायुरुप) काय आहे ? त्या दोन्ही शून्यांचा ग्रास झाला की चैतन्यच चैतन्याला पाहते. द्रष्टा हाच दृश्य होतो, त्यामुळे द्रष्टेपणा राहत नाही. दृश्य द्रष्टा दर्शन ही त्रिपुटी त्याठिकाणी राहात नाही.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात , *''लक्ष्यालक्ष्य गुणी जो जाला। नटला नामरुपात।''* चैतन्य जे नामरुपाने नटलेले आहे ते नामरूप आपण समजतो ते नव्हे. व्यवहारात नामाला रूप व रुपाला नाम असते. रुप पाहिले की त्याचे नाम आठवते व नाम घेतले की रूप डोळ्यासमोर येते, अर्थात येथे नाम व रूप भिन्न आहे. या नामरुपाला नाश आहे. या आपण समजतो त्या नामरुपाने जर चैतन्य नटले असेल तर चैतन्यालाही नाश आहे असेच म्हणावे लागेल. अहो, आम्ही देहाला कल्पनेने नाव ठेवतो, अर्थात ते नाव काल्पनिक असते. हे द्वैत माजवणारे नाम आपणाला देवापासून दूर नेणारेच आहे. ( *''एक नाम हरी द्वैत नाम दूरी। अद्वैत कुसरी विरळा जाणे''* – श्रीज्ञानेश्वरमहाराज) व आम्ही देहाकृतीला रूप समजतो. देहातील चैतन्य गेल्यावर शरीर पतन पावते, मग कुठले नाम व कुठले रूप? वहिवाटीला पण हे नामरूप ठेवले जात नाही. *''वहिवाटीही पुसिले नाम रूप तयाचे।।''* हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन या नामरूपाचे असारपण दाखविणारेच आहे. अर्थात चैतन्य ज्या नामरुपाने नटले आहे ते हे नामरूप नव्हे हे निश्चित.

परमार्थात नाम आणि रूप यात भिन्नता नाही. *''नाम तेचि रूप रुप तेचि नाम। नामरुप भिन्न नाही नाही।।''* हे नामदेवमहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारेच आहे. ब्रह्माची व्यक्त बाजू – सगुण ब्रह्म ज्या नामरुपाने व्यक्त होते ते हे नामरूप आहे. आपले निजत्व या नामरुपाचे माध्यमातून व्यक्त होते.





आपले शरीरात घुमणारा स्वयंसिध्द चैतन्याचा नाद हे त्याचे नाम असून, आपले शरीरात असणारा बाह्य प्रकाशापेक्षा वेगळा असणारा प्रकाश – नवलप्रकाश – स्वयंप्रकाश – जो साधकाचेपुढे डोळे झाकले असता, बिंदू, कला, ज्योतीरुपाने प्रगट होतो, ते चैतन्याचे – सगुणब्रह्माचे रूप आहे. हे निजत्व – नामरुप – आपले देहात असते म्हणून शरीराला रया असते. शरीराला नामरुप प्राप्त होते. या नामरुपाचे आधारानेच – सगुण ब्रह्माचे आधारानेच – निर्गुण ब्रह्माची प्राप्ती होते. या नामरुपाचे वर्णन श्रीदासराममहाराज 'आत्मविज्ञान' या त्यांचे लेखात असे करतात, ''आत्मरुपाचे ठिकाणी जे चिदाकाश महाशून्य तत्वात पसरले आहे, ते नाम आणि रूप यांचेमध्ये व्याप्त आहे. दृश्यात्मक नामरुपास चिदाकाशाने जिवंतपणा आणला आहे. सत्यभूत नामरुप निरुपाधिक असून त्या दोन्हीत ऐक्यता आहे व त्याची मिळणी चिदाकाशाने साधली आहे. म्हणूनच चिदाकाश हे सत्यभूत नामरुपाचे ठिकाणी व्याप्त आहे. या नामरुपैक्यतेचा संतांनी सिध्दसंप्रदाय परंपरेप्रमाणे परिपूर्ण साधनाभ्यास करून प्रात्यक्षिक प्रमाणाने अनुभव घेतला हेच त्या आत्म्याचे विज्ञान होय.'' हे नि:शब्द रूप आणि नाम साधकाला नि:शब्द करणारेच आहे. निशब्द निरुपाधिक आत्मतत्वाची प्राप्ती करून देणारेच आहे.

हे सत्य निरुपाधिक नि:शब्द, नाम, रुप आपणाला कधी लक्ष होणार ? जोवर आमचे लक्ष्यात लक्ष आहे – जोवर प्रत्यक्ष दिसणाऱ्या मायेत लक्ष आहे, तोवर अलक्ष वस्तू अलक्षच राहणार. जेव्हा मायेत अलक्ष होईल तेव्हा अलक्ष वस्तू लक्ष होईल. *''प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तू लक्षी अंतरी। आत्मस्थितीची धारणा धरी। या नाव साधक।। ५/९/१६ ।।''* हे समर्थवचन व *''अलक्ष लक्षुनि पाही निजवस्तू''* हे श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचे नित्यनेमावलीतील वचन, हे स्पष्ट करणारेच आहे. श्रीदासराममहाराज त्यांचे आत्मविज्ञान या लेखात सांगतात, ''निरुपाधिक अलक्ष तत्वाचे ठिकाणी जो कोणी लक्ष लावतो तो आपल्या ठिकाणी

पूर्णत्वाने नि:शब्दरूप आत्मतत्वाचे दर्शन घेण्यास अधिकारी होतो.''

श्रीदासराममहाराज या अभंगाचे शेवटच्या कडव्यात सांगतात,

*''दासरामी या सगुण निर्गुण। संतांचे स्मरणात।।''*

श्रीदासराममहाराजांनी 'संतांचे स्मरणात' असे का म्हटले आहे? कारण आपले ठिकाणी असणारे स्मरण व संतांचे ठिकाणी असणारे स्मरण यात जमीन अस्मानाचा फरक आहे. आपले ठिकाणी फक्त देहाचे स्मरण व चैतन्याचे विस्मरण असते तर संतांचे ठिकाणी चैतन्याचे अखंड स्मरण असते. अर्थात देहाचे अखंड विस्मरण असते. आमचे ठिकाणी असणारे देहाचे स्मरण हे काही अखंड असत नाही. झोपेत देहाचे विस्मरण होतेच. अर्थात आमच्या झोपेत देहाचेही विस्मरण व चैतन्याचेही विस्मरणच असते. ज्यांचे ठिकाणी अखंड चैतन्याचे स्मरण असते त्या संतांना देवत्व प्राप्त होते. ज्यांचे ठिकाणी अखंड चैतन्याचे विस्मरण आहे, त्यांना दानवत्व प्राप्त होते व काही काळ चैतन्याचे स्मरण व काही काळ चैतन्याचे विस्मरण असे जेथे असते त्यांना मानवत्व प्राप्त होते. समर्थ म्हणतात, *''स्मरण म्हणिजे देव। विस्मरण म्हणिजे दानव। स्मरण विस्मरणे मानव। वर्तती आता।। १५/७/३५ ।।''*

संतांचे ठिकाणी सतत असणारी चैतन्याची जाणीव जर आमचे ठिकाणी निर्माण झाली तर सगुणाचे आधाराने निर्गुण परब्रह्माची प्राप्ती निश्चित होणारी आहे.

卐 卐 卐





।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग १९

*अष्टधेचे ज्ञान स्थूल देही जाण।*
*सूक्ष्मदेही खूण नवभक्ती।।१।।*
*कारण शरीरी देखे दसवे द्वार।*
*महाकारणी घोर शून्यज्ञान।।२।।*
*नि:शब्दानुभव ज्ञान तया पैल।*
*शुन्येशून्य बोल अबोल गेले।।३।।*
*ब्रह्मयाचे ज्ञान तयाचे अंतरी।*
*सद्गुरुचे घरी सद्गुरुदृष्टी।।४।।*
*सद्गुरुंचे घर देवदेवा नेणवे।*
*साधुसंता ठावे गुरुकृपा।।५।।*
*दासरामा मौन श्रीगुरुचरणी।*
*चाले निशिदिन डोळ्यावीण।।६।।*

*– दासरामगाथा अ.क्र. ९७९*

चार देह व त्यामध्ये होणारे ज्ञान, चत्वार देह निरसनानंतर होणारे ज्ञान आदी विषय या अभंगात श्रीदासराममहाराजांनी वर्णिलेले आहेत. जसा देह आहे तशी अवस्था, जशी अवस्था तसे प्राप्त होणारे ज्ञान. माणसाला होणारे ज्ञान हे अवस्थेप्रमाणे, देहाप्रमाणे बदलणारे आहे. सत्य ज्ञान कधी बदलणारे असत नाही. अर्थात आपणाला होणारे अवस्थात्मक ज्ञान हे सारे खोटे आहे.

जागृती, स्वप्न या दोन विपरितज्ञानात्मक व सुषुप्ती ही अज्ञानात्मक अशा तीन अवस्था माणसाला निसर्गाने रोज प्राप्त होत असतात. जागृतीचा अनुभव स्थूल देहात, तर स्वप्नांचा अनुभव सूक्ष्म देहात, तर सुषुप्तीचा अनुभव

कारणदेहात प्राप्त होत असतो. अर्थात या तीन अवस्थांबरोबर या तीन देहांचा अनुभव सामान्यपणे सर्वांनाच येतो. साधनाच्या अभ्यासाने त्रिगुणाचा निरास होऊन हे जागृती, स्वप्न, सुषुप्ती या अवस्थांनी त्रिविध झालेले जीवन एकविध होते व तुर्या अवस्थेचा अनुभव महाकारणदेहात त्याला प्राप्त होतो. अर्थात महाकारणदेह सर्वसामान्यत: सर्वांना अनुभवता येत नाही. हा अनुभव फक्त साधन साधणाऱ्यालाच येतो. या चार देहांचे वर्णन श्रीनाथमहाराज असे करतात, *''स्थूल सांडी नश्वर। सूक्ष्म ते मनोजन्य। कल्पना मात्र ते कारण। स्वरुपाभिमान ते चौथे।।''*

या चार देहांचा निरास होणे - देहातीत होणे हे परमार्थात अत्यंत महत्वाचे आहे. देहात असताना मन शुध्द होऊन देहातीत झालो, तरच वस्तुची ओळख होते. *''शुध्द करा मन व्हारे देहातीत। ओळखा वस्तु ते तुका म्हणे।।''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन तर

*''हित आहे देहातीत। म्हणोनी निरोपिती संत।*
*देहबुध्दीने अनहित। हेचि लागे।।* ७/२/३७ ।।''

हे समर्थांचे वचन, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

कोणत्या साधनाच्या अभ्यासाने हा देहांचा निरास होऊ शकतो ? हा देहभाव जाऊ शकतो ? परमेश्वराने जन्माला येतानाच हा देहभाव विरवणारे साधन आपणासोबत दिले आहे पण हे ते साधन आहे याची कल्पना आपणास नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात, *''देहभाव जेथे विरे। ऐसे साधन दिले पुरे। बापरखुमादेवीवरे। विठ्ठलू रे ।।''* आपले आयुष्य ज्याच्यावर अवलंबून आहे असे जे श्वासोच्छ्वास तेच ते देहभाव विरणारे साधन आहे. हे आयुष्याचे साधन साधनीभूत करून आपण सच्चिदानंद वस्तुरूप होऊ शकतो. *''आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे।।''* हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन व *''भजन साधन अभ्यास। येणे पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे।।* १६/१०/३१ ।।'' हे समर्थवचन, ही संतवचने याला प्रमाण आहेत.





ज्या चार देहांचा निरास होणे आवश्यक आहे ते चार देह पंचमहाभूतांपासून बनलेले आहेत. पृथ्वी व आप यापासून स्थूल देह, तेजापासून सूक्ष्म देह व वायूपासून कारणदेह तर आकाशापासून महाकारणदेह बनलेला आहे. ही सारी पंचमहाभूते व त्रिगुण हे सारे सूक्ष्मरूपाने आपल्या श्वसनात आहेत. समर्थ म्हणतात,

*'' त्रिगुण आणि पंचभूते। हे वायुमध्ये मिश्रिते।*
*अनुमानेना म्हणोन त्याते। मिथ्या म्हणो नये।।* ९/८/१७ ।।''

या वायुसाधनाचे अभ्यासाने पृथ्वी, आप, तेज, वायू ही तत्वे बाजूला होणे व आकाशरूप जीवन राहणे म्हणजे चत्वार देहाचा निरास होणे होय.

साधनाच्या अभ्यासाने आपली किती प्रगती झाली आहे हे समजावे या हेतूने कोणते अनुभव कोणत्या देहात प्राप्त होतात याचे वर्णन या अभंगात श्रीदासराममहाराज करतात. ते सांगतात, *''अष्टधेचे स्थान स्थूलदेही जाण। सूक्ष्मदेही खूण नवभक्ती।''* अष्टधेचे ज्ञान होणे हे स्थूलदेहाचे लक्षण आहे. अष्टधा म्हणजे नेमके काय ? हे समर्थ असे सांगतात,

*'' पाच भूते तीन गुण। आठ जाली दोन्ही मिळून।*
*म्हणून अष्टधा प्रकृती जाण। बोलिजेते।।* ११/१/७ ।।''

*'' पंचभूते आणि त्रिगुण। ऐसी अष्टधा प्रकृती जाण।*
*अष्टधा प्रकृतीस नामाभिधान। दृश्य ऐसे।।* ६/२/१४ ।।''

*'' निश्चळामध्ये चंचळ। तेचि कल्पना केवळ।*
*अष्टधा प्रकृतीचे मूळ। कल्पनारूप।।* ११/१/५ ।।''

*'' अष्टधा प्रकृतीचे मूळ। ते हे मूळमायाच केवळ।*
*सूक्ष्मरूप बीज सकळ। मूळीच आहे।।* २०/२/२० ।।''

पंचमहाभूते व त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृती होते व तिलाच दृश्य म्हणतात. निश्चळ परब्रह्माचे ठिकाणी कल्पनेने चंचळत्व-वायू-निर्माण

झाला. या वायूचे ठिकाणी जाणीव निर्माण झाली. हा वायू व त्याचे ठिकाणी असणारी जाणीव या मूळमायेतच दृश्याची बीजे रोवली गेली. कल्पनेतून निर्माण झालेले हे दृश्य आपणाला कल्पनेनेच भासमान होते. कल्पना करणारे मन आहे, म्हणून दृश्याची जाणीव आहे. मनच इंद्रियांच्या साह्याने अष्टधाप्रकृतीचा – दृश्याचा उपभोग घेत असते, त्याला आपण जागृती म्हणतो. श्रीमुकुंदराजमहाराज सांगतात, *''मन प्रवर्ते इंद्रिय द्वारे। बाह्य विषय व्यवहारे । ते जागृती हे खरे। जाणीजे सुख।।''* आपण कल्पना करतो म्हणून भूतसृष्टी भासमान होते. मनाच्या अस्तित्वावर भूतसृष्टी भासमान होते. निर्विकल्प अवस्थेत जे अनुभवाला येते ते सत्य आहे. तो स्वरुपानुभव आहे.

*'' तैसे भूतजात माझ्या ठायी। कल्पिजे तरी आभासे काही।*
*निर्विकल्पी तरी नाही। तेथ मीची मी आघवे।।९/९० ।।''*

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन

*'' जे जे काही साकार दिसे। ते ते कल्पांती* नासे।*
*स्वरुप ते असतचि असे। सर्वकाळ।।९/२/१ ।।''*

हे समर्थ वचन ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत.

स्थूल देहाची जाणीव असताना मनाला जे ज्ञान होते ते सारे अष्टधाप्रकृतीचे – दृश्याचे असते. आपण साधनाला बसलो असताना मनात विचार येतात, डोळ्यासमोरील दृश्य हलत नाही याचा अर्थच आपल्याला साधन साधलेले नाही. आपण अजून स्थूलदेहातच आहोत. आपले दृश्यात गुंतलेले मन जर श्वसनाचे ठिकाणी एकाग्र झाले तर नि:श्वास खाली यायचे प्रमाण कमी होते किंवा नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण कमी झाले तरच मन एकाग्र होते–स्थिर होते. संकल्पविकल्परहित होते – दृश्याचे भान नाहीसे होते.

*''येकाग्र करूनिया मन। बळेचि धरावे साधन।*
*यत्नी आळसाचे दर्शन। होऊच नये।।१८/३/१२ ।।''*

– श्रीसमर्थ



*-कल्पनेचा अंत



*'' विषय ते मनाअधिन। मन पवनासी वश्य जाण।*
*अभ्यासे वश केला पवन। सहजे मन स्थिरावे।।''*

– श्रीनाथमहाराज

*'' बळिये इंद्रिये येती मना। मन एकवटे पवना।*
*पवन सहजे गगना। मिळोंची लागे।। ६/४६० ।।*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*''तरी आजानुबाहो साधू पार्था।*
*मन बुध्दी ठेवी पवनाचिया माथा*
*मग पुशिलिया तत्त्वार्था। सांगितले फावेल।।*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने सारे काही स्पष्ट करणारीच आहेत.

साधनाचे अभ्यासाने मन निर्विचार झाले – दृश्याचे भान नाहीसे झाले की थोडीशी तंद्रील अवस्था प्राप्त होते. ही अवस्था फार महत्वाची. येथे जर आपण सावध न राहताना बेसावध राहिलो तर झोप लागते. अज्ञानावस्था प्राप्त होते व परत सूक्ष्म मन कार्यरत होऊन, सूक्ष्मदेहाचे आधाराने विपरितज्ञानाची दुसरी अवस्था स्वप्नावस्था प्राप्त होते. या स्वप्नावस्थेचे वर्णन श्रीमुकुंदराजस्वामी असे करतात, *''तो आभास घेऊनी अंतरी। मन सूक्ष्म कल्पना करी। तेधवा स्वप्नावस्था बरी। मांडे तेथे।।''*

सूक्ष्मदेहातील या स्वप्नावस्थेचा साधनाच्या दृष्टीने उपयोग शून्यच. साधनात मन निर्विचार होऊन प्राप्त होणाऱ्या तंद्रील अवस्थेत जर आपण सावध राहिलो तर दृश्यापासून परावृत्त झालेल्या मनोवृत्ती चैतन्याकडे वळतात. स्थूलदेहाची जाणीव नाहीशी होऊन फक्त चैतन्याची जाणीव राहते. खरे साधन सुरु होते. या चैतन्याकडे मनोवृत्ती वळणे म्हणजेच सूक्ष्मदेहात अनुभवाला येणारी भक्ती होय. *''विषय इंद्रिये जड ओळखणे या नाव विरक्ती। चैतन्याकडे वृत्ती वळविणे या नाव भक्ती।।''* हे संत शिवरामांचे वचन येथे

लक्षात घेणेसारखे आहे. ही सूक्ष्मदेहात प्राप्त होणारी भक्ती आपण समजतो त्या भक्तीपेक्षा वेगळी आहे, नवीन आहे म्हणून तिला 'नवभक्ती' असे श्रीदासराममहाराजांनी संबोधले आहे. साधनाने मनोवृत्ती चैतन्याकडे वळल्या तर चैतन्याचे प्रेम, आकर्षण वाढते. हे चैतन्याबद्दलचे असणारे प्रेम नऊ प्रकाराने व्यक्त होते. *''श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण, पादसेवन भले। अर्चन, वंदन, दास्य, सख्य, निवेदन झाले। मन हे राम झाले आता। मन हे राम झाले। प्रवृत्ती सोडुन कैसे निवृत्तीसी आले।।''* हे श्रीनाथमहाराजांचे वचन हे स्पष्ट करणारे आहे. मनाची प्रवृत्तीकडून निवृत्तीकडे होणारी वाटचाल नवविधाभक्तीचे माध्यमातून होते. ती यापुढे कशी होते हे श्रीदासराममहाराज पुढे सांगतात, *''कारणशरीरी देखे दसवे द्वार। महाकारणी घोर शून्य ज्ञान।।''*

अज्ञानमूलक सुषुप्ती अवस्था ही कारणदेहाची अवस्था मानली जाते. जागृती आणि स्वप्न या विपरितज्ञानाच्या अवस्थांमध्ये मनाला ज्ञान असते. ते ज्ञान जेव्हा नाहीसे होते तेव्हा तिसरी निद्रा - सुषुप्ती - अवस्था प्राप्त होते. मनोलय सुषुप्ती व उन्मनी या दोन्ही अवस्थांमध्ये साधला जातो. म्हणून या दोन्ही अवस्था सारख्या वाटतात. पण या दोन्हीमध्ये फरक आहे. उन्मनी अवस्था विज्ञानात्मक असून तेथे संसरण - संसार - श्वसन हे सूक्ष्म झालेले असते, तर सुषुप्ती ही अज्ञानात्मक असल्याने या अवस्थेत नि:श्वास खाली यायचे प्रमाण वाढलेले असते.

*''उन्मनी आणि सुषुप्ती अवस्था। सारिखेच वाटे तत्वता।*
*परि विवंचून पाहो जाता। भेद आहे।।८/५/६३ ।।''*

– समर्थरामदास स्वामी

*''जव अज्ञान न फिटे। तव संसार नि:शेष न तुटे।*
*विपरित ज्ञानाचा कोंब फुटे। माधौता म्हणुनी।।''*

– श्रीमुकुंदराजस्वामी





*''गमने तु चतुर्विंशेन्नेत्रवेदास्तु धावने।*
*मैथुने पंचषष्ठिश्च शयने च शतांगुल: ।। २२२ ।।''*

– शिवस्वरोदय

ही संतवचने यावर प्रकाश टाकतात.

जागृती व स्वप्न या दोन अवस्थांमध्ये ज्या नऊ द्वारांच्यामार्फत मनाला ज्ञान होत असते, ती नवद्वारे बंद झाली असता सुषुप्ती अवस्था प्राप्त होते. अर्थात झोपेत आपणाला शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंच विषयांचे ज्ञान नसते. कोणतीही इच्छा निद्रेमध्ये असत नाही. कोणतेही स्वप्न आपण पहात नसतो. मन आणि बुध्दी पूर्णपणे निवृत्त झालेली असते.

''जेव्हा ही नवद्वारे पूर्णपणे बंद होतात तेव्हा ॲटोमॅटिक दहावे दार उघडते.'' असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत. निद्रेत हे द्वार उघडते पण येथे कारणदेहात पूर्ण अज्ञान असल्याने दशमद्वाराचा अनुभव मात्र आपणाला येत नाही. साधनाच्या अभ्यासाने जेव्हा जाणीवेत नऊ द्वारांचा निरोध होतो तेव्हा त्याला दहावे द्वार सापडते. अर्थात दशमद्वाराचा अनुभव हा कारणदेहात येतो. या दशम द्वारात आपण (जीव) आलो असता आपणाला देवाचे दर्शन होते. म्हणून दशमद्वाराला देवाचे द्वार असे म्हटले जाते. या दशम द्वाराचे वर्णन संतांनी अनेक प्रकारे केले आहे. ते असे,

*''नवद्वाराते रोधोनि। दशमद्वारी दासी जनी।''*

– संत जनाबाई

*''नवदरवाजे दसवी खिडकी। उपर है एक फिरकी।*
*विरळा साधु कोई एक जाने। लेकर मनकी गिरकी।*

– संत शिवदिनी

*''खोलोनी दसवे द्वार कवाडपाठी। मनउन्मन परेच्या तठी।*
*अरुप दिसतसे जगजेठी। चहूकडे।।'',*

*''खोलोनि दशमद्वारीच्या छिद्रा। जाता भेटी रामचंद्रा।*
*योगिया लागली योगमुद्रा। चहूकडे ॥''* (श्रीज्ञानदेव तेहत्तिशी)

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*''पहा आपुले शरीरी। दशमद्वार हे पंढरी।''*

– श्रीतुकाराममहाराज

*''नवग्रास घालिता मुखी। दहाव्यात जाहले सुखी।*
*अकराव्या घरा जाऊन। मशी वेडची गेले भरून॥''*

– श्रीमहिपतीमहाराज

*''बारा सोळा जणी गडे ग। बारा सोळा जणी।*
*मिळोनी येती गलगा करती। मशी गेल्या घेऊनी।*
*दहाव्या घरा जाऊनी सखे ग। दहाव्या घरा जाऊनी।*
*सत्रावीचे अमृत प्याले। हर्ष जाहला मनी॥''*

– संतवचन

साधनाचे अभ्यासाने या दशमद्वाराचा अनुभव घेऊन साधक जेव्हा दशमद्वाराचे पलिकडे जाईल तेव्हा त्याला सहजस्थिती, सहजावस्था प्राप्त होते. श्रीदासराममहाराज स्वानुभवाने सांगतात, ***''दशमद्वार ओलांडिता सहजस्थिती येई हाता॥''*** ही सहजस्थिती प्राप्त होणे म्हणजे खरे अध्यात्म आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''ऐशिया आपुलियांची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती।*
*तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा॥८/१९॥''*

निर्हेतुक जीवनाने त्यांना संतत्व प्राप्त होते. ***''तोचि संत तोचि संत। ज्याचा हेत विठ्ठली॥''*** हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन सारे काही स्पष्ट करणारे आहे. या महात्म्यांची कर्मे ही काय स्वरुपाची असतात हे श्रीज्ञानेश्वरमहाराज असे सांगतात,





*''परी कर्मफळी आस न करावी। आणि कुकर्मी संगती न व्हावी।*
*हे सत्क्रियाची आचरावी। हेतूवीण॥२/२६६॥''*

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या देहाच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अवस्था त्याना (संताना) प्राप्त होतात, पण तिन्हीही अवस्थांत ज्ञान – जाणीव फक्त चैतन्याचीच. ही अवस्था म्हणजेच महाकारणदेहातील तुर्यावस्था होय.

जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तीन्ही अवस्थांना प्रकाशित करणारी चौथी ज्ञानात्मक अवस्था म्हणून तिला 'तुरीय' म्हणतात. श्रीनाथमहाराज तुर्येचे वर्णन असे करतात,

*''जागृती, स्वप्न, सुषुप्ती। तिन्ही अवस्थाते प्रकाशिती।*
*यालागी ते चौथी। तुरीय म्हणती सज्ञान॥''*

*''जे जागृतीते जागवीत। जे स्वप्नी स्वप्नाते नांदवीत।*
*जे सुषुप्तीते निजवीत। त्याते तुरीय म्हणती उध्दवा॥''*

तर श्रीमुकुंदराजस्वामी तुरीयेला असे वर्णितात,

*''तिन्ही अवस्थांचे जाणपण। तियेशी तुर्यावस्था ऐसी खूण।*
*तिन्ही देहांचे अवलोकन। हे महाकारणदेह॥''*

*''त्रिविध देहे त्रिविध अवस्था।*
*त्रिविध स्थाने त्रिविध भोग त्रिविध भोक्ता।*
*येया प्रपंचाते तत्साक्षित्वे जाणौनी वेवस्था।*
*ते तुरीया जाणावी॥''*

हे महाकारणदेहात असणारे अखंड स्मरण, ***''जागत राम सोवत राम। सपनेमें देखो तो राजाहीराम॥''*** या श्रीनाथमहाराजांच्या वचनाप्रमाणे असणारी संतांची अवस्था, म्हणजेच त्यांचे अद्वैताचे भजन किंवा हरिकथा आहे, जी जीवाला मुक्त करते.

*''अखंड स्मरणे । अद्वय भजने । वाजवी करटाळी ।*
*एका जनार्दनी मुक्ती होये तत्काळी ।।''*

– श्रीनाथमहाराज व

*''महाकारणदेही अखंडस्मरण । अद्वय भजन हरीकथा ।''*

– श्रीदासराममहाराज

ही संतवचने यावर प्रकाश टाकतात.

कारणदेहात असणारे अज्ञान – नेणीव जिचे कार्य स्थूल आणि सूक्ष्म देहाने व्यक्त होते, या कारणदेहातील अज्ञानाचे ज्ञान होणे – नेणीवेची जाणीव होणे – नेणीव खोटी ठरणे – झोपेत जागे राहणे – आपण आपणाला जाणणे – म्हणजे महाकारण देह होय.

*'' नेणीव जरी जाणितली । तरी ते नेणीव मिथ्या झाली ।*
*तेथील जाणीव उरली । आत्मप्रभा ।।''*

*'' ऐसे नेणीव तेचि कारण । कार्य स्थूळ सूक्ष्म जाण ।*
*तिये कारण सुषुप्तीचे लक्षण । ऐक आता ।।''*

*'' ते नेणीव फिटे गुरुखुणा । जाणे आपण आपणा ।*
*बोलिजे या अनुसंधाना । महाकारण ऐसे ।।''*

*'' फिटूनिया नेणणे । आप आपणा जाणणे ।*
*तिही देहाचेनी साक्षीपणे । महाकारणदेह ।।''*

हे श्रीमुकुंदराजांचे परमामृत सारे काही स्पष्ट करणारे आहे.

स्थूल व सूक्ष्म देहात प्राप्त होणाऱ्या विपरीत ज्ञानात्मक जाणीवेला श्रीदासराममहाराज प्रवृत्ती म्हणतात. या विपरितज्ञानात्मक जाणीवा नाहीशा होऊन राहणाऱ्या कारणदेहातील नेणीवेला श्रीदासराममहाराज शून्य असे संबोधतात. श्रीदासराममहाराज म्हणतात, ***''प्रवृत्ती जाणीव शून्य ते नेणीव । तया पैलभाव निवृत्तीचा ।।''*** व ***''आकार प्रवृत्ती निराकार शून्य ।***





***तयावरी धन्य निवृत्ती ते ।।''*** या नेणीवेचे ज्ञान होणे – शून्याचे ज्ञान होणे हे महाकारण देहाचे लक्षण आहे.

या महाकारणदेहाच्या स्मरणरूप ज्ञानात्मक तुर्याअवस्थेत ब्रह्माचाही अनुभव येतो व मायेचाही अनुभव येतो. सर्व जाणते म्हणुन हिला सर्वसाक्षिणी असे संबोधतात. साक्षित्वाने वेगळेपणाने जे ब्रह्माचे अनुभव येतात, ते याच अवस्थेमध्ये. जागृती, स्वप्न, सुषुप्ती या तिन्ही अवस्थांना जाणणारी चौथी महाकारणदेहाची अवस्था 'तुर्या', तिला ज्ञान असेही म्हणतात. पण तेही पदार्थज्ञानच. म्हणून तुर्येतील ज्ञान हे खरे ज्ञान मानले जात नाही.

खरे ज्ञान हे अद्वैत (चराचराचे मूळ शुध्द स्वरुप) आहे. आणि तुर्या ही तर उघड द्वैतातील आहे. म्हणून शुध्द स्वरुपज्ञान हे नेहमी तुर्येतील ज्ञानाहून वेगळे आहे.

या महाकारण देहातच सगुणब्रह्माचे–ब्रह्माच्या व्यक्त रुपाचे – नामाचे – चैतन्याचे – देवाचे – आत्मदेवाचे – अनुभव नाद, बिंदू, कला, ज्योती या रुपाने प्राप्त होतात. नादश्रवणी तदाकारता घडते. नामाच्या ठिकाणी रुपाची प्रचिती येते. तारकस्वरुपाचे साक्षात्कारानंतर मन हे संपूर्णपणे मुरून जाते. तुर्येमध्ये साक्षीभावाने येणारे अनुभव ठायीच मुरून जातात व त्याला नि:शब्दानुभव प्राप्त होतो.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***''नि:शब्दानुभव ज्ञान तया पैल। शून्येशून्य बोध अबोध गेले ।।''*** नि:शब्दानुभव हा साधकाला नि:शब्द करणाराच असतो. त्याचे शब्दात वर्णन करता येत नाही. अनंत बोलणाऱ्या वेदांनी अनुभवाअंती मौन धारण केले. हे प्रचितीने अनुभवता येते.

*''शब्दचि नि:शब्द होती । श्रुती नेती नेती म्हणती ।*
*हे तो आले आत्मप्रचिती । प्रत्यक्ष आता ।।९/२/३५ ।।''*

– श्रीसमर्थ

*" राऊळामाजी जाता । राहे देहअवस्था ।*
*मन हे उन्मन झाले । नसे बध्दतेची वार्ता ।*
*हेतू हा मावळला । शब्दा आली निःशब्दता ।*
*तटस्थ होऊन ठेले । निजरूप पाहता ॥*

– श्रीनिवृत्तीनाथ महाराज

ही संतवचने सारे काही स्पष्ट करणारी आहेत. उन्मनी अवस्था ही ज्ञान, अज्ञान, बोलणे, अबोलणे यांच्या पलिकडील अवस्था आहे.

*"साच लटिके दोन्ही । न बोले जाहला मौनी ।*
*जे भोगिता उन्मनी । आरायेना ॥१२/२०९ ॥"*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

*"सद्गुरुकृपे केशवी पाही ।*
*बोलणे अबोलणे नुरेची काही ॥"*

– श्रीकेशवस्वामी

ही संतवचने साधकाच्या या अवस्थेचे वर्णन करणारीच आहेत.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *" ब्रह्मयाचे ज्ञान तयाचे अंतरी । सद्गुरुंचे घरी सद्गुरुदृष्टी ॥"* "आकाशाचा शब्दगुण गेला की आकाश हेच ब्रह्म आहे" असे श्रीदासराममहाराज कीर्तनात सांगत. अहो, पितळेला डाग येण्याचा गुणधर्म गेला की पितळ हेच सोने आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*" सांगे पितळेचि गांधिकाळिक । का जै फिटली होय निःशेख ।*
*तै सुवर्ण काई आणिक । जोडू जाईजे ॥ ४/६४ ॥"*

ब्रह्माचे ज्ञान होणे – ब्रह्मरूप होणे हे सारे गुरुकृपा झाली तरच शक्य आहे.





*" परब्रह्म म्हणिजे सकळापरते । तयासी पाहता आपणचि ते ।*
*हे कळे अनुभवमते । सद्गुरु केलिया ॥९/१/२९ ॥"*

– श्रीसमर्थ

*"हे असो दिठी जयावरी झळके । कि हा पद्मकरु माथा पारुखे ।*
*तो जीवची परि तुके । महेशेशी ॥१०/९ ॥"*

– श्रीज्ञानेश्वरमहाराज

ही संतवचने गुरुकृपेचे महत्व दाखविणारीच आहेत.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, ***"सद्गुरुचे घर देवदेवा नेणवे । साधुसंता ठावे गुरुकृपे ॥"*** ही गुरुकृपा होण्यासाठी गुरु राहतात कुठे हे आधी समजले पाहिजे. सद्गुरु हे आपल्या हृदयात राहतात. साधुसंतच हा मार्ग दाखवू शकतात.

श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *"दासरामा मौन श्रीगुरुचरणी । चाले निशिदिन डोळ्यावीण ॥"* रात्रंदिवस डोळे झाकण्याचा अभ्यास केल्याने अहोरात्र साधन साधल्याने श्रीदासराममहाराजांना श्रीगुरुचरणाचे ठिकाणी ब्रह्मयाचे ज्ञानाने मौनावस्था प्राप्त झाली.

अशी काही अवस्था श्रीमहाराजांच्या कृपेने मला व आपणा सर्वांना प्राप्त व्हावी अशी प्रार्थना माझे सद्गुरु श्रीदासराममहाराजांना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्रीदासराममहाराज प्रसन्न ।।

# आत्मारामपाठ

## अभंग २०

*सर्वसाधारण अठरा ते वीस।*
*अंगुळे निश्वास गती वाहे ।।१ ।।*
*क्रोधाग्नी संतापे होता बेसुमार।*
*छप्पन्नाचे वर गती वाहे ।।२ ।।*
*पंधरा अंगुळे निश्वास वहाता।*
*तरी ये स्थिरता सहजेची ।।३ ।।*
*द्वादश अंगुळे साधनी निश्वास।*
*समता चित्तास प्राप्त होय ।।४ ।।*
*एकादश अंगुळे जरी होय वहाती।*
*तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची ।।५ ।।*
*दशम अंगुळे निश्वास वहाता।*
*अक्षरे देखता दृष्टीपुढे ।।६ ।।*
*नवांगुळापासुनी साधी अष्टसिध्दी।*
*असे त्याचा अवधी द्वयांगुळी ।।७ ।।*
*एकचि अंगुळ वहाता निश्वास।*
*होय नादघोष सुस्वरेसी ।।८ ।।*
*जरी होय बंद ऐसा हा निश्वास।*
*दरवळे सुवास चहू ठायी ।।९ ।।*
*ऊर्ध्वमूख होता देखे साक्षात्कार।*
*दासराम स्थिर अलक्ष्यातु ।।१० ।।*

– दासरामगाथा अ.क्र.१६८४

श्रीदासरामगाथेत समाविष्ट असणाऱ्या सदानंदपाठातील हा अभंग आहे. सदानंदपाठ हा वेदशास्त्रपुराणांचे सार व संतांचे हृद्‌गद प्रगट करणारा आहे. गुरुकृपेचे फळ म्हणजे हा सदानंदपाठ आहे. श्रीदासराममहाराज या सदानंदपाठाबद्‌दल असे सांगतात, *''वेदशास्त्र पुराणांचे। सार हृद्‌गद संतांचे॥१॥ तो हा सदानंदपाठ। गुरुकृपा जे चोखट॥२॥ नाम जयाचे सर्वस्व। धन्य धन्य तो वैष्णव॥३॥ ऐशा संतांचे संगती। जेऊ अखंड पंगती॥४॥ दासराम बोधी सेवी। ब्रह्म अन्न मागे चवी॥४॥''*

वेदांना शास्त्रांना जे प्रमाण आहे असे सारभूत नारायण नाम, जे संसारात राहूनच साधता येते, जे संतांचे गौप्य – गुह्य – असून त्यांनी जे आपणासाठी प्रगट केले आहे, जे नाम श्रोत्र वाणी, चक्षू यांचे पैल अनुभवाला येणारे आहे, ज्या नामातून विश्व प्रगट झाले आहे व जे नाम विश्वाला व्यापलेले आहे, ज्या नामाच्या उच्चाराशी – ध्वनीशी – तादात्म्य झाले असता जाणीव नेणीवरहित खरे ज्ञान (वृत्तीरहित) प्राप्त होते, जे नाम एक वेळ अनुभवणेसाठी हजार जन्माची पुण्याई पाहिजे, ज्या नामाचा महिमा देवालाही कळलेला नाही, जे नाम चैतन्यरूप, सगुणब्रह्मरुप आहे, जे नाम तोंडाने घेता येत नाही तर फक्त जाणता येते, अनुभवता येते, ते नाम केव्हा कसे अनुभवाला येते हे सांगणारा हा सदानंदपाठ आहे.

आपला हा नि:श्वास जो सध्या अप्रमाण खाली येतो आहे, त्याला काही प्रमाण आल्याशिवाय आपल्याला हे नाम अनुभवता येत नाही. श्रीदासराममहाराज सांगतात, *''नि:श्वासी प्रमाण श्रवणी जे वचन। एक नारायण सार जप॥''* आपला नि:श्वास सध्या किती खाली येतो आहे, अभ्यासाने नि:श्वास खाली यायचे प्रमाण कमी झाले असता कसा कसा, काय काय अनुभव येतो, ते या अभंगात श्रीदासराममहाराजांनी सांगितले आहे. श्रीदासराममहाराज सांगतात, *''सर्वसाधारण अठरा ते वीस। अंगुळे नि:श्वास गती वाहे॥१॥*





सर्वसामान्यत: सामान्य माणसे ज्या क्रिया करण्यात दिवसातला बराचसा काळ घालवितात त्या काळात, सर्वसाधारणत: नि:श्वास १८ ते २० अंगुळे खाली येत असतो. दिवसातला बराचसा काळ आपण काय करत असतो हो ? एक खात असतो किंवा आज सकाळी काय खायचे, दुपारी काय खायचे किंवा रात्री काय खायचे हा विचार करत असतो. खायचा कंटाळा आला, पोट भरले की आपल्याला 'आधी पोटोबा मग विठोबा' या म्हणीप्रमाणे विठोबाची आठवण येत नाही, तर पोट भरल्यावर बोलायलाच सुचते. बोलायला कोण नसेल तर स्वगत चालू होते. मनातल्या मनात विचारांचे रवंथ सुरु राहते. या होणाऱ्या सर्वसाधारण क्रियांच्या काळात नि:श्वासगती १८ ते २० अंगुळ वाहते.

जागेपणी आणखी ज्या काही क्रिया करतो तेव्हा गती किती वाढते किंवा जेवून झोप लागली तर गती काय असते ? हा सारा विषय भगवान शंकरांनी पार्वतीमातांना जे शिवस्वरोदय शास्त्र सांगितले आहे, त्यात आलेला आहे. तो असा,

*''कायानगरमध्यस्तो मारुतो रक्षपालक:।*
*वेशे दशांगुल: प्रोक्तोनिर्गमे द्वादशांगुल:॥२२१॥*
*गमने तु चतुर्विशेन्नेत्रवेदास्तु धावने।*
*मैथुने पंचषष्टिश्चशयने च शतांगुल:॥२२२॥*
*प्राणस्य तु गतिर्देवि स्वभावादद्वादशांगुलम्।*
*भोजने वचने चैव गतिरष्टादशांगुलम्॥२२३॥*

यावरुन असे लक्षात येईल की कोणतेही मानसिक अथवा शारिरीक श्रम झाले की गती वाढते. झोपेत सर्वात जास्त १०० अंगुळे नि:श्वास खाली येतो. आपल्या इच्छा आकांक्षा पुऱ्या करण्याकरता होणारी प्राणाची धावाधाव आपल्या लक्षातच येत नाही. बरं, एवढे करून आमच्या इच्छा आकांक्षा पुऱ्या होतच नाहीत. त्या पुऱ्या झाल्या नाहीत की राग येतो व राग आला की भाता

किती जोरात मारावा लागतो, हे आपण अनुभवतोच. हा अनुभव मात्र आपणा सर्वांना येतोच. तेच श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत. *''क्रोधाग्नी संतापे होता बेसुमार। छप्पनाचे वर गती वाहे ।।''* राग आला की ५६ अंगुळे नि:श्वास खाली येतो. आपल्या लक्षात येईल की कोणताही विकार निर्माण झाला की गती वाढते. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हे सारे षड्विकार नि:श्वासगती वाढविणारेच आहेत. दिवसभर होणारे हे कामक्रोधांचे भडीमार व रात्री देह व मन थकून प्राप्त होणारी अज्ञानात्मक निद्रा हे दोन्ही प्राणाची गती – संसरणाची गती – नि:श्वासगती – वाढविणारेच आहे. या प्राणाला विश्रांतीची गरज आहे, हे आपणाला आपले प्राण जाईपर्यंत लक्षातच येत नाही. रात्रंदिवस नुस्ती तळमळच अनुभवाला येते. डॉक्टर सांगतात, आता विश्रांती घ्या. धावाधाव फार झालीय. मग आपण काय करतो? अंथरुणावर पडून राहतो. देह जखडला जातो, पण मनाचे काय ? ते दुप्पट वेगाने काम करते. डॉक्टरनी झोपेचे औषध दिले की झोप लागते. देहाला व मनाला विश्रांती मिळते पण देहाला, मनाला विश्रांती मिळण्यासाठी प्राण चौपट वेगाने धावत असतो. त्याला विश्रांती नाहीच. संसरण शांत होत नसल्याने हा संसार दु:खमूळच ठरतो. मग यातून आपणाला कोण खरी विश्रांती प्राप्त करुन देईल असा विचार डोकावू लागतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''संसार दु:खमूळ चहुकडे इंगळ ।*
*विश्रांती नाही कोठे रात्रंदिवस तळमळ ।*
*कामक्रोध लोभ खुणे पाठी लागले वोढाळ ।*
*कोणासी मी शरण जावू। दृष्टी देईल निर्मळ ।।''*

दैववशात एखादा संत महात्मा जर आपणाला भेटला व त्यांचेकडून सहज इंद्रिय दमन घडविणारे, मन शांत करणारे साधन जर प्राप्त झाले व तसे साधन आपणाला साधले तर, अंतर्मुखता प्राप्त होऊन जीवनाला स्थिरता प्राप्त व्हायची शक्यता. हेच श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत. *''पंधरा अंगुळे निश्वास वहाता। तरी ये स्थिरता सहजेची।।''*





सद्गुरुंकडून प्राप्त झालेले साधन जर आपण दैनंदिन साधणेचा प्रयत्न केला तर बहिर्मुख असणारे जीवन अंतर्मुख होईल. जीवनाला थोडीशी स्थिरता प्राप्त होईल. साधनाने हा जेव्हा अनुभव येईल, तेव्हा आपला नि:श्वास १५ अंगुळे खाली येत आहे असे ओळखायला हरकत नाही.

साधनाची गोडी लागून जर साधनाचा अभ्यास वाढला, संतांना अपेक्षित खरे साधन जर सुरु झाले तर प्राप्त होणारा अनुभव श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत, *''द्वादश अंगुळे साधनी निश्वास। समता चित्तास प्राप्त होय।।''* साधनाचे अभ्यासाने देहाचा व बाह्यमनाचा लय जागृतीत साधला असता, साधनात प्रगती साधून नि:श्वास बारा अंगुळावर येईल व चित्ताचे समत्व जे योगाचे सार आहे ते साधेल. श्रीज्ञानेश्वरमहाराज सांगतात,

*''अर्जूना समत्व चित्ताचे। तेचि सार जाण योगाचे।*
*जेथे मन आणि बुध्दीचे। ऐक्य आथी।। २/२७३ ।।''*

१२ अंगुळे नि:श्वासगती राहणे ही श्वसनाची स्वाभाविक गती आहे. साधनाचे अभ्यासाने ही गती जशी सूक्ष्म होईल तसतसा आत्मारामाचा अनुभव वाढत जातो.

*''स्वभावे प्राण अंगुळे बारा। निर्गमागमे संचारा।*
*अखंड पीडे नासीकेद्वारा। तेणे रघुवीरा सेविले।। ''*

हे श्रीनाथमहाराजांचे वचन व

*''नासापुटौनी वारा। जो जातसे अंगुळे बारा।*
*तो गचिये धरुनी माघारा। आतू घाली।। ६/२३६ ।।''*

हे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन, या दोन वचनांचे आधारे हाच निष्कर्ष निघतो.

नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण साधनाचे अभ्यासाने ११ अंगुळे झाले तर काय अनुभव येतो हे श्रीदासराममहाराज पुढे सांगतात, *''एकादश अंगुळे*

*जरी होय वहाती। तरी काव्यस्फूर्ती आत्मयाची ।।''* देहाचा व बाह्यमनाचा लय साधल्यानंतर निर्विचार अवस्थेत होणारी ही काव्यस्फूर्ती आहे म्हणून हिला, 'आत्मयाची काव्यस्फूर्ती' असे संबोधले आहे. म्हणून संतकाव्य हे 'वाङ्मय' या सदराखाली मोडत नाही. वाङ्मय हे वाचा आणि मन यांनी युक्त असते. आपण मनाने बुध्दी चातुर्याने 'र' ला 'र' आणि 'ट' ला 'ट' अशी अक्षरे जुळवून जे काव्य करतो ते वाङ्मय या सदराखाली येते. म्हणून आपले काव्य वेगळे व संतकाव्य हे वेगळे. श्रीतुकाराममहाराज सांगतात, *''जोडिली अक्षरे। नव्हती बुध्दीची उत्तरे।। तुका म्हणे झरा। आहे मुळीचाची खरा ।।''* म्हणून संतवाङ्मयाचा बुध्दीचातुर्याने केलेला शब्दार्थ व त्याचा अनुभवी व्यक्तीने केलेला अर्थ यात जमीन अस्मानाचा फरक राहतो. ही आत्मयाची काव्यस्फूर्ती श्रीदासराममहाराजांना वयाचे ५ वे वर्षी झाली होती, हे केवढे विशेष आहे. श्रीदासराममहाराजांचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शब्दात करावयाचे झाले तर ते असे करता येईल,

*''तैशी दशेची वाट न पाहता। वयसेचिया गावा न येता।*
*बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते।।* ६/४५३ *।।''*

दहा अंगुळे नि:श्वास खाली आला तर काय अनुभव येतो हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, *''दशम अंगुळे नि:श्वास वहाता। अक्षरे देखता दृष्टीपुढे ।।''* 'दहा' अंगुळे नि:श्वास खाली आला की आत्मानुभूती येते, अक्षर आत्मा ज्ञानदृष्टीपुढे येतो.' असे श्रीदासराममहाराज यांनी त्यांचे प्रवचनात सांगितले आहे.

अक्षर चैतन्य, चैतन्याच्या अक्षरात दृष्टीपुढे साकारते. प्रकाशमान अक्षरे दृष्टीपुढे प्रगट होतात. याचा अनुभव श्रीदासराममहाराजांना आलेला आहे. श्रीगुरुलिंगगीतेतील काही पदे त्यांना प्रकाशरुपाने दृष्टीपुढे (ज्ञान) दिसली आहेत. श्रीगुरुलिंगगीतेतील 'जगवू मुट्टीवू' हे पद श्रीदासराममहाराजांना प्रकाशाक्षर स्वरुपात दिसले आहे. वेदमंत्र ऋषीमुनींना





श्रुत झाले किंवा दृष्टीपुढे आले. ऋषीमुनी हे काही वेदाचे कर्ते नव्हते तर ते द्रष्टे आहेत. या काही कपोलकल्पित कथा नसून ते त्रिकालाबाधीत सत्य आहे. श्रीदासराममहाराजांचे बाबतीत आपण हे अनुभवले आहे.

नऊ अंगुळापासून दोन अंगुळेपर्यंत साधनाभ्यासाने नि:श्वास खाली आला असता काय अनुभव येतात हे श्रीदासराममहाराज पुढे सांगत आहेत *''नवांगुळापासुनी साधी अष्टसिध्दी। असे त्याचा अवधी द्वयांगुळी ।।''* नऊ अंगुळापासून दोन अंगुळेपर्यंत प्रत्येक अंगुळाला एक सिध्दी याप्रमाणे आठ अंगुळांना अष्टमहासिध्दींचा लाभ त्या साधकाला होतो. १) आणिमा – शरीर सूक्ष्म होणे. २) महिमा – शरीर मोठे होणे ३) लघिमा – शरीर हलके होणे ४) प्राप्ती – सर्व प्राण्यांच्या इंद्रियांशी अधिष्ठानी देवतांच्या रुपाने संबंध जोडणे ५) प्राकाश्य – ऐहिक आणि पारलौकिक स्थानी भोग आणि दर्शन यांचे सामर्थ्य ६) ईशिता – मायेची ईशाच्या ठायीची प्रेरणा ७) वशिता – आसक्त न होणे ८) प्राकाम्य – इच्छा करावी ते सुख प्राप्त होणे. या त्या अष्टमहासिध्दी होत. ज्यांचे सिध्दींकडे लक्ष असते किंवा ज्यांचा साधनाचा हेतू सिध्दी प्राप्त करणे हाच असतो ते सिध्दीत अडकतात. ते परमेश्वरापर्यंत पोहोचतच नाहीत. संतमहात्मे मात्र या ऋध्दीसिध्दींना उपाधीच मानतात. म्हणून ते ढुंकूनही या ऋध्दीसिध्दींकडे पहात नाहीत. *''ऋध्दीसिध्दी फुकाचसाठी। कोणी तयाकडे न पाहे रे।।''* हे संतवचन व *''ऋध्दीसिध्दी निधी अवघीच उपाधी''* व *'' देखे ऋध्दी सिध्दी तयापरी। आली गेली 'से'न करी।। तो विगुंतला असे अंतरी। महासुखी।।* २/३६२ *।।''* ही श्रीज्ञानेश्वर–महाराजांची वचने, ही संतवचने हे स्पष्ट करणारीच आहेत. म्हणून या अभंगातसुध्दा श्रीदासराममहाराजांनी या ऋध्दीसिध्दींना फारसे महत्व दिलेले नाही.

एकच अंगुळ नि:श्वास खाली येत असेल तर काय अनुभव येतो हे श्रीदासराममहाराज असे सांगतात, *''एकचि अंगुळ वाहाता निश्वास। होय*

*नादघोष सुस्वरेसी ॥''* कानावर अनुहात नाद येणेसाठी – नादश्रवण होणेसाठी – नाम जाणणेसाठी किती अभ्यास व्हावयास हवा हे यावरुन लक्षात येईल. नादश्रवणी तदाकार होणे हे वाटते एवढे सोपे नाही.

नाकातल्या नाकात जीवन वाहू लागले की काय अनुभव येतो, हे श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगत आहेत. *''जरी होय बंद ऐसा हा निश्वास। दरवळे सुवास चहुठायी ॥''* जेव्हा नाकातल्या नाकात जीवन वाहते तेव्हा अनामिक सुगंधाचा अनुभव त्या साधकाला प्राप्त होतो. माझे ज्येष्ठ बंधू ती. अनल (ती. तात्या) यांचे विवाहानंतर आम्ही सर्व श्रीक्षेत्र आप्पाची वाडी येथे आमचे ती. प. पू. दादांचे बरोबर श्रीहालसिध्दनाथांचे दर्शनास गेलो असता, घुमटांमध्ये आमचे ती. प. पू. दादा व श्रीहालसिध्दनाथ यांचे भेटीत प्रगट झालेला अनामिक सुगंध सर्वांनी अनुभवला. अभ्यासाने नि:श्वास खाली येण्याचे प्रमाण अत्यल्प राहिले असता त्या साधकास अमृतपान होत असल्याने त्याला अन्नपाण्याची गरज राहत नाही. शिवस्वरोदय शास्त्र सांगते,

*''द्वादशे हंसचारस्थ गंगामृतरसं पिबेत्।*
*आनखाग्रं प्राणपूर्णे कस्य भक्ष्यं च भोजनम्॥* २२७ ॥''

साधकाच्या या अवस्थेचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराज असे करतात,

*'' ताहाने ताहानचि पियावी। भुकेलिया भूकचि खावी।*
*अहोरात्र वावी। मवावा वारा॥* १२/६३ ॥''

तर श्रीनाथमहाराज हे साधक वर्णन असे करतात,

*''अंगुळे बारा बारा। जिणावया जी वारा।*
*रात्रंदिवस शरीरा। अभ्यासद्वारा आटिती॥* ६/३८० ॥

*क्षुधेने खादली भूक। तृषा तहान प्याली देख।*
*जिणोनिया सुखदु:ख। अतिनेटक निधी॥* ६/३८१ ॥''





श्रीदासराममहाराज पुढील कडव्यात सांगतात, *''ऊर्ध्वमुख होता देखे साक्षात्कार। दासराम स्थिर अलक्ष्यात्॥'' ''सोहं तेही अस्तवले''* या अवस्थेत आकाशरुप जीवन ऊर्ध्वमुख होऊन डोळ्यातील दृश्य नाहीसे होते व द्रष्टा हाच दृश्य होतो. सर्वत्र चैतन्यच साक्षात्काराला येते. लक्ष्य मायेत अलक्ष्य होऊन, अलक्ष्य चैतन्य लक्ष्य होते. श्रीज्ञानेश्वरमहाराज साधकाच्या या अवस्थेचे वर्णन असे करतात,

*''सोहं तेही अस्तवले। जेथ सांगतेची सांगणे जाले।*

*द्रष्टत्वेसी गेले। दृश्य जेथ ॥* १५/५४२ ॥''

असा काही चैतन्याचा अनुभव मला व आपणा सर्वांना साधनाने प्राप्त व्हावा अशी प्रार्थना माझे सद्‌गुरु श्रीदासराममहाराजांना करतो व येथेच थांबतो.

卐 卐 卐

।। श्री दासराममहाराज प्रसन्न ।।

## अभंगवचनामृत

(कंसात दिलेले क्रमांक हे श्रीदासरामगाथेतील अभंग क्रमांक आहेत)

### आत्मा

१) *परमात्मा निश्चळ पूर्ण । आत्मा भासे गतिमान ।।* (१३२१)

२) *कार्य कारण कर्ता एक आत्माराम ।*
*उपाधिने भ्रम वाढविला ।।*
*संकल्प आकाश विकल्प हा वायू ।*
*दृश्य देखे कार्यू चंचळाचे ।।* (१६४७)

३) *जन्ममरणाचे पैल । एक आत्मा घननीळ ।*
*जन्ममरण देखे देही । तरीच होशील विदेही ।।* (३७)

४) *देखणा हा जेव्हा विसरला देखणे ।*
*तेथे आपुलेपणे भेटी झाली ।।*
*आपुलिया आपण आपुलिये ठायी ।*
*भेटो आले देही निजत्वेसी ।।* (३२१)

५) *सर्वाठायी आत्मा आपणात सर्व ।*
*देखोनी हा जीव देव होय (स्वये) ।।* (२२८)

### आनंद

६) *दासराम सहजानंद । सेवी आनंदीआनंद ।।* (९३३)

### उन्मन

७) *नि:शब्दामाझारी प्रवेशता मन ।*
*होतसे उन्मन सुखरुप ।।* (२११)

८) *ज्ञानमयी निद्रा तेची गा उन्मनी ।*
*दासरामा धणी आत्माराम ।।* (१४४५)

### उपाधी

९) चंचळाचे गुणे। झाले उपाधीचे लेणे। (९९४)

१०) टाकिता उपाधी। लागे सहजसमाधी॥ (४२६)

### ओंकार

११) सकार हकार काढूनी टाकिला।
ॐकार उरला शब्दघोष॥ (२७६)

१२) प्रणव उदेला कोठून।
सांगा सांगा ते ठिकाण।
परेपैल हरिवाणी।
झाला उद्भव तेथोनी॥(४८४)

### काकीमुख

१३) काकीमुखातोनी निघे जो उच्चार।
नाद मंद्र स्वर बोलती ज्या॥
चंद्रसूर्य जेथे विरोनिया जाती।
एकवीस रहाती स्वर्ग मागे॥ (२४२)

### गुरुकृपा

१४) गुरु कृपा करी तया कोण मारी।
गुरु जै संहारी कोण राखी॥ (११३८)

### चित्कला

१५) तेथे हे चित्कळा सतरावीची कोर।
जेथे सूर्यचंद्र मावळती॥ (१२७८)

१६) चित्कळा ते लाट चैतन्यसागरी।
प्रकाशाभीतरी कोर देखे॥(१२९१)





१७) चित्कळा ते देखे शिवाचे मस्तकी।
आदिशक्ती सुखी होय जेथे॥ (१२९२)

१८) चित्कळा देखिल्या नुरे देहभान।
आटले गगन नामामाजी॥(१२९०)

१९) सुषुप्तीचे देखे अधिष्ठान आत्मा।
दावितसे समा चित्कळा ते॥(१२८०)

२०) जीवना आधार देखिजे चित्कळा।
समत्वे जिव्हाळा दावितसे॥(१२७५)

२१) प्राणावरी कैसी राहिली चित्कळा।
दाविते जिव्हाळा जीवनाचा॥
दाविते चित्कळादेही जीवभाव।
महाशब्द अपूर्व प्राण पै गा॥(१२८४)

२२) मनोन्मन होण्या चित्कळा कारण।
दासराम शरण तेथे झाला॥(१२८९)

२३) प्राणाचे जीवन मनाचे मनत्व।
जयायोगे स्वत्व प्राणिया ये॥ (१४३९)

२४) चित्कळेचेमुळे प्राणिया ये स्वत्व। देखिजे हा भाव देहामाजी॥
प्रणवापासोनी जहाली चित्कळा। जाणे तो आगळा योगीराव॥
चित्कळेचे वरी मनाची धारणा। दासरामा खुणा संत संगे॥ (१४४७)

२५) देखे सोहंभाव कैचा वायुरूप।
सद्गुरुस्वरुप सर्वांघटी॥
अग्निस्थानी मिळे चैतन्य चित्कळा।
प्रकाश उजाळा ब्रह्मांडासी॥ (१२७७)

२६) *चित्कळे दाविली कैची आदिशक्ती।*
*जेथे दिनराती उरली नाही।।*
*ओवरीत नाही दिवस ना रात।*
*दासराम स्वस्थ चित्त झाला।।* (१२८२)

२७) *गगन प्रणवावरी महाशून्य ओवरी।*
*निर्गुणाची सरी उपरी त्या।।*
*महाशून्य ओवरी दाविते चित्कळा।*
*दासरामा जिव्हाळा चैतन्याचा।।* (१२८३)

## चिदाकाश

२८) *त्रिपुटी निरास निजत्व प्रकाश।*
*जेथे चिदाकाश आकारिले।।* (१३३०)

## चिद्रुप

२९) *रामकृष्ण हरी सार। दृश्य अपार चिद्रुप।।* (१३५४)

३०) *शब्द शून्यत्वे चिद्रुप। संकल्प हा दृश्यमूल।।* (१३५७)

३१) *सुखदुःखासी कारण। चिद्रुपात्मक विकृत जीवन।।* (९७)

३२) *चिद्रुपी या वाढे द्वैत। सुखदुःख हेताहेत।।* (१३६४)

३३) *चिद्रुपामाझारी वाढे द्वैताद्वैत।*
*सुखदुःख हेत ब्रह्मी कैचा।।* (१४२७)

## चैतन्य

३४) *सर्व विश्वामाजी असे जे सामान्य।*
*तेचि असामान्य दासरामी।।*(११३२)

३५) *चिदाकाशामाझारी चैतन्याची परी।*
*तेथे नाही परी दुजी काही।।* (१२७४)





## जन्ममरण

३६) *सत्यावरी जे का भासाची विकृती।*
*तयासी म्हणती जन्म बापा।।* (७४)

३७) *विकृती आहे ज्यात। तया आहे आदी अंत।*
*सत्य नोहे भास। कैचे जन्ममरण त्यास।*
*सत्य हे अढळ। तेणे निर्मिले सकळ।।* (४३९)

३८) *सोहंरूप वायुपुत्र हा असे जयापाठी।*
*तया नाही पुनर्जन्म जोडी जगजेठी।।*(५०५)

३९) *चुकविजे जन्ममरण। ऐशा कर्मा नाव पुण्य।*
*पापकर्म तेची जाण। जेणे चुकेना बंधन।।*(४६९)

४०) *अखंड जीवन अखंड स्मरण।*
*जेथे जन्ममरण नाही नाही।।* (१६०४)

४१) *राम होवोनिया रामभक्ती करा।*
*चुकवोनी फेरा गर्भवास।।* (४६८)

## त्याग

४२) *अहंकार त्यागी तोचि जाणा त्यागी।*
*येर सर्व ढोंगी जाणावे ते।।*(४६४)

## दशमद्वार

४३) *दशमद्वार ओलांडिता। सहजस्थिती येई हाता।*(२७२)

४४) *दशमद्वारापैल मिसळता प्राण। सहज होय पूर्ण ब्रह्मरूप।।*(२३६)

## देवपण

४५) *देऊळाभोवती घिरट्या घालोनी।*
*मेळविला कोणी हरी सांगा।।* (११०३)

४६) *मीपण सांडोनी ओळखी मीपण ।*
*तरी देवपण प्राप्त होय ।।* (४७२)

**धर्म**

४७) *अवघाची झाला चक्षू । आत्मा आत्मपणे लक्षू ।।* (१२९९)

४८) *चक्षुरूप हरी तोचि निजधर्म । तेथे दासराम मौनावला ।।* (१४३५)

४९) *जेणे योगे राहे मनाचे स्मरण ।*
*तेचि जाण खूण स्वधर्माची ।।* (१४४०)

**नयन**

५०) *महाशून्य मूस पंचभूत आटणी ।*
*वायुस्वरुपिणी हृदयामाजी ।।*
*पृथ्वी आप तेज गेले ते ग्रासोनी ।*
*देखिजे नयनी वायुरूप ।।* (१४०३)

५१) *वारियाने गिळले हो आपणा आपण ।*
*निःशब्दाचा शब्द करुनी केला त्याचा नयन ।।* (१२४१)

**नाम**

५२) *सदा नामजप करी तरी कोण ।*
*सांगा निवडोन मायबाप ।।* (१११०)

५३) *निःश्वासी प्रमाण श्रवणी जे वचन ।*
*सार नारायण जप एक ।।* (१६६९)

५४) *हृदयात झाली वायुची घासणी । कंठात उदेला ॐकार वह्नी ।*
*नामाचा बिंदू घडला गे माये । अंतर बाहेर प्रकाशे स्वये ।।* (४८९)

५५) *कंठामाजी देखे अनहत नाद ।*
*वरी तो आनंद तेजोरूप ।।* (१३९७)





५६) *श्रोत्र वाणी चक्षू याचे पैल नाम ।*
*जेथे नादब्रह्म अनिर्वाच्य ।।* (१७८)

५७) *निर्विकल्प नाम । तेचि जाणा परब्रह्म ।।* (१४५)

५८) *श्वासोच्छ्वासी वेळ तया ग्रासी काळ ।*
*तयाचिया पैल नाम आहे ।।*
*म्हणोनी तयासी काळवेळ नाही ।*
*उध्दारची होई साधिलिया ।।* (१६७१)

५९) *हकार निवृत्ती त्रिगुण आटणी ।*
*नामगती भरणी होता साधे ।।* (८६)

६०) *तोचि जाणावा धार्मिक । ज्याचे मुखी नाम एक ।* (१७२)

**परब्रह्म**

६१) *ते जाणावे केवळ ब्रह्म । जेथे नुरे समविषम ।*
*तेथे नाही येणे जाणे । नुरे जाणणे नेणणे ।।* (८४)

**परमार्थ**

६२) *प्राणापानामाजी मनाचे मिलन । परमार्थ पूर्ण तया ठाया ।।* (१७०६)

**पहाणे**

६३) *आकार पाहणे द्वैताचे देखणे ।*
*विसरोनी रहाणे आपणासी ।।*
*आपणा पाहता आकार उरेना ।*
*बोलाया राहेना पहाता कोणी ।।* (१३११)

६४) *आपणा पहाता आकार उरेना ।*
*जेथे पहाणेपणा पहाणे आले ।।* (१३३१)

६५) *अखंड अद्वैती पहाणे आपणा।*
*तयाते म्हणेना पहाणे कोणी ॥*(१३१०)

**प्रवृत्ती/निवृत्ती**

६६) *प्रवृत्ती जाणीव शून्य ते नेणीव।*
*तया पैल भाव निवृत्तीचा ॥*(११७१)

६७) *प्रवृत्ती बडबड शून्य वाचा मौन।*
*करणी ते साधन निवृत्तीचे ॥*(११७७)

६८) *आकार प्रवृत्ती निराकार शून्य।*
*तयावरी धन्य निवृत्ती ते॥* (११७१)

६९) *प्रवृत्तीसी अंध डोळा उघडीला।*
*आनंद जोडिला निवृत्तीचा॥* (१७१३)

**भजन**

७०) *भकारी विरावी जनेंद्रियवृत्ती। भजन बोलती याचिलागी॥* (३४)

**भक्त / अभक्त**

७१) *विभक्तता अहंपणी। निजत्वाचे विस्मरणी।*
*निजस्मरणी होय भक्त। जेथे नाही द्वैताद्वैत ॥*(१२९८)

७२) *नव्हतेची ऐसा होवोनिया ठेलो।*
*तुझा भक्त झालो एकाएकी ॥*(१७५२)

**भक्ती**

७३) *चिदचिदग्रंथी विराम पावती।*
*जये ठायी भक्ती उपजो लागे ॥*(३५)

**रामकृष्ण**

७४) *दासरामी रामकृष्ण। जे का जाहले चिदगुण॥* (१००९)





७५) *रामकृष्ण जरी हंसस्थिती आले।*
*परमहंस झाले रामकृष्ण॥* (११४२)

७६) *वारियाची बदले चाल। तरी होती फार हाल।* (११४६)

**लळीत**

७७) *नाम साधे श्वासोच्छ्वासी। घडी घडी अहर्निशी।*
*दास म्हणे हे लळीत। बोलियेले साधुसंत ॥*(८००)

**शब्द / नि:शब्द**

७८) *अढळ स्मरण शब्द गतीमान। शून्य ते सगुण शब्दरूप॥*
*निर्गुणापासोनी जहाले सगुण। सगुणी त्रिगुण संभवले ॥*(५०)

७९) *डोळा तो गगन नाद तोचि कान।*
*शब्दाचे स्फुरण जिव्हारूप ॥*(१३१७)

८०) *शब्दातुनी निघे गती। पुढे वाऱ्याची प्रचिती ॥*(१५९१)

८१) *निश्चळ ते पूर्ण घन। परब्रह्म निरंजन॥*
*तेथे शब्द हा चंचळ। दृश्य तत्वांचे हे मूळ॥*
*शून्याठायी जाला शब्द। शून्य चंचळ प्रसिध्द॥*
*तेथे जाहले पाहणे। आपणासी द्वैतपणे॥*
*दासरामी हा विचार। दृश्यादृश्य परमेश्वर॥* (१३२२)

८२) *शब्द ते सगुण अशब्द निर्गुण।*
*व्यक्ताव्यक्त शून्य प्रकृती ते ॥*(२८८)

८३) *शब्दाशब्द देखे प्रकृती ब्रह्माची।*
*लिला भगवंताची चिंतनीय॥* (५१)

८४) *आहे नाही लटिके दोनी। सारिखे जे असुनी नसुनी।*
*परमात्मा तो नि:शब्द। शब्दाशब्दी जीव बध्द ॥*(३८)

८५) *निःशब्द अशब्द शब्दांचे मिश्रण ।*
*तेथेचि चैतन्य उदय झाला ।।*(५४)

८६) *शब्द निःशब्दाची सांगड कीर्तन ।*
*पावे समाधान गुरुकृपे ।।*(१७९६)

**शून्य**

८७) *शून्याचा हा खेळ विश्वाचा पसारा ।*
*अनुभव सारा शून्यामाजी ।।*(४८)

८८) *चक्षुरूप आत्मा भरला सर्वाठायी ।*
*शून्य दृष्टी लाही शून्य झाली ।।*(१६११)

८९) *शून्याचे विवरी दृष्टीचे जे अग्र ।*
*तेचि महाद्वार नवापैल ।।*
*तेथे चाले नित्य हरीचे कीर्तन ।*
*करिता श्रवण ब्रह्मप्राप्ती ।।* (१३३४)

९०) *शून्य चंचळ चंचळ । आत ब्रह्म ते निश्चळ ।।* (१२९८)

**सगुण निर्गुण**

९१) *सगुणावाचोनी अकळ निर्गुण ।*
*सुलभ ते खूण सगुणाची ।।* (१२२९)

९२) *शुध्द जो चिद्‌गुण जाणावे निर्गुण ।*
*जाले बहुगुण चंचळाने ।।*(२४३)

९३) *जेथे नाही गुण देखे ते निर्गुण ।*
*निरालंब खूण मार्ग ज्याचा ।।*(१५९७)

९४) *निर्गुण सगुण जेथोनी उदेले ।*
*देखताची झाले एक दोनी ।।*(१२२४)





९५) *निर्गुण सगुण रूप एकी एक ।*
*दाविती कौतुक हरी माझा ।।*(१२२५)

**समाधान**

९६) *हकार सकारी मिळालिया जाण ।*
*होय समाधान समतेचे ।।*(१०७१)

**संकल्प/विकल्प/मन**

९७) *मन ज्याला आवरेना ।*
*तोचि सांसारिक जाण ।*
*मन ज्याच्या हाती आले ।*
*दासा चित्त स्थिर झाले ।।* (९६९)

९८) *जेथे एक अग्र होय तुझे मन ।*
*जाणावे सुजाण चित्त तेची ।।* (१२८७)

९९) *गतीवरी मन मनावरी गती ।*
*तेथे ऐक्य स्थिती गुजभाव ।।* (१०७०)

१००) *दास म्हणे केल्या मनावरी मात ।*
*खरा परमार्थ दूर नसे ।।* (२७५)

१०१) *संकल्प मारोनी होई निर्विचार ।*
*पावे निर्विकार मुद्रा तेची ।।* (१९९)

**स्मरण**

१०२) *चिद्रुप ते स्मरण । जाले सगुण निर्गुण ।।*(९९६)

१०३) *हरिचे स्मरण नुरवी विस्मरण ।*
*रुक्मिणीरमण तुष्ट होय ।।* (१३७७)

१०४) *महाकारणदेही अखंड स्मरण।*
*अद्वय भजन हरिकथा॥* (१५०२)

१०५) *अखंड स्मरण शब्दाने कळेना।*
*पैल ज्ञानाज्ञाना होता कळे॥*(४९)

१०६) *अर्धमात्रेउपरी गगनाचे वरी।*
*अहंतेची उरी उरली नाही।*
*जाणीव नेणीव ज्ञानाज्ञान आटले।*
*पापपुण्य सरले दासरामा॥*(१४३३)

१०७) *स्मरण हा देव शब्दाचिया पैल।*
*दासरामा केवल साधन ते॥*(१५९३)

१०८) *स्मरणाचा प्रकाश बरा।*
*दावी अज्ञानांध:कारा॥* (१३०६)

卐 卐 卐